म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्र
सं क्र. ८४६
REFBK-0024200
REFBK-0024200

६४६
24200
१४।६।८४

प्र वा स व र्ण न

# तरंगणारे शहर

रमेश मंत्री

REFBK-0024200

मेनका प्रकाशन प्रा. लि.

मेनका प्रकाशन . ३२९
आवृत्ती पहिली : १९८४
© १९८४ रमेश मंत्री,
'श्रीधर', हनुमान रस्ता,
विलेपार्ले, मुबई–४०००५७

प्रकाशक
पु. वि. बेहेरे
मेनका प्रकाशन, प्रा. लि.
५६० नारायण, पुणे–३०

मुद्रक
पी. बी महागरे
प्रशांत मुद्रणालय,
१०७१, बुधवार, पुणे २

मूल्य ३५ रुपये

# तरंगणारे शहर

रमेश मंत्री

## लेखानुक्रम :


१ कालव्यात आणि काव्यात तरंगणारे शहर : व्हेनिस
२. मानवाचे महाकाव्य : अथेन्स
३. अद्भुततेचा गाव : होनोलुलू
४. सबंध जगाची विभागणी करणारे : बर्लिन
५ एकाच घटनेने जगप्रसिद्ध झालेले : डलास
६ पाश्चात्य जगाचे सांस्कृतिक पुनरुज्जीवन करणारे : फ्लॉरेन्स
७ युरोपची राजधानी : ब्रुसेल्स
८ अमेरिकेतील सर्वात प्रेक्षणीय शहर : लॉस एंजेलिस
९ क्रौर्याचे आगर–नाजूक सौंदर्याची गंगोत्री : रोम
१० खरेदीदारांचा स्वर्ग : हाँगकाँग
११. चैतन्यशाली–प्रमाथी : शिकागो
१२ धर्म आणि विलास यांचा संगम : बँकॉक
१३ अनेक जागतिक उच्चांक तोडणारे महानगर : टोकियो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ. शाखा (स्थल प्रत)

## कालव्यात आणि काव्यात तरंगणारे रसिले शहर

# व्हेनिस

रोमच्या हॉटेलमधून एका दुपारी निघालो स्टेशनवर आलो तिथून व्हेनिसला जाऊन परत यायचे होते म्हणून एका लहानशा बॅगेत एक-दोन दिवस पुरतील एवढे कपडे घेतले आणि बाकीचे सामान स्टेशनवरच्या लॉकअप्‌मध्ये ठेवले व्हेनिसचे वेळापत्रक पाहिले. हॉटेलचा एक दिवसाचा खर्च वाचवायचा, तर गाडीने रात्री प्रवास करायला हवा होता रोम ते व्हेनिस ह्या आगगाडीच्या प्रवासाला साधारण साडेआठ ते नऊ तास लागतात माझा सबंध युरोपचा रेल्वेचा पहिल्या वर्गाचा पास होता तरीही मिलान ते रोम या प्रवासात मला पहिल्या वर्गातही जागा मिळाली नव्हती झोपायला बर्थ तर राहोच, पण बसायलाही मिळाली नव्हती. पहिल्या वर्गाच्या कॉरिडॉरमध्ये माझ्या बॅगेवर बसून मी मिलान ते रोम हा प्रवास केला होता त्यामुळे रोम ते व्हेनिस या प्रवासात तरी जागा मिळेल की नाही याची धास्तीच होती चौकशीच्या खिडकीजवळ येऊन विचारले, 'व्हेनिसचे रात्रीच्या गाडीचे रिझर्व्हेशन मिळेल का?' माझा प्रश्न इंग्रजीत होता पण ऐकणाऱ्याला इटालियनशिवाय कोणतीही भाषा येत नव्हती त्याने जो काही इटालियन शब्द उच्चारला, त्याचा अर्थ 'काय?' असा असावा असा मी अंदाज केला मी पुन्हा तो प्रश्न केला तेव्हा त्याने 'व्हेनिझिया?—व्हेनिझिया?' असा प्रतिप्रश्न केला. व्हेनिसला व्हेनिझिया असे इटालियनमध्ये म्हणतात एवढाच मला त्यावरून बोध झाला पण माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. त्या माहितीच्या कौंटरवर पाच खिडक्या होत्या त्यापकी एकावर English [illegible] खिडकी रिकामी होती. बाकीच्या तीन वर (Huso) हा इटालियन 'बंद' या अर्थी शब्द होता आणि एकमेव उघड्या खिडकीतील माणसाला इंग्रजी येत नव्हते. मी देवावर भार टाकून गाडी

सुटण्याच्या वेळीच यायचे ठरवून स्टेशनसमोरच्या फूटपाथवरच्या उपहारगृहात जाऊन बियर घेत बसलो इटलीमध्ये कॉफीपेक्षा बियर स्वस्त आहे आणि बियर पिण्यात अधिक वेळ घालवता येतो

रात्रीची व्हेनिस एक्स्प्रेस सुदैवाने फारशी भरलेली नव्हती पहिला वर्ग तर अर्धा-अधिक रिकामाच होता आमच्या डब्यातले उतारू बव्हंशी प्रवासी होते आणि त्यातले बहुतेकजण अमेरिकन होते एका अर्थी मला बरे वाटले, कारण निदान इंग्रजीतून संभाषण शक्य होते या अमेरिकन म्हाताऱ्या प्रवास करण्यात आणि बडबड करण्यात जबर असतात माझ्या डब्यातल्या चार उतारूंपैकी दोघीजणी साठीच्या आसपासच्या अमेरिकन बायका होत्या. त्यांनी मला भारताविषयीचे अनेक प्रश्न विचारून इतके भंडावून सोडले की याच बायका केवळ इटालियन किंवा स्वीडिश भाषा जाणणाऱ्या असत्या तर मला बरे वाटले असते तुमच्या देशात शीख किती प्रमाणात आहेत ? हिंदूमध्ये वैष्णव आणि शैव यांचे शेकडा प्रमाण किती ? तुम्ही सारे एकच भाषा का बोलत नाही ? साधू लोक रोग बरे करतात तर तुमच्या देशात डॉक्टरांचे कसे चालते ? रस्त्यावर किंवा फूटपाथवर झोपणाऱ्या भारतीयांना थंडीचा त्रास होत नाही काय ? (वैतागाने मी मनातल्या मनात म्हटले, साल्यांनो तुम्हाला दया येत असेल तर तुम्ही त्यांच्याजवळ जाऊन झोपा ना ! ) रात्री बारा वाजता त्या दोघींनी सिगरेटी ओढल्या आणि अखेरीस त्या झोपी गेल्या

पहाटेला कुठले तरी स्टेशन आले आणि मला जाग आली माझी बॅग माझ्या-जवळ सुरक्षित होती आमच्या खुर्च्या ओढून साधारण पाय पसरून झोपण्याची व्यवस्था होती, त्यामुळे मला चांगली झोप लागली होती कोणते स्टेशन आले ते न पाहताच मी पुन्हा झोपी गेलो सकाळी साडेआठच्या सुमाराला ' व्हेनिझिया, व्हेनिझिया ' असा ' अल्ला हो अकबर ' च्या थाटात गाडीत शिरलेल्या इटालियन हमालांनी पुकार केला, आणि मी पुन्हा जागा झालो पाहतो तर त्या अमेरिकन म्हाताऱ्या पूर्वीच उठून कपडे बदलून, लिपस्टिक, रूज लावून तयार होऊन बसल्या होत्या या वयात त्या कुणाला खूष करायला निघाल्या होत्या राम जाणे—किंवा ख्रिस्त जाणे !

व्हेनिस हे त्या गाडीचे अखेरचे स्टेशन होते त्यामुळे रेल्वेचे दोन नोकर ' ऑल आऊट ' असे इंग्रजीतून आणि त्याच अर्थी इटालियन व फ्रेंचमधून ओरडत डब्या-डब्यातून फिरत होते त्या अमेरिकन म्हाताऱ्यांजवळ चिकार सामान होते—व्हेनिसला बिऱ्हाड बदलायच्या इराद्याने आल्यासारखे, त्यामुळे त्यांनी दोन पोर्टर्स बोलावले. मी त्या स्त्रियांचे औपचारिक आभार मानून माझी छोटी बॅग घेऊन निघालो. स्टेशनच्या बाहेर येऊन पाहतो तर रस्ता नव्हताच ! होता तो एक प्रचंड कालवा, एखाद्या विस्तीर्ण नदीसारखा हाच तो ग्रँड कॅनॉल त्यात अनेक पोर्टर

टॅक्सी म्हणजे लहान मोटर लॉचीस आणि मोठया यांत्रिक नावा उभ्या होत्या. 'व्हेनिझिया—व्हेनिझिया, पियाझा—पियाझा' असा त्यांचा पुकार चालला होता. टॅक्सीपेक्षा बस स्वस्त पडणार हे सांगायला काही अर्थतज्ज्ञ लागत नाही मी अडीचशे लिरांचे बोटीचे तिकीट काढले दोनएकशे प्रवाशी पोटात घेऊन आमची नाव जोरात निघाली

ते वातावरण अतिशय प्रसन्न होते विशाल कालव्यावर अनेक उत्साही प्रवासी वेगाने जा–ये करीत होते. हायवेवर वाहनांची वाहतूक चालावी तशी त्या जलमार्गावर नावांची धावपळ चालली होती प्रेमात पडलेल्या युगुलाना हळुवारपणे नेणाऱ्या गोंडोलापासून अगदी आतरराष्ट्रीय मोटर रेससारख्या विजेच्या वेगाने सुसाट जाणाऱ्या मोटर लॉचेस्‌पर्यंत वेगाच्या, अनेक प्रकारच्या नावा कालव्यातून चालल्या होत्या लग्नानतर वरातीच्या मोटारी सजवतात, तशा काही नावा सजवलेल्या होत्या हवेत गारवा होता, वाऱ्यात उत्साह होता, मनात सगीत होते आणि सभोवार पसरलेल्या पाण्यात तारुण्य होते रोमला भेटलेला एक इटालियन लेखक मला म्हणाला होता ते खरेच होते 'व्हेनिस हे जगातलं एकच अस शहर आहे, की त्याच वर्णन करता येत नाही. तिथं प्रत्यक्षात गेल पाहिजे. तिथली हवा खाल्ली पाहिजे तिथ राहिल पाहिजे तरच तुम्हाला व्हेनिस म्हणजे काय ते समजेल'

कारण हे पाण्यातले असे जगातले एकमेव अद्‌भुत शहर आहे ज्या शहरात एकही मोटार नाही वाहतूक नियत्रण करणारा पोलीस नाही, ट्रॅफिक लाईट्स नाहीत आणि रस्त्यावर धक्काबुक्की नाही असे हे जगातले एकमेव शहर कारण याला खऱ्या अर्थाने रस्तेच नाहीत आहेत ते कालवे—फक्त कालवे आणि त्यांना जोडणारे पूल आईच्या गळ्यात मुलाने हात टाकावा तसे हे पूल लाडिक, प्रेमळ. हा गाव म्हणजे रूढ अर्थाने शहर नव्हेच, तर अनेक छोटया बेटांचा हा पुजकाच आहे. निळ्या मखमली सागरावर टाकलेल्या हिऱ्या—माणकांच्या ढिगासारखा हा लांबून दिसतो मधूनच चर्च किंवा जुना राजवाडा यांची टोके आभाळात घुसतात ग्रँड कॅनॉलच्या किनाऱ्यावर खुर्च्या टाकलेल्या चार खुर्च्यांच्या मध्ये टेबल आणि त्यावर रंगीबेरंगी प्रचड छत्री या खुर्च्यांवर बसून बियर किंवा कॉफी घेत समोरून सरकणाऱ्या विविध आकराच्या आणि अनत प्रकारांचे उतारू वाहून नेणाऱ्या नावांची ये—जा पाहत बसायचे तीच गमत या नावातून प्रवास करणाऱ्यांनाही पाहायला मिळते. डेकवर येऊन किनाऱ्यावरच्या निरुद्योगी संथ, शांत, चित्रविचित्र प्रवाशांच्याकडे पाहत पुढे—पुढे सरकायचे हे शहर निरुद्योग्यासाठीच आहे यात शका नाही. कारण इथे येणाऱ्या प्रवाशांना कसलीही घाई—गर्दी नसते न्यूयॉर्क, मुबई, हॉगकॉग अशा शहरांतल्या धावपळीपासून हे निवात शहर सर्वस्वी अलिप्त आहे.

व्हेनिसच्या मध्यवर्ती भागात शिरण्यापूर्वी एका मोठ्या चर्चचा प्रचंड घुमट

दिसला. शेजारच्या एका ब्रिटिशाने आपल्या गाईड बुकात पाहून तो घुमट सॅन सिमेऑन पिकोलो चर्चचा आहे असे सांगितले इतकेच नव्हे, तर हातातल्या पुस्तकातील चित्रही पुराव्यादाखल दाखवले कोलंबसाने अमेरिकेचा शोध लावावा तसा आपण काही मूलभूत शोध लावला आहे असा अभिमान त्याच्या चेहऱ्यावर होता आमच्या नावा डावलून सरकणाऱ्या काही नावा छोटया, काळया रंगाच्या आणि विशेष नक्षीदार आकाराच्या होत्या त्यांचे चालकही खास व्हेनिसच्या गोंडोला चालकांचा पोषाख घालून नावा वल्हवीत होते डोकीवर स्ट्रॉ हॅट, अंगात पांढरा शर्ट आणि काळी पँट असा त्यांचा वेश होता काही गोंडोलात दोन चालक होते आणि त्याच्यापैकी एकजण हातातली गिटार वाजवीत होता बहुधा या संगीत गोंडोलात प्रणयी युगुले बसलेली होती–म्हणजे ती नवरा–बायकोच असतील असे नव्हे किंबहुना एकमेकांचे पतिपत्नी असण्याची शक्यता कमीच दिसत होती कारण ज्या बेहोशपणे ती एकमेकांच्या बाहुपाशात विसावून चुंबन घेत होती, ती मदहोशी परिपक्व पतिपत्नीची नसावी असे वाटत होते. पन्नाशी उलटलेले प्रवासी नवराबायको सहज ओळखता येत होते ते आपले एकमेकांचा फक्त हात धरून हातातल्या गाईड बुकातून काठावरच्या इमारतींची नावे शोधीत होते किंवा छायाचित्रे घेण्यात दंग होते विशेष म्हणजे या रोमॅन्टिक गोंडोला यांत्रिक नव्हत्या तर नावाड्याने हाताने वल्ही मारण्याच्या होत्या कारण व्हेनिससारख्या रमणीय शहरात धावाधाव करायची नसते सावपणे आजूबाजूच्या जलनगरीचे चविष्ट दर्शन घ्यायचे असते.

इटलीत जी चार वैशिष्टयपूर्ण शहरे आहेत, त्यापैकी सर्वात अपार्थिव असे हे व्हेनिस रोम हे प्राचीन, वैभवशाली इतिहासाबद्दल ख्यातनाम आहे, फ्लॉरेन्स शहर हे युरोपमधील सांस्कृतिक पुनरुथ्यानाचे स्फूर्तिकेंद्र आहे, नेपल्स हे शिल्पकला आणि संगीतादी कलांचे माहेरघर, तर व्हेनिस ही जलनगरी म्हणजे पृथ्वीवरील स्वर्गाची झलक. या शहराजवळ विमान, आगगाडी किंवा मोटारीने आपण जाऊ शकतो पण मोटारी दूर ठेवून खुद्द शहरात मात्र नावेनेच यावे लागते जिकडे तिकडे हिरवे–निळे पाणी आणि अनंत बेटावर उगवलेली घरे, चर्चेस, हॉटेलांच्या आणि दुकानांच्या इमारती. ‘ जरा कोपऱ्यावर जाऊन सिगरेट घेऊन येतो ’ असे बायकोला सांगून नवरा घराबाहेर पडतो, तो नावेत पाय ठेवतो आणि ती वल्हवून कोपऱ्यावरच्या रेस्टॉरंट–स्टोअरच्या काठी नाव उभी करून सिगरेट घेऊन घरी परततो आपण जसे बाहेर पडून ‘ पाय मोकळे ’ करून यावे म्हणतो तशी इथे पाय मोकळे करण्याऐवजी चार वल्ही मारून ‘ हात मोकळे ’ करून येण्याचीच सोय आहे.

पण रोमप्रमाणे व्हेनिसमध्येही हौशी प्रवाशांचे खिसे मोकळे करण्याची उत्तमात उत्तम सोय आहे कारण व्हेनिसमध्ये जलवाहतूक–तीही व्हॅपोरेती नावाच्या मोठ्या नावाचीच–काय ती स्वस्त आहे. बाकी राहण्याची हॉटेल्स, जेवण, कॉफी, खाद्यपदार्थ या सर्व बाबतीत प्रवाशाचा बकरा केला जातो त्यांना भरपूर कापण्याची

सोय इथे आहे. व्हेनिसमध्ये इतकी हॉटेल्स आहेत की या शहराच्या गाईड बुकामध्ये म्हटले आहे, 'हॉटेल्स आर नो प्रॉब्लेम इन व्हेनिस' मला मात्र अनुभवाने पटले की हॉटेलची बिले देणे हाच एक मोठा प्रॉब्लेम आहे डॅनियल रॉयल एक्सेलसियर, ग्रिटी पॅलेस, युरोपा ब्रिटानिया या सुंदर डिलक्स हॉटेलांकडे तर वळण्याचीच सोय नाही त्यांचा एका माणसाचा रोजचा दर साधारण सातशे ते आठशे रुपये आहे स्मगलर्स व काळाबाजारवाले याच्याशिवाय कोणाला त्या हॉटेलात प्रवेशच मिळत नसावा. कारण एका जेवणाला दीडशे रुपये आणि ब्रेकफास्टला पंचेचाळीस रुपये, श्रमाने पैसा मिळवणारा देणे अशक्यच आहे पण कॅव्हलेट्टो, फ्लोरा, सॅव्हॉय ही रोज साडेतीनशे रुपयाची किंवा बेल सितो, पॅगॅनेली, झमीर ही रोज दीड-दोनशे रुपयांची हॉटेल्स एक-दोन दिवसासाठी आटोक्यातली आहेत व्हेनिस तसे लहान शहर आहे सारा विस्तार सहा-सात मैलांचा आणि मध्यवर्ती भाग तर दीड-दोन मैलांतच सामावलेला जलवाहतूक मुबलक आणि इतर जिनसापेक्षा स्वस्त, त्यामुळे मध्यवर्ती जागेपासून जरा लांब राहिले, तरी शहराचा आस्वाद घेणे अवघड जात नाही. अर्थात व्हेनिसच्या महागाईचे एक कारण असे, की इथे टूरिस्ट सिझनमध्ये (जुलै ते सप्टेंबर) अतोनात गर्दी राहते उलट, पावसाळा आणि हिवाळा या काळात फार थोडे प्रवासी येतात त्यामुळे व्हेनिसच्या हॉटेलवाल्यांना वर्षाचा खर्च तीन-चार महिन्यात भरून काढावा लागतो मी व्हेनिसला गेलो, तो ऑगस्टच्या सुरुवातीला म्हणजे प्रवासी लोकाचा ऐन बहर. त्यामुळे जिकडे-तिकडे गर्दीच गर्दी आणि अमेरिकन व जपानी धनाढ्य प्रवाशांचे नुसते लोट येत होते त्याना लुबाडण्याच्या नव्या-नव्या क्लृप्त्या इटालियन हॉटेलवाले आणि रेस्टॉरंटवाले काढीत होते

एक उदाहरण देतो पिॲझा सॅन मार्को हे व्हेनिसचे मध्यवर्ती केंद्र या चौकातल्या एका उपहारगृहात सकाळी दहा वाजता मी बाराशे लिरांना सँडविच आणि बियर घेतली व्हेनिसमध्ये बराच भटकून दीडच्या सुमारास मी त्याच उपहारगृहात गेलो आणि पूर्वीचेच जिन्नस मागविले त्यांचे बिल वेटरने अठराशे लिरा म्हणजे पूर्वीच्या दीडपट दिले. मी त्या फरकाबद्दल विचारले, तेव्हा तो म्हणाला, 'एक ते तीन लंच टाईममध्ये दर वाढलेले असतात' गर्दी झाल्याबरोबर नियमितपणे हे लोक दर वाढवितात यालाच इतरत्र काळाबाजार म्हणतात पण इटलीत तसा शब्द नाही कारण सगळीकडेच यथेच्छ भ्रष्टाचार आहे, तेव्हा कोण कुणाला जाब विचारणार ?

ग्रँड कॅनॉल हा कालवा इंग्रजी 'एस'च्या आकारासारखा असून व्हेनिसमधून सापासारखा सळसळत जातो. व्हेनिस हे ॲड्रियॅटिक सागराच्या किनाऱ्यावर आहे म्हणून त्याला 'क्वीन ऑफ ॲड्रियॅटिक सी' असे म्हणतात इ. स १४९९ पर्यंत जागतिक बाजारपेठेत व्हेनिसचा भलताच दबाब होता कारण युरोपियन देशांतून

पौर्वात्य देशांकडे जाणारा व येणारा बराचसा माल व्हेनिसमधून जात असे पण १४९९ मध्ये वास्को-डी-गामाने केप ऑफ गुडहोपला वळसा घालून भारताला जाण्याचा नवा जलमार्ग शोधून काढल्याबरोबर व्हेनिसच्या व्यापारी वर्चस्वाला धक्का बसला हा धक्का एवढा मोठा होता, की नव्या जलमार्गाची बातमी आल्याबरोबर व्हेनिसमधील आणि इटलीतील अनेक बँकांचे दिवाळे निघाले कारण नवा जलमार्ग स्वस्तातला, अधिक सोयीचा होता आणि व्हेनिसमार्गे पूर्वेला जाणारा माल अधिक महाग पडणार होता आणि साहजिकच त्या मालावर तारण देणाऱ्या बँकाना पैसे परत मिळण्याची शक्यता नव्हती कारण हा माल पूर्वेस खपलाच नसता. व्हेनिसच्या रिॲल्टो या धनिकाच्या विभागातील बँकांना आणि व्यापारी संस्थांना वास्को-डी-गामाच्या नव्या जलमार्गाने विशेष तडाखा दिला.

मी स्टेशनवर व्हेपोरेतीमध्ये बसलो वाटेत सेंट मार्क चर्चजवळ बहुतेक प्रवासी उतरले मी चौकशी केली, तेव्हा कळले की ती नाव आणखी पुढे, लिडोपर्यंत जाते. तिकीटही जादा नव्हते मी काढलेल्या तिकिटातच अधिक पुढे जाता येते तर तोही भाग का पाहू नये या पुणेरी व्यावहारिक विचाराने मी शेवटपर्यंत गेलो जाताना काठावरची हॉटेले, सुंदर घरे, नावांची ये-जा आणि सर्वत्र दिसणारा पाण्याचा उत्सव यांचे वैभव चाखीत मी मजेने प्रवास केला मुक्कामाच्या शेवटी लिडो येथे खाली उतरलो त्या भागात चक्कर टाकली तो भलताच पॉश आणि खानदानी भाग होता एकदरीत इटालियन लोक गबाळे आणि अस्ताव्यस्त म्हणून प्रसिद्ध असले, तरी या भागातले स्त्री-पुरुष हे इटालियन असूनही उत्तम कपडे घातलेले, नथ हालचालींचे आणि इंग्लडमधील लॉर्ड लोकांच्याप्रमाणे उच्चभ्रू असे होते. त्यांच्या रुबाबाकडे पाहूनच मी तेथे उपहारगृहात चहा-कॉफी वगैरे काही घ्यायचे नाही असे ठरवले कारण सेंट मार्क चौकापेक्षा इथले दर निदान चौपट असतील असे वाटत होते तिथल्या एका चर्चच्या निवांत आवारात थोडा वेळ बसलो. मग कालव्याच्या काठी ठेवलेल्या बाकाचा आश्रय घेतला. वास्तविक अशा प्रसन्न सकाळी गरम चहा आणि ताजे वर्तमानपत्र हे आनंदाचे विषय असतात पण व्हेनिसमध्ये चहा मिळत नाही, कॉफी अत्यंत महाग असते आणि वर्तमानपत्र फक्त इटालियन या आपल्याला अगम्य भाषेत असते म्हणून फक्त हवा खाण्याचाच कार्यक्रम मला तासभर करावा लागला लिडो या त्या भागाच्या नावाची आणखी एक सुखद आठवण होती पॅरिसमधल्या 'लिडो' या जगप्रसिद्ध नाईट क्लबमध्ये मी अनेकदा गेलो होतो चहा-कॉफीवर मी पैशांची बचत करीत होतो, पण नाईट क्लब, नाटक, प्रेक्षणीय स्थळे पाहणे या क्षेत्रात मी नेहमीच उदारहस्त असतो. म्हणून तर मला जगात एवढे अनुभव आले. व्हेनिसमध्ये जाऊन ड्युकल पॅलेस न पाहता तोच पैसा पिझ्झा-ऑम्लेट-कॉफीवर खर्च करणे हा माझ्या मते तद्दन मूर्खपणा आहे. ड्यूकल पॅलेस हा काय प्रकार आहे, ते यथावकाश सांगेनच.

व्हेनिस ते लिडो अशी व्हेपोरेती येऊन दोन–तीनदा येऊन गेल्यावर मी पुन्हा सेंट मार्क चौकाकडे जाण्यासाठी त्या नावेत बसलो पुन्हा तिकीट काढले सेंट मार्क चौक हा व्हेनिसचा प्राणच आहे त्यामुळे व्हेनिस पाहणे याचा अर्थच मुळी हा जग-प्रसिद्ध चौक, तेथील सेंट मार्क चर्च आणि जवळचा ड्यूकल पॅलेस पाहणे होय. ड्यूकल पॅलेस म्हणजे ड्यूकचा राजवाडा प्राचीन काळापासून या भागावर ड्यूकची सत्ता होती त्या ड्यूकचा राजवाडा सेंट मार्क चौकातच आहे

काही-काही शहराच्याविषयीच्या आपल्या कल्पना अगदी ठाम असतात. पॅरिस हे नाईट क्लब्जचे शहर, न्यूयॉर्क हे 'गगनचुंबी' इमारतींचेच शहर तसे व्हेनिस हे केवळ पाण्यातले शहर एवढीच कल्पना रूढ असते. पण निवडणुकीची पद्धत अमलात आणणारे व्हेनिस हे जगातील एक अत्यंत जुने शहर आहे तिथे काच-सामानाचा आणि विणकामाचा उद्योग फार मोठ्या प्रमाणावर चालतो, या व्हेनिसच्या इतर वैशिष्ट्याची मात्र तेवढीशी प्रसिद्धी झालेली नसते व्हेनिस शहराची स्थापना झाली, ती सहाव्या शतकात रोमन साम्राज्याचा पाडाव झाला तेव्हा । ५६८ साली व्हेनिसजवळच्या अल्टिनो आणि अक्विलिया या विभागावर लोंबार्डची स्वारी झाली, तेव्हा तेथील नागरिकांची जीव बचावण्यासाठी पळापळ झाली त्यावेळी व्हेनिस हे एका तळ्याच्या काठी असलेल्या छोट्या बेटाचे खेडे होते तेथे मुख्यत मासेमारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कोळ्यांची वस्ती होती. टॉर्सेलो नावाच्या छोट्या बेटावर अल्टिनोचे लोक आले आणि वस्ती करून राहू लागले या निर्वासितांनीच या भागाचा विकास केला. या भागातील राजकीय प्रमुखाला ड्यूक म्हणत असत. त्याची निवडणूक इ स ७२७ साली झाली व्हेनिस हे व्यापाराच्या दृष्टीने चांगले केंद्र आहे याची जाणीव झाली, तेव्हा अधिकाधिक बेटावर वस्ती झाली पूल टाकून ही बेटे जोडण्यात आली. रिआल्टो हा भाग जलवाहतुकीचा प्रमुख मार्ग झाला. व तेथे मोठमोठ्या व्यापारी वखारी व नावाचे कारखाने उभारले गेले

डॉमिनिको या ड्यूकने १०३२ सालीच जनतेला पूर्ण लोकशाही अधिकार दिले. सेंट मार्कच्या नावाने व्हेनिसच्या प्रमुख चौकात एक भव्य चर्च बांधण्यात आले, ते अजूनही व्हेनिसमधील सर्वात लक्षणीय असे ठिकाण आहे १०८२ पासून व्हेनिस-मार्गे युरोपचा पूर्वेकडील देशाशी व्यापार चालू झाला

बिझण्टाईन साम्राज्याच्या काळात व्हेनिसच्या ड्यूकची पदवी 'लॉर्ड ऑफ द फोर्थ पार्ट अँड ए हाफ' म्हणजे 'बिझण्टाईन साम्राज्याच्या एकचतुर्थांशाहून अधिक भागाचा स्वामी' अशी होती हा भाग म्हणजे व्हेनिस व आसपासचा सागर होता. ड्यूक हा प्रमुख आणि त्याला सल्ला देणारे पंचेचाळीस लोकनियुक्त मंत्र्यांचे सल्लागार मंडळ अशी तेव्हा व्हेनिसची राजकीय रचना होती. व्हेनिससारख्या छोट्या राज्याला जवळपासच्या इतर स्वतंत्र अंमलाशी अनेक लढाया द्याव्या लागल्या, पण

व्हेनिसचे आरमार बळकट असल्याने व्हेनिसचे ड्यूक त्या लढायातून यशस्वी होऊन बाहेर पडले. पण नेपोलियनपुढे या छोटया राज्यांचा निभाव लागला नाही फ्रेंच राज्यक्रांतीनंतर नेपोलियनने १७९७ साली व्हेनिसचा पाडाव केला आणि व्हेनिस हे राजकीयदृष्टचा ऑस्ट्रियाला जोडून व्हेनिसमध्ये फक्त एक नगरपालिका तेवढी ठेवली १८६१ मध्ये मात्र ऑस्ट्रियाचा पराभव करून इटलीने व्हेनिसचे नियंत्रण पुन्हा आपल्याकडे घेतले तेव्हापासून व्हेनिस हा इटलीचा एक प्रांत म्हणून राहिला आहे. व्हेनिस ही आता व्हेनिझिया प्रांताची राजधानी आहे इटलीची जी सहा प्रमुख बंदरे आहेत, त्यात व्हेनिसचा समावेश होतो.

व्हेनिस हे तरंगते शहर असल्याने त्याचे काही खास प्रश्न आहेत. सर्वांत प्रमुख अडचण अशी, की समुद्र आणि कालवे यांच्या पाण्याने काठावरील घराचे पाये सतत दुर्बल होत असतात वारंवार सिमेंटचे भराव टाकून ते टिकवून धरावे लागतात. बऱ्याच घरांच्या तळमजल्यावर सतत ओल असते समुद्राचे पाणी दोन फुटापर्यंत चढते क्वचित प्रसंगी ते तीन ते चार फूट चढते, तेव्हा तळमजल्यावरील नागरिकांची त्रेधातिरपीट उडते सामान हलवून वरच्या मजल्यावर न्यावे लागते पण या नैसर्गिक आपत्तीची आता त्यांना सवय झाली आहे. व्हेनिसपासून जगातील पाच खंडांना बोटी जाऊ शकतात. त्याची सोय व्हावी म्हणून बंदराचा उत्तम विकास करण्यात आला आहे १९६० साली मार्को पोलो वि तळ बांधण्यात आला. त्याशिवाय लिडो येथेही खाजगी विमानांसाठी वेगळा लहानसा विमानतळ आहे १९३२ साली मध्यवर्ती तळाभोवती सुंदरसा रस्ता बांधला गेला आहे गोंडोला ही विशिष्ट पद्धतीची नाव हे व्हेनिसचे जलवाहतुकीचे प्रमुख साधन. १५६२ साली व्हेनिसच्या सीनेटने खास कायदा करून सर्व गोंडोलांचा रंग काळा असला पाहिजे असा निर्बंध घातला. गोंडोलाची लांबी सुमारे बत्तीस फूट व मध्यभागी रुंदी पाच फूट असते. पिण्याचे पाणी हा व्हेनिसचा आणखी एक ज्वलंत प्रश्न संबंध शहर पाण्यात आहे. पण पिण्याच्या पाण्याची वानवा आहे. कारण आजूबाजूला पसरलेले अथांग पाणी समुद्राचे असल्याने खारट आणि अशुद्ध असते ' Water, water everywhere, but not a drop to drink ' या कवितेची आठवण व्हेनिसला गेल्यावर होते व्हेनिस नगरपालिकेने पिण्याचे पाणी वीस मैलांवरच्या अँब्रियोगी डि ब्रिओहून आणले आहे पण मोठ्या नळांमधून आणलेला हा पाणीपुरवठा अपघातामुळे किंवा नळ बिघडल्यामुळे खंडित झाला तर पेचप्रसंग निर्माण होऊ नये, म्हणून नगरपालिकेने काही बोअर विहिरी सज्ज ठेवल्या आहेत. गेल्या महायुद्धात पाणीपुरवठा बंद झाला होता. या बोअर विहिरींना फार खोलवरचे पाणी उपसावे लागते. कारण जवळचे पाणी घेतले, तर ते खारट लागते म्हणून व्हेनिसच्या नलिकाविहिरी समुद्रसपाटीच्या खाली एक हजार फुटावरून पिण्याच्या पाण्याचा उपसा करतात. या गावी इमारत

बांधायची, तर तिचा पाया समुद्रसपाटीपासून सात ते दहा फूट खाली घालावा लागतो तोही सिमेंटचाच असावा लागतो.

पियाझा सेंट मार्क म्हणजे सेंट मार्क चौक हे व्हेनिसचे सर्व काही आहे. व्हेनिसचे धार्मिक केंद्र हेच, सर्वांत प्रेक्षणीय स्थळ हेच आणि सास्कृतिक केंद्रही हेच! जगातल्या अनेक शहरात अनेक चौक मी पाहिले बहुतेक चौकात हजारो कबुतरे असतात लंडनचा ट्रॅफलगार चौक याबद्दल प्रसिद्ध आहे पण व्हेनिसच्या सेंट मार्क चौकात कबुतराची जी फौज आहे, तशी इतरत्र कोठेही मी पाहिली नाही ही सर्व कबुतरे एकाच वेळी उडाली तर सबंध आकाश झाकून टाकतील आणि शहरावर कृत्रिम सूर्यग्रहण आणतील एवढी त्याची सख्या मोठी आहे प्रवाशानी टाकलेल्या पावाच्या आणि इतर खाद्यपदार्थांच्या तुकड्यावर ही कबुतरे दिवसभर चरतातच, पण त्याशिवाय दररोज दुपारी दोन वाजता सेंट मार्क चर्चतर्फे त्यान: अधिकृत खाना देण्यात येतो पावसाळ्यात प्रवासी जवळजवळ नसतातच त्यावेळी त्यांनी काय खावे, या विचाराने ही कायमची तरतूद केलेली असते सेंट मार्क कॅथेड्रल किंवा चर्च हे इटलीतील बिझण्टाईन पद्धतीच्या बांधणीचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून महशूर आहे. सेंट मार्क हे थोर ख्रिश्चन संत अलेक्झांड्रियात निधन पावले त्यांचे पवित्र अवशेष व्हेनिसच्या व्यापाऱ्यांनी इ स. ८२९ मध्ये आणले त्या अवशेषांचे रक्षण करण्यासाठी म्हणून या चर्चची उभारणी झाली या चर्चला पाच मोठे घुमट आहेत चार बाजूचे चार आणि मधला मोठा, उच्च घुमट शिवाय अनेक मनोऱ्यांनी हे कॅथेड्रेल अगदी वेगळे आणि उठून दिसते त्याचे मुख्य प्रार्थनागृह रोम येथील जगप्रसिद्ध सेंट पीटर्स चर्चच्या भव्य प्रार्थनागृहाची आठवण करून देते भिंतींचा खालचा भाग सुंदर संगमरवरांचा असून त्यावरील भागात बायबलमधील प्रसगांची मोझाइक चित्रे अत्यत प्रेक्षणीय आहेत त्यातील धार्मिक भावना इतर धर्मीयाच्या दृष्टीने तितकीशी महत्त्वाची नसली, तरी कलेच्या आस्वादाच्या दृष्टीने ही चित्रे उत्कृष्ट आहेत. 'जगाची निर्मिती', 'अॅडमचा अधःपात' आणि 'ख्रिस्त व द्रष्टे' ही तीन भव्य चित्रे विशेष लक्षणीय असून दरसाल हजारो कलारसिक केवळ ही मोझाईक चित्रे पाहण्यासाठी व्हेनिसला भेट देतात, इतकी ती विख्यात आहेत चर्चच्या कलादालनात अनेक निवडक तैलचित्रे आहेत त्यापैकी 'व्हॉल्ट ऑफ पॅराडाईज' हे टिटनच्या 'लॉस्ट जजमेंट' इतकेच गाजलेले चित्र आहे. हे चर्च निवातपणे पाहण्यासाठी निदान तीन तास लागतात सुरुवातीलाच तुमचा गाईड सांगतो, "स्टे अॅज लॉंग अॅज यू कॅन! देअर इज ओन्ली वन् सेंट मार्क!" (तुम्हाला हवा तितका वेळ घालवा. जगात एकच सेंट मार्क चर्च आहे.) मुख्य क्रॉसच्या आसपासचे सोन्याचे नक्षीकाम तर अविस्मरणीय आहे.

सेंट मार्क चर्चचा मनोरा दोनशे फूट उंच आहे. त्याला 'क्लॉक टॉवर' म्हणतात. या मनोऱ्यावर एक प्रचड घंटा आहे. दर तासाला पुरुषाचे दोन पुतळे या घंटे-

वर मोठ्या हातोड्याने टोले मारतात, ते पाहण्यासाठी सेंट मार्क चौक गर्दीने भरून जातो. शेकडो लोक कॅमेऱ्याने हे दृश्य टिपतात. काही अति उत्साही प्रवासी टॉवर-वर चढून, अगदी जवळून हा घंटानाद पाहतात

या चर्चला लागूनच ड्यूकचा राजवाडा ( डोगेज् पॅलेस) आहे त्यात प्रवेश करण्यासाठी अडीच हजार लिरा द्याव्या लागतात, पण हा राजवाडा पाहणे आव-श्यकच आहे कारण सबंध व्हेनिसचा दीड हजार वर्षांचा इतिहास इथेच घडला या वाड्याच्या पहिल्याच चौकात उभे राहून वरच्या दुसऱ्या मजल्यावर पाहिले, तर एका महालाची गॅलरी दिसते ही गॅलरी इतिहासप्रसिद्ध आहे कारण जगातील अत्यंत ख्यातनाम आणि लोकप्रिय—किंवा खरे तर स्त्रियांना प्रिय असलेला प्रेमवीर कॅसानोव्हा हा या महालात ड्यूकला नकळत त्याच्या मुलीबरोबर प्रणयक्रीडा करीत असे कॅसानोव्हा हा दिसायला अत्यंत सुंदर, बोलण्यात चतुर आणि स्त्रियांची मने जिंकण्यासाठी कोणतेही धाडस करणारा होता. अनेक देशांतील सौंदर्यवती, राज-कन्या, राण्या आणि सरदार—दरकरांच्या पत्नी त्याच्यावर बेहद्द खूष होत्या आपल्या राजकन्येला तो चोरून भेटतो हे व्हेनिसच्या ड्यूकला कळले, तेव्हा त्याने पाळत ठेवून पकडले आणि तुरुगात ठेवले प्रेमवीर कॅसानोव्हा तुरुंगात आला आहे हे तुरुंगाधिकाऱ्याच्या तरुण मुलीला समजले, तेव्हा तीच चोरून त्याला त्याच्या कोठडीत भेटू लागली कॅसानोव्हाने तिच्यावर एवढी मोहिनी घातली, की तिने एका रात्री बापाच्या कपाटातल्या किल्ल्या घेतल्या आणि आपल्या प्रियकराची—कॅसा-नोव्हाची सुटका केली ! प्रेमामुळेच तो तुरुंगात गेला आणि प्रेमानेच त्याची सुट-काही केली

या ड्यूकच्या वाड्याच्या प्रवेशद्वाराला 'कागदाचा दरवाजा' (पोर्टा डेला कार्टा ) असे नाव आहे. हे विचित्र नाव पडण्याचे कारण असे, की पूर्वीच्या काळी ड्यूक जे हुकूम, जाहीरनामे वगैरे काढीत असे, ते याच दरवाजावर चिकटविण्यात येत असत या राजवाड्यात आता चित्रसंग्रहालय आणि शस्त्रागार आहे टिटन, टिन्टोरेटो, व्हेरोनीज अशा जगप्रसिद्ध कलावंताच्या उत्कृष्ट कलाकृती इथे पाहा-यला मिळतात. 'पॅराडाईज' हा टिन्टोरेटोचा सर्वोत्तम फ्रेस्को (भित्तिचित्र) या वाड्यात आहे. वाड्याच्या एका भागात पूर्वी न्यायालय असे शिक्षा झालेला कैदी तुरुंगात नेताना पळून जाऊ नये म्हणून त्यावेळी तुरुंगही वाड्याच्या अगदी जवळ होता दोन्हींच्या मध्ये फक्त एक कालवा आहे राजवाड्यातले न्यायालय आणि तुरुंग यांना जोडणारा एक पूल आहे, हा पूल व्हेनिसमधील सर्वांत प्रसिद्ध पूल आहे त्याला 'ब्रिज ऑफ साईज्' (निःश्वासाचा पूल) हे काव्यमय आणि अन्वर्थक नाव आहे. न्यायालयाने ज्यांना फाशीची शिक्षा दिली आहे, असे गुन्हेगार न्यायालयातून तुरुंगात जाताना याच पुलावरून खुल्या, मुक्त जगाचे अखेरचे दर्शन घेत आणि निःश्वास सोडीत. एकदा का ते तुरुंगाच्या भिंतीआड गेले, की पुन्हा कधीही बाहेर

येऊ शकत नसत त्यानी सोडलेल्या अखेरच्या नि:श्वासाना उद्देशून या पुलाला ब्रिज ऑफ साईज (Bridge of sighs) असे नाव पडले आहे.

व्हेनिसच्या ग्रँड कॅनॉलमधून नावेत बसून फिरणे हा जीवनातील एक अत्युच्च आनद आहे गोंडोला इतके हळुवारपणे पाण्यावरून जातात की आपण स्थिर असून आसमतच फिरत आहे असा आपल्याला भास होतो सेंट मार्क चौकातून गोंडोलाने पेसेरा चौकापर्यंत जावे आणि परत येताना छोटचा-छोटचा कालव्यांतून काम्पो द फ्रियाटीपर्यंत यावे दोन-अडीच तासांचा हा धीमा प्रवास अतिशय प्रसन्न आणि देखणा आहे वाटेत अनेक चर्चेस् आणि इतर महत्त्वाची ठिकाणे डोळ्यांसमोरून सरकत जातात. सांता मरिया देला चर्च हे प्लेग चर्च म्हणून प्रसिद्ध आहे व्हेनिस व आसपासच्या भागात सत्तराव्या शतकात प्लेगने कहर केला ती साथ संपल्यानतर लाँगेना या नामवत आर्किटेक्टने हे चर्च प्लेगच्या विनाशाच्या स्मृतीसाठी बाधले ग्रँड कॅनॉलमधून निघाल्यानतर थोडचाच अतरावर व्हेनिसच्या आर्ट ॲकॅडमीची इमारत लागते या गॅलरीत अनेक जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराच्या कलाकृती ठेवण्यात आल्या आहेत डाव्या किनाऱ्यावरचा पियाझो रेझोनिको हा वाडा दोनशे वर्षापूर्वी होता, तसाच अद्याप ठेवण्यात आला आहे या वाडचाच्या वरच्या मजल्यावर त्या काळच्या औषधांचा सग्रह आहे. तो वैद्यक क्षेत्रातील तज्ज्ञाच्या कुतूहलाचा विषय आहे फॉस्कारी आणि पिसानी हे वाडे पधराव्या शतकात बाधले गेले. पाण्याचा अविरत मारा होत असतानाही पाचशे वर्षे हे वाडे कसे मजबूत राहिले आहेत हे आश्चर्यच आहे त्याकाळी सिमेंटचा शोध लागला नव्हता, तरीही व्हेनिसची अनेक जुनी बाधकामे अजून बळकट आहेत

पिसानी वाडचाजवळचा 'रिआल्टो पूल' हे व्हेनिसमधील एक अत्यंत महत्त्वाचे असे प्रेक्षणीय स्थळ आहे शेक्सपियरच्या दिगंत कीर्तीच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकातील घटना याच पुलाजवळ घडल्या आणि तो व्हेनिसचा दयाहीन व्यापारीही इथलाच रिआल्टो हा फार पूर्वीपासून व्यापारी उलाढालींचा, गजबजलेला भाग आहे. साहित्याची आणि व्हेनिसची आणखी एक जवळीक आहे. ती अशी की व्हेनिसचा आसमतात पाडुआ नावाचे गाव आहे. तेथे पूर्वी एक डचेस होती. तिच्या विवाहबाह्य प्रेमावर ऑस्कर वाईल्ड याने 'डचेस् ऑफ पाडुआ' हे अत्यत विलोभनीय व काव्यात्मक नाटक लिहिले आहे. व्हेनिसपासून वीस मैलावर व्हेरोना हे गाव आहे शेक्सपीयरच्या दोन कलाकृतींनी हे गाव अमर केले आहे 'रोमिओ ॲड ज्युलियट' ही जगातील सर्वश्रेष्ठ प्रेमकथा याच व्हेरोनात घडली. रोमँटिक दु:खांतिकेच्या क्षेत्रात शेक्सपीयरचे हे नाटक अजोड आहे. 'टू जटलमेन ऑफ व्हेरोना' या शेक्सपीयरच्या नाटकाला 'रोमिओ ॲण्ड ज्युलियट' ची लोकप्रियता मिळाली नाही, पण त्या नाटकाची पार्श्वभूमीही व्हेरोना हे गावच आहे.

व्हेनिसच्या याच रिआल्टो भागात दूर देशाचे पर्यटन करून जगप्रसिद्ध प्रवासी मार्को पोलो आला, तेव्हा त्याने आपल्या मळकट कपड्यांत लपवून लक्षावधी पौंडाची हिरे–माणके आणली होती त्याने जेव्हा मोगल दरबारात दहा हजार लोक असतात आणि त्यांना दिलेल्या शाही मेजवानीच्या वेळी पाच हजार कुत्रेही जेवतात असे सांगितले, तेव्हा व्हेनिसचे नागरिक अवाक् झाले होते. व्हेनिसच्या अनेक घरांना थोर लेखकांचा स्पर्श झाला आहे याच जलनगरीतील एका घरात जगप्रसिद्ध कवी ब्राउनिंग याचा अंत झाला. त्या घरावर ब्राउनिंगच्या नावाची पाटी आहे आणखी एका आडगल्लीतील घरावर पाटी आहे ती दुसरा जगप्रसिद्ध कवी लॉर्ड बायरन याची । या घरात तो राहत असताना एका वृद्ध उमरावाच्या तरुण पत्नीचे त्याच्यावर प्रेम जडले. आणि बायरनही तिच्या प्रेमात पडला १७५० साली रोमहून येथे आलेला जगप्रसिद्ध प्रेमवीर कॅसानोव्हा हाही ड्यूकच्या वाड्याजवळच्याच एका घरात राहत असे. ड्यूकच्या तुरुंगातून तेथील अधिकाऱ्याच्या मुलीच्या मदतीने पळून गेल्यावर कॅसानोव्हा फ्रान्सला गेला आणि तिथे एक लॉटरी काढून त्याने अमाप संपत्ती मिळवली मोठमोठ्या नामवंतांचा सहवास घडलेल्या या छोट्या घरांच्या गल्ल्यांतून आज फिरले की दिसते ते ठराविक दृश्य या दोन घरांना दोऱ्या बांधून वाळत घातलेले कपडे आणि छोट्या बोळकांड्यात खेळणारी मांजरे आणि मुले मात्र दोन्ही बाजूच्या घरांच्या खिडक्यांत नक्षीदार कुंड्या असतात, आणि त्यातील कलात्मक रोपे शहराचे शांत सौंदर्य वाढवीत असतात.

'हाऊस ऑफ गोल्ड' या नावाने प्रसिद्ध असलेला चित्रसंग्रह ग्रँड कॅनॉलच्या किनाऱ्यावर आहे. १४४० साली बांधलेल्या या इमारतीत व्हॅन डाईक, टिटन, मॅन्टेना यांच्या कलाकृती आहेत 'व्हीनस अॅट द मिरर' हे टिटनचे जगप्रसिद्ध तैलचित्र याच इमारतीत आहे पॅलेझो पॅरोटो हा वाडा म्हणजे व्हेनिसचा प्रसिद्ध आर्किटेक्ट लाँगेना याची एक दर्जेदार निर्मिती आहे. सध्या त्यात आधुनिक चित्रकला आणि पौर्वात्य चित्रकला या क्षेत्रातील निवडक कलाकृतींचा संग्रह आहे. रिचर्ड वॅग्नर हा जगप्रसिद्ध संगीतकार ज्या वाड्यात १८८३ साली निधन पावला, तो पॅलेसा व्हॅन्देमियाही ग्रँड कॅनॉलमधून जाताना काठालाच लागतो त्याच्या उलट बाजूला पंधराव्या शतकातले गोथिक पद्धतीचे चर्चही आहे ज्याला लॅगून म्हणतात त्या विस्तीर्ण तळ्यात वीस मैलपर्यंत लहान–लहान बेटे पसरली आहेत. त्यापैकी अनेक बेटे इतकी लहान आहेत, की त्यावर एक घरसुद्धा पूर्णपणे उभे राहू शकत नाही हा भाग अगदी स्वप्नातल्या दृश्यासारखा दिसतो अथांग पाण्यात मध्येच डोकी वर काढणारे इवलेसे जमिनीचे तुकडे वास्तव सृष्टीतले वाटतच नाहीत.

जलनगरी व्हेनिसमध्ये राहणारे लोक उद्योगधंदा काय करीत असतील, असा प्रश्न साहजिकच पडतो. मुख्य व्यवसाय अर्थात हॉटेलांचा आणि त्याला अनुषंगिक

अशा इतर क्षेत्रांचा ! हॉटेल म्हटले की बेकरी, लाँड्री, भाजीपाला, अन्न वगैरेचा प्रश्न आलाच व्हेनिस आणि लिडो या विभागात काही फार मोठी, अलिशान हॉटेल्स आहेत. 'युरोप अँड ब्रिटानिया', 'एक्सेलसियर', 'ग्रिटी पॅलेस', 'डॅनियल रॉयल', 'हॉटेल ग्रँड' अशी दोनशे ते तीनशे खोल्याची अवाढव्य हॉटेल्स चालविणे हा व्हेनिसचा एक प्रमुख व्यवसाय आहे कारण हे जगाच्या सर्व भागांतून येणाऱ्या श्रीमंत प्रवाशांचे आवडते ठिकाण आहे ते विश्रांतीचे प्रेक्षणीय आणि चैनीचे स्थळ आहे

पण विशेष म्हणजे व्हेनिसमध्ये उत्कृष्ट काचसामानाचे अनेक जगविख्यात कारखाने आहेत. उत्तम ग्लासेस्, काचेचे शोभेचे प्राणी, तक्तपोशीवर टांगायची मोठी झुबरे, मोझाइक्ससाठी वापरण्याच्या काचा, काचेवरील कोरीव कामातील चित्रे अशा अनेक प्रकारचे काचसामान व्हेनिसमध्ये होते व्हेनिसलाच हा उद्योग मिळण्याचे कारण असे, की फार पूर्वी इटालीतील घरे मुख्यत लाकडाची होती. रोम मिलान, बलोना यासारख्या मोठ्या शहराना तेथील काच सामानाच्या कारखान्यां-तील भट्ट्यांमुळे आगीची फार भीती वाटत होती. अनेकदा काचकारखान्यातील ज्वाळांमुळे मोठ्या आगीही लागल्या होत्या म्हणून मोठ्या शहरांतून हे कारखाने हद्दपार करून पाण्याने वेढलेल्या व्हेनिसमध्ये नेण्याचा सरकारने हुकूम काढला त्यामुळे सुमारे हजार वर्षे व्हेनिस हे काचकामाचे जगातील प्रमुख केंद्र झाले आहे व्हेनिशियन ग्लासला जागतिक काचबाजारात मोठा मान आहे काचेवर एनॅमल, चांदी, सोने याचे वर्ख चढविण्याची कसबी कामे व्हेनिसमध्ये प्रवाशांना प्रत्यक्ष मोफत पाहता येतात अनेक कारखान्यावर पाट्या असतात, " Glass work demonstration 3 to 5 p. m free "

काचेप्रमाणेच हाताने विणलेल्या लेसचाही मोठा व्यवसाय व्हेनिसमध्ये चालतो. बुरानो बेट आणि व्हेनिस शहर ही लेसकामाबद्दलची इटालियन केंद्रे प्रसिद्ध आहेत चित्रकलेच्या क्षेत्रातही व्हेनिसची परंपरा श्रेष्ठ आहे. येथील ड्यूक हे कलेचे भोक्ते होते शिवाय व्हेनिसच्या शांत आणि कलात्मक वातावरणाच्या आकर्षणाने अनेक ख्यातनाम इटालियन आणि परदेशी चित्रकार येथे येऊन काही काळ वास्तव्य करून चित्रे काढीत व्हेनिसमध्ये असलेली अनेक चित्रसंग्रहालये यांची उत्तम साक्ष देतात

व्हेनिसमध्ये अनेक लोभसवाणे महोत्सव होतात 'ला सेन्सा' हा महोत्सव म्हणजे व्हेनिसचा समुद्राबरोबरच्या विवाहाचा दिवस ! प्राचीन कालापासून व्हेनिसचा 'लॉर्ड ऑफ द सी' असा किताब आहे. तो सिद्ध करण्यासाठी व्हेनिसच्या या महोत्सवात सागराशी विवाह होतो अर्थात व्हेनिसनगर हा नवरा आणि सागरकन्या ही नवरी ! दरसाल जुलैमध्ये व्हेनिसच्या नावाचा महोत्सव

असतो. तेव्हा गोंडोला, मोटारबोटी, व्हेपोरेत्ती वगैरे सर्व जलवाहनांना शृंगारून त्यांची पाण्यातून मिरवणूक काढण्यात येते. याच वेळी बोटींची शर्यतही होते दोन वर्षांतून एकदा व्हेनिसमध्ये आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवही होतो १८९५ पासून येथे आंतरराष्ट्रीय कलामहोत्सवही दर दोन वर्षांनी होतो दरसाल ऑगस्टमध्ये 'रात्रीचा उत्सव' होतो तेव्हा शेकडो गोंडोलाची रात्रीच्या वेळी चिनी कंदील आणि इतर दिव्यांच्या माळा लावून अतिशय शोभिवत मिरवणूक ग्रँड कॅनॉलमधून जाते

व्हेनिसचे रस्ते म्हणजे पाणरस्ते असतात याची कल्पना नसलेला एक मुनीम एकदा लंडनहून व्हेनिसला विमानाने आला रस्त्यावर सगळीकडे पाणीच पाणी झालेले पाहून त्याने आपल्या मालकाला तार केली, " व्हेनिसमध्ये पूर आला आहे सगळे रस्ते पाण्यात तुडुंब आहेत परत येऊ की पूर ओसरेपर्यंत वाट पाहू ते कळवा ! "

व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन ! व्हेनिस म्हणजे केवळ कालव्यांचेच नव्हे तर काव्यातही तरंगणारे शहर ! एक प्रचंड उत्साह आणि उत्सव ! दोन दिवसाच्या निवांत मुक्कामानंतर हे गोड, कलासक्त आणि निळ्या पाण्यावर तरंगणारे शहर सोडताना मनाला खूपच हुरहूर वाटली

□ □ □

# अथेन्स

जगातल्या अनेक शहरांत भटकलो सुंदर रस्ते, उत्कृष्ट शिल्पे, उत्तमोत्तम चित्रे, सौंदर्यखनींचे रात्रीचे रंग, विशाल उद्याने, उत्तुंग गिरीशिखरे, भव्य राजप्रसाद, निवडक नाटयकृती हे सारे पाहिले, पण एका शहराजवळ आल्यावर हे सर्व लहान वाटू लागले शाळेतल्या गॅदरिंगमध्ये 'नाच रे मोरा' ऐकणे वेगळे आणि शास्त्रोक्त संगीतातील अतिरथी-महारथी भेटणे वेगळे ! गझल, लावणी, कव्वाली ही छचोर मंडळी काही वेळा करमणूक करतात, पण सूरसम्राट तानसेन किंवा घरंदाज गायकीचे बादशहा अल्लादिया खाँ यांच्याशी गाठ पडणे अगदी निराळे ! तसेच इतर शहरांची मौजमजाह् आणि अथेन्सचे भव्योदात्त दर्शन यांच्यातील अंतराचे आहे

या अथेन्सने जगाला दिलेल्या देणग्या केवळ अपूर्व आहेत वैचारिक क्षेत्रात सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, प्लेटो असे दिग्गज दिले महाकाव्यात होमरच्या तोडीचा दुसरा कवी हजारो वर्षांत निघाला नाही सोफोक्लिसच्या 'ओडिपस रेक्स' सारखी दु खांतिका जगाच्या पाठीवर झाली नाही हिचा डिम्डिम् थेट महाराष्ट्रात येऊन पोचला आणि त्या नाटकाचे दोन श्रेष्ठ मराठी लेखकांनी आदरपूर्वक अनुवाद केले राजकारणात अथेन्सने दिलेली लोकशाही अर्ध्या जगावर बाज मांडून आहे. क्रीडेच्या क्षेत्रात ग्रीसच्या ऑलिंपिक्सने हजारो वर्षे जग जिंकले आहे शिल्पाच्या क्षेत्रात पार्थिनॉनसारखे दगडातले महाकाव्य नंतर झाले नाही सत्यासाठी विषप्राशन करणारे तत्त्ववेत्ते याच भूमीतले पृथ्वीवर देववाणी झाली ती ग्रीसमधल्या डेल्फीमध्ये जगाच्या बुद्धिमत्तेची ही गंगोत्री बायरनने म्हटले आहे, 'Only at Athens one can conceive of the perfection of man considered as

intelligent being.' (बुद्धिमत्ता असलेला परिपूर्ण प्राणी म्हणून मानवाची प्रतिमा जर कुठे उमटली असेल तर ती अथेन्समध्ये !)

जर्मन कवी गटे याने ग्रीस कधीच पाहिले नाही पण 'फाऊस्ट'मध्ये त्याने हेलन आणि फाऊस्ट याची भेट घडवली ती ग्रीसमध्ये ! कारण सौंदर्य आणि बुद्धिमत्ता यांचा मिलाफ होण्यासाठी जगात कोणते आदर्श स्थळ असेल तर ते ग्रीसच याची गटेला खोल जाणीव होती

ग्रीस या देशाची आणि अथेन्स या शहराची आदबच वेगळी आहे भूमितीचा पाया घालणारा पायथागोरस, अनेक प्रमाणभूत शोध लावणारा छादिष्ट आर्किमिडीस, सात समुद्राचे गर्वहरण करणारा युलिसिस, शारीरिक बळावर जागतिक उच्चांक गाठणारा स्पार्टाकस (याच्या काळात ग्रीसच्या जमिनीने पाण्यापेक्षा अनेकपट अधिक रक्त प्याले होते ) अशी उत्तुग नावे ग्रीसनेच दिली सौंदर्य, स्वातंत्र्य, हक्क, न्याय हे मानवी जीवनाचे सर्व मूलभूत शब्द आणि त्यामागील भव्य कल्पना ही ग्रीसची देणगी आहे मानवी देह किती परिपूर्ण होऊ शकतो याचे प्रात्यक्षिक परमेश्वराने दाखविले, ते ग्रीसमध्ये ! ग्रीक सौन्दर्य, ग्रीक शोकातिका, ग्रीक बुद्धिवैभव, ग्रीक शिल्प, ग्रीक क्रीडा हे त्या–त्या क्षेत्रातील अखेरचे शब्द आहेत मोगल सम्राटाची ऐहिक श्रीमती मात्र ग्रीकला भुलवू शकली नाही

जगात पहिली लोकशाही स्थापन झाली ती ग्रीसमध्ये ख्रिस्तपूर्व ५०७ मध्ये या लोकशाहीचा पाया क्लिस्थेनिसमध्ये घातला गेला ज्येष्ठ इतिहासकार आणि प्रवासी हिरोडटस ख्रिस्तपूर्व ४८० मध्ये जन्मला त्याच वर्षी सलामीस सामुद्रधुनीत झालेल्या अपूर्व लढाईने पाश्चात्य जगाचा चेहरामोहरा कायमपणे बदलून टाकला पर्शियनांनी लक्षावधी सैनिक आणि नाविकांनिशी मॅरॅथॉन भागात चढाई केली ती यशस्वी झाली असती तर ग्रीसबरोबर युरोपवरही पर्शियाचे साम्राज्य पसरले असते पण ग्रीकने अतुल पराक्रम करून ते युद्ध जिंकले आणि इतिहास घडविला

इ स पूर्व ४६९ मध्ये जागतिक महत्त्वाचा सॉक्रेटिस जन्मला पेरिक्लिस हा बलाढ्य राजा अथेन्स व ग्रीकवर राज्य करीत होता, तेव्हा अथेन्सची लोकसख्या चार लक्ष होती ज्याच्या नावावरून डेमॉक्रसी हा शब्द अस्तित्वात आला, त्या डेमॉक्रिटस् या तत्त्ववेत्याचा जन्म याच सुमारास झाला खरोखर हा पन्नास वर्षांचा काळ अथेन्स, ग्रीक आणि सारेच जग याचा सुवर्णाचा काळ होता अचीलस हा महाकवी ('प्रॉमीथस अनबाऊंड' या महाकाव्याच्या लेखक), वैदकाचा पिता असा ज्याचा उल्लेख करण्यात येतो तो हिपॉक्रिटस्, ॲरिस्टॉटल, प्लेटो, सुखातिकांचा पाया घालणारा ॲरिस्टोफेनिस, यांच्यासारख्या ऋषी–महाऋषींनीच जागतिक सस्कृतीचा या कालखडात प्रारभ केला विचार करणारा प्राणी म्हणून मानवाची नवी प्रतिमा या ज्येष्ठांनी रूढ केली

बाहेरच्या भपक्यावर छाप पाडावी असे ग्रीसला कधी वाटलच नाही श्रीमती

आणि दिखाऊपणा ग्रीकाना कधी सुचलाच नाही त्यांचे आतरिक सामर्थ्यच असे जबरदस्त होते की जुळवून आणि जमवून आणलेल्या वस्त्रालकारांची त्याना कधी जरूरच पडली नाही कमरेखाली एक पांढरे वस्त्र आणि वर एक उत्तरीय एवढे त्याना बस होते ॲरिस्टॉटलने जगातल्या हुकूमशहाची झोप उडवली ती बुद्धि-मत्तेवर राजवस्त्रांच्या भपक्याबर नव्हे त्याच्याकडे नाही एक हत्ती, नाही एक घोडा–फार काय गाढवसुद्धा नाही स्फूर्ती देण्यासाठी होती फक्त कजाग बायको ! पण ॲरिस्टॉटलने उपस्थित केलेले प्रश्न जगाच्या अतापर्यंत सुबुद्ध नागरिकाला अस्वस्थ करतील

अशा या बुजुर्ग देशात प्रवेश करताना मी जरा घाबरलोच. अहो काय सांगता ? अथेन्सचा तिकीट कलेक्टर तिकीट विचारण्याऐवजी 'मानवी जीवनाचा अर्थ काय ?'–असे विचारू लागला तर काय करायचे ? आम्हाला तरी कुठे तो अर्थ माहीत आहे ? हे ग्रीक लोक त्याबाबत काही आडाखे–अदाज सुचवतील म्हणून तर खडतर प्रवास करून आलो

युगोस्लाव्हियाहून ग्रीसमध्ये प्रवेश करताना प्रथमच लक्षात आले की, हा अत्यत साधा देश आहे त्याला एकच रग आवडतो–पांढराशुभ्र ! घरे पांढरी, चर्चेस् पाढरी, कचेऱ्या–हॉटेल्स–रेस्टॉरट्स्–सगळे पाढरे ! रात्रीच्या धूसर प्रकाशात हा देश फारच छान दिसतो सर्वत्र पाढऱ्या इमारतीमुळे नुकतेच या देशावर भरपूर बर्फ पडून गेले आहे असा भास होतो निळ्या समुद्राच्या पार्श्वभूमीवर तर हा पांढरा रग फारच शोभून दिसतो सारा ग्रीस या शुभ्रतेमुळे अत्यत स्वच्छ आणि प्रसन्न वाटतो

थिसोलिनीकीहून अथेन्सकडे आगगाडीने जाताना अतिशय रम्य प्रदेश लागतो लहान–लहान गावात पाढरी बैठी घरे, त्याच्यापुढे द्राक्षाच्या वेलीचे माडव आणि गाढवावर बसून जाणारे धर्मोपदेशक ही हमखास दिसणारी दृश्ये ग्रीसमध्ये गाढ-वाला प्रतिष्ठा आहे घोड्याइतकाच गाढवालाही मान आहे अनेक उच–सखल भागात गाढव आपल्या पाठीवरील उतारूला जपून नेते वाटेत अमाप पसरलेल्या द्राक्षवेलीही ते खाते आणि त्या गाढवाचा उतारू उच हात करून द्राक्षे तोडून फस्त करतो हे गमतीचे दृश्य मी कित्येकदा पाहिले

ग्रीसमध्ये युगोस्लाव्हियाएवढी स्वस्ताई नाही पण जर्मनी, इटली या युरोपीय देशांइतकी महागाईही नाही जेवणात इटली–भारताप्रमाणे तिखट व मसाल्याचा वापर होतो भात भरपूर मिळतो पण स्थानिक लोकाचा मुख्य भर पावावर !

ग्रीसचे क्षेत्रफळ ( एक्कावन्न हजार चौरस मैल) अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्याच्या क्षेत्रफळाएवढे आहे पण ग्रीसमध्ये डोगर, टेकड्या आणि काठाशी समुद्र असल्याने हा छोटासा देश सृष्टिसौंदर्याची बरसात करतो लोकांची साधी राहणी,

कोणालाही मदत करण्याची तत्परता आणि सुखी जीवन जगण्याची ओढ यांची प्रवाशावर तात्काळ छाप पडते सुमारे एक तृतीयांश ग्रीक लोक शेती, द्राक्षमळे आणि तबाखूचे पीक यावर जगतात युरोपमध्ये शेतीवर जगणाऱ्याचे प्रमाण आठ ते दहा टक्के आहे ग्रीसमध्ये अद्यापही ग्रामीण वळण आहे डोंगराळ भागात काटक बकऱ्या बिनधास्तपणे उड्या मारताना दिसतात या भागात बकरीच्या दुधाचा वापर करणारे लोक आढळतात चीज आणि द्राक्षांचे मद्य यांचेही उत्पादन ग्रीक-मध्ये मोठ्या प्रमाणावर होते

अथेन्स शहर मात्र युरोपियन शहरांच्या वळणावर गेले आहे प्राचीन शिल्प व संस्कृतीचे अवशेष पाहायला येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली, त्याच प्रमाणात लंडन–न्यूयॉर्कसारख्या बड्या शहरांप्रमाणे भव्य हॉटेलांची संख्याही वाढली आजच्या अथेन्सची लोकसंख्या तीस लक्ष आहे किंग जॉर्ज, हिल्टन, ग्रँड बाल्कन, किंग्ज पॅलेस, अँथेनी पॅलेस अशा बादशाही हॉटेलात खोलीला रोज बाराशे ते दीड हजार ड्राक्मा भाडे पडते ड्राक्मा हे ग्रीक चलन असून एक रुपया म्हणजे तीन ड्राक्मा असे त्याचे रुपयाशी प्रमाण आहे पण दररोज दीडशे ते दोनशे ड्राक्मा पडणारी हॉटेलेही चार–दोन दिवस छानपैकी राहायला उपयोगी पडणारी अशी आहेत त्यात अल्बीयन, कॉसमॉस, कॅपिटॉल यांचा उल्लेख करता येईल श्रीमंत प्रवाशासाठी ग्रीसमध्ये आणखी एक सोय आहे ती म्हणजे डोंगरावर किंवा समुद्रकाठी भाड्याने मिळणारे सुंदर, स्वतंत्र बंगले ! रोज आठशे ते हजार रुपयांना पाच–सहा जणांच्या कुटुंबाला राहण्यासाठी हे बंगले एक–दोन दिवसांसाठीही मिळू शकतात

ग्रीसमधील हवाही आपल्यासारखीच आहे मस्तपैकी ऊन पडते समुद्रावरचा प्रसन्न वारा वाहत असतो लोकही आपल्याकडच्या जनताजनार्दनासारखेच थोडे गबाळे, अव्यवस्थित त्यामुळे लंडन–वॉशिंग्टनच्या कडक इस्त्रीच्या लोकात राहिल्या-सारखे घुसमटायला होत नाही रस्त्यावर पाव, बिस्किटे, चीज असे खाद्यपदार्थ विकणारे लोक बसलेले असतात किंवा ढकलगाडीवर घेऊन फिरत असतात मला अनेकांनी 'इंडिया ? व्हेरी गुड कंट्री !'–म्हणून शुभेच्छा दिल्या होत्या. हा निर्हेतुक चांगुलपणा हे ग्रीसचे वैशिष्ट्यच आहे इथे कुणी आपल्याला फसवील, बनवाबनवी करील अशी शंका मनात येत नाही

जागोजाग दिसणारे प्राचीन ग्रीक पुतळे, इमारती, स्मारके आणि चर्चेस् यांनी आधुनिक अथेन्सची मुळे इतिहासात हजारो वर्षे खोल रुजली आहेत ही जाणीव क्षणोक्षणी होते हा देश आणि हे शहर मानवी इतिहासाला चिरंतन मूल्ये देऊन अजून दीपस्तंभाप्रमाणे अचल राहिले आहे ही मन उचावणारी जाणीव अथेन्सच्या चौकाचौकात झाल्यावाचून राहत नाही. सोफोक्लीस, होमर, ॲरिस्टॉटल, प्लेटो, पायथागोरस असे तत्त्ववेत्ते, लेखक, शास्त्रज्ञ यांची नावे प्रमुख रस्त्यांना दिली आहेत.

ॲपोलो, थिऑस, देलफी, ऑलिंपिया अशा ग्रीक देवताची नावेही चौकाना आणि महत्त्वाच्या स्मारकाना दिली आहेत ग्रीसवर आणि विशेषत अथेन्सवर धर्माचा अजून खोल पगडा आहे चर्चच्या आसपास अनेक मॉक्स (धर्मोपदेशक) वावरताना दिसतात एक व्हॅटिकन (पोप यानी राजधानी) सोडले, तर अथेन्सइतके दुसरे धार्मिक शहर पाश्चात्य जगात मी दुसरे पाहिले नाही रोमन सम्राटांनी शक्तीच्या आणि मनुष्यबळाच्या जोरावर साम्राज्य स्थापन केले, पण केवळ बुद्धिमत्तेच्या बळावर हजारो वर्षे जगावर कबजा मिळवणारे अथेन्स हे एकमेव उज्ज्वल शहर आहे.

अथेन्सइतका जुना इतिहास मिळण्याचे भाग्य फार थोडया शहरांना लाभले आहे इसवी सनापूर्वी दोन हजार वर्षे, म्हणजे आजमितीस सुमारे चार हजार वर्षांपूर्वी हेलेनीस लोकानी पृथ्वीचा हा भाग व्यापला. हे हेलेनीस लोक म्हणजे इंडो–युरोपियन जातीपैकी होते त्यामुळे आशियाई व युरोपियन अशा दोन्ही शरीर-विशेषांचे व सस्कृतींचे मिश्रण त्यांच्यात झाले होते. इ स १५०० पूर्व मध्ये अचीयन सस्कृतीचा उदय झाला इ. स. ११८० पूर्व मध्ये जगप्रसिद्ध ट्रोजन हॉर्सचे युद्ध झाले होमरच्या महाकाव्याचा हाच विषय आहे अथीना या ग्रीक देवतेवरून अथेन्स हे नाव पडले या देवतेचा भव्य पुतळा अजून अथेन्समध्ये आहे. इ स पूर्व ७७६ मध्ये ग्रीसमधील ऑलिंपियामध्ये पहिला क्रीडामहोत्सव झाला तेच नाव आजही ऑलिंपिक सामन्यांनी अमर केले आहे या सुमारास ग्रीक हे विजिगीषु होते त्यांनी इटली आणि सिसिलीवर आपला ताबा बसविला वैज्ञानिक, कवी आणि तत्त्वज्ञ याची ग्रीसची परपरा इ स. पूर्व ७०४ पासून उज्ज्वल आहे. आर्किलॉस हा कवी आणि थेल्स हा तत्त्वज्ञ–संशोधक यांचा हा काळ आहे भूमिती आणि गणितशास्त्र यांचा पाया घालणारा पायथागोरस इ स पूर्व ५८० मध्ये जन्मला सोफोक्लीस हा कविश्रेष्ठ मॅराथॉन येथे इ स पूर्व ४९५ मध्ये जन्मला त्याच्या 'ओडिपस रेक्स' या नाटकाने सर्वोत्कृष्ट दु:खातिकेचे निशाण अडीच हजार वर्षे फडकवत ठेवले आहे ! सोफोक्लीसच्या जन्मानतर पाच वर्षांनी डेरियसने ग्रीसवर स्वारी केली त्याने या चढाईत सहाशे जहाजे आणि एक लक्ष दहा हजार सैनिक वापरले पण ग्रीकानी त्यांच्याशी यशस्वी मुकाबला केला

मॅरॅथॉन शर्यत हा आता क्रीडाक्षेत्रातील सर्वश्रुत शब्द आहे त्याचे मूळ ग्रीस-मधीलच आहे. इ स पूर्व ४९० मध्ये मॅरॅथॉन या गावी ग्रीकानी विजय मिळविला हा विजय अथेन्स या राजधानीत कळविण्यासाठी एक जलदगतीचा दूत पाठविण्यात आला. मॅरॅथॉन ते अथेन्स हे अतर आता पचवीस मैल आहे, पण त्यावेळी ते पाच–सात मैलांनी अधिक असले पाहिजे कारण त्यावेळचे रस्ते वळणावळणाचे होते. मॅरॅथॉनहून ते सुमारे बत्तीस मैलाचे अतर तो दूत कमीत कमी वेळात धावत गेला, त्यावरून मॅरॅथॉन रेस हा शब्द रूढ झाला

जगातील पहिले ऑलिंपिक सामने ग्रीसमधील ऑलिंपियात इ. स पूर्वी ७७६

मध्ये झाले जगाच्या इतिहासात त्या वेळेपर्यंत एवढे भव्य सामने इतरत्र कोठेही झाले नव्हते या प्राचीन ऑलिंपिक्समध्ये धावणे, बॉक्सिग, थाळी फेकणे, कुस्ती, रथाच्या शर्यती असे अनेक प्रकार होते देवतेसमोर चाललेल्या या सामन्यात कुस्ती, बॉक्सिग किंवा रथांच्या शर्यतीत अनेकदा स्पर्धकांना मृत्यु येई क्रीडांगणावर मरण पावलेल्या शूरांना शेवटी ऑलिव्ह वेलीचा मुकुट घालण्यात येई. पुढे रोमन साम्राज्याचा उदय झाला आणि ग्रीसपेक्षा अधिक भव्य प्रमाणावर रोमच्या रोमन सम्राटांनी सामने सुरू केले नीरोसारख्या विकृत सम्राटांनी या सामन्यांत क्रौर्याची कमाल केली आणि खवळलेल्या सिंहापुढे माणसे सोडण्याचेही प्रकार केवळ करमणुकीसाठी करून मूळ ग्रीक क्रीडामहोत्सवाची विटंबना केली

हिरोडोटस हा इतिहासकार आणि मनस्वी प्रवासी इ स पूर्व ४८० मध्ये जन्मला याच सुमारास अथेन्सच्या जवळपासच्या गावांचे एकीकरण होऊन बृहन् अथेन्सची स्थापना झाली, आणि त्याचेच पुढे अथेनियन साम्राज्यात रूपांतर झाले इ स पूर्व ४७६ ते ४६९ या काळात पिंडर हा महाकवी आणि सॉक्रेटिस हा महान तत्त्ववेत्ता याचे जन्म झाले पेरिक्लसच्या हाती यानंतर पाच वर्षांनी सत्ता आली तेव्हा अथेन्सची लोकसंख्या चाळीस हजार होती इ स पूर्व ४६० मध्ये डेमॉक्रिटस या तत्त्ववेत्त्याचा जन्म झाला तो थोर गणिततज्ज्ञही होता. त्यानेच प्रथम लोकशाहीची कल्पना मांडली आणि त्याच्याच नावावरून 'डेमॉक्रसी' हा शब्द रूढ झाला पार्थेनॉन हे महाप्रचंड शिल्प इ स. ४५४ नंतरच्या सोळा वर्षांत बांधले गेले 'प्रॉमिथिस बाऊंड' ही महान शोकांतिका लिहिणाऱ्या अचीलस या महाकवीचा जन्म इ स पूर्व ४५० मध्ये झाला त्यानंतर अनेक शतकांनी शेले या दुसऱ्या महाकवीने 'प्रॉमिथिस अन्बाउंड' हे काव्य लिहिले ज्याला वैद्यकाचा पिता म्हणतात तो हिपोक्रिटस अचीलसनंतर दहा वर्षांनी जन्मला

त्यानंतरच्या वीस वर्षांत अथेन्सवर आपत्तीमागून आपत्ती कोसळल्या स्पार्टन लोकांनी ग्रीसवर चढाई केली, पेरिक्लसचे निधन झाले आणि प्लेगच्या साथीने साऱ्या अथेन्सवर सहाराची प्रचंड लाट आली मात्र या आपत्तीच्या काळातच प्लेटो या जागतिक महत्त्वाच्या तत्त्ववेत्त्याचा जन्म झाला 'ओडिपस रेक्स' ही जगातील सर्वश्रेष्ठ शोकांतिका सोफोक्लिसने इ स पूर्व ४२० मध्ये लिहिली

या शोकांतिकेचे सूत्र असे आहे, की एका राजाला ओडिपस हा मुलगा झाला, तेव्हा ज्योतिषाने सांगितले की या मुलाच्या हातून त्याच्या बापाचा म्हणजे राजाचा मृत्यु आहे हे भयंकर भविष्य ऐकल्यावर राजाने मुलाच्या पायांत खिळे ठोकले आणि सेवकांना हुकूम दिला की त्या राजपुत्राला जंगलात नेऊन त्याचा शिरच्छेद करावा सेवक त्या नवजात अर्भकाला जंगलात नेतात, पण त्यांना त्याची दया येते. ते सेवक मुलाला तसेच जंगलात ठेवतात आणि परत येऊन राजाला सांगतात की

मुलाला ठार मारले एका धनगराला ते मूल सापडते तो त्याला वाढवतो मुलगा महापराक्रमी होतो जवळपासच्या लोकाची सघटना करून राजपुत्र त्या राजावर स्वारी करतो आणि राजाचा वध करतो मात्र आपण आपल्या बापालाच ठार मारले याची त्याला कल्पना नसते

त्या काळी अशी रूढी होती की विजेत्याने पराजित राजाच्या बायकोशी विवाह करायचा त्याप्रमाणे राजपुत्र त्या राणीशी म्हणजे स्व.तच्या जन्मदात्या आईशीच लग्न करतो पण पुढे त्याला जेव्हा सत्य कळते तेव्हा पश्चात्तापाने ओडिपस आपले डोळे फोडून घेतो या नाटकाच्या कथेवरून मानसशास्त्रात 'ओडिपस कॉम्प्लेक्स' ही सज्ञा रूढ झाली आहे श्री पु ल देशपाडे यांनी 'राजा ओदिपोस' या नावाने या नाटकाचा अनुवाद मराठीत केला असून श्री सदानद रेगे यानीही 'राजा ओडिपस' या नावाने या नाटकाचा अनुवाद केला आहे अपरिवर्तनीयता हा शोकातिकेचा गाभा असून तो या शोकातिकेत अत्यत प्रभावीपणे मांडला आहे.

इ स पूर्व ४१५ मध्ये सिसिलीने ग्रीसवर स्वारी केली आणि अथेन्सच्या सैन्याला नामोहरम करून अरिकामधील डेसेलीयम भाग व्यापला पण अथेन्सच्या नौदलाने विजय मिळवला इ स पूर्व ३९९ मध्ये सॉक्रेटिसला विषाचा प्याला देऊन ठार मारण्यात आले तो लोकांना अश्रद्ध करतो आणि परपरेविरुद्ध जनतेला चिथावणी देतो असा त्याच्यावर आरोप होता सॉक्रेटिस तुरुगात होता, मृत्यूच्या शिक्षेची वाट पाहत होता, तेव्हा त्याचे काही मित्र त्याला गुप्तपणे भेटले आणि चोरवाटेने त्याची सुटका करण्याचे त्यानी आश्वासन दिले पण पळून जाण्याला स्पष्ट नकार देऊन सॉक्रेटिसने त्याना प्रश्न केला, " तुम्ही मला अशा जागी न्याल का, की जेथे मला कधीही मृत्यु येणार नाही ? मी सत्यापासून पळून जाणार नाही "

सॉक्रेटिसच्या मृत्यूनतर पच्याऐंशी वर्षांनी ॲरिस्टॉटल हा तत्त्वज्ञानातील दिग्गज जन्माला आला दरम्यानच्या काळात अथेन्सचे सैन्य आणि स्पार्टन्स याची युद्धे, जय-पराजय याचे चक्र चालूच होते इ स. पूर्व ३४७ मध्ये प्लेटोचे निधन झाले. त्यानत सम्राट अलेक्झांडरचा उदय झाला त्याने आशिया मायनर, इजिप्त, पॅलेस्टाईन, फोनेशिया असे एकामागून एक भूप्रदेश काबीज केले इ स पूर्व ३२५ मध्ये तो भारताच्या सीमेपर्यंत धडकला पण त्यानतर दोनच वर्षांत बॅबिलॉनमध्ये अलेक्झाडरचे निधन झाले आणि ग्रीसवरची पकड काहीशी सैल झाली

यानतर काही वर्षांनी इपिक्युरसचा अथेन्समध्ये जन्म झाला याच्याच नावावरून 'इपिक्युरीयन' हा शब्द स्वच्छदी या अर्थी इग्रजीत रूढ झाला आहे.

कवी थिऑक्रिटस आणि शास्त्रज्ञ आर्किमिडिस हे याच काळातले नवा शोध लागल्यावर वस्त्राचे भान न ठेवता आंघोळीच्या टबातून बाहेर पडणारा आर्कि-

मिडिस हाच शास्त्रज्ञ इ स पूर्व १५० मध्ये हेरॉन हा इजिनियर जन्मला त्याने त्या काळात वाफेच्या इजिनाचे तत्त्व शोधून काढले त्याचाच विस्तार व प्रत्यक्ष कृती पुढे जेम्स वॅट यांनी केली याच सुमारास रोमन सम्राटानी ग्रीसवर स्वारी करून ते जिंकले इ स. पूर्व ४८ साली सम्राट ज्यूलियस सीझर आणि पॉम्पी यांच्यात युद्ध होऊन सीझरचा विजय झाला रोमवर ऑगस्टसचे राज्य आले, तेव्हा त्याने ग्रीसचे स्वतत्र अस्तित्व नष्ट करून त्या देशाला रोमन साम्राज्याच्या एका प्रांताचा दर्जा दिला नतर नीरो या क्रूर रोमन सम्राटाने अनेक श्रेष्ठ ग्रीक पुतळे नष्ट केले आणि काही निवडक पुतळे रोमला नेले. अलेक्झांड्रियातील ग्रथालयाला लागलेल्या जगप्रसिद्ध आगीत अमूल्य ग्रीक हस्तलिखित ग्रंथ नष्ट झाले प्राचीन ज्ञानाचा ठेवा कायमचा हरवला. (इ स २७३) ऑलिंपिक खेळाची प्रथाही ग्रीस-मधून नाहीशी झाली प्राचीन ग्रीसमधील अखेरचे ऑलिंपिक सामने इ स. ३९३ मध्ये झाले

पाचव्या शतकात गॉथ आणि व्हॅन्डॉल लोकानी ग्रीसवर स्वारी केली. व्हॅन्डॉलनी तर अथेन्समध्ये इतकी नासधूस केली की बेमुर्वत नासधुशीला इग्रजीत त्यावरून 'व्हॅन्डॉलिझम्' हा शब्द कायमचा रूढ झाला

त्यानतर स्लाव्ह, बिअटाईन या लोकांनी ग्रीसवर स्वाऱ्या केल्या. पण ग्रीकांनी बंड करून प्रचंड लढा दिला. क्रूसेडर्स या नाव इतिहासात प्रसिद्ध असलेल्या सैनिकांनी ग्रीसवर चढाई केली मग सुलतान मुरादने ग्रीसचा मॅकेडोनिया भाग जिंकला. तुर्क, अल्बेनियन्स अशा अनेकांच्या स्वाऱ्या या लहानशा देशावर होतच राहिल्या. त्या परतविण्याचे, प्रसंगी पराभूत होण्याचे तर कधी विजयी होण्याचे खडतर काम अथेन्सनेच केले इतिहासाची ही विलक्षण दैवगती आहे, की काही देशावर शेकडो वर्षे आक्रमण होत नाही (उदाहरणार्थ जपान) तर ग्रीससारख्या एखाद्या देशावर अगणित स्वाऱ्या होतात. एकोणिसाव्या शतकातही तुर्कस्थानने ग्रीसवर स्वारी केली अगदी अलीकडे, १९४० साली इटालीनेही ग्रीसवर स्वारी केली आणि हिटलर व मुसोलिनी यांच्यातील ठरावानुसार हिटलरने १९४१ साली ग्रीसवर ताबा मिळविला पण १९४४ साली हिटलरला ग्रीस सोडावा लागला. ग्रीसने अक्षरश हजारो वर्षे स्वातत्र्यासाठी जो अविरहित लढा दिला, त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

अगदी अलीकडे म्हणजे ऑक्टोबर १९८१ मध्ये ग्रीक व अमेरिकन पुरावस्तु-तज्ज्ञानी अथेन्समध्ये केलेल्या उत्खननात 'पेन्टेड स्टोवा' नावाच्या प्राचीन इमा-रतीचे बहुतेक अवशेष सापडले गेल्या शभर वर्षात इतका मोठा प्राचीन बांध-कामाचा ठेवा सापडला नव्हता असे 'टाईम' (ता. ३० नोव्हेंबर १९८१) या नियतकालिकाने म्हटले आहे पर्शियाने केलेल्या संहारानंतर इ. स. पूर्व ४६० मध्ये

ही भव्य इमारत ग्रीकांनी बांधली 'स्टोवा' या नावावरूनच 'स्टॉईसिझम' हे तत्त्वज्ञानातील एका शाखेचे नाव पडले आहे या पेन्टेड स्टोवा इमारतीत ग्रीक चित्रकलेचे आणि शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने होते पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे याच इमारतीत जगातील लोकशाहीचा पाया घातला गेला त्यावेळच्या ग्रीक तत्त्वज्ञांनी याच इमारतीत जनतेचे सरकारमधील प्रतिनिधित्व मान्य केले आणि त्याला जाहीर पाठिंबाही दिला या पेन्टेड स्टोवा इमारतीच्या आसपासच्या चाळीस एकरांत जगातील संस्कृती, नाट्यशास्त्र, लोकशाही, कायदा पद्धत आणि शिल्पकला यांचा उगम झाला आहे असे पुरातत्त्वनिपुण होमर ए. थॉम्पसन यांनी म्हटले आहे

अथेन्समधील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे अक्रोपोलिस टेकडी मूळ ग्रीक अर्थाने अ‍ॅक्रोपोलिस म्हणजे उंचवटा किंवा टेकडी हे सामान्यनाम असले तरी आता अक्रोपोलिस हे नाव अथेन्समधील या विशिष्ट टेकडीलाच पडले आहे संरक्षणाच्या दृष्टीने ही टेकडी आदर्श असल्याने ग्रीक राजांनी हिचा आश्रय घेतला पेरिक्लिस्ट्स राजाने सलामीच्या विजयानंतर या टेकडीवर अथीना देवीसाठी शंभर फूट उंचीचे भव्य देवालय बांधण्यास सुरुवात केली त्यानंतरच्या दीडशे वर्षांत या टेकडीवर उत्कृष्ट बांधकामाच्या भव्य कलाकृती निर्माण झाल्या. यापैकी काहींची मोडतोड नंतरच्या स्वाऱ्यांत आक्रमक सैन्याने केली पण त्या खंडित वास्तू, खांब, मूर्ती यांचे एक प्रदर्शन 'अक्रोपोलिस म्युझियम' या नावाने सरकारने सुरू केले असून प्राचीन कलेचा अमूल्य ठेवा जतन केला आहे या टेकडीशी ग्रीक इतिहासातील अनेक भल्याबुऱ्या स्मृती निगडित झाल्या आहेत

इ स पूर्व दोनशे वर्षे राजा एगियस याने आपल्या मुलाला समुद्रातून स्वारीवर पाठवले त्याने कप्तानाला सांगितले होते की या स्वारीत राजपुत्र मारला गेला तर येताना काळी शिडे लावून आणा वास्तविक या नाविक लढाईत राजपुत्र विजयी झाला होता पण विजय साजरा करण्याच्या घाईगर्दीत कप्तान काळी शिडे खाली उतरण्याचे विसरला राजा अक्रोपोलिस टेकडीवरून पाहत होता नावेवर काळी शिडे दिसल्याबरोबर राजपुत्र मारला गेला असे त्याला वाटले आणि राजाने त्या टेकडीवरून उडी मारून आत्महत्या केली

इ स पूर्व ४८६ मध्ये अथीना येथे एक देवालय ग्रीकांनी बांधले ते विजय साजरा करण्यासाठी, पण १६८७ साली तुर्कांनी अथेन्सवर कबजा केला आणि याच अक्रोपोलिस टेकडीवर तोफा आणल्या पण तोफांच्या टप्प्याच्या आड अ‍ॅथीनाचे देवालय येते म्हणून त्यांनी ते सुंदर, भव्य देवालय पाडून टाकले इंग्लंडचे लॉर्ड एल्जिन यांनी प्राचीन कलेची ती अवहेलना पाहून देवालयाचे ते तुकडे तुर्कांच्याकडून घेऊन बोटीने इंग्लंडला पाठवले अजूनही ते ब्रिटिश म्युझियममध्ये जपून ठेवले असून एल्जिन मार्बल्स या नावाने ते प्रसिद्ध आहेत.

या टेकडीवरील एका प्राचीन मंदिरात 'विंगलेस व्हिक्टरी' पुतळा आहे. त्याची कथा म्हणजे मानवी कल्पना आणि इच्छाशक्ती याचे गमतीदार मिश्रण आहे. ज्या काळात ग्रीकांना अनेक लढायात पराभव पत्करावे लागले, त्या काळात एका लढाईत त्यांचा विजय झाला, तेव्हा त्यांनी विजयदेवतेचा पुतळा केला त्या वेळच्या कल्पनेप्रमाणे विजयदेवतेला पंख असत म्हणून ग्रीकांनी पंख असलेला पुतळा केला. पण त्याच पंखांनी विजय आपल्यापासून उडून जाऊ नये म्हणून त्यांनी त्या पुतळ्याचे पंख तोडले ! अँथीना देवीच्या मंदिरातील हा 'विंगलेस व्हिक्टरी' चा (पंखहीन विजयदेवता) पुतळा ग्रीकांच्या त्या महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे या विजयदेवतेभोवती प्रचंड स्तंभ बांधून ग्रीकांनी तिला अक्षरशः तुरुंगात ठेवले होते— आपला विजय कुठे पळून जाऊ नये म्हणून !

अक्रोपोलिसचे काव्य समजायला व्हिक्टर ह्यूगोसारखा प्रतिभाश्रेष्ठच हवा. तो म्हणतो, 'अथेन्समधली ही भव्य देवालये पडलेली नाहीत यांचे बांधकाम नुकतेच सुरू झाले आहे अजून ती पूर्ण व्हायची आहेत पूर्ण झाल्यावर ती जगाला भव्योदात्त आदर्श घालून देतील अथेन्समधील प्रभात दररोज नवनवोन्मेषशालिनी असते म्हणून हे राष्ट्र चित्तप्रसन्न राहिले आहे ' अथेन्समधील सकाळ ही ' ट्रायफंट मॉर्निंग' असते असे ह्युगोने म्हटले आहे नित्शे या जर्मन तत्त्वज्ञान्याने एका धीरोदात्त नायकाच्या शौर्याचे आणि कलात्मकतेचे वर्णन करताना म्हटले आहे; 'The hero is lighthearted and dances in battle !' तेच वर्णन या ग्रीकांना ततोतंत लागू पडते ग्रीक सैनिक रणक्षेत्रावरही नृत्य करीत असे सोफोक्लीसने म्हटले आहे प्रवाशांच्या मोसमात अँक्रोपोलिस टेकडीच्या पायथ्याशी हजारो खुर्च्या टाकल्या जातात रात्री या भव्य सांस्कृतिक केंद्राचा इतिहास आवाज आणि प्रकाश यांच्या साहाय्याने सांगितला जातो दिल्लीला असाच इतिहास 'लाईट अँण्ड साऊंड' या नावाने सादर केला जातो

ग्रीसमधीलच नव्हे तर सबंध जगातील सर्वांत प्रसिद्ध असे प्राचीन बांधकाम म्हणजे अथेन्समधील अँक्रोपोलिस टेकडीवरचे पार्थनॉन मंदिर त्याचा अर्थ 'चेंबर ऑफ व्हर्जिन्स' (कुमारिकांचे सदन) असा आहे इ स पूर्व ४४७ ते ४३२ मध्ये पेरिक्लीस राजाने हे मंदिर बांधले. फिडियस हा त्या मंदिराचा आर्किटेक्ट होता डेमॉस्थेनिस या विश्वविख्यात वक्त्याने हे मंदिर बांधल्यानंतर शंभर वर्षांनी भाषण केले होते 'Most beautiful poem in morble' (संगमरवरी दगडात कोरलेले सर्वांत सुंदर काव्य) असे पार्थनॉनचे वर्णन केले आहे प्राचीन काळी पार्थनॉनमधील देवतेच्या अंगावर सुवर्णाचे अलंकार आणि सुवर्णाची वस्त्रे घातली जात. याच इमारतीत शेकडो वर्षे ग्रीसचा सुरक्षित सरकारी खजिनाही होता कारण देवीचे मूल्यवान अलंकार, वस्त्रे हलवून खजिन्यात ठेवण्यासाठी अक्रोपोलिसची

टेकडी उतरून जाणे कठीण होते म्हणून ग्रीक राजानी आपला खजिनाच पार्थनॉन-वर ठेवला होता अथीना या बुद्धिमत्तेच्या देवीची पार्थनॉनमधील पुजारी पूजा करीत असत सुरुवातीला पार्थनॉनमधील एकाच दालनाचे नाव 'चेंबर ऑफ व्हर्जिन्स' असे होते, पण पुढे ते सर्वच इमारतीला पडले पार्थनॉनचे स्तभ डोरिक पद्धतीचे, पाढऱ्याशुभ्र सगमरवराचे आणि भव्य आहेत या इमारतीचा काही भाग खडित झालेला असूनही पार्थनॉनचे प्राचीन वैभव अजूनही आपल्या डोळ्यापुढे स्पष्टपणे उभे राहते एकोणसत्तर मीटर्स लाब आणि तीस मीटर्स रुद, शभर मीटर्स उच्च अशी ही ग्रीक इमारत जगाचे एक शाश्वत वैभव ठरली आहे

थिसियसचे मदिर हे पार्थनॉनच्या आसपासच्या काळातच बाधले गेले अथीना हेफॅस्टस या देवीचे हे मदिर असून औद्योगिक कलांची ही देवता आहे पार्थनॉन-प्रमाणे हे मदिरही डोरिक स्तभांचे आणि पेन्टेलिकन सगमवराचे आहे इटेक्थीयमचे देवालय मात्र वेगळ्या पद्धतीचे आहे या देवालयात स्तभांऐवजी सहा ग्रीक देवता कोरल्या असून त्याचे सौंदर्य हजारो वर्षांनतर आजही स्तिमित करणारे आहे ग्रीसमध्ये इतरत्रही अशी अनेक प्राचीन पण खडित मदिरे त्या काळातील भव्य पण खानदानी सस्कृतीचे दर्शन घडवतात उदाहरणार्थ, एका आडबाजूच्या, चार हजार फूट उचावर बाधलेले बसॉई मदिर अपोलो देवतेने आपल्याला प्लेगपासून वाचवले म्हणून ग्रीकानी इ स पूर्व ४२० ते ४१५ या काळात उभारलेले हे भव्य मदिर अगदी अलीकडेपर्यंत अज्ञातच होते. १७६८ साली बॉबर नावाच्या फ्रेंच आर्किटेक्टने या अपोलो मदिराचा शोध लावला अडतीस मीटर्स लाब, चौदा मीटर्स रुद आणि साठ मीटर्स उच असलेल्या या मदिराचे छत नष्ट झाले आहे पण बहुतेक स्तभ अडीच हजार वर्षे पाऊस, वारा, ऊन याना तोंड देऊन अजून उभे आहेत. अपोलोचे कॉरिन्थ मदिर मात्र प्राय नष्ट झाले असून आता त्याचे पाच पूर्ण आणि दोन अर्धवट डोरिक स्तभच काय ते कसेबसे उभे आहेत उजाड माळावर बाधलेले हे देवालय 'रात्रीच्या प्रेमा'चे मदिर म्हणून ग्रीक इतिहासात प्रसिद्ध आहे दुर्दैव असे की, तुर्कांच्या बरोबर झालेल्या लढाईचा अवाढव्य खर्च भागवण्यासाठी ग्रीसने या मदिराचे काही अमूल्य भाग इग्लड, जर्मनी आणि फ्रान्स या देशांना विकले प्रेमाच्या मदिराची एवढी विटबना क्वचितच झाली असेल

अथेन्सच्या उपनगरात सीमेटरी नावाचा भाग आहे मातकाम आणि शिल्पकाम करणारे कारागीर या भागात प्राचीन काळी राहत असत अजूनही या भागात उत्कृष्ट शिल्पकृती पाहायला मिळतात या परिसराची काही जागा स्मशानभूमी म्हणून वापरण्यात येत असे 'प्रॉमनडे ऑफ आर्लेस' हे विशेष प्रेक्षणीय स्थळ असून अर्धवट खडित झालेले काही उत्कृष्ट ग्रीक प्राचीन पुतळे येथे आहेत त्यात मानव, पशू आणि अर्धमानव, अर्धपशू अशा विविध कलाकृती आहेत.

ज्या नावावरून आजही ऑलिंपिक सामने चालू आहेत, ते मूळ ऑलिंपिया हे मंदिर झिवस ऑलिंपियसचे आहे ॲरिस्टॉटलने या मंदिराची आणि विस्तीर्ण क्रीडांगणाची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. इ स पूर्व ५१५ मध्ये या विशाल मंदिराच्या बांधकामाला सुरुवात झाली, पण पुढील चारशे वर्षे त्यात बदल होतच होते या मंदिराचे सोळा स्तंभ अजून उभे असून ग्रीक लोक इस्टरमध्ये अद्याप या ठिकाणी क्रीडामहोत्सव करतात लिंडॉस हा खडक अगदी सग ाच्या काठावर उभा आहे. या एकाकी खडकावर अथीन लिंडिया मंदिराचे चारच स्तंभ आहेत सेंट जॉन यांनी या भागात आपले धार्मिक कार्य केल्याचा इतिहासात उल्लेख आहे.

डेल्फी हे ग्रीसमधील एक जगप्रसिद्ध ठिकाण या ठिकाणी प्राचीन काळी आकाशवाणी होत असे ती ' ओरॅकल ऑफ डेल्फी ' या नावाने सर्वश्रुत आहे डेल्फी येथील अपोलो मदीर आता बहुतांश नष्ट झाले आहे. तुटलेले सात खांब आणि काही चौथरे उभे आहेत, एवढेच. इथे होणाऱ्या आकाशवाणीने शेकडो वर्षे ग्रीसचे भवितव्य ठरवले या भागात झालेल्या अनेक भूकंपांनी लोकांचा आकाशवाणीच्या देवत्वावरचा विश्वास अधिकच दृढ केला होता.

ग्रीसमधला फेरफटका म्हणजे अडीच हजार वर्षांपूर्वीच्या सुवर्णयुगाला दिलेली भेटच ! पण आजचा ग्रीस मात्र पराभूत राष्ट्राच्या मालिकेत बसतो स्वतंत्र असूनही त्याची रया गेल्यासारखी वाटते. याचे प्रमुख कारण म्हणजे युरोपमधील देश विजेच्या वेगाने औद्योगीकरणाकडे गेले पण ग्रीस मात्र अजूनही शेतकऱ्यांचा, गुराख्यांचा देश राहिला आहे प्रवाशांना हा देश स्वस्त वाटतो याचे कारण त्याची गरीबी ! एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या या देशात बेकारी इतकी आहे, की ग्रीक तरुण नोकरीच्या शोधात अमेरिका, जर्मनी, ऑस्ट्रेलिया अशा देशांत जातात परदेशात काम करणाऱ्या हजारो ग्रीकांच्याकडून त्यांच्या नातेवाईकांना दरसाल चाळीस कोटी डॉलर्स ग्रीसमध्ये पाठवले जातात ग्रीसचा हा मोठाच आधार आहे. अजून या देशात हुंड्याची जाचक पद्धत आहे बहिणीचे लग्न व्हावे म्हणून भावाने आपले लग्न मागे ठेवून बहिणीसाठी हुंडा जमवण्यात जवानी घालवली असे प्रकार मोठ्या प्रमाणावर अजून घडतात. ग्रीसचे सरकार मुलींच्या नावावर लग्नासाठी बचत करता यावी म्हणून नॅशनल फंडातर्फे बँकांत खास खाती उघडण्याची व्यवस्था करते

मात्र दैनंदिन जीवनात हे दु'ख जाणवत नाही हजारो वर्षे युद्ध, दारिद्र्य, भूकंप बेकारी यांना तोंड देणारा सर्वसामान्य ग्रीक माणूस धीराने जीवनाला सामोरा जातो आणि मद्य, द्राक्षे आणि नृत्य यात आनंदाने जीवन व्यतीत करतो

□ □ □

एक अद्‌भुतरम्य गाव :

# होनोलुलू !

होनोलुलू या नावातच एक जादू आहे. अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टीतील ही एखादी स्वप्ननगरी असावी असे नावावरून वाटते होनोलुलू हे अमेरिकेचेच एक शहर असले तरी भौगोलिकदृष्टया ते अमेरिकेपासून दोन हजार मैल दूर आहे विमानाचा एकमार्गी प्रवास सॅन्‌फ्रॅन्सिस्को किंवा लॉस एंजेलिस या जवळच्या अमेरिकन शहरापासून आठ तासांचा आहे अर्थात होनोलूलूला जाणे खर्चा-चेही आहे त्यामुळे अमेरिकेला जाणाऱ्या लक्षावधी परकीय प्रवाशांपैकी एक टक्का लोकही होनोलुलूला जात नाहीत मला मात्र त्या गावी जाण्याची - खूप उत्सुकता होती. माझे जागतिक प्रवासाचे विमानाचे तिकीट असल्यामुळे मला त्याच तिकिटात होनोलुलू पाहता आले असते म्हणून मी टोकियोहून मुख्य अमेरिकेस जाण्यापूर्वी वाटेत होनोलूलुला मुक्काम करण्याचे ठरवले तेथे ' ईस्ट वेस्ट सेंटर ' आहे आणि या केंद्रातर्फे पौर्वात्य आणि पाश्चात्य देशांत अधिक सलोखा निर्माण करण्याचे आणि या दोन्ही भागांतील ज्ञानाचा प्रसार करण्याचे कार्य चालते अशी माहिती मला पूर्वीच मिळाली होती. म्हणून मी त्या केंद्राची अधिक चौकशी केली, तेव्हा कळले की हवाई विद्यापीठात अनेक परदेशी विद्यार्थी, साहित्यिक, कलावंत यांचे स्वागत होते आणि विद्यापीठातर्फे वसतिगृहात राहण्याचीही सोय होते.

हवाई विद्यापीठातील परदेशी विद्यार्थ्यांच्या विभागाच्या प्रमुख जून नॉटन नावाच्या बाई आहेत त्यांना पत्र लिहिले. माझ्या विमानाच्या प्रवासाच्या तारखा आधीच ठरल्या होत्या. त्यामुळे पत्रातून त्यांना कळविले की, २ जुलैला टोकियोहून फ्लाईट क्र. ६११ ने निघून ३ तारखेस सकाळी नऊ वाजता मी होनोलूलूला येईन. कोणा भारतीय विद्यार्थ्याला विमानतळावर पाठवणे शक्य असेल तर पाठवावे

मी मुंबई सोडेपर्यंत तरी त्याचे उत्तर आले नव्हते पण मी १९ जूनलाच निघालो असल्याने २ जुलैपर्यंत घरच्या पत्त्यावर पत्र आले असावे आणि अमेरिकन पद्धतीप्रमाणे नॉटन बाईंनी माझी व्यवस्था केली असावी असा माझा अदाज होता टोकियोहून मी ठरलेल्या वेळी म्हणजे दोन तारखेस रात्री अकरा वाजता निघालो आणि सकाळी नऊ वाजता होनोलुलूला पोचलो विमानात उत्तम व्हिस्की आणि चिकनचे मस्त जेवण जेवून झोपलो होतो वाटेत पॅसिफिक महासागरच होता अर्थात खिडकीतून बाहेर पाहण्यासारखे काहीच नव्हते मी होनोलुलू येथे अमेरिकेत परदेशातून प्रवेश करीत असल्याने पासपोर्ट, व्हिसा वगैरेची तपासणी झाली पण मी अमेरिकन सरकारचा माजी कर्मचारी असल्याचे कार्ड होते म्हणून काहीच अड-चण न येता व माझे सामानही उघडावे न लागता मी हद्दीपार झालो प्रवाशांना उतरून घेण्यासाठी अनेक नातेवाईक, मोठ्या हॉटेल्सचे प्रतिनिधी वगैरे आले होते अनेकांनी अपेक्षित प्रवाशांच्या नावाचे फलक आपल्या हाती सहज दिसावे असे धरले होते पण माझ्या नावाचा फलक दिसेना कोणीही भारतीय विद्यार्थी आढ-ळेना आणि ध्वनिवर्धकावर माझ्या नावाचा पुकाराही झाला नाही. तेव्हा काहीतरी गडबड झाली असावी असा मी तर्क केला जून नॉटनबाईंना माझे पत्र मिळाले नसेल किंवा काही अडचणीमुळे 'व्यवस्था करता येत नाही' असे त्यांनी मुंबईच्या पत्त्यावर लिहिलेही असेल मग मी विमानतळावरून हवाई विद्यापीठाला फोन केला नॉटनबाईंच्या खोलीत ऑपरेटरने फोन दिला, पण तो नुसताच वाजत होता त्या रजेवर असणेही शक्य होते विमानतळावरच्या चौकशीच्या कचेरीत विचारणा केली तेव्हा तेथील हवाई सुंदरीने—हवाईच्या सुंदरीने—सांगितले की 'हवाई विद्यापीठ खूप दूर आहे तिथे बस जात नाही टॅक्सीला बारा ते चौदा डॉलर्स पडतील' एकदा इथपर्यंत आल्यावर विद्यापीठापर्यंत जाणे भागच होते. मी टॅक्सी केली.

विद्यापीठाचे आवार एवढे अवाढव्य होते की जूनबाई नक्की कोणत्या इमार-तीत काम करतात हे माहीत नसेल तर पाच–दहा मैलांचा म्हणजेच आठ–दहा डॉलर्सचा आणखी फेरा पडणार होता इतक्यात मला आठवले की ईस्ट–वेस्ट सेंट-रच्या पुरुषांच्या वसतीगृहाला अलामोना असे नाव आहे. जर माझी व्यवस्था त्याच वसतीगृहात व्हावयाची असेल तर इतरत्र उतरून, टॅक्सी सोडून मग सामान घेऊन वसतीगृहावर जाणे फारच अडचणीचे आणि कष्टाचे होते म्हणून मी थेट वसतीगृहाकडे टॅक्सी न्यायला सांगितले तिथे व्यवस्थापिका म्हणून पॅट हॉल नावाची तरुणी होती ती म्हणाली की वसतीगृहात जागा नाही मी नॉटन बाईंना फोन करण्यास सांगितले सुदैवाने नॉटनबाई फोनवर होत्या मी माझे नाव सांगित-ल्यावर त्या आश्चर्याने म्हणाल्या. 'मिस्टर मंत्री, तुम्ही आलात ?' त्यावरून ती मला नावाने ओळखत असावी हे उघड होते ती म्हणाली, "तुमचं पत्र उशीरा मिळालं. पण तुम्ही उद्या येणार म्हणून उद्यासाठी मी व्यवस्था केली होती. तुम्ही

एक दिवस आधी कसे काय आलात ? ' मला त्या बाईंच्या उद्गाराचे आश्चर्य वाटले मी म्हटले, " मी अगदी ठरलेल्या वेळी आलो आहे तीन तारखेला सकाळी नऊ वाजता येतो अस मी लिहिल होत '

" पण आज दोन तारीख आहे "

" हे कस शक्य आहे ? कारण दोन तारखेला रात्री नऊ वाजता मी टोकियो-हून निघालो "

" ते मी आपल्याला नतर सांगेन तूर्त तुम्ही तिथेच थाबा मी कोणातरी भारतीय विद्यार्थ्याला तुमच्याकडे पाठवून तुमची खोलीची व्यवस्था करते " असे म्हणून तिने फोन बद केला कॅलेंडर पाहण्यात या बाईचा काहीतरी घोटाळा झाला असावा हे मी ओळखले कारण पॅन अमेरिकन विमानाच्या वेळा आणि तारखा कशा चुकतील ?

नॉटन बाईंनी इडियन स्टुडट्स हॉस्टेलच्या क्रीडागृहात फोन केला आणि 'कोणी भारतीय विद्यार्थी आहे काय ?'—असे विचारले, योगायोग काय आहे पाहा! ' त्यावेळी फोनजवळचा भारतीय विद्यार्थी हा मराठी भाषिक होता आणि सबध होनोलुलूत तो एकमेव मराठी सशोधक होता त्याने फोन घेतला तेव्हा नॉटन बाई म्हणाल्या, " भारतातून रमेश मत्री नावाचे एक पाहुणे आले आहेत "

" ते लेखक मत्री काय ?' त्याने उत्सुकतेने विचारले

नॉटनबाई म्हणाल्या, " होय ! तुम्ही त्याना ओळखता ?"

" आमचा प्रत्यक्ष परिचय नाही पण त्याची पुस्तक मी वाचली आहेत "

" त्याच्या राहण्याची व्यवस्था तुम्ही करू शकाल काय ?"

" आनदाने करीन! त्यांना माझ्याकडेच राहायला आणि जेवायला येऊ द्या "

मग मी ईस्ट-वेस्ट सेंटरच्या वसतीगृहात रिसेप्शनजवळ आहे अस नॉटन-बाईंन सागितल्यावर ते एकमेव मराठी सशोधक विद्यार्थी लगेच तेथ आले

" माझ नाव नारायण वर्दे मी इथच राहतो तुम्ही माझ्याकडेच चला सुदैवान माझ्याकडे जादा खोलीही रिकामी आहे " असे म्हणून त्यांनी माझी बॅग घेतली दुसरी बॅग घेऊन मी निघालो मघाशी जागा नाही ' म्हणून सागणारी मुलगी आश्चर्याने माझ्याकडे पाहू लागली

खोलीत आल्यावर वर्दे म्हणाले, मी मूळचा गोव्याचा ! वर्षभर इथ आहे मी आणि माझी पत्नी इथ राहतो ती कामावर गेली आहे दुपारी चारला येईल "

त्यांनी चहा केला आणि माझ्यासाठी शेजारची खोली व्यवस्थित करून मला दिली खोली अत्यत सुदर होती समोरचा देखावा डोळ्यांचे पारणे फेडणारा होता सुदर हिरवी झाडी, डोंगर, जलाशय हे भव्य काचाच्या खिडकीतून गोजिर-वाणे दिसत होते लेखन करायला ही आदर्श जागा होती मी तसे वर्दे यांना म्हटले

तेव्हा त्यांनी सांगितले, "वाटेल तितके दिवस इथ राहा आणि भरपूर लेखन करा !"

"पण मला उद्या सकाळीच सॅनफ्रॅन्सिस्कोला जायच आहे" मी म्हटल

"उद्या ? होनोलुलूसारख्या जगप्रसिद्ध रमणीय ठिकाणी फक्त एकच दिवस राहणार ? अहो तीन तारखेला माझ्या लग्नाचा वाढदिवस आहे मी आणि बायकोन रजा घेतली आहे मी विद्यापीठाकडून उद्यासाठी गाडी घेतली आहे तुम्ही उद्याचा दिवस राहा आणि परवा जा"

"तुमची काही तरी चूक होते आहे तीन तारीख आज आहे" मी म्हटले

"वा ! माझ्या लग्नाची तारीख मलाच माहीत नाही की काय ? आज दोन जुलै, उद्या तीन !" त्यानी पुन्हा आग्रहाने म्हटले मी त्यांना माझे तकीट दाखवले आणि सांगितले, "हे पाहा मी दोन तारखेला रात्री निघालो"

"बरोबर आहे टोकियोहून होनोलुलूला येताना पॅसिफिकमध्ये आंतरराष्ट्रीय डेट लाईन आहे ती ओलांडली की सबंध एक दिवस कॅलेंडर मागे न्यावं लागत म्हणजे तुम्ही दोन तारखेलाच म्हणजे त्याच दिवशी सकाळी इथ पोचलात" त्यानी भौगोलिक स्पष्टीकरण केले

अरेच्च्या ! असे आहे काय ? तरीच नॉटनबाई म्हणत होती की मी संपूर्ण एक दिवस आधी आलो म्हणून ! आता हा घोटाळा माझ्या लक्षात आला पण तारखेच्या त्या घोटाळ्यामुळे मला होनोलुलूला एक दिवस अधिक मिळणार होता आणि वर्देच्या विवाहाच्या वाढदिवसानिमित्त मी हजर राहू शकलो ही फारच सुखद बाब होती आम्ही चहा घेऊन नॉटनबाईला भेटायला गेलो. ती पस्तीशीची, प्रसन्न व्यवस्थापक अधिकारी होती तिने हवाई विद्यापीठाविषयी बरीच माहिती सांगितली आणि मला अनेक माहितीपत्रके, पुस्तिका आणि मासिकेही दिली

विद्यापीठाच्या काही प्राध्यापकांनाही आम्ही भेटलो भारतातील स्वामीनाथन् म्हणाले, "होनोलुलूचे आणि भारताचे फार जुने संबंध आहेत खाकसार चळवळीचे नेते श्री हरदयाळ हे येथे सन् युत सेन याना भेटले होते. भारताच्या स्वातंत्र्यमोहिमेत परराष्ट्राचे साहाय्य मिळविण्यासाठी ते येथे आले होते पंजाबी आणि सिंधी व्यापाऱ्यांनी इथे खूप मोठी दुकाने चालविली आहेत त्याचे इथे एक हिंदू मंदिर आहे तसेच हरेकृष्ण मोहिमेने चालविलेले दुसरे हिंदू मंदिर कृष्णाचे आहे हवाई विद्यापीठात भारताचे पंधरा–वीस विद्यार्थी आणि चार प्राध्यापक आहेत. शिवाय व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून काही भारतीय प्राध्यापक येथे वर्ष–सहा महिन्यासाठी येत असतात. नेपाळ, सिलोन, पाकिस्तान अशा भारताजवळच्या देशांचेही प्राध्यापक आणि विद्यार्थी हवाई विद्यापीठ व ईस्ट–वेस्ट सेंटरमध्ये आहेत.

गोपाळराव जोशी हे होनोलुलूला आल्याचा उल्लेख आहे हे गोपाळराव जोशी म्हणजे 'आनंदी गोपाळ' चे नायक ।

होनोलुलू ही हवाई राज्याची राजधानी आहे हवाई राज्यात सात बेटे आहेत मुख्य अमेरिकेच्या किनाऱ्यापासून म्हणजे सॅन्फ्रॅन्सिस्कोपासून होनोलुलूचे अंतर २२'१० मैल आहे पॅसिफिक महासागरात निहुआ, कवाई, ओहायू, मोलोकाई लनाई, मॉवी आणि हवाई अशी ही सात पोलेनेशियन वंशातील लोकांची वस्ती असलेली अत्यंत रमणीय, आपल्याकडील गोव्याची आठवण करून देणारी पण अनेक-पटींनी संपन्न आणि प्रगत अशी ही बेटे आहेत अमेरिकेहून या बेटांना जाणे खूपच खर्चाचे आणि वेळ घेणारे आहे विमानप्रवासालाच साडेसहा तास लागतात आणि अमेरिकेहून परतीचे तिकीट साडेचार हजार रुपयावर आहे त्यामुळे अतिशय सधन प्रवासीच मुद्दाम या हवाई बेटांना भेट देतात मी तेथे गेलो याचे एकमेव कारण म्हणजे माझे तिकीट जगप्रवासाचे असल्याने मला होनोलुलूला जाण्यासाठी वेगळा असा काहीच खर्च येणार नव्हता शिवाय माझी राहण्या-जेवण्याची व्यवस्थाही हवाई विद्यापिठातर्फे होणार होतीच

हवाई बेटे ही अनेक वर्षे स्वतंत्र होती. मग अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आली आणि १९६० पासून अमेरिकेचे पन्नासावे राज्य म्हणून हवाईस अमेरिकेत सामील करण्यात आले, ते अर्थात तेथील लोकांच्या इच्छेनेच । या बेटांच्या काही अगदी आतल्या भागात अजूनही छाती उघडी टाकून हिंडणाऱ्या पोलेनेशियन आदि-वासी स्त्रिया आढळतात एक भौगोलिक आश्चर्य असे, की ही हवाई बेटे आका-राने हळूहळू वाढत आहेत कारण या बेटावर अनेक ज्वालामुखी पर्वत आहेत त्यातून उद्रेकाच्या वेळी वाहणारा लाव्हा रस वाहत किनाऱ्यापर्यंत जातो तेथे जाई-पर्यंत तो थंड होऊन थिजतो आणि किनाऱ्याचा भूप्रदेश हळूहळू वाढत समुद्राची अधिकाअधिक जागा व्यापतो

अठराव्या शतकापर्यंत सुसंस्कृत जगाला ही बेटे अज्ञातच होती कॅप्टन कुक् या जगप्रसिद्ध संशोधकाला १७७८ मध्ये ही बेटे सापडली तेव्हा या बेटावर एवढी सुबत्ता होती की ' एका खिळ्याला पन्नास डुकरे विकली जात होती ' असे कॅप्टन कुक्ने लिहिले आहे त्यावेळी या बेटावर कामाह़ामेह नावाचा आदिवासींचा राजा राज्य करीत होता तो चांगला सहा फूट सहा इंच होता आणि अत्यंत बलशाली, धाडसी होता

या बेटांचा शोध लागल्यावर त्यांचा फायदा कुणी घेतला असेल तर पॅसिफिक महासागरात फिरणाऱ्या जपानी आणि अमेरिकन युद्धनौकावरील नौसैनिकांनी । नौदलातील कष्टमय जीवनाला कंटाळलेले नौसैनिक या हवाई बेटांजवळ आगबोट येताच अचानक समुद्रात उडी टाकून बेटांवर पोहून जात आणि हिरव्या, दाट जग-

लात नाहीसे होत त्यानंतर अमेरिका आणि इंग्लंडहून ख्रिश्चन धर्मोपदेशक या बेटावर धर्मप्रसारासाठी येऊ लागले मग जपानी व्यापाऱ्यांना हा प्रदेश अवलचा वाटून ते या भागात कापड, मणी, सुरे, मासे पकडण्याचे गळ अशा वस्तू घेऊन जहाजांतून येऊ लागले अमेरिकन व्यापाऱ्यांचे लक्ष या हवाई बेटांकडे गेले, ते जपानी व्यापाऱ्यांनी तेथे बस्तान बसवल्यानंतर ! जपान्यांची उपक्रमशीलता आणि धाडस यांची छाप अजूनही या बेटांवर दिसते आज हवाई बेटातील एकदर लोकसंख्येपैकी पचवीस टक्के अमेरिकन, वीस टक्के जपानी, सत्तावीस टक्के कॉकेशियन, दहा टक्के चिनी आणि बाकीचे विविध वंशांतील आहेत अर्थात लोकसंख्येची ही आकडेवारी असली, तरी राजकीय आणि आर्थिक प्रभाव नव्वद टक्के अमेरिकेचाच आहे यात शंका नाही

हवाई बेटाचे हवामान उसाच्या लागवडीला आदर्श आहे हे पाहून अमेरिकन शेतीतज्ज्ञांनी तेथे दोन लाख एकरांत उसाची प्रचंड लागवड केली त्यासाठी चीन व जपानहून शेतमजूर आणले साखर कारखाने निघाले होनोलुलूत दरसाल वीस लक्ष टन कच्ची साखर तयार होते त्यापैकी दहा टक्के रिफाईन (पांढरी साखर) केली जाते बाकीची बोटींनी अमेरिकेला जाते व तेथे त्या ब्राऊन शुगरवर प्रक्रिया केली जाते उसाबरोबरच अननसाचेही पीक इथे भरभराटले आहे हवाईमध्ये शेकडो वर्षांच्या राजेशाहीनंतर १८९३ साली क्रांती झाली राजा पदच्युत झाला काला कुवा हा अखेरचा राजा होता. या राजा-राणीचा मुकूट आणि राजदंड आम्ही होनोलुलूच्या वस्तुसंग्रहालयात पाहिला हवाई राज्याच्या विधिमंडळात या सिंहासनाच्या प्रतिकृती ठेवण्यात आल्या आहेत

माझे स्नेही वर्दे म्हणाले, " अहो, होनोलुलूत महत्त्वाचा भाग म्हणजे वायकीकी बीच ही जगातली सर्वश्रेष्ठ चौपाटी आहे असा सुंदर सागर किनारा इतरत्र कुठेही नाही " त्यांच्या मोटारीने आम्ही त्या किनाऱ्यावर गेलो आणि ते वैभव पाहून थक्क झालो हिरवीगार नारळीची झाडे, त्याखाली पहुडलेली कुटुंबे, प्रियकर-प्रेयसी, मुले आणि चित्रविचित्र लोक बहुतेक पुरुषांनी नुसत्या चड्ड्या घातलेल्या स्त्रियांनी चड्ड्या आणि ब्रेसियर्स. सुंदर, धारदार, नितळ स्त्रियांच्या शरीराचा नुसता खच होता अनेकजणी पाण्यातून पोहून निथळत्या अंगाने टॉवेलने शरीर पुसत होत्या कोणी ओले तोकडे कपडे काढून कोरडे पण तोकडेच कपडे घालीत होत्या कोणी आपल्या सवंगड्यांबरोबर छोट्या नावांतून जात होत्या, तर कोणी सर्फिंग-मध्ये दंग होत्या. लहानशा मोटार लॉंचला दोरी बांधून एक फळी पाण्यावर तरंगती ठेवलेली असते त्या फळीवर उभे राहून हातात दोरी घट्ट धरायची मग मोटर लॉंचने वेग घेतला, की पाणी कापीत आणि पाणी उंच उडवीत अतिशय वेगाने सागर-सफर करायची, त्याला सर्फिंग म्हणतात वाइकिकी बीचवर आईस्क्रीम,

चॉकलेटस्, हॉट डॉग्ज मिळत होते कुठे ट्रॅन्झिटर्स, कुठे टेपरेकॉर्डर्सवर द्रुत गतीचं संगीत चाललं होत आनदाचा नुसता जल्लोश होता

आम्ही तास दीड तास त्या जगप्रसिद्ध वाइकिकी बीचवर घालवून अला मोना या बाजारपेठेत गेलो वाइकिकी बीचपासून पाच-सात मिनिटांच्याच अंतरावर सुमारे पावणेदोनशे प्रचड डिपार्टमेंटल स्टोअर्सचा हा विस्तीर्ण विभाग आहे. काही स्टोअर्स इतकी मोठी आहेत की त्यांच्या मधल्या चौकात पोहण्याचे तलाव आणि धबधबेही आहेत ! या तलावाच्या काठी खुर्च्या-टेबले मांडलेली असतात आणि त्यावर बसून तुम्हाला कोणत्याही देशाचे मद्य आणि जेवण मागवता येते चिनी, जपानी, इटालियन, आशियाई असे अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ ऑर्डर दिल्यावर खास तयार करून अगदी गरम-गरम वाढण्याची इथे सोय आहे कुलवर्थ, एबीसी अशा जागतिक कीर्तीच्या साखळी दुकानांच्या शाखा अला मोनावर आहेत. इथे मालाची खरेदी केली तर तो टपालाने जगात कोठेही तुम्ही दिलेल्या पत्त्यावर पाठवण्याची सोय आहे मित्राना भेटी पाठवण्यासाठी ही सोय उपयोगी पडते. हवाईतील फळफळावळाचे खास स्टॉल्स आहेत काही स्टोअर्समध्ये हवाईचा 'हुला हुला' नृत्याचा कार्यक्रमही मोफत दाखविण्यात येतो. चित्रकलेचे उत्तम नमुने विकणारी दुकाने आहेत त्यात जपानी प्रिंट्सची दुकाने विशेष लक्ष आकर्षून घेतात. हिलो हॅटीस फॅशन सेंटरमध्ये कपड्यांच्या, कर्णफुलांच्या, नेकलेसच्या, बागड्यांच्या फॅशन्सचे वीस हजार नमुने आहेत. या एकाच केंद्राची बारकाईने पाहणी करायची तर सबंध एक दिवस अपुरा पडेल एवढे ते समृद्ध आहे मिलिटरी शॉपमध्ये देशोदेशीच्या लष्करी चिन्हांची, पुस्तकांची, गणवेषाची विक्री होते. सीअर्स रोबक आणि जे सी पेनी या अमेरिकन दुकानात कपड्यांपासून मचकापर्यंत सर्व वस्तू मिळतात नाणी आणि टपालाची तिकिटे विकणारी आठ-दहा दुकाने आहेत रॉयल हवाईमध्ये हवाईचे खास अलकार मिळतात हवाई हे नाव आपल्याकडे ज्या वस्तू-मुळे प्रसिद्ध आहे ती म्हणजे रबरी पादत्राणे ! वाईकिकी चौपाटीवर घालण्यासाठी सुटसुटीत म्हणून दोन पट्ट्यांची ही हलकी रबरी पादत्राणे निघाली त्यांनी आता जगातील कमी उत्पन्नाच्या सर्व बाजारपेठा काबीज केल्या आहेत

होनोलुलूच्या मुक्कामात मी, वर्दे, त्यांची पत्नी आणि नाईक नावाचे त्यांचे स्नेही सकाळी दहा वाजता हवाई नृत्य पाहायला गेली चोहो बाजूनी नारळीची उच झाडे, त्याभोवती खाद्यपेयांचे स्टॉल्स आणि त्यापुढे क्रिकेट मॅचसाठी असते तसे लाकडी पायाडाचे स्टेडियम. मात्र त्या चौकाच्या तीनच बाजू या स्टेडियमन व्यापल्या होत्या एक बाजू हवाई नर्तकींना मोकळी ठेवली होती या पायाडांवर सुमारे हजारभर प्रवासी जागा अडवून बसले होते हवाई सरकारतर्फे हा सास्कृतिक कार्यक्रम रोज सकाळी मोफत दाखविण्यात येतो. या कार्यक्रमाचा विशेष म्हणजे

प्रेक्षकानी हे हुला हुला नृत्य नुसते पाहायचे नसते, तर त्यात भाग घेण्यासाठी आवाहन करण्यात येते उन्नत छातीवर किरकोळ कपडा बांधलेला, डोकीवर आणि गळयात फुलांच्या माळा आणि कमरेला गवताचा लोंबता आखूड जुडगा अशा वेषात पन्नास हवाई सुदरी नृत्यासाठी उभ्या होत्या या नृत्याची प्रमुख शिक्षिका प्रेक्षकाना उद्देशून म्हणाली, "या सुदरी तुमच्या सहकार्याची वाट पाहत आहेत पन्नास पुरुषानी इथ याव आणि त्याच्याबरोबर नृत्य कराव प्रेक्षकापैकी ज्या स्त्रियांना हे नृत्य करायचं आहे, त्यानीही इथं याव त्यानी आपला 'पार्टनर' आणावा किंवा आम्ही तो पुरवू. तुम्हाला हवाई नृत्य आल नाही तरी चालेल इथ आना तुम्हाला त्याच शिक्षण देण्यात येईल"

प्रेक्षकांतून पन्नास एक हौशी पुरुष आले तसेच काही जोडपीही आली त्याच्या गळयात नर्तकानी माळा घातल्या. मग नृत्य शिक्षिका एका उच्च व्यासपीठावर उभी राहून संगीताच्या तालावर नृत्य कसे करायचे याचे पाठ देऊ लागली पधरा मिनिटांच्या शिक्षणानतर सर्वंचजण त्या सोप्या नृत्यप्रकारात वाकबगार झाले मग अर्धा एक तास मनसोक्त नृत्याचा कार्यक्रम झाला. त्यानतर प्रमुख शिक्षिका म्हणाली, "ज्या पाहुण्यानी या नृत्यात भाग घेतला, त्यांना हवाई नृत्याच्या प्राविण्याबद्दल सर्टिफिकेट्स देण्यात येतील" राज्य सरकारचे शिक्के असलेली ही शिफारसपत्रे सर्व पाहुण्याना वाटण्यात आली मग हौशी प्रवाशांनी नर्तक पोरीच्या बरोबर आपली छायाचित्रे काढून घेतली आणि हा गंमतीचा कार्यक्रम सपला

होनोलुलू हे निसर्गरम्य ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच गेल्या महायुद्धाला या शहराने अचानक कलाटणी दिली म्हणूनही ते मशहूर आहे. कारण पर्ल हार्बर हा सुविख्यात भाग याच शहराच्या एका टोकाला आहे पर्ल हार्बर हे नाव गेल्या महायुद्धापासून मी असख्य वेळा ऐकले व वाचले होते त्या ठिकाणाला समक्ष भेट देण्याची मला अतिशय उत्सुकता होती म्हणून मी आणि वर्दे कुटुब तेथे गेलो अला मोनापासून सुमारे वीस-पचवीस मिनिटांच्या मोटारीच्या रस्त्यावर पर्ल हार्बर आहे. ६ डिसेंबर १९४१ रोजी रात्री जपानने अत्यत अनपेक्षितपणे पर्ल हार्बर या बदरावर बॉबहल्ला केला. अमेरिकेचे हे मोठे नौदल केंद्र होते जपानने आधी हल्ला केला आणि मग युद्ध पुकारले त्यामुळे अमेरिका त्यावेळी बेसावध होती या हल्ल्यात अमेरिकेच्या दोन अवाढव्य युद्धनौका बुडाल्या, शेकडो सरकारी आणि खाजगी छोटया नावा समुद्राच्या तळाला गेल्या आणि एकवीसशे नौसैनिक व नागरीक एका रात्रीत ठार झाले जखमींचा आकडा दहा हजारांवर गेला. याचाच वचपा म्हणून रूझवेल्ट, चर्चिल आणि इतर दोस्तानी 'डी डे' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रात्री शत्रूवर अचानक हल्ला करून त्याचे अपरिमित नुकसान केले अमेरिकेने १९४५ मध्ये जपानवर दोन अणुबॉब टाकले, त्यांच्या निर्दयपणासाठी अमेरिकेला

दोष देण्यात येतो पण पर्ल हार्बरवरच्या क्रूर जपानी हल्ल्याचा तो बदला होता असे अमेरिकन युद्धतज्ज्ञांनी म्हटले होते त्यावरून पर्ल हार्बरचे जागतिक महत्त्व लक्षात येते

पर्ल हार्बरच्या ज्या भागात अमेरिकन बोटी बुडाल्या, तेथे आता अमेरिकन सरकारने या हुतात्म्यासाठी पाण्यात भव्य स्मारक बांधले आहे या स्मारकाला मी भेट दिली, तेव्हा मला एक अतिशय कुतूहलजनक वर्तमानपत्र मिळाले त्यावर तारीख होती रविवार, ७ डिसेंबर १९४१ दैनिकाचे नाव होते 'होनोलुलू स्टार-बुलेटिन.' तीन इंच उंचीच्या, जाड टाईपात मजकूर होता,

WAR !

OAHU BOMBED BY

JAPANESE PLANES

त्या दिवशी या दैनिकाच्या तीन आवृत्त्या निघाल्या या तिन्ही आवृत्त्या वारंवार छापून इथ विकण्यात येतात, त्यामुळे त्या दिवशी ही बातमी कशी दिली गेली, शहरात व देशात त्यामुळे घबराट कशी पसरली याचे यथार्थ व सचित्र दर्शन घडते

पर्ल हार्बरला लागूनच अमेरिकन नौदलाचे केंद्र आहे या केंद्राला खास परवानगीशिवाय कोणाला भेट देता येत नाही पण श्री वर्दे म्हणाले, " ही मोटार हवाई विद्यापीठाची म्हणजे सरकारी आहे तिच्यावर सरकारी चिन्हे आणि सरकारी क्रमांकही आहे आपल्याला कोणी अडवणार नाही " आणि झालेही तसेच ! नौदल केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ आमची मोटार आल्यावर रस्त्यावरचा आडवा अडसर वर झाला इतकेच नव्हे तर आम्ही कोणी वरिष्ठ अधिकारी असू म्हणून रक्षकानी आम्हाला लष्करी सलामही केला बंदरात नांगरलेल्या प्रचंड लष्करी बोटी आम्ही पाहिल्या त्या बोटीवर तोफा होत्या आणि लहान विमानेही होती. या बोटीच्या बाजूना पाण्यात खोलवर मिसाईल्स म्हणजे क्षेपणास्त्रेही जोडलेली असतात असे वर्दे यानी सांगितले

मग आम्ही होनोलुलूहून परत आलो आणि तेथील शैक्षणिक केंद्रे पाहिली. हवाई विद्यापीठ आणि ईस्ट वेस्ट सेंटर ही हवाई राज्यातील दोन प्रमुख शैक्षणिक केंद्रे एकमेकांच्या जवळच आहेत त्याचे वातावरण अतिशय प्रसन्न आहे. इतके निसर्गसुंदर वातावरण इतरत्र क्वचितच दिसते एक तर या दोन्ही केंद्रानी प्रचंड भूभाग व्यापला आहे. डोंगर, झाडी, तलाव याच्यामध्ये आधुनिक, डौलदार इमारती उभ्या आहेत. ईस्ट वेस्ट सेंटरमध्ये तर जपान, कोरिया, चीन, इंग्लंड, फ्रान्स यानी देणगी म्हणून दिलेली शिल्पे, बांधलेल्या इमारती आहेत जपानने एक उत्कृष्ट उद्यान तयार करून दिले आहे. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी भव्य मैदान आणि

एकरच्या एकर सुंदर हिरवळी आहेत ईस्ट वेस्ट सेंटरच्या वाचनालयात अनेक देशांची वृत्तपत्रे येतात तेथे मला आठ-दहा भारतीय इंग्रजी व हिंदी दैनिके पाहायला मिळाली बऱ्याच कालावधीनंतर देवनागरी लिपीतला मजकूर पाहायला मिळाला पण त्या बातम्या मात्र दिल्लीतल्या दंगलीच्या आणि केरळातील अपघाताच्या होत्या पौर्वात्य आणि पाश्चात्य ज्ञानाचा संगम व्हावा आणि दोहोंत देवघेव व्हावी म्हणून अमेरिकन सरकारने कोट्यावधी डॉलर्स खर्चून 'ईस्ट वेस्ट सेंटर'ची उभारणी केली आहे सध्या या केंद्रात दोनशे प्राध्यापक आणि अडीच हजारावर विद्यार्थी-विद्यार्थिनी आहेत शेती, टेलीकम्युनिकेशन्स, समाजशास्त्र, लोकसंख्याशास्त्र, मानववंशशास्त्र अशा अनेक शाखांत या केंद्रात शिक्षण देण्यात येते. बुद्धिमान विद्यार्थ्यांना आकर्षित करून घेण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर इथे शिष्यवृत्त्या आणि फेलोशिप्स देण्यात येतात सुमारे सत्तर टक्के विद्यार्थ्यांना या ना त्या रूपाने शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य मिळते या केंद्रातील सांस्कृतिक विशेष लक्षवेधी असतात कारण आफ्रिका, आशिया, युरोप वगैरे खंडातील नाटके व नृत्ये यांनी त्यात भरपूर वैचित्र्य आणि विविधता आलेली असते दक्षिण भारतीय नृत्ये आणि रामायणातील हिंदी नाटक प्रयोग रंगल्याचे तेथील विद्यार्थ्यांनी सांगितले

दुपारी थोडी विश्रांती घेऊन आम्ही डायमंड हेड हा होनोलुलूचा प्रसिद्ध भाग पाहायला गेलो एक उंच, रुंद, हिरव्यागार टेकडीला हे नाव ब्रिटिश खलाशांनी दिले शेकडो वर्षांपूर्वी त्यांना या टेकडीच्या उतारावर हिरे सापडल्याची कथा सांगतात त्यावरून याला डायमंड हेड असे नाव पडले असा एक अर्थ सांगण्यात येतो काहींच्या मते या टेकडीचे टोक हिऱ्याच्या पाचूप्रमाणे आहे म्हणून त्याला डायमंड हेड म्हणतात या टेकडीवरून होनोलुलू आणि आसपासच्या भागाचे नयनमनोहर दर्शन घडते पर्ल हार्बरपर्यंतचा भाग इथून दिसतो टेकडीवर आइस्क्रीम आणि इतर खाद्यपदार्थ मिळण्याची सोय आहे सुट्टीच्या दिवशी अनेक कुटुंबे सहलीसाठी या टेकडीवर येतात अजूनही होनोलुलूच्या डोंगरावर कधीकधी ज्वालामुखी जागृत होतो ब्लो हॉर्न नावाचा एक खडक समुद्रकिनाऱ्याजवळ आहे त्याखाली पोकळी आहे आणि लाटा जोराने आल्या की त्या खडकाच्या छिद्रातून उंचच उंच नैसर्गिक कारंजा उडतो.

होनोलुलूच्या फुलांचे मनस्वी वेड ! विमानतळावर किंवा बोटीच्या धक्क्यावर प्रवासी उतरल्यावर त्याचे मित्रांकडून आणि नातेवाईकांकडून स्वागत होते, ते फुलांच्या माळा घालून ! आपल्याकडे सत्कारसमारंभात गळ्यात हार पडल्याबरोबर अधीरपणे तो लगेच काढला जातो, तसे इथे होत नाहीत गळ्यात फुलांच्या माळा घालून लोक दिवसभर मिरवीत असतात बहुधा या पांढऱ्या चाफ्याच्या फुलांच्या माळा असतात, इकडच्या मुली आपल्या गळ्यातच फुलांच्या माळा घाल-

तात असे नाही, तर केसांत आणि कानावरही फुले माळतात जाणारे प्रवासी विमानतळ मोठ्या अभिमानाने फुलाच्या माळा घालून त्या घरी जाईपर्यंत ठेवतात आणि घरच्या मडळींना त्या कौतुकाने दाखवतात अनेक प्रवासी कपन्या आपल्या गटातील प्रवाशाना स्थानिक युवतीच्याकडून हार घालून त्याचे स्वागत करतात इतर ठिकाणच्या नुसत्या हस्तादोलनापेक्षा हे सपुष्प स्वागत प्रवाशांना खचितच सस्मरणीय वाटते नव्याने आलेल्याना विमानतळावर माहिती देणाऱ्या मुलीही फुले माळून आणि स्थानिक तोकडे पोषाख घालून 'इन्फर्मेशन' डेस्कवर बसलेल्या असतात.

वायकिकी बीचवर सध्याकाळी काही विशेष रमणीय दृश्ये दिसतात असे ऐकल्याने आम्ही तिथे हजर झालो स्नानमग्न असलेल्या शेकडो स्त्रिया आणि पुरुष मौजूद होते जरा लाबवर गेल्यावर अद्भुत दृश्य दिसले ते म्हणजे टॉपलेस अशा स्थानिक आणि काही परदेशी स्त्रिया किनाऱ्यावर मुक्तपणे पडल्या होत्या किंवा फिरत होत्या हवाई स्त्रियांना त्यात आपण विशेष काही करतो आहोत असेही वाटत नव्हते मावळता सूर्य, सुदर नारळीची झाडे, शुभ्र किनारा आणि त्या पार्श्व-भूमीवर उघड्या उरोजांनी आणि केसात फुले माळून फिरणाऱ्या किंवा विश्राती घेणाऱ्या त्या मदनिका, यामुळे होनोलूलूच्या त्या सायकाळला एक अद्भुतरम्य, स्वर्गीय स्वरुप आले होते मी जपानहून येताना विमानात मिळणारी व्हिस्कीची बाटली आणली होती वर्देचा लग्नाचा वाढदिवस आम्ही त्या बाटलीसह साजरा केला सौ. वर्दे म्हणाल्या, "दोन वर्षं कशी गेली ते कळलच नाही."

मी म्हटल, "अहो वर्षंच काय, आता दिवसही जातील!" त्यावर ते दोघेही मनःपूर्वक हसले आणि सौ वर्दे तर तोंड झाकून होनोलुलूच्या मुक्त किनाऱ्यावर अगदी मराठी गृहिणीच्या घरदाज पद्धतीने लाजल्या !

होनोलुलू या शब्दाचा अर्थ Sheltered harbour किंवा सरक्षित बदर असा आहे या बदराला झाडाचे, डोंगरांचे नैसर्गिक सरक्षण मिळाले आहे त्यामुळे मस्त उन्हाच्या दिवसात या सरक्षित किनाऱ्यावर टॉपलेस होऊन स्नान करतात आणि मग अग वाळवीत किनाऱ्यावर पहुडतात होनोलुलू हा पॅसिफिक महासागरा-तला महत्त्वाचा थाबा आहे म्हणजे जपानहून अमेरिकेला जाणारी विमाने आणि आगबोटी इथे थाबतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराने होनोलुलूला फारच चांगला हात दिला आहे हे प्रवासी चार दिवस इथे मुक्काम करून वायकिकी किनाऱ्यावरची अनुपम मौज भोगून पुढे जातात. शहराची वस्ती तशी चार लाखा-च्या आसपास, पण टूरिस्ट सेंटर असल्याने त्या मानाने पैशाची प्रचड उलाढाल ! एवढ्याश्या बेटावर पधरा नभोवाणी केंद्रे आणि तीन दूरचित्रवाणीची केंद्रे आहेत.

हवाईच्या ज्वालामुखींची कहाणी हे एक स्वतत्र आणि अत्यत रजक प्रकरण

आहे डायमंड हेड हे आता पर्वतावरचे खोलगट टोक आहे पण पूर्वी तो इतर पर्वता-सारखा सुळका होता पण अगदी अलीकडची गोष्ट म्हणजे फक्त एक लाख वर्षां-पूर्वी पृथ्वीच्या पोटात प्रचंड स्फोट झाला आणि सुळका वरच्यावर जोराने उडाला त्या ठिकाणी आता खोलगट भाग आहे हवाईची बेटे अडीच कोटी वर्षांपूर्वी समुद्राखाली होती, ती केवळ ज्वालामुखीच्या जोराच्या दट्ट्यामुळे समुद्रपातळीवर आली, असे भूगर्भशास्त्रज्ञाचे मत आहे हे लोक अडीच कोटी वर्षांइतके मागे कसे जातात, परमेश्वर जाणे ! विसाव्या शतकातही मॉना लोपा नावाच्या पर्वतातून ज्वालामुखी बाहेर पडला १९५० साली या पर्वतातून प्रचंड प्रमाणावर लाव्हा रस वाहू लागला दर तासाला सहा मैल लांबीचा लाव्हा वाहत होता तो सतत तेवीस दिवस चालू राहिला अमेरिकन आकडेशास्त्रज्ञांच्या मताने या रसातून सबंध पृथ्वीभोवती दोन वेटोळी होतील एवढा वीस फूट रुंदीचा रस्ता बांधता येईल मात्र हवाईच्या डोंगरातले ज्वालामुखीचे उद्रेक फार समजदार आहेत. त्यानी शहरांचा नाश केलेला नाही कारण त्यांची वाहण्याची गती फार मंद असते आणि त्या लाव्हा-रसाला वाट करून देण्यासाठी भरपूर वेळ असतो ज्वालामुखीची भौगोलिक कारणे माहीत होण्यापूर्वी हवाईचे मूळ पोलेनेसियम लोक ज्वालामुखीला जागृत देवता मानून त्याची पूजा करीत असत असूनही या ज्वालामुखींच्या भागात प्रवाशांना फिरवून आणण्यासाठी खास टूर असते मात्र जागृत ज्वालामुखी क्वचितच दिसतो.

होनोलुलूला गेल्यावर 'अलोहा' हा शब्द विसरता येणार नाही कारण तो वारंवार ऐकू येतो अलोहा याचा अर्थ गुड, छान, वेलकम् असा आहे. हवाई भाषेत गुड मॉर्निंग, म्हणायचे तर 'अलोहा काकाहैका' म्हणतात 'गुड आफ्टरनून'ला 'अलोहा अयुनाला म्हणतात 'गुड इव्हिनिंग'ला अलोहा अहीयी' म्हणतात. माझे एक भारतीय मित्र ईस्ट वेस्ट सेंटरमध्ये काही काळ प्राध्यापक होते. भारतात परत आल्यावर त्यानी बंगला बांधला, त्याचे नाव त्यानी 'अलोहा' असे ठेवले आहे हवाई भाषेत 'माझे तुझ्यावर प्रेम आहे' असे म्हणायचे तर 'अलोहा ऑलीवा' असे म्हणतात हे उत्साही रसिकांना आधींच सांगून ठेवतो. यात एक धोका आहे तो असा की 'टॉयलेट'ला हवाईत लुआ म्हणतात प्रेम आणि टॉयलेट यांच्या उच्चा-रात घोटाळा मात्र करू नका ! हवाईतले जे काही शब्द मला फार आवडले, त्यात 'सुंदर' या अर्थी नानो', पक्षी या अर्थी 'मानू', सूर्याच्या अर्थी 'ला' आणि आकाश म्हणजे 'सानी' हे आहेत - हुना माशाला आकू म्हणतात हे ठीक, पण सागरी बोनिटोला काकू का बरे म्हणत असावेत हे समजत नाही हवाई भाषेत पाच स्वर आणि सातच व्यंजने अशी फक्त सतराच अक्षरे आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यास कमी द्यावा आणि त्यांनी निसर्गसौंदर्याकडे अधिक लक्ष द्यावे हा या सुलभीकरणाचा उद्देश असावा.

आम्ही वायकीकी किनाऱ्यावरील मुक्त सौंदर्य पाहून एका चिनी हॉटेलमध्ये वर्देच्या विवाहानिमित्त समृद्ध मेजवानी घेतली आणि रात्री दहाला घरी परतलो पण त्यावेळीही हवाई विद्यापीठाचे आवार गजबजलेले होते कारण ती अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनाच्या आदल्या दिवशीची रात्र होती पॉप म्युझिक. बार्बेक्यू, बियर, स्नॅक्स, नृत्य याचा नुसता जल्लोष चालला होता आम्ही तास–दीड तास त्या आनंदोत्सवात सामील झालो जवळच पटांगणात शोभेचे दारूकाम अप्रतिम वैभव दाखवीत होते शेवटी बारा वाजायला आले दिवसभराच्या श्रमाने डोळे आणि शरीर थकायला लागले दुसऱ्या दिवशी सकाळी होनोलूलूहुन मला सॅन्फ्रॅन्सिस्कोला जायचे होते तिथेही माझे मित्र होते त्याना फ्लाईट क्रमांक आणि वेळ कळवली होती म्हणून थोडयाशा नाराजीने आणि नाइलाजानेच हवाई विद्यापीठाच्या आवारातील हजारावर विद्यार्थी–विद्यार्थिनीच्या जल्लोशाचा निरोप घेतला आणि विश्रांतीसाठी खोलीवर आलो

सकाळी आठ वाजता टॅक्सी बोलावली विमानतळावर आलो शेकडो प्रवाशाना गळयात चाफ्याच्या फुलांच्या माळा घालून निरोप दिले जात होते कुणीतरी हवाई तरुणी माझ्याजवळ आली तिने एक माळ माझ्या गळयात घातली मीही हसून आभार मानले इतक्यात आमच्या विमानाच्या उड्डाणाची घोषणा झाली आणि त्या रोमांचकारी होनोलूलूचा कृतज्ञतापूर्वक निरोप घेऊन मी विमानात चढलो

□ □ □

दा. क. ...

## सबंध जगाची विभागणी करणारे

# ब र्लि न

बर्लिनमध्ये मी पाऊल ठेवले, तेव्हा या शहराचा विलक्षण दरारा माझ्या मनात होता. अवघ्या जगाच्या इतिहासाची उलथापालथ करणाऱ्या हिटलरचे हे सत्ता-केन्द्र. इथे नाझी सैनिकांच्या भयंकर आक्रमक सैनिकांची संचलने झाली. हिटलरच्या प्रभावी भाषणांनी लक्षावधी जर्मनांची अंतःकरणे हेलावली, जे दोस्तांच्या बॉंबफेक्या विमानांनी बेचिराख केले आणि त्या राखेतूनही ज्याचा पुनर्जन्म झाला, असे हे दैदिप्यमान शहर. या शहरातून जाणाऱ्या भिंतीने किती विभागण्या केल्या, त्याला अंतच नाही. कुटुंबाची विभागणी केली. देशाची विभागणी केली. इतकेच नव्हे, तर जेथे ही भिंत स्मशानाच्या मधून गेली, तिथे या भिंतीने मृताचीही विभागणी केली. हे भयंकर दडपण मनावर घेऊन मी बर्लिनच्या स्टेशनवर उतरलो खरा, पण प्रत्यक्ष तिथे पोचल्यावर मात्र त्या गावावर मला कसलेच दडपण दिसले नाही. एक तर बर्लिनचे स्टेशन अगदीच लहान आहे. आपल्या चर्चगेटएवढे, चारच प्लॅटफॉर्म्सचे. लंडन, टोकियो, पॅरिस अशी अवाढव्य स्टेशने पाहिल्यानंतर हे छोटे स्टेशन एवढ्या प्रचंड इतिहासाच्या शहराचे स्थानक असावे हे खरेच वाटत नाही. मात्र मी जर्मनी-तील इतर मोठी स्टेशने पाहिली होती. कलोन, फॅंकफर्ट...चौदा, सोळा फलाटाची, तुफान गर्दीची आणि अनेक रुळांचा गुंता झालेली.

स्टेशनबाहेर आलो. हिटलर आणि नाझी यांच्या दहशतवादाचा, क्रौर्याचा, पराक्रमाचा लवलेशही कोठे दिसत नव्हता. उलट स्टेशनच्या आसपास ब्ल्यू फिल्म्स, लाईव्ह सेक्स, नाईट क्लब्ज आणि अश्लील 'पीप शोज' यांची रेलचेल होती ! त्यांचे दलाल रस्त्यावर उभे राहून, प्रवासी हेरून त्यांना आत येण्याचा आग्रह करीत होते. बर्लिनच्या माझ्या मनातील उग्र दरारायुक्त प्रतिमेला त्यामुळे एकदम

तडा गेला बर्लिनचा इतिहास पाहिला, तर दोन शहरांचे विभक्त जिणे या शहराच्या नशिबी सुरुवातीलाच होते आणि त्याची एकसंध शहर म्हणून १९६१ मध्ये अखेरी झाली आणि पुन्हा त्याचे विभक्त जीवन सुरू झाले आठशे वर्षांपूर्वी स्प्री नदीच्या काठी बर्लिन हे खेडे होते त्याच नदीतील एका बेटावर कॉलन नावाची छोटी वसाहत होती या दोन्ही छोट्या वसाहतींना जोडणारा पूल बांधला गेला आणि बर्लिन हेच त्यांचे नाव चालू राहिले

या शहरात मला सर्वांत अधिक पाहण्याची उत्सुकता होती, ती म्हणजे जगप्रसिद्ध बर्लिनची भिंत. ही एक भिंत पाहण्यासाठी मी खूपच त्रास घेतला होता आणि खर्चही केला होता तेव्हा मी फ्रँकफर्टला राहत होतो, तिथून बर्लिनला जाण्याचे दोन मार्ग होते माझ्याकडे युरोपचा युटोरेलचा पहिल्या वर्गाचा पास होता पण हा पास पूर्व जर्मनीत चालत नाही. त्या भागाचे वेगळे तिकीट काढावे लागते म्हणून प जर्मनीतून जेथे पूर्व जर्मनी जास्तीत जास्त जवळ आहे, त्या हॅंपस्टेड या स्टेशनपर्यंत मी युटोरेल पासाने गेलो तिथून पूर्व जर्मनीत गाडी जाते हॅंपस्टेड या सरहद्दीवरच्या स्टेशनवर गाडी बराच वेळ थांबली प्रत्येकाचे पासपोर्ट, व्हिसा वगैरे तपासण्यात आले या स्टेशनवर दोन उंच मनोरे आहेत त्या मनोऱ्यात पूर्व जर्मनीचे सैनिक मशीनगन्स घेऊन रात्रंदिवस पहारा करीत असतात पूर्व जर्मनीतील कोणी अचानक गाडीत चढू नये म्हणून स्टेशनवरही प्रत्येक दहा–वीस फुटांवर लष्करी रक्षक आणि त्यांच्याबरोबर शिकारी कुत्रे असे खडे असतात हॅंपस्टेड स्टेशनवर आमच्या गाडीच्या सर्व दरवाजांना कुलपे लावण्यात आली या गाडीच्या खिडक्यांनाही गज असतात त्यामुळे गाडी जेव्हा पूर्व जर्मनीतून पश्चिम बर्लिनपर्यंत ११० मैल जाते, तेव्हा गाडीतील कोणीही खाली उतरू शकत नाही किंवा बाहेरून कोणी आत येऊ शकत नाही.

पूर्व जर्मन हद्दीतून गाडी जाऊ लागली, तेव्हा सर्वत्र भीतीचे वातावरण दिसले दोन्ही बाजूंना तारांची कुंपणे होती आणि ठराविक अंतरावर भयंकर मोठे आणि क्रूर असे कुत्रे मोकळे सोडले होते हे तारांचे कुंपण ओलांडून कोणी पलीकडे आगगाडीच्या मार्गावर जाण्याचा प्रयत्न केला तर ते कुत्रे त्याला सहजच थोपवू शकत होते असे सहाशे कुत्रे त्या मार्गावर ठेवण्यात आले होते त्याशिवाय जागोजाग मनोरे, त्यात टेहळणी करणारे पथक मशीनगन्स घेऊन सज्ज! मनोऱ्यावरून रात्रीच्या वेळी सर्चलाईट पाडण्याची व्यवस्थाही होती दोन्ही बाजूंना वस्ती नव्हतीच काही घरे लागली पण ती पडकी आणि ओसाड होती या ११० मैल मार्गावर तीन स्टेशने लागली पण त्यांपैकी एकाच स्टेशनावर गाडी थोडा वेळ उभी राहिली पण गाडीतून कोणी उतरले नाही किंवा गाडीत कोणीही चढले नाही सर्वत्र तंग वातावरण होते इतके, की क्षणात कोणीतरी गोळी झाडील आणि कुणातरी पूर्व जर्मनाचे शव कोसळताना दिसेल अशी भीती वाटत होती अखेर दोन तासांच्या पूर्व जर्म-

नीतील प्रवासानंतर आमची गाडी बर्लिनला पोचली गाडीची कुलपे काढण्यात आली आणि चकित नजरेने मी बर्लिनकडे पाहू लागलो

या बर्लिन शहराने जेवढे हाल सोसले, विध्वंस पाहिला आणि मानवनिर्मित आपत्ती सहन केल्या, तेवढ्या जगातील इतर कोणत्याही शहराने सहन केलेल्या नाहीत. जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या हिटलरचा उदय, उत्कर्ष आणि हृदयद्रावक अत याच शहरात झाला. आजही बर्लिनची राजकीय आणि भौगोलिक परिस्थिती अपूर्व अशी आहे. पूर्व बर्लिन हे कम्युनिस्टांच्या ताब्यात आहे, पश्चिम बर्लिन ही पूर्वी सयुक्त जर्मनीची राजधानी होती पण बर्लिनच्या विभाजनानतर पश्चिम जर्मनीची राजधानी कम्युनिस्ट सरहद्दीपासून दूर बॉन येथे नेण्यात आली पूर्व जर्मनीची राजधानी मात्र पूर्व बर्लिनमध्येच आहे प बर्लिन हे राजकीयदृष्ट्या प जर्मनीचे एक राज्य असले, तरी तांत्रिकदृष्ट्या ते अमेरिका, फ्रान्स आणि इग्लड या तीन राष्ट्रांच्या ताब्यात आहे शहराच्या सरक्षणाची जबाबदारी या तीन राष्ट्रांवर आहे आणि अजूनही या तिन्ही राष्ट्रांच्या मोठ्या सैन्याचा तळ प बर्लिनमध्ये आहे

रोम किंवा अथेन्ससारख्या युरोपमधील काही शहरांना हजारो वर्षांचा इतिहास आहे त्या मानाने बर्लिन अलीकडचे आहे त्याचे वय फक्त आठशे वर्षेच आहे स्प्री नदीच्या दोन तीरांवरच्या दोन छोट्या वसाहती एक होऊन त्यांचे बर्लिन हे एक खेडे झाले, ते बाराव्या शतकात । पण त्याना एकत्रित गाव म्हणून मान्यता मिळाली ती तेराव्या शतकात । स्प्री नदी या ठिकाणी विभागून तिच्या दोन शाखा होत असल्याने जलवाहतुकीला आणि व्यापाराला हे आदर्श ठिकाण होते पधराव्या शतकात फ्रेडरिकने हे गाव जिंकून घेतले आणि त्याचे राजकीय व नागरी हक्क नष्ट केले त्याने कॉलन विभागात एक किल्लाही बांधला फ्रेडरिक-नतरच्या राज्यकर्त्यांनी तेथेच राजधानी नेली १६५४ साली बर्लिनची लोकसख्या दहा हजार होती मात्र त्यावेळी कलोन, न्यूरेम्बर्ग, फ्रँकफर्ट ही जर्मनीतील शहरे बर्लिनपेक्षा अधिक मोठी आणि अधिक सपन्न होती. बर्लिनच्या अवतीभवतीची अनेक खेडी एकत्र करून पहिल्या फ्रेडरिकने त्यांचे एकच मोठे शहर केले १७९० मध्ये बर्लिनची लोकसख्या १ लक्ष ७२ हजार झाली. शिक्षण विज्ञान, उद्योगधदे आणि व्यापार यांचे केंद्र म्हणून बर्लिनची झपाट्याने वाढ होऊ लागली पण १८०६ साली फ्रेंचानी हे शहर जिंकून घेतले आणि जर्मनीची राजधानी कोनिस्बर्ग येथे हलवण्यात आली पण नेपोलियनच्या पराभवानंतर प्रशियाने बर्लिनवर पुन्हा वर्चस्व स्थापन केले आणि जर्मनीची राजधानी पूर्ववत तेथे नेण्यात आली एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास जर्मनीत आगगाड्याचे जाळे टाकण्यात आले युरोपमध्ये बर्लिनचे मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन तेथे व्यापार–उद्योग वाढवण्याच्या दृष्टीने रेल्वेचे बारा मार्ग टाकण्यात आले. त्या काळाच्या मानाने हा एक उच्चांकच होता वाहतूक स्वस्त आणि सुलभ झाल्याने बर्लिनची सतत वाढ होत गेली आणि १९३२ मध्ये या शह-

राची लोकसंख्या, बेचाळीस लक्ष झाली. मशिनरीच्या कारखान्याना इथे फार मोठा वाव मिळाला आगगाडीचे डिबे, विजेची उपकरणे, सायकली, रसायने, शिवणयंत्रे अशा अनेक आधुनिक मालाचे बर्लिनमध्ये झपाट्याने उत्पादन होऊ लागले १९३६ साली बर्लिनमध्ये जागतिक ऑलिंपिक सामने झाले, तेव्हा एक लक्ष प्रेक्षकांची सोय असलेले अवाढव्य स्टेडियम तेथे उभारण्यात आले ऑपेरा, नाटक, साहित्य, छपाई, वृत्तपत्रे इत्यादी क्षेत्रांतही जर्मनीची अतिशय भरभराट झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी दोन वर्षे बर्लिन हे जागतिक राजकारणातील सर्वात महत्त्वाचे केंद्र होते हिटलरने आपल्या तुफानी वक्तव्याने आणि जर्मन हे जगातील सर्व श्रेष्ठ वंशाचे आर्यन असून जागतिक प्रभुत्व मिळविणे हा त्याचा हक्कच आहे असा त्यांचा समज करून देऊन जर्मनांना प्रभावित केले पोलंड, डँझिग यांच्यावर चढाया करून हिटलरने जर्मनाच्यात भक्कम आत्मविश्वास निर्माण केला (जर्मन पार्लमेंट) समोरचे विस्तीर्ण पटांगण हे तेव्हा जगाची उलथापालथ करणारे सत्ताकेंद्र होते पण महायुद्धाच्या सुरुवातीच्या विजयांना दोस्त राष्ट्रांनी जोराचे हादरे दिले आणि महायुद्धाच्या अखेरच्या दोन वर्षांत बर्लिनचे अतोनात हाल झाले लक्षावधी ज्यूंची कत्तल करणाऱ्या हिटलरचे धाबे दणाणून गेले

महायुद्धाच्या सुरुवातीला जनरल गोरिंग याने बर्लिन येथील जाहीर भाषणात आश्वासन दिले होते, 'जर्मनीची लष्करी सिद्धता एवढी मोठी आहे, की बर्लिनवर एकही बॉंब टाकण्याची शत्रूची प्राज्ञा नाही.' पण प्रत्यक्षात जे घडले, ते जगाच्या इतिहासात अपूर्व होते आकाशातून पडणारे बॉंब आणि जमिनीवरून झालेल्या तोफांचे हल्ले यांनी बर्लिनवर जो वर्षाव केला, त्याला इतिहासात तोड नाही बर्लिनवर एक हजार वेळा दोस्तांच्या विमानांनी बॉंबहल्ले केले पाच वर्षांत दोस्तांनी बर्लिनवर शहात्तर हजार टनाचे बॉंब टाकले एप्रिल १९४५ च्या शेवटच्या दहा दिवसात तर कहर झाला उन्मत्त हिटलरवर अखेरचा हल्ला करणाऱ्या विमानांनी दहा दिवसात चाळीस हजार टन बॉम्ब बर्लिनवर टाकले रशियन तोफा आणि रणगाडे तोपर्यंत बर्लिनपर्यंत पोचले होते. १ मे १९४५ रोजी रशिययानी बर्लिनचा ताबा घेतला, तेव्हा लाखो जर्मनांची प्रेते आणि कोसळलेल्या हजारो इमारतींचे जळते ढिगारे तेवढे शहरात उरले होते इतके उध्वस्त झालेले शहर नागासाकी आणि हिरोशिमाशिवाय दुसरे नाही

महायुद्धाच्या शेवटच्या दीड वर्षांत बर्लिनमध्ये उपासमार, सक्तीची लष्करी सेवा, सरकारी कामासाठी खाजगी मालमत्तेचा बेगुमान उपयोग, जबरदस्ती आणि छळ यांना ऊत आला होता या काळात बर्लिनने कष्ट, हालअपेष्टा सोसण्याची पराकाष्ठा केली. दुसऱ्या महायुद्धात बर्लिनच्या शेवटच्या लढाईत जर्मनांचे किती नुकसान झाले, याचा ताळेबंद धक्का देणारा आहे. या लढाईत व बॉंबहल्ल्यात बावन्न

हजार सैनिक आणि एक लाख नागरीक ठार झाले आजूबाजूला झालेल्या अवाढव्य विनाशाने आणि नजिकच्या नातेवाईकांच्या मृत्युमुळे पधरा हजार लोक हृदयविकाराने मरण पावले सहा हजार लोकांनी आत्महत्या केली. दोस्त राष्ट्रांचे सैन्य अनेक बाजूनी उध्वस्त बर्लिनमध्ये शिरले, तेव्हा ऐंशी हजार स्त्रियांच्यावर बलात्कार झाले ! चौदा वर्षांच्या पोरीपासून पच्याहत्तर वर्षांच्या वृद्धेपर्यंत क्वचितच कोणी बचावली असेल या बलात्कारापासून गर्भधारणा झाल्यामुळे नको असलेली शत्रूची मुले होऊ नयेत म्हणून नंतर पचावन्न हजार जर्मन स्त्रियांनी गर्भपात करून घेतले या सर्व उत्पातात जखमी न झालेली व्यक्ती बर्लिनमध्ये हजारात एखादीच असेल असे प्रत्यक्ष ही लढाई पाहिलेले सागतात जगातील इतर कोणतेही शहर एवढ्या भयकर मानवनिर्मित यातनातून गेलेले नाही. बेभान रशियनानी मालमत्तेचा किती विध्वस केला, याची गणतीच नाही जखमी शिपायांना अत्यावश्यक औषधे मिळावीत म्हणून हिटलरने अशा औषधांचा आणि इजेक्शन्सचा प्रचंड साठा एका तळघरात करून ठेवला होता जखमी जर्मनांना औषधे मिळू नयेत म्हणून रशियन लष्कराने त्या साठ्यावर मशीनगन्स चालवल्या इजेक्शन्स, औषधे यांच्या लक्षावधी बाटल्या फुटून तळघर तुडुब भरले भयकर मिश्रणाने आणि धुराने आसमत तग झाला जर्मनांचे हाल व्हावेत म्हणून रशियनानी पाण्याच्या व अन्नाच्या साठ्याचेही नाश केले

बर्लिनचा ताबा मिळाल्यावर इग्लड, अमेरिका व फ्रान्स एका बाजूला आणि रशिया दुसऱ्या बाजूला असे गट पडले जर्मनीची फाळणी झाली पूर्व जर्मनीवर कम्युनिस्टांचा ताबा राहिला आणि प जर्मनी स्वतत्र राहिला तरी त्रिराष्ट्रांचे त्यावर सरक्षणाबाबत नियत्रण राहिले बर्लिन शहराचे चार भाग करण्यात आले. रशियाकडे एक भाग राहिला आणि इग्लड, अमेरिका व फ्रान्स यांचे तीन वेगळे भाग झाले. बर्लिनची अशी चमत्कारिक भौगोलिक अवस्था होती, की त्या भोवती सारा पूर्व जर्मनाचा प्रदेश होता पश्चिम जर्मनीच्या सरहद्दीपासून एकशे दहा मैल पूर्व जर्मन हद्द ओलाडून गेल्यावर प बर्लिन येत होते. सबध राष्ट्र एकीकडे आणि त्यातही सर्वात महत्त्वाचे असे राजधानीचे शहर दुसऱ्या राष्ट्रात असा विचित्र प्रकार पूर्वी कधी घडला नव्हता भौगोलिक परिस्थिती आपल्या बाजूची आहे, म्हणून पश्चिम बर्लिनला सगळीकडून वेढून ते पूर्व जर्मनीस सहज जोडता येईल असा रशियाचा डाव होता हॅम्बुर्ग, हॅनोव्हा आणि फ्रँकफर्ट या तीन प जर्मन शहरांना जोडणारे आगगाडीचे मार्ग पूर्व जर्मन विभागातून जाऊ देण्याची परवानगी करारा-प्रमाणे रशियाने दिली.

१९४८ च्या मार्च महिन्यात इग्लंड, अमेरिका व फ्रान्स यांनी बर्लिनच्या आपल्या भागांचे एकत्रीकरण केले, तेव्हा रशियाने या कृतीचा निषेध केला आणि

संयुक्त नियंत्रण समितीतून आपला प्रतिनिधी काढून घेतला. त्याच वर्षी जूनमध्ये दोस्त राष्ट्रांनी पश्चिम जर्मनीत डॉईश मार्क हे नवे चलन सुरू केले, तेव्हा रशिया व दोस्तांतला तणाव शिगेला पोचला २४ जून १९४८ रोजी सोवियत रशियाने बर्लिनची नाकेबंदी केली आणि विमानासकट सर्व मार्ग बंद केले पश्चिम युरोपीय राष्ट्रांचा बर्लिनच्या तीन भागावर काहीही हक्क नाही अशी सनसनाटी घोषणा रशियाने केली दोस्त राष्ट्रांना हे सर्वात मोठे आव्हान होते. बर्लिनमध्ये चाळीस लाख लोक अडकून पडले होते त्यांना अन्नपुरवठा करणे आवश्यक होते

सव्वीस जूनला अमेरिका आणि ब्रिटन यांनी उचललेले पाऊल हे जगाच्या इतिहासातील अत्यंत धाडसी असे होते ही कृती 'एअरलिफ्ट' या नावाने प्रसिद्ध आहे या दोन राष्ट्रांच्या शेकडो विमानांनी बर्लिनमध्ये अन्न, औषधे, कपडे अशा अत्यावश्यक वस्तू विमानातून खाली फेकल्या कारण विमानतळ बंद होते नंतर शहरातच दोस्तांची विमाने उतरली बर्लिनमधून दोस्तांना हाकलून देण्याचा स्टॅलिनचा प्रयत्न फसला बर्लिनमध्ये दोस्त राष्ट्रांचे फार तर आठ डिव्हिजन्स सैन्य होते त्याच्यावर दडपण आणण्यासाठी रशियाने चाळीस डिव्हिजन्स सैन्य आणले अमेरिका आणि ब्रिटन यांनीही आपले अवाढव्य आरमार युरोपच्या दिशेला हलविले त्या काळात दोन्ही बाजूचा तणाव उत्कटतेला पोचूनही भडका उडाला नाही कारण नुकत्याच एका महायुद्धातून पोळून निघालेल्या दोन्ही बाजूंना आणखी एक युद्ध परवडणारे नव्हते अखेर युनोच्या सुरक्षा मंडळात या प्रकरणाची बरीच चर्चा होऊन चार जुलै १९४९ रोजी सोविएत रशियाने बर्लिनची नाकेबंदी उठवली तोपर्यंत एक वर्षाहून अधिक काळ बर्लिन शहर विमानातून येणाऱ्या मालाच्या पुरवठ्यावर जगत होते इतक्या दीर्घकाळ कृत्रिम पुरवठ्यावर जगणाऱ्या दुसऱ्या शहराचे उदाहरण नाही या काळात अमेरिका आणि ब्रिटन यांनी तेवीस लक्ष टन अन्न व इतर आवश्यक मालाचा बर्लिनला विमानाने पुरवठा केला आणि त्यासाठी पंचवीस कोटी डॉलर्स खर्च झाला त्यानंतर मात्र आजपर्यंत सोविएत रशियाने तशा प्रकारची नाकेबंदी केली नाही

पश्चिम बर्लिनची संपन्नता, स्वातंत्र्य आणि नोकऱ्यांची उपलब्धता यांची पूर्व जर्मनीतील लोकांच्यावर मोहिनी पडून पूर्व बर्लिनच्या नागरिकांचे लोंढेच्या लोंढे पश्चिम बर्लिनमध्ये येऊ लागले नाकेबंदीच्या प्रकरणामुळे नागरिकांचा रशियावरचा विश्वास उडाला रशिया अचानक केव्हा काय करील याचा नेम नाही ही भावना पूर्व जर्मनीच्या नागरिकांच्या मनात खोलवर रुजली पण तिचा उच्चार करायची सोय नव्हती. पूर्व जर्मनीतून उघडपणे जाणारा लोंढा मर्यादित करण्यासाठी रशियाने परवाना पद्धत सुरू केली पूर्व बर्लिनमधून पश्चिम बर्लिनमध्ये जाण्यासाठी परवाना घेणे आवश्यक ठरले पण परवान्यावर 'बाजारहाट करण्या-

साठी ' किंवा ' नातेवाइकांना भेटण्यासाठी ' असे कारण देणारे हजारो जर्मन पूर्व बर्लिनमध्ये परत न येता प जर्मनीतच राहू लागले, तेव्हा सोविएत रशियाला अधिक कडक मार्गांचा विचार करावा लागला कारण देशच्या देश असा ओसाड पडणे हे रशियाच्या इभ्रतीला आणि जगभरच्या कम्युनिस्ट विचारपद्धतीला अत्यंत मारक होते पूर्व जर्मनीतील नागरिकांवर रशियाने वाढती बंधने घातली ? याविरुद्ध नागरिकांनी अधून-मधून उठावही केले. पण ते सर्व रशियन सरकारने निर्दयपणे दडपून टाकले

पश्चिम आणि पूर्व बर्लिन यामधील दळणवळण रशियाने जवळ-जवळ बंद केले तांत्रिकदृष्टचा परवाना पद्धत चालू होती, पण परवाना प्रत्यक्षात मात्र द्यायचा नाही, किंवा अपवाद म्हणूनच द्यायचा असे कडक धोरण रशियाने ठेवले मग पूर्व जर्मनीतील स्वातंत्र्यप्रेमींनी वेगवेगळया क्लृप्त्या योजल्या कोणी लांबलचक बोगदे खणून पार झाले, कोणी जंगलातील सरहद्दीवरून पसार झाले, कोणी खाजगी विमानांनी तर कोणी गॅसचे मोठे फुगे हवेत उडवून आणि त्यांना लोंबकळून सरहद्द पार केली सरहद्दीवर भयंकर कुत्रे ठेवण्यात आले होते पण त्यांना ठार मारून काही जर्मन पूर्वेकडून पश्चिमेकडे गेले जर्मनीचे विभक्तीकरण झाल्यापासून १९६१ पर्यंत तीस लक्ष पूर्व जर्मन लोक पश्चिम जर्मनीत पळून गेले इतक्या मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्यावर रशियाला आता अत्यंत कडक असा उपाय योजणे भाग आहे असे वाटू लागले.

१३ ऑगस्ट १९६१ रोजी जे घडले, त्याने काही तासांच्या अवधीत सबंध जगाची दोन गटात अचानक विभागणी केली त्या रात्री दीड वाजता पूर्व जर्मनीतून पश्चिम जर्मनीकडे जाणारी आगगाडी वाटेतच थांबविण्यात आली बंदुका घेतलेल्या रशियन सैनिकांनी गाडीतील सर्व उतारूंना खाली उतरवले. त्यांचे तिकिटांचे पैसे परत देऊन त्यांना दुसऱ्या गाडीने परत पाठवण्यात आले रात्री दोन वाजून सात मिनिटांनी रशियन लष्कराने गच्च भरलेली दुसरी गाडी आली. त्या गाडीतून जमीन उकरण्याची ड्रिलिंग यंत्रे, काटेरी तारा आणि सिमेंटचे हजारो खांब आणि विटा आणल्या गेल्या होत्या रशियन सरकारने भराभर दोन जर्मनीतील सरहद्दीवर सिमेंट काँक्रीटची अभेद्य भिंत उभारण्यास सुरुवात केली. हीच ती बर्लिनची जग-प्रसिद्ध भिंत ! त्यासाठी पन्नास हजार सैनिक पूर्व जर्मनी आणि रशिया या देशातून जमवले होते सिमेंटच्या लक्षावधी विटा आणि सिमेंटचे प्रचंड ढीग तयार ठेवले होते काटेरी तारांनी भरलेल्या शेकडो ट्रक्स सज्ज होत्या ही सर्व तयारी रशियाने इतक्या गुपचूपपणे केली, की दोस्त राष्ट्रांच्या तल्लख गुप्तहेरांना तिचा थोडासासुद्धा मागमूस लागला नाही सबंध सरहद्दीवर झेकोस्लाव्हाकिया, रशिया आणि पूर्व जर्मनी यांचे लष्कर मशीनगन्स आणि रणगाडे घेऊन तयार होते व भिंत बांध-

ण्याच्या कामाला सरक्षण देत होते या सैन्याचा आकडा दोन लाखाच्यावर होता.

पश्चिम आणि पूर्व बर्लिन यांच्यामधील काही जागा तटस्थ पट्टा म्हणून राखून ठेवला आहे त्याला ' चेक पॉईंट चार्ली ' असे नाव आहे या पट्ट्याच्या दोन्ही बाजूना दोन्ही पक्षांचे उच्च टेहळणी मनोरे आहेत १३ ऑगस्ट १९६१ च्या रात्री अडीचच्या सुमाराला दोस्त राष्ट्रांच्या टेहळणी पथकाने दुर्बिणीतून नेहमी-प्रमाणे रशियन हद्दीत पाहिले, तेव्हा त्याला तेथे चमत्कारिक लष्करी हालचाली दिसल्या अधिक बारकाईने निरीक्षण केल्यावर मशीनगन्सच्या पहाऱ्यात भिंत उभा-रली जात असल्याचे पथकाला आढळून आले पथकाच्या प्रमुखाने तावडतोब ही घटना बर्लिनमधील दोस्त राष्ट्राच्या लष्करी नियत्रण केंद्राना कळवली दोन्ही बाजूच्या टेहळणी पथकांनी कोणत्याही परिस्थितीत स्वत गोळीबार करू नये, कारण त्यामुळे युद्धाचा भडका होण्याची शक्यता आहे, अशी सक्त ताकीद दोन्ही पक्षानी दिल्याने दोस्त राष्ट्रांच्या टेहळणी पथकांना समोर काय चालले आहे हे दिसत असतानाही ते पथक मुख्य कचेरीकडे निरोप पाठविण्याशिवाय काहीही करू शकले नाही

जागतिक इतिहासातील या अत्यत महत्त्वाच्या क्षणी दोस्त राष्ट्रांचे प्रमुख काय करीत होते ? इग्लडचे पतप्रधान मॅक्मिलन हे यॉर्कशायर परगण्यात शिकार करायी म्हणून गेले होते फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष जनरल द गॉल हे एका निवात खेड्यात विश्राती घेत होते आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी हे ह्यानिस पोर्ट येथे विश्रांती आणि मासेमारी एवढेच काम करीत होते त्या–त्या राष्ट्राच्या बर्लिनमधील प्रतिनिधींनी ' मोस्ट इपॉर्टंट '. ' इम्मीजिएट, ' ' टॉप सीक्रेट ' अशा शब्दांनिशी बर्लिनच्या भिंतीची ही वार्ता गुप्त सदेशांच्या द्वारे आपआपल्या राष्ट्र-प्रमुखाना कळवली. पण ती बातमी आली, तेव्हा आधीच इतका उशीर आला होता की पन्नास हजार सैनिकांनी अर्धी–अधिक भिंत बाधूनही टाकली होती तीन राष्ट्रांचे प्रमुख हजारो मैलाच्या अतरावर तीन दिशाना होते त्यांनी एकत्र येऊन काही उपाययोजना करण्याचा विचार करण्याआधीच भिंत बांधूनही झाली असती. तेव्हा सध्याच्या परिस्थितीत आपल्याला कोणतीही लष्करी उपाययोजना करणे शक्य नाही हे त्यानी ठरवून टाकले त्याचे लष्करी सल्लागारसुद्धा जवळ नव्हते. रशियाने ही सर्व माहिती गुप्तहेराच्या मार्फत पूर्वीच काढून ठेवली असावी आणि मगच हा बेत अत्यत पद्धतशीरपणे व गुप्तपणे रचला असावा असा तज्ज्ञाचा अदाज आहे ही भिंत पूर्व जर्मन हद्दीत घातली जात होती त्यामुळे तिला कायदेशीर हर-कत घेतली, तरी ती टिकणारी नव्हती इग्लडचे पतप्रधान मॅक्मिलन हताशपणे म्हणाले, ' जर्मन लोक जर स्वत चे प्रश्न सोडवू शकत नसतील, तर बर्लिनमध्ये जाऊन त्याच्यासाठी कोण लढणार ?' हीच री अमेरिका आणि फ्रान्स यांनी ओढली. याचे प्रमुख कारण हेच होते, की भौगोलिकदृष्ट्या बर्लिन हे पूर्व जर्मन

किंवा रशियन हद्दीत शभर मैलांहून अधिक अतरावर असल्याने दोस्तांनी प्रयत्न केला असता, तरीही हे काम लष्कराच्या बळावर त्यांना धावविता आले नसते आजही अशी परिस्थिती आहे की बर्लिनमध्ये दोस्तांचे सैन्य तीस हजार असले, तरी पूर्व जर्मनी आणि रशिया यांचे पाच लक्ष सैनिक दोस्तांना अनेकपटींनी पुरून उरणारे आहे

बर्लिनमध्ये गेल्यावर मला जे पाहायचे होते, ते म्हणजे जगाची दोन वेगळ्या भागात विभागणी करणारी भिंत ! स्टेशनच्या बाहेर पडल्यावर मला कोणीही ती भिंत कोठे आहे ते सहज सांगेल अशी माझी भाबडी कल्पना होती पण रस्त्यावरचे लोकच काय, पण वाहतूक नियंत्रण करणारा पोलीससुद्धा ही भिंत कोठे आहे ते मला सांगू शकला नाही ! म्हणजे ती कोठे आहे ते त्यांना माहीत नव्हते किंवा माहिती असूनही त्यांना ती बातमी गुप्त ठेवायची होती, असे नव्हे, तर माझी इंग्रजी भाषाच कुणाला कळत नव्हती ! मी ' वॉल, वॉल ' करीत विचारीत होतो, तर त्याना जर्मनशिवाय इतर कोणतीही भाषा येत नसल्याने ते मान हलवून ' काही कळत नाही बुवा ' अशा अर्थाचा आविर्भाव करत होते मग मी एक युक्ती केली स्टेशनवर पिक्चर कार्डस किंवा प्रेक्षणीय स्थळाची रंगीत चित्रे मिळत होती. त्यापैकी बर्लिनच्या भिंतीची दोन चित्रे मी विकत घेतली. त्यातले एक चित्र ब्रॅंडन-बर्ग गेट या जगप्रसिद्ध विजय कमानीचे होते ते चित्र मी एका टॅक्सीवाल्याला दाखवले आणि ' मला इथं जायचं आहे ' असे सुचवले खरे तर पाश्चात्य देशात मला टॅक्सी करणे परवडत नाही पण नव्या गावात बसचे मार्ग माहीत नसतात आणि जर्मनीत तुम्हाला त्याची भाषा येत नसेल तर सारीच गती खुंटून जाते बर्लि-नला गेल्यावर भिंत तर पाहिलीच पाहिजे, म्हणून मी महागडी टॅक्सी केली विचार केला, की रशियाने घातलेली भिंत पाहण्यासाठी अमेरिकन सरकारने दिलेल्या पेन्शनमधून काही पैसा खर्च झाला, तर तो सार्थकीच लागेल शहराच्या गर्दीच्या भागातून टॅक्सी कमी गर्दीच्या आणि लष्करी छापाच्या विभागातून जाऊ लागली मध्येच एक अतिशय उंच असा विजयस्तंभ लागला, तो ओलांडल्यावर French Army Head Quarter Prohibited Area ' असा फलक दिसला. तिथून दहा मिनिटे टॅक्सीने गेल्यावर लांबूनच एक अवाढव्य कमान दिसली तिची अनंत छायाचित्रे मी युद्धाच्या वेळी व नंतर पाहिली होती युद्धपटांतूनही ती कमान अने-कदा पाहिल्याचे आठवत होते तीच ती ब्रॅंडनबर्ग विजय कमान व त्या कमानीच्या जरा अलीकडे सिमेंटची सुमारे दहा फूट उंच भिंत व त्यावर तारांचे दोन फूट कुंपण दिसले मी टॅक्सीतून उतरलो आणि जवळ जाऊन पाहू लागलो

या भिंतीपलीकडील दृश्य पाहता यावे म्हणून अलीकडच्या ब्रिटिश लष्करी विभागात पधरा--वीस फूट उंचीचे एक पाचाड बाधलेले आहे त्यावर चढून मी

पलीकडे पाहिले. तो पूर्व जर्मन किंवा रशियन विभाग होता दोस्ताचा विभाग व रशियन विभाग याच्यामध्ये एक पट्टा होता तो डेथ ट्रॅप किंवा मृत्यूचा सापळा म्हणून प्रसिद्ध आहे या पट्ट्यावर तारांची भेंडोळी सोडलेली आहेत लांबून पाहणाऱ्याला या कांटेरी तारा साध्या दिसत असल्या, तरी वस्तुत: त्यातून प्रचंड दाबाची वीज सोडण्यात आली आहे त्या तारेला स्पर्श करणारा ताबडतोब जळून खाक होईल या तारांच्या मध्यभागी दर दहा फूट अंतरावर ऑटोमॅटिक मशिनगन्स आहेत त्यांना स्पर्श झाल्याबरोबर त्या आपोआप चालू होतात आणि त्यातून मरणाचे दूत म्हणून काडतुसाचा वर्षाव होतो त्या पलीकडे पाण्याचा खंदक आहे त्या पाण्यातही विजेचे प्रवाह आहेत खंदकातून पोहून जाण्याचा प्रयत्न करणारा जागच्या जागी मरून पडेल. एवढा बदोबस्त पुरेसा नाही म्हणून की काय त्या पलीकडे शिकारी हिंस्त्र कुत्रे ठेवले आहेत आपल्याच देशातील लोक बाहेर जाऊ नयेत म्हणून एवढी हिंस्त्र खबरदारी जगातील इतर कोणत्याही राष्ट्राने कधीही घेतलेली नव्हती

या भितीच्या अलीकडे म्हणजे दोस्ताच्या विभागात एक मोठा फलक आहे त्यावर लिहिले आहे – 'Liberty ends here !' हे दोस्ताचे मत असले तरी पूर्व जर्मनांचे आणि रशियनाचे मात्र या भितीबद्दल वेगळे मत आहे कारण त्यांच्या विभागातील मोठ्या फलकावर लिहिले आहे

FRONTIER OF VICTORY त्यांच्या दृष्टीने ते खरेही आहे कारण ही भित घातल्यानतर दोस्त राष्ट्रांनी किंवा पश्चिम बर्लिनने ती मोडून काढण्याचा प्रयत्नही केला नाही इतका कडक बदोबस्त असूनही ही भित घातल्यानंतर जिवावर उदार होऊन पूर्व बर्लिनच्या सत्तर लोकानी हा मृत्यूचा सापळा ओलांडण्याचा जिद्दीचा प्रयत्न केला ते सर्वजण मरण पावले. त्याना श्रद्धांजली म्हणून एक क्रूस पश्चिम बर्लिनच्या सरहद्दीवर आहे देशप्रेमी जर्मन लोक त्या क्रुसावर रोज ताज्या फुलांचे चक्र भक्तिभावाने ठेवीत असतात ब्रॅडनबर्ग कमानीजवळ दोन गटांच्या राष्ट्रातील हा पट्टा चेक पॉइंट चार्ली म्हणून प्रसिद्ध आहे. दोन्ही विभागातील उच्च मनोऱ्यांवरून मशीनगन्सधारी सैनिक दुर्बिणीतून पलीकडे अखड नजर ठेवीत असतात पश्चिम बर्लिनच्या भितीवर मी एक काहीसा भयानक पण विनोदी मजकूर पाहिला त्या प्रकाराला इंग्रजीत ब्लॅक ह्यूमर म्हणतात पूर्व बर्लिनकडे बाणाने निर्देश करून एका फलकावर लिहिले होते– 'HIGH JUMP TRAINING AREA'

शांततेच्या काळातही जगड्व्याळ युद्धाचा अनुभव देणारे हे आजच्या जगातील एकमेव ठिकाण आहे तो पाहण्याचा चित्तथरारक अनुभव मी घेतला

तात्पुरता परवाना काढून काही वेळेसाठी पूर्व बर्लिनमध्येही जाता येते. ही

भिंत घालण्यापूर्वी दोन बर्लिनच्या काही भागातून एक ओढा वाहत होता ती सरहद्द होती त्या प्रवाहात एकजण मासे मारीत होता त्याला एका अमेरिकन पत्रकाराने विचारले, ' तू या नदीत पूर्व जर्मन मासे पकडतोस की पश्चिम जर्मन ?" तो कोळी म्हणाला, " मी दोन्ही बर्लिनचे मासे पकडतो " त्यावर पत्रकाराने विचारले " पण कोणता मासा कुठल्या बर्लिनचा हे तुला कसे ओळखता येते ?" मासे मारणाऱ्याने सांगितले, " पूर्व बर्लिनचे मासे हे कम्युनिस्ट पक्षाचे सभासद असतात. त्यांच्या अंगावर पक्षसदस्य असल्याचा शिक्काच मारलेला असतो ! "

बर्लिनच्या भिंतीबद्दल दोन मते मला जर्मनीत ऐकायला मिळाली पन्नाशीच्या वरचे जर्मन होते, त्यांना मित्र, कुटुंब, नातेवाईक, राज्यपद्धती याची विभागणी करणाऱ्या या भिंतीबद्दल तीव्र तिरस्कार वाटत होता. ही भिंत पाडली जावी आणि पुन्हा दोन बर्लिन, दोन जर्मनी यांचे एकीकरण व्हावे असे त्यांना वाटते पण पचविशी-खालचे जे जर्मन आहेत, त्यांना एक बर्लिन आणि एक जर्मनी यांची आठवण नाही मी बर्लिन शहरात गेलो, तो दिवस म्हणजे १३ ऑगस्ट १९८१ हा योगायोगाने या बर्लिन भिंतीचा विसावा वाढदिवस होता त्यामुळे दोन्ही अगदी परस्परविरोधी सभा मला पाहायला मिळाल्या पश्चिम बर्लिनमधील सभांतून स्वातंत्र्याचे पवाडे गायले जात होते आणि या अमानुष भिंतीचा निषेध होत होता त्या दिवशीला वृत्तपत्रात एक कविता प्रसिद्ध झाली होती, तिच्या दोन ओळी अशा होत्या " मानवा, तू कोण आहेस ? या भिंतीतली एक वीट ! "

याउलट पूर्व बर्लिनमध्ये विजयोत्सवाच्या सभा चालल्या होत्या ' वीस वर्षांत या भिंतीचा एक कोपराही भांडवलशाही राष्ट्रांना हलवता आला नाही ' असे त्या सभेत गर्वाने सांगण्यात येत होते पण आश्चर्याची गोष्ट अशी, की ही अभेद्य भिंत उभारल्यानंतरही एक लक्ष सत्तर हजार लोक पूर्व जर्मनीतून पळून गेले प्रथम ते युगास्लोव्हियासारख्या कमी कडक कम्युनिस्ट देशात गेले आणि तिथून ग्रीस, तुर्कस्थान, प जर्मनी वगैरे देशांतगेले पूर्व जर्मनीतील जनता पूर्णपणे सुखी आहे, हा कम्युनिस्टांचा दावा खोटा ठरला आहे पूर्व बर्लिनमधील लोकांचे राहणीमान पश्चिम बर्लिनमधील लोकांच्या जीवनमानापेक्षा खूपच निकृष्ट प्रतीचे आहे उदाहरणार्थ, प जर्मनीतील प्रत्येक घरातगॅसवर स्वयंपाक केला जातो, तर पूर्व बर्लिनमधील ऐंशी हजार लोक अजून कोळशाच्या शेगड्या वापरतात

फक्त भिंतीचे दु ख सोडले, तर प बर्लिन हे भरभराट पावलेले शहर आहे तेथील एकवीस लक्ष लोकसंख्येपैकी चाळीस टक्के लोक उद्योगधंद्यात आहेत एकदर कामगारांपैकी ९ टक्के कामगार परकीय आहेत फक्त साडेसात टक्के जमीन शेतीसाठी वापरली जाते रसायने (उदाहरणार्थ सीमेन्स), मशीन टूल्स, विजेची उपकरणे, एंजीनियरिंग या उद्योगधंद्यात बर्लिनचा क्रम जगातील पहिल्या पाचात

आहे. याउलट पूर्व बर्लिनमधील ११ लक्ष लोकसंख्येपैकी तीस टक्के लोक सरकारी नोकरीत व सरकारी कारखान्यात आहेत त्यावरून लोकांच्यावरची सरकारची पकड लक्षात येते मात्र पूर्व बर्लिनमधील हुबोवर विद्यापीठात जगातील अनेक श्रेष्ठ विचारवंत व शास्त्रज्ञ यांनी काम केले आहे अल्बर्ट आईन्स्टीन आणि कार्ल मार्क्स ही त्यातील दोन सुप्रसिद्ध नावे। पूर्व बर्लिनमध्ये मुलांच्या शिक्षणाकडे बारकाईने लक्ष देण्यात येते भांडवलशाही राष्ट्रे जगाचा विनाश करीत आहेत असे चित्र विद्यार्थ्यांच्या मनावर कसोशीने बिंबवले जाते पूर्व बर्लिनमधील प्रत्येक नागरिकाला आपल्याबद्दलची अधिकृत माहिती देणारी एक पुस्तिका सतत बाळगावी लागते त्या पुस्तिकेत जन्मतारीख, पत्ता, कुटुंबात कोण–कोण आहेत, नोकऱ्यांचा तपशील वगैरे माहिती दिलेली असते सरकारी अधिकारी मागणी करतील तेव्हा ही पुस्तिका ड्रायव्हरच्या लायसेन्सप्रमाणे दाखवावी लागते

प बर्लिनचा पद्धतशीरप्रमाणे विकास करण्यासाठी प जर्मन सरकारने कोटयावधी मार्क्स खर्च केले आहेत अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदा प. बर्लिनमध्ये भरतात अशा आठशे परिषदा एका वर्षात (१९८०) भरल्या होत्या तेथे सात हजार लोक बसतील एवढे मोठे प्रेक्षागृह खास परिषदांच्यासाठीच बांधण्यात आले आहे प बर्लिनमध्ये अधिक लोकांनी स्थायिक व्हावे म्हणून सरकारने तेथील रहिवाशांच्या करात बरीच सूटही दिली आहे ऑपेरा आणि सॉकर (फुटबॉलसारखा खेळ) हे जर्मनीचे आवडते छंद। त्या दोन्हीसाठी भव्य नाटयगृहे आणि क्रीडांगणे प बर्लिनमध्ये आहेत बियर हे तर जर्मनीचे राष्ट्रीय पेय जर्मन बियर ही जगातील सर्वोत्कृष्ट बियर। ती जर्मनीत अत्यंत स्वस्त मिळते इतकी, की पाण्याच्या बाटलीला पाच रुपये पडतात तर बियरच्या बाटलीला साडेतीन रुपयेच पडतात फ्रान्समध्येही फिल्टर्ड वॉटरपेक्षा म्हणजे पाण्यापेक्षा वाईन स्वस्त मिळते। मद्य न पिणाऱ्यांच्यावर हा क्रूर आघातच आहे फळफळावळे आणि खाद्यपदार्थही इटली, इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंडच्या मानाने प जर्मनीत खूपच स्वस्त मिळतात

बर्लिनमध्ये अनेक उद्योगधंदे आहेत त्यात सर्वात जोरात चालणारा धंदा म्हणजे गुप्त हेरगिरीचा। जगातील दोन्ही बलिष्ठ राष्ट्रांचे गट अगदी समोरासमोर ठाकले आहेत ते याच शहरात। त्यामुळे एकमेकांची रहस्ये भेदण्यासाठी उत्सुक असलेले आणि त्यासाठी आपला जीव धोक्यात घालण्यासाठी तयार असलेले शेकडो गुप्तहेर सर्व अद्ययावत् उपकरणांसह इथे मौजूद आहेत एखादा निरुपद्रवी वाटणारा हॉट डॉग्जचा रस्त्यातला विक्रेताही गुप्तहेर असू शकेल किंवा आलिशान हॉटेलात प्रसन्न स्मित करून नाजूक हात पुढे करणारी एखादी युवतीही रक्तामांसाचा गुप्त संदेश पोहोचवीत असेल कॅरी या सर्वश्रेष्ठ गुप्तहेरकथांच्या लेखकाने 'द मॅन हू केम इन् फ्रॉम द कोल्ड !'– ही जबरदस्त कादंबरी बर्लिनच्याच पार्श्वभू

भूमीवर लिहिली आहे दोन सत्तागटाचे गुप्तहेर विभाग आपले हेतू सिद्ध करण्यासाठी जिवंत माणसाचा बाहुल्याच्यासारखा कसा क्रूर उपयोग करतात, याचे भयानक चित्रण या कादंबरीत करण्यात आले आहे या गाजलेल्या कादंबरीवरील चित्रपटात रिचर्ड बर्टनने नायकाची भूमिका केली आहे दोन्ही बर्लिनमध्ये यशस्वी हेरगिरी करणं हे जगातील सर्वच गुप्तहेराना एक प्राणसंकटाचे आव्हान आहे

पूर्व बर्लिनमधल्या एका तळघरात दुसऱ्या महायुद्धाचे अखेरचे बळी घेतले गेले. ते सारेच दृश्य भीषणतेची परिसीमा गाठणारे होते हिटलर, त्याची प्रेयसी इव्हा ब्राऊन, गोबेल्स, त्यांचे कुटुबीय, एक डॉक्टर, लष्करी साहाय्यक असे नाझी राजवटीचे सर्व श्रेष्ठी तळघरात होते हिटलर पराभवाने आणि तणावाने अखेरच्या बेभान अवस्थेत होता त्याच्यासमोर नकाशांचे ढीगच्या ढीग पसरले होते त्यावर बोट ठेवून तो हुकूम देत होता– 'अकरावी डिव्हिजन या जागी पाठवा' त्याचे मदतनीस 'यस् सर' म्हणत हिटलर सांगे, 'शभर विमान इथ पाठवा– पन्नास युद्धनौका इथ जाऊ देत' तो हुकूम देत होता सहकारी ते हुकूम ऐकून 'होय' म्हणत होते पण वस्तुस्थिती अशी होती की त्या सहकाऱ्यांच्याकडे सैन्य, विमाने, युद्धनौका यापैकी काहीच नव्हते जवळजवळ सर्वांचा नाश झाला होता किंवा शत्रूने त्याचा ताबा घेतला होता पण हे जर हिटलरला सांगितले, तर तो सत्य सागणाऱ्यालाच चिडून गोळी घालून ठार करेल हे माहीत असल्याने ते हुकुमाचे पालन होत असल्याचा बहाणा करीत होते गोबेल्सची बायको नवऱ्याला म्हणाली, "माझी मुल शत्रूच्या हाती जिवंत पडता कामा नयेत शत्रू येणार याची खात्री झाली की आपण मुलांना मारून टाकल पाहिजे"

इतक्यात हिमलरने शरणागती पत्करली अशी सर्वांना चकित करणारी बातमी आली हिटलरने आपल्या ड्रायव्हरला भरपूर पेट्रोल ताबडतोब आणण्याचा हुकूम दिला इव्हा ब्राऊनच्या बहिणीचा नवरा पूर्वी याच तळघरात होता पण तो अचानक पळून गेला त्याचे नाव फेगेलीन बर्लिनमधून पळून जाताना हिटलरच्या गुप्तहेरानी त्याला पकडून तळघरात आणला हिमलरन शरणागती पत्करली अशी खात्रीलायक बातमी आल्याबरोबर हिटलरने फेगेलीनला आपल्यासमोर आणला आणि या शरणागतीला तूच जबाबदार आहेस असे सागून सर्वांच्या समोर त्याच्या वर गोळी झाडून त्याला ठार मारले याच वेळी इव्हा ब्राऊनची दाढ दुखू लागली "डॉक्टर बोलवू का ?" असे गोबेल्सच्या बायकोने विचारले, तेव्हा विषण्ण हसून इव्हा ब्राऊन म्हणाली, "नको आता थोड्याच वेळात सगळच संपणार आहे" तिने अर्सेनिकची एक कॅप्सूल दाखवून म्हटले, "ही खाल्ली, की क्षणात मरण येईल" तिथे उपस्थित असलेल्या एका डॉक्टरने विचारले, "पण ती विषारी असेलच याचा भरवसा काय ?" तेव्हा हिटलरने आपल्या आवडत्या कुत्र्याला जवळ बोलावले,

त्याच्या जबड्यात अर्सेनिकची कॅप्सूल खुपसली तो कुत्रा क्षणार्धात सर्वांच्यासमोर तडफडून मेला

गोबेल्सने आपल्या बायकोला सांगितले, "मुलांना मारण्याची वेळ झाली." ती रिव्हॉल्वर घेऊन उठली तिची पाच मुले त्यावेळी हिटलरकाकाचे मनोरंजन करण्यासाठी हिटलरसमोर उभी राहून गाणी म्हणत होती सौ गोबेल्सने त्यांना जवळ घेतले, आणि ती दुसऱ्या खोलीत गेली तिथे मुलांच्यावर गोळ्या झाडून थरथरत ती परत आली हिटलरने सांगितले, "मी इव्हा ब्राऊनबरोबर लग्न केल्यानंतरच मरणार आहे" त्याच वेळी बातमी आली की इटालीचा हुकूमशहा मुसोलिनी याला पकडले, त्याला गोळ्या घालून ठार करण्यात आले, त्याचे प्रेत टांगून ठेवल्यावर इटालियन लोकांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या, पादत्राणे, दगड मारले ते त्याच्या प्रेतावर थुंकले हिटलरने आधीच ठरवले होते, आपल्या प्रेताची विटंबना होऊ द्यायची नाही. त्याचा तो निर्णय आता पक्का झाला हिटलरने आपले शेवटचे अधिकारपत्र सेक्रेटरीला डिक्टेट केले त्याने राष्ट्राध्यक्ष म्हणून डोएनिझची नेमणूक केली आणि जोसेफ गोबेल्सला टिश्टॅगचा चॅन्सेलर म्हणून नेमले मग हिटलरने इव्हा ब्राऊनबरोबर विवाह केला थोड्याच वेळात आपण मरणार याची खात्री झालेल्याचा तो विवाह होता उपस्थितांनी वधुवरांना शुभेच्छा दिल्या. आपल्या विश्वासू सहकाऱ्यांसमोर केलेल्या शेवटच्या भाषणात हिटलर म्हणाला, "मला मृत्यूचे भय नाही मला मृत्यु हा उपकारकर्ताच आहे चिंता आणि आपत्तींचे जगणे आता संपणार माझ्या जवळच्या मित्रांनी माझ्याशी प्रतारणा केली, राष्ट्रद्रोह केला" मग हिटलर आणि पत्नी इव्हा शेजारच्या खोलीत गेले पिस्तुलाची गोळी झाडल्याचा आवाज आला हिटलरचे सहकारी थोड्या वेळाने आत गेले हिटलरने स्वतःवर गोळी झाडून घेतली होती. त्याची दहा-बारा मिनिटेच पत्नी असलेली इव्हा अर्सेनिकची कॅप्सूल खाऊन गतप्राण झाली होती हिटलरच्या अखेरच्या इच्छेप्रमाणे त्या दोघांची प्रेते एका ब्लँकेटमध्ये गुंडाळण्यात आली, त्यावर पेट्रोल ओतण्यात आले आणि त्याला आग लावण्यात आली यावेळी हजर असलेल्या हिटलरच्या ड्रायव्हरने लिहिले आहे– "जगाचा थरकाप करणारा हिटलर जळत असताना बेकन भाजल्याचा वास आला. तीच त्याची अखेरची स्मृती !"

असे हे भयचकित करणारे बर्लिन म्हणजे माझा एक विलक्षण, थरारक, अविस्मरणीय अनुभव आहे

□ □ □

## एकाच घटनेने जगप्रसिद्ध झालेले शहर

# डलास

या शहरांची एक गमत असते ज्या राज्यात किंवा राष्ट्रात ती असतात, त्यांचे प्रतिबिंब शहरात पडतेच असे नाही मुंबईकडे पाहून महाराष्ट्राची अजिबात कल्पना येत नाही पुणे मात्र अस्सल मराठी वाटते लंडनमध्ये ब्रिटनचे प्रतिबिंब आहे, पण बँकॉक हे थायलंडपेक्षा अमेरिकेत असल्यासारखे वाटते डलास हे शहर मात्र टेक्सस या राज्याची सर्व वैशिष्टचे घेऊन उभे आहे ती टेक्ससची राजधानी आहे पण टेक्ससमधील ते सर्वात मोठे शहर नाही आपल्याकडे राज्याची राजधानी हे त्या राज्यातील बहुधा सर्वात मोठे शहर असते पण अमेरिका, जर्मनी अशा काही पाश्चात्य देशांत राजधानी म्हणून लहान शहराचीच निवड करण्याची पद्धत पडली आहे. वॉशिंग्टन ही अमेरिकेची राजधानी न्यूयॉर्क, शिकागोपेक्षा किती तरी लहान आहे आणि बॉन ही प जर्मनीची राजधानी फँकफुर्ट, म्युनिकपेक्षा लहान आहे.

मी डलासला गेलो, तो ठरवून नव्हे अत्यंत अनपेक्षित रीतीने, किंवा चुकूनच म्हटले तरी चालेल मी सॅन्फ्रॅन्सिस्कोहून न्यू आर्लीन्सला चाललो होतो पण वाटेत दोनदा विमान बदलावे लागणार होते. सकाळी नऊ वाजता ' एअर वेस्ट ' कंपनीच्या विमानाने निघालो, तो दुपारी दोनला फोनिक्सला उतरलो तिथ पाहतो तर पुढचे विमान सुटायला चागला चार तासांचा अवधी होता. विमानतळावरच्या लॉकरमध्ये सामान ठेवून फोनिक्सचा एक फेरफटका केला तिथून संध्याकाळी सहाला टेक्सस लाईन्सने निघालो वेळापत्रकात छापले होते त्याप्रमाणे हे विमान ९-४० ला डलासला जाणार होते आणि १०-०० ला डलासहून न्यू आर्लीन्सला जाणार होते. रात्री ९-४० ला आमचे विमाम डलासला उतरले आता न्यू आर्लीन्सला वेगळ्याच कंपनीच्या विमानाने जायचे होते वेळ तर फक्त आठ-दहा मिनिटांचाच होता.

कारण पहिल्या विमानातून सामान मिळविण्यास दहा मिनिटे गेली होती मी 'चौकशी' च्या कौंटरवर सामान घेऊन गेलो तो कौंटर भारतातला नसल्याने 'चौकशी' असे लिहिले असूनही तिथे कोणीतरी युवती माहिती देण्यासाठी बसली होती मी तिकीट व विमानाचा उड्डाण क्रमांक दाखवून तिला विचारले, "मला न्यू आर्लीन्सच विमान मिळेल का !" ते पाहून ती म्हणाली,' मिळेल ना ! त्यासाठी तुम्हाला भरपूर वेळ आहे बारा तास ! कारण हे तुमच विमान उद्या सकाळी दहाच आहे !" मी चकित होऊन विचारले, "अहो, पण या वेळापत्रकात रात्रीचे आणि दिवसाचे आकडे दाखविल्यास काही फरक का करीत नाहीत ? आमच्याकडे रात्री ९–४० ला २१–४० म्हणतात"

ती म्हणाली, "आमच्याकडेही फरक असतो रात्रीचे आकडे जाड ठशात असतात दिवसाचे आकडे पातळ असतात" आकड्यांच्या घोटाळ्याच्या अर्थ एवढाच होता की डलास या मला सर्वस्वी अज्ञात गावात मला निदान एक रात्र तरी मुक्काम करावा लागणार होता माझ्याकडे नेहमीप्रमाणेच पैशाची टचाई होती आणि या अपरात्री टॅक्सी करून जायचे, हॉटेल शोधून एका रात्रीपुरते राहायचे तर तीन–चारशे रुपयांचा खर्च होता. विमानतळावरच्या पोलिसाला 'सकाळपर्यंत इथेच विमानतळावर बसून राहिलो तर चालेल काय ?'' असे विचारले पण त्याला ती कल्पना फारशी पसत पडली नसावी तो म्हणाला, "तुम्ही हॉटेलात जा इथे तुमची गैरसोय होईल" विमानतळावर सहा–सात तास काढण्यात मी सोयीचा विचार करीत नसून खर्चाचा करीत होतो हे त्याला सागण्यात अर्थ नव्हता मी थोडा वेळ विचार केला आणि मला अचानक आठवले की, घोलकर नावाचा कोल्हापूरचा एक तरुण डलासमध्ये राहत होता मी टेलिफोन डिरेक्टरी पाहिली आणि तीत त्याच नाव व फोन क्रमांकही मिळाला. या वेळेपर्यंत रात्रीचे सव्वादहा वाजले होते पण सुदैवाने तो घरी होता आणि अतिशय आनदाने त्याने विचारले, 'अहो लेखक रमेश मत्री तुम्हीच ना ? थाबा तिथेच मी येतो गाडी घेऊन !'' तो पधरा मिनिटांत विमान-तळावर आला आणि मी अतिशय अनपेक्षितपणे डलासमध्ये राहिलो घोलकरचा इतका आग्रह पडला की दुसऱ्या दिवशीने माझे विमानप्रयाण रद्द करून मला तिथे चांगले चार दिवस राहावे लागले. त्या घोलकरचे नि माझे लाबचे नातेही निघाले आणि घाईगर्दीने विमानोड्डाण करणाऱ्या मला अतिशय हवी असलेली विश्रातीही तिथे मिळाली

घोलकरने आपल्या कचेरीतून रजा घेतली आणि मग चार दिवस त्याच्या-बरोबर सतत भटकणे, खाणे–पिणे, चित्रपट पाहणे हा माझा एकमेव उद्योग झाला ज्या टेक्सस राज्याची राजधानी म्हणून डलास हे गाव प्रसिद्ध आहे, त्याची माहिती असल्याबाचून या गावाचे वैशिष्ट्य कळणारच नाही. कारण डलास हे सलग गाव

नाही. ते टेक्ससच पूर्ण प्रतिबिंब आहे टेक्ससचा आकार, लोकसंख्या, इतिहास आणि अतिभव्यतेचे वेड ही सर्वच वैशिष्ट्ये लक्षणीय आहेत या राज्याचे क्षेत्रफळ दोन लक्ष सदुसष्ट हजार चौरस मैल आहे फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड आणि स्वित्झर्लंड हे युरोपमधील चार देश या एकाच राज्यात सहज मावतील अमेरिकेची इतर सर्व राज्ये ही संघराज्यात विलीन होण्यापूर्वी राज्ये होती पण टेक्सस हे एकच राज्य असे आहे की विलीन होण्यापूर्वी ते स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र होते त्यामुळे इतर राज्यांपेक्षा टेक्ससमधील लोकांच्यात अजूनही एक वेगळाच आत्मविश्वास आणि आक्रमकता दिसते प्रचंड विस्तार असल्याने विपुल राने, वने, मोकळ्या जागा, हजारो गाई व बैल असलेले रँचीस किंवा गौळीवाडे इथल्याइतके जगात इतरत्र कुठेही नाहीत तीच गोष्ट घोड्यांच्या पैदाशीची ! पाच–पाच हजार घोडे असलेल्या वाड्या टेक्ससमध्ये आहेत

जवळजवळ तीनशे वर्षे म्हणजे १५१९ ते १८२१ पर्यंत टेक्ससवर स्पेनचे राज्य होते त्यामुळे अमेरिकेतल्या या एकमेव राज्यावर अजूनही स्पॅनिश संगीत आणि स्पेनचा खिलाडू दिलदारपणा यांची खोल छाप आहे मेक्सिकोमध्ये बंड झाल्यावर टेक्ससमध्ये काही वर्षे लष्करी हुकूमत होती फक्त पाचच वर्षे फ्रेंचांनीही टेक्ससवर राज्य केले १८३६ साली टेक्ससने आपले स्वातंत्र्य मिळवले आणि सॅम ह्यूस्टन हे स्वतंत्र प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले त्यानंतर दहा वर्षांनीच हे राज्य अमेरिकन संघराज्यात विलीन झाले टेक्ससमध्ये पेट्रोलच्या खाणी फार मोठ्या प्रमाणावर आहेत ह्यूस्टन हे शहर अमेरिकेची पेट्रोल राजधानी आहेच. शिवाय जगातील पहिल्या क्रमांकाचे अवकाश–संशोधन केंद्र आहे. अमेरिकेने अवकाश–शास्त्रात केलेल्या अनेक उच्चांकांचा पाया ह्यूस्टनच्या प्रयोगशाळेत घातला गेला आहे अमेरिकन चित्रपटात ज्यांना ‘वेस्टर्न’ म्हणतात, त्या बहुतेक धाडसी चित्रपटांची पार्श्वभूमी टेक्सस हीच आहे त्याबद्दल सॅन अन्टोनिओ हे शहर प्रसिद्ध आहे कापूस, घोडे, बैल, तांदूळ यांची पैदास या राज्यात विक्रमी प्रमाणावर होते. जगातील सर्वांत महाग मोटारी–कॅडिलॅक व लिंकन कस्टम–या सर्वांत मोठ्या प्रमाणावर न्यूयॉर्कमध्ये नसून टेक्ससमध्ये आहेत आणि तरीही घोडेस्वाराची रहदारी जेवढी टेक्ससमध्ये आहे, तेवढी या आधुनिक जगात इतरत्र कुठेही नाही तगड्या, रानवट, धाडसी लोकांचे हे राज्य आहे उन्मत्त बैलाला नुसत्या हाताने वठणीवर आणून त्याच्यावर स्वार होण्याचे जीवघेणे खेळ टेक्ससमध्ये सहज खेळले जातात, तसेच बेफाम घोड्यावर जबरीने स्वारी करण्याच्या स्पर्धाही टेक्ससमध्ये होतात अनेकजण घोड्यांकडून किंवा बैलाकडून फेकले गेल्यामुळे जखमी होतात, काहीजण प्राण गमावतात काऊबॉय हा जगप्रसिध्द शब्द याच टेक्ससमधील साहसी तरुणांना उद्देशून प्रचारात आला आहे टेक्ससला ‘लोन स्टार’ असेही नाव आहे. ते एका जुन्या लोकगीतावरून पडले आहे त्या प्रसिध्द दोन ओळी अशा–

In the dreams I live with a memory

Beneath the stars all alone

एकच तारा हे टेक्ससचे मानचिन्ह आहे त्यावर लोकांचे एवढे प्रेम आहे की अनेकांनी आपल्या पुढच्या दातावर तारा कोरून घेतला आहे काँऊबॉय हॅट ही खास उच व रुंद पट्टीची हॅट असते काऊबॉयचे कपडेही लांब हातांचा शर्ट, त्यावर कातड्याचे जाकीट, पायात गुडघ्यापर्यंत असलेले बूट आणि त्या बुटाच्या मागे ताऱ्याचे चक्र असे खास असतात आणि पिस्तुले जवळ बाळगणे, ती सहजी फिरवीत गोळ्या सोडणे आणि समोरून सुटणाऱ्या गोळ्यांना छाती पुढे करून सामोरे जाणे ही काऊबॉयची वैशिष्ट्ये असतात टेक्ससच्या एका सरहद्दीवर मेक्सिको हे राष्ट्र आहे. अमेरिकेतील इतर बहुतेक राज्यांच्या सरहद्दी समुद्राने आखल्या असल्याने इतक्या जवळ परराष्ट्र असणारी राज्ये अमेरिकेत दुर्मिळच आहेत मेक्सिको आणि टेक्सस यांच्या सरहद्दीवर अक्षरश रोज खून पडतात आठवड्याला बारा अशी त्याची अधिकृत सरासरी आहे मारामाऱ्या आणि गोळीबार याची तर गणतीच करणे कठीण आहे

मेक्सिकोत अतोनात बेकारी आणि दारिद्र्य आहे, तर अमेरिका हे सपन्न राष्ट्र आहे, तिथे भरपूर काम आहे म्हणून मेक्सिकोतून टेक्ससमध्ये बेकायदा, चोरट्या मार्गाने घुसणाऱ्या मेक्सिकन बेकाराना थोपवणे, अटक करणे, परत पाठविणे, हा अतिशय कटकटीचा उद्योग सरहद्दीच्या अमेरिकन रक्षकांना करावा लागतो कितीही काळजी घेतली, तरी नदीतून पोहून किंवा जगलातून चोरून येऊन दरसाल शेकडो मेक्सिकन लोक अमेरिकेत अक्षरश बेपत्ता होतात न्यायालयात अशाच एका मेक्सिकन बेकाराने स्पष्टपणे सांगितले, ' मी अमेरिकन सरकारकडे स्थलांतरासाठी अर्ज केला, तर त्याचा निकाल लागायलाच दहा वर्षे लागतील पण मी या क्षणी भुकेला आहे, आणखी दोन दिवसही जगू शकणार नाही, त्याचे काय ? मला दहा वर्षे वाट पाहणे परवडत नाही मी जीव धोक्यात घालून रिओ ग्रँड नदीच्या पोटातून पोहून आलो " टेक्सस पोलिसांनी एका वर्षात पासष्ट हजार मेक्सिकनांना परत पिटाळले, यावरून या लोंढ्याची कल्पना येईल.

बार्बेक्यू आणि मिरची हे टेक्सन लोकांचे आवडते खाद्य आहे. बार्बेक्यू हे जंगली खाद्यच आहे सबंध डुक्कर किंवा बैल अगातून सळी खुपसून उघड्या मैदानावर खाली विस्तव पेटवून भाजायचा आणि त्याचे लचके तोडून खायचे असे हे रानटी खाणे आडदांड टेक्सन लोकांचे लाडके जेवण आहे बियर हे त्यांचे आवडते पेय आहे जास्तीत जास्त मिरची घातलेले तिखट अन्न खाण्याच्या चढाओढी या राज्यात लागतात. टेक्ससच्या प्रमुख जत्रेत बार्बेक्यूसाठी पाच–पाच हजार बैल,

गाई, डुकरे मारली जातात ह्यूस्टनसारखे तीस लाखांवर वस्ती असलेले शहर असलेल्या या राज्यात एक खेडे इतके लहान आहे, की त्याची लोकसंख्या फक्त तीन आहे !

टेक्ससची भव्यता, आडदांडपणा आणि रंगेल–रगेलपणा लक्षात घेतल्याशिवाय डलासचा आत्मा समजणार नाही कोणतेही शहर म्हणजे त्यातील इमारती, उद्याने रस्ते नव्हेत, तर त्या शहराचा आत्मा काय आहे त्यावरच त्याची प्रत ठरत असते सबंध अमेरिका राष्ट्रच तसे पाहिले तर अलीकडचे आहे कोलंबसाने १७३४ साली या देशाचा शोध लावला आणि स्वतंत्र राष्ट्र म्हणून १७७६ साली अमेरिका अस्तित्वात आली. पण डलास या शहराचा जन्म त्यानंतर पासष्ट वर्षांनी झाला १८४१ साली ट्रिनिटी नदीच्या काठी जॉन ब्रियान याने पहिले घर बांधले, तीच या शहराची सुरुवात. हळूहळू वस्ती वाढू लागली तेव्हा नव्या गावाला नाव देण्याचा प्रश्न आला त्यावेळी जॉर्ज दलास हे अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष होते म्हणून त्यांचेच नाव या गावाला देण्यात आले नदीच्या पलीकडे ला रीयुनियन गावी फ्रेंच व स्विस कलाकार राहत असत पण त्या गावाचा लढाईत पाडाव झाला, तेव्हा १८५८ मध्ये तेथील कसबी कलाकार डलासला आले कापड, कलाकुसरीच्या वस्तू, नव्या फॅशन्सचे कपडे याचे डलास हे केंद्र बनले १८७० मध्ये डलासला आगगाडीचे स्टेशन झाले, तेव्हापासून तर या शहराची वेगाने व्यापारी भरभराट झाली. आता डलास हे नव्या फॅशन्सचे आगर आहे सध्याच्या डलासमधून दरसाल तीस कोटी डॉलर्सचे फॅशनेबल, अद्ययावत् तयार कपडे बाहेर जातात त्याचा खप सबंध अमेरिकेतच नव्हे तर काही परदेशातही होतो टेक्सस राज्यात पेट्रोलच्या खाणी निघाल्यावर तर व्यापार व विमा या दोन्हीना उधाण आले कपड्यांची आणि कापडाची मोठी उलाढाल या शहरातून होत असल्याने आता अमेरिकेतील चाळीस टक्के कापसाचा व्यापार डलासच्या कॉटन एक्स्चेंजमधून होतो

जगातील काही अत्यंत श्रीमंत लोक डलासमध्ये राहतात उदाहरणार्थ पेट्रोल आणि साखर यांचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेल्सन हंट या डलासच्या व्यापाऱ्याकडे जेवढी चांदी आहे, तेवढी बँक ऑफ इंग्लंडकडेही नाही ! एक–एक लाख घोडे किंवा गाई-बैल असणाऱ्या प्रचंड खांडाचे मालक डलासमध्ये राहतात. लीमन-मार्क्स कंपनीचे स्टॅन्ले मार्क्स हे रॉकफेलर फोर्ड यांच्या तोडीचे उद्योगपती आहेत. बँकिंग आणि विमा यांचे प्रमुख केंद्र असलेल्या डलासमध्ये साहजिकच कायदेतज्ज्ञांच्या मोठ्या फर्म्स आल्या. अवाढव्य आलिशान हॉटेलसही प्रचंड व्यापाराच्या विस्तारासाठी आवश्यक झाली. पेट्रोलचे साठे व पेट्रोल पुरवणाऱ्या कंपन्या यांचे कोट्यावधी डॉलर्सचे व्यवहार १९३० पासूनच या शहरातून होऊ लागले १९४६ नंतरच्या दहा वर्षांत डलास शहराची चौपट वाढ झाली, यावरून झपाट्याने

प्रगत होणाऱ्या व्यापाराची कल्पना येईल डलासच्या परिसरात दोन मोठ्या विमानबांधणीच्या कंपन्या सुरू झाल्याने त्याला नवे परिमाण मिळाले डलास व फोर्टवर्थ ही दोन शहरे आपल्याकडील हैद्राबाद–सिकंदराबादसारखी जुळी शहरे म्हणून प्रसिद्ध आहेत मोठ्या व्यापाराची उलाढाल करण्यासाठी डलासला चार रेल्वे-कंपन्यांची केंद्रे आहेत शिवाय विस्तीर्ण विमानतळ आहेच आजही डलासचे उद्योगधंदे व व्यापार यांची एवढी तुफान प्रगती होत आहे, की दर आठवड्याला तेथे नव्या पाचशे नोकऱ्या किंवा रोजदाऱ्या उपलब्ध होत असतात अमेरिकेतील पाचव्या क्रमांकाच्या लोकवस्तीच्या या शहराचा नव्या नोकऱ्या मिळवून देण्यात तिसरा क्रम आहे

डलासची तंत्रशास्त्रातील प्रगती विस्मयजनक आहे पेट्रोल व कापूस यांच्या-पासून अफाट पैसा मिळविणाऱ्या या शहराने टेक्सस इन्स्ट्रुमेंट्स ही जगातील पहिल्या दर्जाची तंत्रविशारदांची संस्था सुरू केली आहे या संस्थेच्या जगभर पसरलेल्या १९ शाखांत ऐंशी हजार लोक काम करतात जपानमध्येही तिच्या दोन शाखा आहेत तंत्रशास्त्रात जपानचा पहिला क्रम असूनही टेक्सस इन्स्ट्रुमेंट्सने तेथेही मूळ धरले आहे या संस्थेच्या प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेले सेमिकंड-क्टर्स एवढे सूक्ष्म आहेत, की मानवी केसाच्या जाडीत तसे तीस सेमिकंडक्टर्स बसू शकतात माणसाच्या नखाच्या टोकाएवढे मायक्रोकॉम्प्युटर्स तयार करण्यात या तंत्रसंस्थेला यश मिळाले आहे

सांस्कृतिक क्षेत्रातही डलासची कामगिरी विलोभनीय आहे नाटकाची चळवळ इथे जोमात आहेच शिवाय ऑपेरा, सिंफनी ऑर्केस्ट्रा, यांचेही कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होतात विज्ञान, चित्रकला, इतिहास यांना वाहिलेली भव्य म्युझियम्स आहेत. दरसाल होणाऱ्या टेक्सस फेअरला पंचवीस ते तीस लक्ष लोक येतात अनेक विस्तीर्ण उद्यानांनीही डलास शहराचे रेखीव सौंदर्य वाढविले आहे पन्नास मजले उंच असलेल्या रीयुनियन टॉवरवर असलेले हॉटेल व उपहारगृह हा शहराचा एक अभिमानस्पद ठेवा आहे या ठिकाणावरून शहराकडे पाहताना पॅरिसच्या इफेल टॉवरची आठवण झाल्यावाचून राहत नाही

डलासचा उल्लेख अनेकदा डलास–फोर्टवर्थ असा केला जातो कारण डलास व फोर्टवर्थ अशी दोन शहरे मिळून झालेले जोड शहर (ट्विन सिटीज) आहे त्यापैकी फोर्टवर्थ हे लहान आहे या दोन शहरांच्या मध्ये डलास–फोर्टवर्थ रीजनल विमानतळ आहे या अवाढव्य तळावर अनेक सार्वजनिक व खाजगी विमानवाहतु-कीची केंद्रे आहेत चुकून जर तुम्ही कंपनीचे नाव किंवा तळ क्रमांक चुकलात, तर हातात सामान घेऊन विमानाच्या कौंटरवरचाच मैल–सव्वा मैलाचा प्रवास करावा लागेल एका टर्मिनलवरून दुसऱ्या टर्मिनलवर जाणे हे हृदयविकाराच्या लोकांना

अशक्यच ! टर्मिनल क्रमांक चुकला, तर सरळ बाहेर येऊन टॅक्सी करावी आणि हव्या त्या टर्मिनलकडे टॅक्सीने जावे हे उत्तम ! या बाबतीत शिकागोच्या विमानतळाशी डलास–फोर्टवर्थचा तळ उत्तम चढाओढ करू शकतो एके काळी फोर्टवर्थ हे आगगाड्यांच्या जाळ्यांचे अत्यंत मोठे केंद्र होते आता त्याची जागा विमानांनी घेतली आहे टेक्सास हे श्रीमंत राज्य असल्याने खाजगी मालकीची शेकडो विमाने डलास–फोर्टवर्थ तळावर पसरलेली दिसतात कित्येक धनाढ्य मोटारीने विमानतळावर येऊन मग स्वतःच्या विमानाने लांबच्या प्रवासाला जातात. फोर्टवर्थमध्ये विज्ञान, इतिहास, कला यांची चार भव्य वस्तुसंग्रहालये आहेत टेक्ससमधील श्रीमंत कलासक्तांनी रेम्ब्रां, गोया, अल ग्रेको, मॅटिसी अशा जगन्मान्य कलावंतांची चित्रे खरेदी करून या संग्रहालयांना दिली आहेत

डलासमध्ये 'ड्रंक मण्डे' नावाचा एक सोमवार पाळतात हा पिणाऱ्यांचा दिवस असतो या दिवशी जेवणाबरोबर वाढेल तेवढी बियर मोफत मिळते 'लोन स्टार' ही टेक्ससची खास बियर प्रत्येक गिऱ्हाईकाला हॉटेलतर्फे मोफत देण्याची पद्धत आहे या 'ड्रंक मन्डे'ला केवळ मोफत बियर पिऊन मौज करण्यासाठी अनेक लोक जवळपासच्या गावाहून डलासला येतात आणि या गावाला जत्रेचे स्वरूप येते म्युनिक या जर्मनीतील गावीही 'ऑक्टोबर फेस्ट' नावाच्या नव्या बियरच्या महोत्सवात सर्वांना मोफत बियर देण्याची व्यवस्था बियर कंपन्यांच्यातर्फे होत असते

माझे डलासमधील मित्र अरुण चोलकर मला एकदा म्हणाले, "आता आपण डलासमधील सर्वांत सुप्रसिद्ध आणि सर्वांत कुप्रसिद्ध अशी जागा पाहायला जाऊ या ठिकाणी घडलेल्या एकाच घटनेने डलासचे नाव जगातील प्रत्येक वर्तमानपत्रात पहिल्या पानावर ठळकपणे छापून आले. आम्हाला या घटनेबद्दल अत्यंत दुःख होते आणि पुन्हा असे दुर्दैव आमच्यावर ओढवू नये अशी आमची प्रार्थना आहे. ही घटना म्हणजे डलासच्या एका रस्त्यावर अमेरिकेचे सर्वांत तरुण आणि लोकप्रिय राष्ट्राध्यक्ष जॉन एफ् केनेडी यांचा २३ नोव्हेंबर १९६३ रोजी दुपारी झालेला खून !"

मला तो दिवस आठवला २४ नोव्हेंबर हा सुट्टीचा दिवस होता मी मुंबईत मालाडला राहत असे आणि अमेरिकन सरकारच्या माहिती खात्यात काम करीत असे सुट्टी असल्यामुळे मी नेहेमीपेक्षा उशीराच उठलो साडेसात वाजताच वर्तमानपत्र आले होते. पण ते कुणी उघडलेही नव्हते. मी उठून दाराजवळ पडलेले दैनिक घेऊन पहिल्या पानावर ठळक अक्षरांतली ती धक्कादायक बातमी वाचली, 'अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी यांची निर्घृण हत्या !' अत्यंत अनपेक्षित अशी ती बातमी पाहून इतर लक्षावधी लोकांप्रमाणेच मलाही धक्का बसला आणि हळहळ वाटली. पण माझ्या कामाशी ती बातमी संबंधित असल्याने मी ताबडतोब 'युसिस' मध्ये

गेलो त्यावेळी दोन अमेरिकन अधिकारी आणि काही भारतीय अधिकारी सुट्टी असूनही आले होते खुद्द वॉशिंग्टन आणि डलासमध्ये त्यावेळी गोंधळाची परिस्थिती होती. कारण हा एका व्यक्तीने केलेला खून आहे की अमेरिकेविरुद्ध कोणीतरी केलेल्या भयंकर मोठ्या कटाचा तो एक भाग आहे याची कोणालाच कल्पना नव्हती तरी परराष्ट्र खात्याने जगाच्या सर्व भागातील अमेरिकन सरकारच्या कचेऱ्यांना 'अॅलर्ट' चा इषारा दिला होता केनेडींच्या खुनाबद्दल शोक प्रदर्शित करणाऱ्या तारा व अधिक चौकशी करणारे फोन 'युसिस' व 'अमेरिकन कॉन्सुलेट' कडे येत होते त्या घटनेनंतर जवळजवळ नऊ वर्षांनी मी डलास येथे ज्या रस्त्यावर केनेडींचा खून झाला, त्या रस्त्यावर उभा होतो

२३ नोव्हेंबर १९६३ हा शुक्रवार होता शुक्रवार हा अमेरिकेत सर्वत्र पगाराचा दिवस इंग्लंड–अमेरिकेत आणि इतर बहुतेक पाश्चात्य देशात दर आठवड्याला पगार देतात पगाराच्या दिवसाचा एक विशेष म्हणजे त्या दिवशी हातात पैसा पडल्याबरोबर शेकडो कामगार चिकार मद्यपान करतात त्याचा परिणाम असा होतो, की शुक्रवारी संध्याकाळी सर्व रुग्णालयांत दारू पिऊन मोटार अपघातात सापडलेले, दारू पिऊन मारामारीत जायबंदी झालेले किंवा अतिमद्यपान करून रस्त्यावर पडलेले हजारो लोक आणले जातात अर्थात दर शुक्रवारी पोलीस खात्यावर ताण हा पडतोच या शुक्रवारी तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी हे उपराष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांच्यासह डलासला भेट देणार होते जॉन्सन हे टेक्सस राज्यातलेच, त्यामुळे या भेटीला विशेष महत्त्व होते जॉन्सन पतिपत्नी आधीच टेक्ससमध्ये आले होते राष्ट्राध्यक्ष केनेडी हे एअरफोर्सच्या विमानाने येणार होते त्यानंतर विमानतळावरून मिरवणुकीने ते जॉन्सन पतिपत्नीसह डलास शहरात येणार होते मिरवणुकीच्या मार्गावर जय्यत पोलीस बंदोबस्त होता एफ बी आय टेक्सस राज्य पोलीस, गुप्तहेर, वाहतूक खाते या सर्वांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक वॉशिंग्टनमध्ये भरून राष्ट्राध्यक्षांच्या मिरवणुकीच्या मार्गावर कुठे किती पोलीस ठेवायचे, कुठे साध्या वेषातील पोलीस ठेवायचे याची तपशीलवार योजना आखली गेली होती

राष्ट्राध्यक्ष, त्यांची पत्नी जॅकेलिन, त्यांचे विमान, मोटार, उपराष्ट्राध्यक्ष त्यांची पत्नी, त्यांच्या संरक्षकांची वाहने या सर्वांना गुप्त शब्द ( कोड वर्ड्स ) देण्यात आले होते हेतू असा, की प्रत्यक्ष मिरवणूक सुरू झाल्यावर रेडिओ संदेश देताना ते चुकून दुसऱ्या अनधिकृत इसमाने ऐकले तर त्याला हे हुकूम समजू नयेत. केनेडींचा उल्लेख लॅन्सर असा करण्यात आला होता जॅकेलीन केनेडींना लेस, त्यांच्या विमानाला टायगर, त्यांच्या मोटारीला एस–एस १०० एक्स, त्यांच्या तात्पुरत्या निवासाला चारकोल, उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांना व्हॉलन्टीयर, व्हाईट

हाऊमला कॅसल, राष्ट्राध्यक्षाच्या मोटारीमागून जाणाऱ्या सरक्षकाच्या मोटारीला हाफ बॅक अशी पन्नासावर गुप्त नावे देण्यात आली होती गुप्तहेर खात्यापैकी जे अधिकारी त्यावेळी ड्यूटीवर होते त्यांनाही वेगळी नावे देण्यात आली होती विमानतळावर सर्वात अधिक बंदोबस्त ठेवला होता कारण राष्ट्राध्यक्षांच्या स्वागतासाठी जमलेल्या हजारो लोकातून कोणी त्याच्यावर गोळी झाडू नये म्हणून विमानतळावर ७६५ गुप्तपोलीस आणि वरिष्ठ अधिकारी ठेवण्यात आले होते शिवाय मिरवणुकीच्या मार्गावर बाराशे पोलीस, साध्या कपड्यातील पोलीस, गुप्तहेर यांची योजना करण्यात आली होती मिरवणुकीच्या मार्गावर ट्रेड मार्ट व एल्म रस्ता यावर विशेष बंदोबस्त होता संशयितावर कडक नजर ठेवण्यात आली होती

बरोबर ११ वाजून ३८ मिनिटांनी केनेडींचे विमान तळावर उतरले. केनेडींचे स्वागत करण्यासाठी जॉन्सन, त्यांची पत्नी, गव्हर्नर कोनोली वगैरे सरसावले उजव्या बाजूला उंच लोखंडी जाळीच्या पलीकडे दहा हजारावर लोक हात उंचावून आणि जयजयकार करून केनेडींचे स्वागत करीत होते विमानतळाच्या इमारतीच्या छपरावर हातात दुर्बिणी आणि भरलेल्या बंदुका घेऊन रक्षक पोलीस गर्दी न्याहाळीत होते जाळीवरून चढून उडी मारून एक फोटोग्राफर केनेडींच्या दिशेने धावू लागला पण एका गुप्त पोलिसाने त्याच्यावर झडप घालून त्याला पोलिसाच्या हवाली केले शाळेतील शभरावर मुलांनी फडक्यावर काढलेला मोठा फलक सोडला त्यावर 'वुई लव्ह जॅक' अशी भलीमोठी अक्षरे होती केनेडींनी हात उंच करून त्या मुलाच्या स्वागताचा स्वीकार केला पण केनेडींच्या विरोधी घोषणा लिहिलेले फलकही गर्दीत होते 'कम्युनिस्टाना सामील असलेल्या केनेडींचा धिक्कार असो' असा एक फलक होता तर 'यांकी गो बॅक' असा दुसरा फलक होता केनेडींचे विरोधक आणि त्याना पाठिंबा देणारे यांच्यातील तणाव वाढत असल्याचे गुप्त पोलिसाना जाणवले आणि त्यांनी मिरवणुकीच्या पुढील मार्गावर अधिक दक्षता घेण्याच्या सूचना तेथे कामावर असलेल्या रक्षकांना दिल्या

डलासच्या स्वागत समितीचे लोक विमानतळाच्या टर्माईनवर उभे होते राष्ट्राध्यक्षाची एस-एस १०० ही मोटार विमानाजवळ आली होती केनेडींची व स्थानिक नेत्यांची ओळख करून दिली जात असताना ती मोटार त्यांच्यामागून मंदगतीने येत होती केनेडींच्यावर लांबच्या प्रेक्षकांतून कोणी गोळ्या झाडू नयेत म्हणून तीन सशस्त्र रक्षक केनेडींच्या तिन्ही बाजूनी चालत होते चौथ्या बाजूने स्वागत समितीच्या लोकाशी केनेडी हस्तादोलन करीत होते. त्यांच्याबरोबर आलेल्या दुसऱ्या विमानातील पत्रकार स्थानिक लोकांची नावे उतरून घेत होते विमानतळावरचा स्वागत समारंभ झाल्यावर केनेडी, जॅकेलिन व रक्षक उघड्या लिंकन मोटारीत बसले. त्यांच्या पुढे व मागे सरक्षकांच्या मोटारी होत्या. उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन, गव्हर्नर कॉनेली वगैरेंच्या मोटारी त्यामागून हळूहळू चालल्या होत्या

डलासमध्ये राष्ट्राध्यक्ष केनेडींनी रस्त्यावर मिरवणुकीने जाताना बुलेट-प्रुफ काचेच्या मोटारीतून जावे अशी सूचना गुप्तहेर खात्याने केली होती पण केनेडींनी त्या सूचनेला नकार देताना म्हटले होते, ' नाही ! लोकांना भिता कामा नये ! ' सरक्षण व्यवस्थेचा अर्थातच नाईलाज झाला आजूबाजूचा बदोबस्त वाढवण्याचा निर्णय एफ बी आय् व इतर खात्यांनी घेतला व्हाईट हाऊसचे स्वतःचे सुरक्षा खाते असते त्यानेही मिरवणुकीच्या मार्गावर आपले खास अधिकारी नेमले होते कारण त्या वेळच्या राजकीय वातावरणाने डलास तग आहे याची वॉशिंग्टनमध्ये पूर्ण कल्पना होती केनेडींचे वैयक्तिक डॉक्टर बर्कले यानी या बिकट प्रसगी राष्ट्राध्यक्षांच्या गाडीतून प्रवास करण्याची इच्छा व्यक्त केली होती, पण अशा वेळी डॉक्टरची फारशी गरज लागणार नाही म्हणून सरक्षण व्यवस्था प्रमुखांनी ती सूचना फेटाळली

११-५५ ला राष्ट्राध्यक्षांची मोटार लव्हफील्ड विमानतळावरून बाहेर पडली, तेव्हा तेथे सज्ज असलेल्या चारशेवर गुप्त पोलिसानी सुटकेचा निश्वास टाकला डलासच्या भेटीतला हा सर्वांत धोक्याचा भाग आहे, कारण विमानतळ चोहोबाजूनी उघडा असतो, असा गुप्त अहवाल आधीच व्हाईट हाऊसकडे आला होता राष्ट्राध्यक्षाच्या मोटारीचा क्रमाक जी जी ३०० असा होता या मोटारीत एकदर सहाजण होते, जॉन केनेडी, सौ जॅकेलिन केनेडी, गव्हर्नर कॉनेली, त्यांच्या पत्नी, एक रक्षक आणि ड्रायव्हर या गाडीच्या डिकीमध्ये एक रक्षक हातात रिव्हॉल्व्हर घेऊन लपविण्यात आला होता ही डिकी आतून उघडण्याची सोय होती आणि पेरिस्कोपच्या साहाय्याने डिकीतल्या रक्षकाला बाहेरचे दिसत होते राष्ट्राध्यक्षाच्या मोटारीच्या पुढे आणि दोन्ही बाजूना मोटार सायकलवरचे सशस्त्र रक्षक होते शिवाय राष्ट्राध्यक्षांच्या मागच्या मोटारीत सहा धिप्पाड रक्षक हातात भरलेली पिस्तुले घेऊन सज्ज होते सर्वांच्या जवळ बिनतारी सदेशाची उपकरणे होती त्यांच्या साहाय्याने हे अधिकारी मिरवणुकीच्या मार्गावर आपण कुठे आहोत व केव्हा कोणत्या ठिकाणी येऊ याची माहिती देत होते

आता कडक उन्हे पडली होती जॅकेलिन केनेडींनी उन्हापासून बचाव करण्यासाठी डोळ्यावर काळा चष्मा चढवला जॉन केनेडी रस्त्यावरच्या लोकाचे अभिवादन स्वीकारीत नेहमीसारखेच हसऱ्या चेहऱ्याने प्रवास करीत होते दोन वेळा केनेडींच्या इच्छेनुरूप त्यांची मोटार थांबविण्यात आली दोन्ही ठिकाणी शाळेतील मुले भव्य फलक घेऊन उभी होती त्या फलकांवर लिहिले होते, ' मिस्टर प्रेसिडेंट, कृपा करून थांबा आणि आमच्याशी हस्तांदोलन करा ! ' त्यांच्या इच्छेला मान देऊन केनेडींनी मोटार थाबवून मोटारीतूनच त्या मुलांशी हस्तादोलन केले सरक्षण व्यवस्थेला जबाबदार असणारे अधिकारी अस्वस्थ होत होते मिरवणुकीच्या मार्गावर अनपेक्षित थाबे

घेऊ नयेत, असे मत होते, पण केनेडींच्या पुढे त्यांचे काही चालले नाही राष्ट्राध्यक्षांची ही उल्हास भेट सबंध राष्ट्रात टेलिव्हिजनवर दाखवली जात होती कोट्यावधी लोक तो कार्यक्रम रंगीत दूरचित्रवाणीवर पाहत होते ठरलेल्या वेळेपेक्षा राष्ट्राध्यक्षाच्या मिरवणुकीला दहा मिनिटे उशीर झाला होता. तरी अजूनपर्यंत सुरक्षा अधिकाऱ्यांना विशेष चिंताजनक असे काही आढळले नव्हते मिरवणूक ट्रेड मार्ट, मेन स्ट्रीट, ह्यूस्टन स्ट्रीट या मार्गाने धिम-धिमे एल्म रस्त्याकडे जात होती. राष्ट्राध्यक्षांच्या गाडीचा वेग तासाला अकरा मैल होता आपल्या विभागातून राष्ट्राध्यक्षांची गाडी. गेली, की त्या-त्या विभागावरच्या सुरक्षा अधिकाऱ्यांना आपल्या डोकीवरचे ओझे गेल्यासारखे वाटत होते जबाबदारी पुढच्या विभागावर पडत होती

एल्म रस्त्यावर बुक डिपॉझिटरी नावाची एक विटाची उंच इमारत होती या इमारतीच्या सहाव्या मजल्यावर खिडकीजवळ ली ओस्वाल्ड हा तरुण पुतळ्या-सारखा उभा होता त्यावेळी १२ वाजून १८ मिनिटे झाली होती राष्ट्राध्यक्षांच्या मिरवणुकीतील मोटार सायकलीचा आवाज ऐकू येत होता सर्व सुरक्षा अधिकारी हातातली रिव्हाल्व्हर्स घेऊन सज्ज झाले. या एल्म रस्त्यावर गर्दी फारशी नव्हती बुक डिपॉझिटरीच्या समोर एक पती-पत्नी मिरवणूक पाहण्यासाठी उभे होते त्यांच्यापैकी पती रोलट याची नजर अचानक ली ओस्वाल्डकडे गेली त्या नागरिकाने आपल्या बायकोला मोठ्या कौतुकाने सांगितले, "अग, राष्ट्राध्यक्षांचं रक्षण करण्यासाठी ठेवलेला सशस्त्र गुप्त पोलीस तुला पाहायचा आहे का ?" बायकोने विचारले, 'कुठे आहे ?" नवऱ्याने डिपॉझिटरीच्या सहाव्या मजल्याच्या खिडकीकडे बोट दाखवले त्याच वेळी त्याने जवळच उभ्या असलेल्या एखाद्या पोलिसाचे लक्ष तिकडे वेधले असते, तर सबंध इतिहास बदलला असता ! पण राष्ट्राध्यक्षाचा खून होईल असे सर्वसामान्य नागरिकाच्या स्वप्नातही नव्हते शिवाय, आता राष्ट्राध्यक्षाची मिरवणूक दृष्टिपथात आली होती म्हणून त्या पत्नी-पत्नींनी हात उंच करून केनेडींचे स्वागत केले त्यांच्याजवळच एका बापाने आपल्या मुलाल खांद्यावर घेतले होते त्या मुलाने आपला चिमुकला हात वर करून केनेडीचे स्वागत केले त्यावेळी १२ वाजून २१ मिनिटे झाली होती केनेडींनीही हसत-हसत हात उंच केला आणि त्या मुलाच्या स्वागताचा कौतुकाने स्वीकार केला

इतक्यात सपासप गोळ्या झाडल्या गेल्या आणि केनेडी मोटारीत कोसळून पडले ! जॅकलिन केनेडींना तो आवाज प्रथम मोटारसायकलचा वाटला पण नवरा कोसळल्याचे पाहून त्या 'ओ नो !' अशी किंकाळी फोडून त्याच्या रक्षणासाठी केनेडींच्या अंगावर स्वतःला झोकून दिले. डिकीमधला रक्षक ताडकन् रिव्हॉल्व्हरसह बाहेर पडला मागच्या गाडीतल्या सरक्षकांनी तो रायफलचा आवाज ओळखला आणि आपली शस्त्रे परजली, पण कोठून गोळ्या आल्या आणि हल्लेखोर कोठे आहे

घेऊ नयेत, असे मत होते, पण केनेडींच्या पुढे त्याचे काही चालले नाही राष्ट्राध्यक्षांची ही उल्हास भेट सबंध राष्ट्रात टेलिव्हिजनवर दाखवली जात होती. कोट्यावधी लोक तो कार्यक्रम रंगीत दूरचित्रवाणीवर पाहत होते ठरलेल्या वेळेपेक्षा राष्ट्राध्यक्षांच्या मिरवणुकीला दहा मिनिटे उशीर झाला होता तरी अजूनपर्यंत सुरक्षा अधिकाऱ्यांना विशेष चिंताजनक असे काही आढळले नव्हते मिरवणूक ट्रेड मार्ट, मेन स्ट्रीट, ह्यूस्टन स्ट्रीट या मार्गाने धिम-धिमे एल्म रस्त्याकडे जात होती राष्ट्राध्यक्षाच्या गाडीचा वेग तासाला अकरा मैल होता आपल्या विभागातून राष्ट्राध्यक्षांची गाडी गेली, की त्या-त्या विभागावरच्या सुरक्षा अधिकाऱ्याना आपल्या डोकीवरचे ओझे गेल्यासारखे वाटत होते जबाबदारी पुढच्या विभागावर पडत होती

एल्म रस्त्यावर बुक डिपॉझिटरी नावाची एक विटांची उंच इमारत होती या इमारतीच्या सहाव्या मजल्यावर खिडकीजवळ ली ओस्वाल्ड हा तरुण पुतळ्या-सारखा उभा होता त्यावेळी १२ वाजून १८ मिनिटे झाली होती राष्ट्राध्यक्षांच्या मिरवणुकीतील मोटार सायकलींचा आवाज ऐकू येत होता सर्व सुरक्षा अधिकारी हातातली रिव्हाल्व्हर्स घेऊन सज्ज झाले. या एल्म रस्त्यावर गर्दी फारशी नव्हती बुक डिपॉझिटरीच्या समोर एक पती-पत्नी मिरवणूक पाहण्यासाठी उभे होते त्याच्यापैकी पती रोलट याची नजर अचानक ली ओस्वाल्डकडे गली त्या नागरिकाने आपल्या बायकोला मोठ्या कौतुकाने सांगितले, "अग, राष्ट्राध्यक्षांच रक्षण करण्या-साठी ठेवलेला सशस्त्र गुप्त पोलीस तुला पाहायचा आहे का ?" बायकोने विचारले, 'कुठे आहे ?" नवऱ्याने डिपॉझिटरीच्या सहाव्या मजल्याच्या खिडकीकडे बोट दाखवले त्याच वेळी त्याने जवळच उभ्या असलेल्या एखाद्या पोलिसाचे लक्ष तिकडे वेधले असते, तर सबंध इतिहास बदलला असता ! पण राष्ट्राध्यक्षाचा खून होईल असे सर्वसामान्य नागरिकाच्या स्वप्नातही नव्हते शिवाय, आता राष्ट्राध्यक्षांची मिरवणूक दृष्टिपथात आली होती म्हणून त्या पत्नी-पत्नींनी हात उंच करून केनेडींचे स्वागत केले त्याच्याजवळच एका बापाने आपल्या मुलाल खांद्यावर घेतले होते त्या मुलाने आपला चिमुकला हात वर करून केनेडींचे स्वागत केले त्यावेळी १२ वाजून २१ मिनिटे झाली होती केनेडींनीही हसत-हसत हात उंच केला आणि त्या मुलाच्या स्वागताचा कौतुकाने स्वीकार केला

इतक्यात सपासप गोळ्या झाडल्या गेल्या आणि केनेडी मोटारीत कोसळून पडले ! जॅकलिन केनेडींना तो आवाज प्रथम मोटारसायकलचा वाटला. पण नवरा कोसळल्याचे पाहून त्या 'ओ नो !' अशी किंकाळी फोडून त्याच्या रक्षणासाठी केनेडींच्या अंगावर स्वतःला झोकून दिले डिकीमधला रक्षक ताडकन् रिव्हॉल्व्हरसह बाहेर पडला मागच्या गाडीतल्या सरक्षकांनी तो रायफलचा आवाज ओळखला आणि आपली शस्त्रे परजली, पण कोठून गोळ्या आल्या आणि हल्लेखोर कोठे आहे

याची त्यांना काहीच कल्पना येईना मिरवणूक थांबली प्रचंड गोंधळ झाला. शेकडो पोलीस आणि सरकारी अधिकारी जमा झाले उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन आणि गव्हर्नर कॉनेली भांबावून गेले कॉनेलीही जखमी झाले होते सुरक्षा प्रमुखानी चटकन राष्ट्राध्यक्षांचा ताबा घेतला त्यांचे शरीर रक्तात लडबडले होते प्रथम राष्ट्राध्यक्षाना हॉस्पिटलमध्ये नेले पाहिजे असे ठरवून त्यांनी ताबडतोब लिंकन गाडी हॉस्पिटलकडे नेण्याचा हुकूम दिला गाडीच्या बुलेटप्रुफ काचा उचावल्या गेल्या गाडी तुफान वेगाने पार्कलँड हॉस्पिटलकडे निघाली

हा व्यक्तीने केलेला हल्ला आहे की राष्ट्रव्यापी कट आहे याची उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन याना काहीच कल्पना येईना एफ् बी. आय ला बुक डिपॉझिटरीमधून गोळ्या झाडल्या गेल्याचे लगेच कळले चारशे सशस्त्र पोलिसानी त्या इमारतीला वेढा दिला वॉशिंग्टनला ही बातमी कळविण्यात आली या गोळीबारात राष्ट्राध्यक्षांचे निधन झाले तर ताबडतोब जॉन्सन यानी अधिकारसूत्रे घ्यावीत असा निर्णय घेऊन त्यांच्या शपथविधीची तयारी करण्याच्या सूचना वॉशिंग्टनहून डलासला आल्या अशा पेच-प्रसंगातही सरकार आणि राज्य चालविण्याचा प्रथम विचार करावा लागतो मिरवणूक पाहण्यासाठी आलेल्या हजारो लोकात हाहाकार उडाला दूरचित्रवाणीवर त्याच क्षणी हे दृश्य टिपले गेल्याने राष्ट्रभर संतापाची, चिंतेची, दुःखाची लाट पसरली

पार्कलँड मेमोरिअल हॉस्पिटल एल्म रस्त्यापासून चार मैलांवरच होते रेडिओ संदेशाने तेथे आधीच राष्ट्राध्यक्ष जखमी अवस्थेत येणार असल्याचे कळवले होते या हॉस्पिटलमध्ये दररोज २७२ इमर्जन्सी केसेस् येत होत्या आता बारा वाजून एक-तीस मिनिटांनी त्या हॉस्पिटलच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा पेशंट घेऊन राष्ट्राध्यक्षांची लिंकन गाडी आली. गाडी हॉस्पिटलमध्ये शिरत असताना जॅकेलिन आपल्या नवऱ्याच्या अंगावर पडून आकांत करीत होती "ही इज डेड ! दे हॅव किल्ड हिम ! ओ जॅक, आय लव्ह यू !" हॉस्पिटलच्या डॉक्टरनी निर्धाराने जॅकेलिन याना दूर केले आणि केनेडीना स्ट्रेचरवर ठेवले

हॉस्पिटलकडे सतत फोन येऊ लागले म्हणून शेवटी फोन बंद करावे लागले पत्रकार, सरकारी अधिकारी, स्नेही यांच्या झुंडीच्या झुंडी मोटारीनी पार्कलँड हॉस्पिटलकडे निघाल्या, पण सुरक्षा अधिकाऱ्यानी सबंध हॉस्पिटलभोवती कडे करून कोणालाही जवळ येऊ दिले नाही बारा वाजून पस्तीस मिनिटांनी डॉक्टरानी जॉन केनेडी यांना स्ट्रेचरवरून घाईघाईने, धावतच ऑपरेशन रूमकडे नेण्यास सुरुवात केली स्ट्रेचरच्या दांडीला धरून जॅकेलिन आकांत करीत धावत होती डॉक्टरानी अत्यंत नाईलाजाने आणि दुःखाने जॅकेलिनला ऑपरेशनच्या खोलीबाहेर थांबवले इतक्यात जॉन्सन आणि त्याची पत्नी आली

बरोबर एक वाजता प्रमुख डॉक्टर डॉनेल यांनी जॉन्सन यांना सांगितले, "दि प्रेसिडेंट इज डेड !"

जॉन्सन यांनी अमेरिकेचे सदतिसावे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेण्याची तत्काळ सिद्धता करण्यात आली डलास ते वॉशिंग्टन या मार्गावरील विमानातच त्यांनी ती शपथ घेतली पुढे ली ओस्वाल्डवर केनेडीच्या खुनाचा आरोप ठेवून खटला भरण्यात आला हा खटला चालू असतानाच ओस्वाल्डचा खून जॅक रुबी या अमेरिकनाने केला. वॉरेन कमिशनची नेमणूक होऊन त्याने केनेडींच्या खुनीबाबत मोठा अहवाल प्रसिद्ध केला ज्या ठिकाणी केनेडीचा खून झाला, तेथे त्याचे एक स्मारक बांधण्यात आले आहे या जागेजवळच्या एका उद्यानात केनेडींची स्मृती जागती ठेवणाऱ्या वस्तू आता 'सॉवेनियर्स' म्हणून मिळतात डलासमध्ये ज्या जागेवर केनेडींचा खून झाला, त्या जागेसंबंधी आणि खूनाच्या घटनेसंबंधी जगातील लक्षावधी वृत्तपत्रांतून आणि नियतकालिकातून सचित्र माहिती प्रसिद्ध झाली नंतर अनेक पुस्तकेही लिहिली गेली त्यात 'डेथ ऑफ ए प्रेसिडेंट' हे विल्यम मँचेस्टर यांनी लिहिलेले सातशे पानी पुस्तक सगळ्यात अधिकृत आहे जॅकेलिन केनेडी यांच्याच सूचनेवरून त्यांनी प्रदीर्घ अभ्यास करून ते लिहिले आहे 'दुसऱ्या कोणी विपर्यास करून लिहिण्यापेक्षा जॉनला अत्यंत जवळच्या असणाऱ्या तुमच्यासारख्या मित्रान लिहिणं चागल !' —असे जॅकेलिन केनेडींनी मँचेस्टर यांना सांगितले डलासमधील त्या लहानशा स्मारकाकडे पाहताना मला त्याच पुस्तकाचे शीर्षक एकसारखे आठवत होते— 'डेथ ऑफ ए प्रेसिडेंट !'

☐ ☐ ☐

नगर ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# पाश्चात्य जगाचे सांस्कृतिक पुनरुज्जीवन करणारे

# फ्लॉरेन्स

कोणत्या शहराला पहिली भेट कशी द्यावी याचेही एक तंत्र आहे इस्तंबूल शहराची पहिली भेट सागरमार्गाने व्हावी, हॉंगकॉंगची विमानाने व्हावी, पॅरिसची आगगाडीने तर न्यूयॉर्कची मोटारीने किंवा बसने ! फ्लॉरेन्सला जावे ते विमानाने ! कारण त्या पहिल्या भेटीत मायकल अँजेलोची छाप पडलेल्या या सर्वांगसुंदर शहराचे विहंगम दृश्य अत्यंत मनोहर दिसते हा आदर्श उत्तम असला, तरी मी इटलीत गेलो तेव्हा फ्लॉरेन्सच्या इतक्या जवळ होतो की विमानाने त्या शहराचे पहिले दर्शन घ्यायचे तर अडीचशे मैल मागे परतून जावे लागले असते व्हेनिसहून आगगाडीने रोमला परत येत असताना वाटेतच फ्लॉरेन्स लागत होते मग अशा वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्याची संधी न पकडता केवळ विमानातून हे शहर अधिक सुंदर दिसते म्हणून अडीचशे मैल मागे मिलानला किंवा तुरीनला का जावे ?

आगगाडीच्या स्टेशनावरून आत प्रवेश केल्यावर घडणारे फ्लॉरेन्सचे दर्शनही फार सुखद आहे अर्नो नदीच्या काठचे हे रम्य, छोटे, टुमदार गाव अॅव्हन नदीच्या काठच्या शेक्सपियरच्या गावाची आठवण करून देते. सॅनफ्रॅंसिस्कोसारख्याच या गावात उंचसखल जागा अनेक आहेत घरांची छपरे तांबडसर कौलांची आहेत त्यामध्येच जुन्या इमारतींचे उंच मनोरे, चर्चेसचे सुळके किंवा घुमट दिसतात याचे इटालीयन भाषेतले नाव आहे फेरेन्झ. जसे व्हेनिसचे आहे व्हेनिझा कित्येक जगप्रसिद्ध कलाकृतींचे हे माहेरघर ! पण पाँपे किंवा कार्थेडासारखे पडीक, मोडकळीला आलेले नाही. हे आहे एक खानदानी, उच्च अभिरुचीचे, सुसंस्कृत गाव. केवळ सुसंस्कृत नव्हे तर युरोपियन सुसंस्कृतीची ही गंगोत्रीच आहे. संस्कृतीचे जे पुनरुज्जीवन (रिनायसेन्स)

झाले, ते याच शहरातून या छोट्याशा गावाने जगाला विविध क्षेत्रांत दिलेल्या अतिरथी–महारथींची नावे थक्क करणारी आहेत मायकेल अँजेलो, गॅलिलिओ, डान्टे सेलिनी, मॅकिव्हॅली, बोकॅशिओ, बॉहिसेली, द व्हिन्सी, गियोटो, सॅव्हॅनारोला अशी जगाच्या सस्कृतीचा चेहरामोहरा बदलणारी किती म्हणून नावे सांगावी ? ऑस्ट्रेलियासारख्या खडप्राय देशातून सस्कृतीवर कसलेही आभरण चढू नये आणि या छोट्याशा गावाने जगाची सस्कृती उजळून टाकणारी रत्ने द्यावीत असे का घडावे याला काही गणित नाही पण ग्रीसबाहेरचे अथेन्स ही पदवी या लहानशा गावाला मिळाली आहे, ती सार्थ वाटते

फ्लॉरेन्स हे जगातील एक अतिशय प्राचीन शहर आहे इसवी सनापूर्वी एक हजार वर्षे या ठिकाणी वस्ती होती इडो–युरोपियन लोक तेव्हा अर्नो नदीच्या काठी राहत होते इ स पूर्व पाचवे ते दुसरे शतक अशी तीनशे वर्षे हे गाव इट्रूस्कनांच्या अमलाखाली होते पण इ स पूर्व ८२ मध्ये लढाईत शत्रूंनी ते उध्वस्त केले नतर रोमचा सम्राट ज्यूलियस सीझर याने इ स पूर्व ५९ मध्ये या गावाची पुन्हा स्थापना केली त्यावेळी वसत ऋतू आणि फुलांचा मोसम होता रोमन पुराणाप्रमाणे फ्लोरा ही फुलांची व उद्यानांची देवता आहे या फ्लोराचा सबध थेट आपल्याकडे मुबईच्या फ्लोरा फौंटनपर्यंत आला आहे एके काळी रोमच्या नाण्यांवर ही फुले होती त्यावरून फ्लोरिन हे नाणे अस्तित्वात आले सीझरचे फुलाच्या आठवणीसाठी या गावाचे नाव फियोरेन्झिया असे ठेवले त्याचेच पुढे इटालियन भाषेत फिरेन्झ झाले आणि इग्रजीत फ्लॉरेन्स असा त्याचा उल्लेख होऊ लागला दुसऱ्या शतकात फ्लॉरेन्सची लोकसख्या दहा हजार होती त्या काळाच्या मानाने ही सख्या मोठी होती नदीकाठचे शहर, व्यापाराच्या दृष्टीने मध्यवर्ती केंद्र आणि सभोवती तटबदी असल्याने सुरक्षित असे होते भिंती विटाच्या होत्या आणि घरांची छपरे कौलाची होती युरोपमध्ये आता कौलाची घरे क्वचितच दिसतात पण अजूनही फ्लॉरेन्स हे कौलारू घरांचे शहर आहे आज फ्लॉरेन्सची लोकसख्या साडेसात लक्ष म्हणजे साधारण पुण्याएवढी आहे.

दुसऱ्या शतकातही फ्लॉरेन्समध्ये कलांना बहर आला होता तेथे भव्य प्रेक्षागृह होते त्यात नाटक, सगीत, नृत्य यांचे कार्यक्रम होत शहरातला मुख्य रस्ता सगमरवरी होता गरम पाण्याची सार्वजनिक स्नानगृहे त्यावेळीही या गावी होती• त्याना रोमन बाथ्स म्हणत शहराच्या मध्यभागी उच मनोरा होता पिसाहून आलेल्या सीरियन व्यापाऱ्यानी फ्लॉरेन्समध्ये स्थायिक झाल्यावर ख्रिश्चन धर्माचा तेथे प्रसार करण्यास सुरुवात केली पण रोमनानी त्याला कडाडून विरोध केला इ स २५० मध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणाऱ्या सेंट मिनिसयला रोमन अधिकाऱ्यांनी भर चौकात जिवत जाळले त्याला ज्या टेकडीवर पुरले, तेथे नतर अनेक शतकानी सेंट मिनियाटो चर्च ख्रिश्चनानी उभारले

भरभराट पावणाऱ्या फ्लॉरेन्सचा लोभ आजूबाजूच्या राज्यकर्त्यांना होणे साहजिकच होते त्यामुळे अटिलाचे हुन्स (याचा उल्लेख डान्टने आपल्या महाकाव्यात केला आहे), ऑस्ट्रोगॉथ आणि लोंबार्ड यानी या शहरावर चढाया केल्या पण ८५४ साली लोथरने पुन्हा फ्लॉरेन्स घेऊन त्याची सुरक्षित पायावर फेरउभारणी केली दरम्यान ख्रिश्चन धर्माचा प्रस्थापना झाली होती सेंट मिनियाटो या भव्य चर्चच्या उभारणीला १०१४ साली सुरुवात झाली आणि ते पन्नास वर्षांनी पूर्ण झाले १०५५ साली या ठिकाणी स्वत पोप आले आणि त्यानी धर्मगुरूची सभा या चर्चमध्ये घेऊन फ्लॉरेन्सला धार्मिक क्षेत्रात प्रतिष्ठा दिली त्यानतर दोन वर्षांनीच फ्लॉरेन्सचे बिशप घेराडो हेच पोप झाले आणि जगातील सर्व रोमन कॅथॉलिकाचे नेतृत्व फ्लॉरेन्सकडे आले पोप घेराडो यानी अखेरपर्यंत फ्लॉरेन्स हीच रोमन कॅथोलिक धर्माचा राजधानी केली. या शहराशी ते मरेपर्यंत एकनिष्ठ राहिले रोमच्या वैभवाचा मोह त्याना कधीच पडला नाही

बाराव्या आणि तेराव्या शतकात फ्लॉरेन्सला ' फ्लरिशिंग फ्लॉरेन्स ' म्हणत असत त्याची मोठ्या वेगाने भरभराट होत होती चौदाव्या शतकात फक्त आठ महिन्यासाठी अथेन्सचा ड्यूक हा फ्लॉरेन्सचा राज्यकर्ता होता पधराव्या शतकात फ्लॉरेन्सच्या ' काळ्या ' आणि ' पाढऱ्या ' अशा दोन गटात वैमनस्य झाले इतर युरोपियनाच्या तुलनेत इटालियन लोक काळे आहेत कारण इटलीत प्रखर सूर्यप्रकाश पडतो यावेळी कृष्णवर्णीयांची सरशी होऊन त्यानी हजारो गौरवर्णीयाना फ्लॉरेन्स-बाहेर घालविले जगप्रसिद्ध कवी डान्टे याचीही त्यात हकालपट्टी झाली त्यानतर प्लेगची भयकर साथ आली आणि फ्लॉरेन्सची अर्धी लोकसख्या त्या साथीने नाहीशी केली फ्लॉरेन्सची अर्नो नदीवरून डोगरातून वाहत येते आणि फ्लॉरेन्सला ती एकदम सपाट जागेत शिरते भौगोलिक परिस्थितीचा असा परिणाम झाला आहे की डोंगर विभागात अतिवृष्टी झाली की अर्नो नदीला पूर येतो ऊचावरून खळाळत येणारे प्रवाह प्रचड सपाट जागेवर आल्यावर फुगतात आणि फ्लॉरेन्स शहरात नदीचे पाणी पाच ते आठ फुटापर्यंत अचानक चढते अशा अचानक पुराचे अनेक तडाखे गेल्या चारशे वर्षांत फ्लॉरेन्सने झेलले आहेत चौदाव्या शतकात नदीचे पाणी तेरा फूट वाढले होते तर १८४४ साली आलेला पूर त्यापेक्षा सहा इच जास्त होता त्या पुरात शभर लोक वाहून गेले आजूबाजूची अनेक खेडी पाण्याखाली गेली

पण या नैसर्गिक आपत्तींना तोंड देऊनही फ्लॉरेन्सची प्रगती होतच राहिली. कापडधदा मजबूत पायावर उभा होता. वाईनचे भरपूर उत्पादन होत होते हस्त-कलेचे व्यवसाय वाढत होते तेल, काच, खाद्यपदार्थ यांचे कारखानेही उत्तम उलाढाल करीत होते. सर्व व्यावसायिक सघटना होत्या आणि त्याचे हितसबध सांभाळले जात होते त्या त्या व्यवसातील बड्या मबळीचा खास उमरावासारखा खानदानी वर्ग निर्माण होत होता या श्रीमत वर्गाने फ्लॉरेन्समधील सस्कृती आणि कला याची

वाढ करण्यासाठी अतोनात कार्य केले उच्च अभिरुचीच्या या धनाढ्य वर्गाने चित्रकला, शिल्पकला, नाट्य, काव्य अशा अनेक कलाना आश्रय आणि उत्तेजन देण्याची रसिकता दाखवली या श्रीमतांनी वाडे बांधले, कलात्मक चर्चेस् उभारली आणि वस्तुसग्रहालये काढली डाटे आणि गियाटो यांच्यासारखा धुरधरांनी या मोहिमेस हातभार लावला चौदाव्या शतकात विलासी रोमन सम्राटाच्या कारकीर्दीत रोम शहर मद्य, उची खाणे, विलास आणि शौकीन खेळ याच्यात गढून गेले होते, तेव्हा फ्लॉरेन्स मात्र बुद्धिमान कलावतांचे आगर होते

फ्लॉरेन्सवर परकीयाचे हल्ले होऊ नयेत म्हणून अर्नो नदीच्या दोन्ही तीराना धरून शहराभोवती बळकट भित उभारण्याचे काम अर्नोल्फो कॅम्बियोने केले. याच वेळी दिनो कॅम्पानी आणि गियोव्हानी या जगप्रसिद्ध लेखकांचा उदय झाला त्यांनी इतिहासाला लालित्यपूर्ण भाषेत सादर केले आणि त्यातूनच पुढे ऐतिहासिक कादबरी हा प्रकार निघाला या काळात फ्लॉरेन्सचे उद्योगधदे आणि सावकारी—ज्याला स्थूल अर्थाने बँकिग म्हणता येईल—इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रगत झाली होती की, या गावचे सावकार परराष्ट्रांनाही कर्ज देत होते खुद्द रोमचे सम्राट अनेक वेळा आर्थिक साहाय्यासाठीच या सावकाराकडे दूत पाठवित असत चौदाव्या शतकातही फ्लॉरेन्सची राज्यव्यवस्था बरीच प्रगत झालेली होती सर्व थरातून निवडून आलेल्या १८ प्रतिनिधीचे कौन्सिल होते व शहराचे अधिकारी निवडण्याचे काम हे कौन्सिल करी कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली नतर अधिकारी काम करीत चौदाव्या शतकात फ्लॉरेन्सचे स्वत चे सैन्य होते आणि त्याने पिसापर्यंतचा भाग जिकून आपल्या प्रदेशात समाविष्ट केला होता पधराव्या शतकात गिव्होवानी मेडिसी फ्लॉरेन्सचा प्रमुख झाला. त्यानतर जवळजवळ तीनशे वर्षे या मेडिसी घराण्याने फ्लॉरेन्सची लोकशाही गुडाळून ठेवून राजासारखा अमल गाजवला. मात्र हे मेडिसी घराणे मूळचे श्रीमत होते व्यापारात मिळविलेला पैसा त्यानी चातुर्याने राजकारणात वापरून सत्ता हाती घेतली निरनिराळ्या शहर-राज्यांशी व्यापारी व राजनैतिक करार करून आपली सत्ता बळकट केली त्या काळी एखाद्या देशाची मध्यवर्ती सत्ता दुबळी झाली की शहरे स्वतत्र होऊन स्वत ची जहागिरीसारखी राज्ये स्थापना करीत याच सुमारास चावट प्रणयकथा लिहिणारा जगातील पहिल्या क्रमांकाचा ‘ रोमँण्टिक ’ लेखक गिओव्हॅनी बोकॅशिओ (१३१३ ते १३७५) उदयाला आला हे फ्लॉरेन्सचे सुवर्णयुगच होते कारण त्याच अवधीत पट्रार्क हा चित्रकार, ओर्काना, टॅलेन्टो हे कलावत, डोनॅटेलो, घिबर्टी, बॅन्को हे शिल्पकला व वास्तुरचनातज्ज्ञ, लिमी फिसीनो, मोर्झलिओ हे चित्रकार अशी विविध क्षेत्रांतील अग्रगण्य कलावंतांची फलटणच फ्लॉरेन्समध्ये अवतरली युरोपमधील सांस्कृतिक पुनर्जीवनाची (रिनायसेन्स) हीच सुरुवात होती मेडिसी हे राज्य प्रमुख आणि त्यांचे सरदार—दरकदार हेही उच्च

अभिरुचीचे व कलासक्त असल्याने कलेचा बहर येण्याला हा काळ अत्यंत अनुकूल ठरला संगीत, नृत्य, स्त्रियांची प्रणयाराधना यांची आधुनिक काळातली भरतीची लाट आली ती याच काळात आणि याच फ्लॉरेन्समध्ये । आतापर्यंत घरातच डाबून राहणाऱ्या स्त्रिया आता बाहेर पडू लागल्या. चित्रकला प्रदर्शने, संगीत, ऑपेरा, नृत्य यांच्या कार्यक्रमाना स्वत. केशभूषा व देशभूषा करून हजर राहू लागल्या सार्वजनिक जीवनात स्त्रियाची नजाकत ठेवणाचा पायंडा याच फ्लॉरेन्सने प्रथम पाडला

सॅव्हॅनोरेला या धर्मपरायण नेत्याने मेडिसीविरुद्ध यशस्वी बंड करून १४९४ साली फ्लॉरेन्सचा ताबा घेऊन मेडिसीची हकालपट्टी केली पण मेडिसींनी परकीय मदत घेऊन सॅव्हॅनोरेलाचा शिरच्छेद करून पुन्हा फ्लोरेन्सचा ताबा चारच वर्षांच्या खडानतर स्वत कडे घेतला. त्यानंतरही फ्लोरेन्सवर कधी यशस्वी तर कधी अयशस्वी अशा परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या, पण अधूनमधून पराभव झेलूनही मेडिसीचे वंशज पुन्हा विजयी झाले आणि त्यांनी आपली पकड दीर्घकाळ सोडली नाही

फ्रेंच क्रांतीच्या वेळी १७९९ मध्ये फ्लॉरेन्समध्ये फ्रेंच फौजा घुसल्या नेपोलियनची बहीण एलिझा हिला फ्लॉरेन्सची डचेस् करण्यात आले तिने फ्लॉरेन्समध्ये फ्रेंच सौंदर्यदृष्टी आणि कला-कल्पना यांची भरच घातली फ्लॉरेन्स पूर्वीपासूनच राजकीय व सास्कृतिक बाबतीत उदार व पुरोगामी होते त्यामुळे लेखक, कवी, राजकीय नेते, विचारवंत, चित्रकार, शिल्पकार याना या शहराचे मोठेच आकर्षण वाटून नेपोलियनच्या काळापासून आतापर्यंत शेकडो कलाकारांनी या शहरालाच आपली कर्मभूमी केली रोमसारखे हे अती गर्दीचे शहर केव्हाच नव्हते रसिक नागरिक व शात जीवन वरदान फ्लॉरेन्सला मिळाले होते एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस शहराभोवतीची तटबदी पाडण्यात आली. कारण वाढत्या शहराला वाट करून देणे भाग पडले त्याबरोबर तट बांधून गावाचे रक्षण करण्याची कल्पना जुनी व कालबाह्य झाली तट गेल्याने फ्लॉरेन्सच्या जीवनाला एक मोकळेपणा आणि भरपूर जागा असल्याची नवी जाणीव आली दुसऱ्या महायुद्धात फ्लॉरेन्स हे 'मुक्त शहर' (ओपन सिटी) म्हणून जाहीर करण्यात आले. तरीही दोस्तांनी केलेल्या बाँबहल्ल्यानी आणि माघार घेणाऱ्या जर्मनांनी पेरून ठेवलेल्या भुईसुरुगांनी या शहराचे बरेच नुकसान केले मात्र युद्धानतर फ्लॉरेन्सने ही सर्व नुकसानी भरून काढून पुन्हा पूर्वीचे कलासक्त जीवन सुरू केले

४ नोव्हेंबर १९६६ रोजी पहाटे फ्लॉरेन्स शहर साखरझोपेत मशगूल होते. फक्त काही चर्चेस्‌मधील धर्मोपदेशक लवकर उठून धार्मिक कार्यांना सुरुवात करण्याच्या तयारीत होते ऑनिसॅन्टो चर्चचा मोठा दरवाजा बाहेरून कोणीतरी धडधड वाजवीत आहे असे वाटून एक धर्मोपदेशक दरवाजाच्या आतला अवाढव्य लाकडी

अडसर काढण्याचा प्रयत्न करू लागला, तेव्हा दरवाज्याच्या फटीतून पाणी झिरपत असल्याचे त्याला आढळले तावडतोब काय झाले याची कल्पना येऊन 'अर्नोला पूर आला' असे तो ओरडला चर्चमधील इतरजण त्या बाजूला धावले त्यांनी दरवाजाला नेट लावला पण बाहेरील पाण्याचा दाब एवढा प्रचंड होता की एखाद्या काडयाच्या पेटीतल्या काडीसारखा तो अडसर मोडला आणि सर्वांना ढकलून दरवाजा आत उघडला चार फूट पाण्याचा लोंढा जबरदस्तीने आत घुसला त्याही अवस्थेत शक्य तितक्या वेगाने चर्चचे धर्मोपदेशक आत गेले कारण चर्चच्या भिंतीवर शेकडो वर्षांच्या जुन्या आणि मायकेल अँजेलासारख्या जगप्रसिद्ध चित्रकारांनी काढलेल्या अमोल कलाकृती होत्या त्या घाईघाईने गोळा करून त्यांनी कशाबशा वरच्या मजल्यावर नेल्या

अर्नो नदीचे तुफान वेगाचे पाणी फ्लॉरेन्समध्ये शिरत होते, वाढत होते दोन तासांत एक कोटी चौरस वार पाणी फ्लॉरेन्समध्ये शिरले त्यात दीडशे लोक आणि चाळीस हजार गुरे वाहून गेली जगातल्या शेकडो उत्तमोत्तम कलाकृती पाण्यात व चिखलात बुडून गेल्या पाणी अडविण्यासाठी डोंगरात बांधलेले धरण फुटले होते आणि धोक्याचा इशारा येऊन पोचण्यापूर्वीच पाण्याचा चार फूट उंच लोंढा गावात येऊन पोचला होता आसपासचा तीन हजार मैलाचा टापू कमीअधिक पाण्याने व्यापला होता लोक सामानसुमानाची आशा सोडून आपल्या घराच्या छपरावर चढून बसले होते वाहत्या पाण्याकडे हताश नजरेने पाहत होते दागदागिने आणि निवडक मौल्यवान वस्तू घेण्यात काहींना यश मिळाले होते तर काहींना तेवढेही मिळाले नव्हते रस्त्यात उभ्या करून ठेवलेल्या मोटारी प्रवाहाच्या जोराबरोबर वाहून गेल्या होत्या व्हेनिस आणि पिसा या शहरांपर्यंत यावेळी अर्नो नदीचा चढ पोचला होता विजेचा प्रवाह बंद पडला होता नदीच्या काठची ठिसूळ मातीच्या पायाची घरे नदीत पडून वाहून जाताना दिसत होती नदीत अनेक दुर्दैवी जीव तरंगताना दिसत होते लाकडी वस्तूंच्या बरोबरच तेही प्रवाहाबरोबर वेगाने लोटले जात होते

काही तासांनी पूर ओसरला तेव्हा पुनस्संधानाचे अवाढव्य काम सरकार, नगरपालिका, सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था यांना करावे लागले रस्त्यात घट्ट रोवलेले अनेक पुतळेही तुटून गेले होते जगप्रसिद्ध तैलचित्रे चिखलात लडबडली होती. प्राचीन दुर्मिळ ग्रंथांत पाणी शिरून त्यांचे मातेरे झाले होते अनेक दुबळ्या इमारती फुटून कामच्या निकामी झाल्या होत्या. फ्लॉरेन्स हा जगातील एक अत्यंत महत्त्वाचा कलेचा ठेवा असल्याने 'युनेस्को' सारख्या जगन्मान्य संस्थांनी लक्षावधी डॉलर्सची मदत देऊन बहुतेक कलाकृती साफसूफ करून त्यांची पूर्ववत् प्रतिष्ठापना करण्यात यश मिळविले. पण १९६६ चा पूर म्हणजे फ्लॉरेन्सच्या इतिहासातील एक अत्यंत भयानक अनुभव होता

इवल्याशा फ्लॉरेन्सने जगाला दिलेल्या रत्नाचा ठेवा अपरिमित आहे. मायकेल अँन्जेलो बुनारोटी हा जगातील सर्वश्रेष्ठ चित्रकार आणि शिल्पकार तो आर्किटेक्ट होता, तसाच कवीही होता त्या काळच्या पहिल्या प्रतीच्या बुद्धिवंतांचा सहवास त्याला फ्लॉरेन्समध्ये लाभला आणि त्यामुळे मायकेल अंजेलोच्या कलाकृतींना एक श्रेष्ठ बौद्धिक परिमाणही मिळाले शरीर हा आत्म्याचा तुरुग आहे असे त्यानेच आपल्या काव्यात म्हटले आहे अचिलस, हर्क्युलस अशा बलदडाचे त्याने केलेले पुतळे हे शरीराचे अपार सामर्थ्य दाखवतात, तसेच त्याने केलेल्या ख्रिस्ताच्या अनेक पुतळ्यातून अथाग करुणेचेही सर्वोत्कृष्ट दर्शन घडते रोमच्या सेंट पीटर्समध्ये मायकेल अँजेलोच्या निवडक कृती पाहून मला अद्भुत आनद मिळाला होता, त्याचीच प्रचीती मला फ्लॉरेन्सच्या ठायीठायी या सर्वश्रेष्ठ कलाकाराच्या कलाकृती पाहून पुन्हा आली ज्याला 'क्लासिक' म्हणतात त्या अभिजात शिल्पकलेचे व चित्रकलेचे पुनरुजीवन करून मायकेल अँजेलोने पाश्चात्य सस्कृतीच्या पुनरुज्जीवनाला मोठीच चालना दिली 'मॅडोना वुईथ द डेड ख्राईस्ट' हा त्याने केलेला पुतळा (सेंट पीटस, रोम) त्याची सर्वोत्कृष्ट कलाकृती मानली जाते त्याच्या बहुतेक कलकृती ख्रिश्चन धर्मावर आधारलेल्या आहेत

'दि डिव्हाईन कॉमेडी' या महाकाव्याचा कर्ता डाटे हा इटलीचा सर्वश्रेष्ठ कवी । सास्कृतिक पुनरुज्जीवनात त्याचा महत्त्वाचा भाग आहे. 'ला व्हिटा नोव्हा' हे त्याचे पहिले दीर्घकाव्य बिआट्रिस या त्याचा प्रेयसीवरील प्रेमकाव्य आहे. अशा प्रकारचे भावनाना मुक्त वाट करून देणारे काव्य लिहिण्याची त्यावेळी डांटे यानेच प्रथा पाडली, म्हणून काव्याच्या क्षेत्रात त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे 'इल कॉन्व्हिव्हो' हा त्याचा ओडस् या काव्यप्रकाराचा सग्रहही आत्मचरित्रात्मक आहे त्याने भाषा, राजकारण, तत्त्वज्ञान अशा विविध विषयावर लेखन केलेच, पण साहित्यिकाची समाजाशी बांधिलकी मानणारा तो लेखक असल्याने त्याने पुरोगामी राजकारणात प्रत्यक्ष भाग घेतला, म्हणून त्याला हद्दपार करण्यात आले. परागदा झालेल्या डाटेनेही उत्कृष्ट काव्ये लिहिली आणि युरोपमधील सांस्कृतिक पुनरुज्जीवनात काव्याचा व साहित्याचा झेंडा फडकविला. 'डिव्हाईन कॉमेडी' हे १४२३३ ओळीचे महाकाव्य असून इन्फर्नो (नरक), पृथ्वी आणि स्वर्ग या तिन्ही लोकांत कवीने केलेल्या काल्पनिक प्रवासाचे त्यात तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून केलेले वर्णन आहे.

गॅलिलिओ या फ्लॉरेन्सच्या शास्त्रज्ञाने सबध जगाचा विज्ञानविषयक आणि विश्व विषयक दृष्टिकोन बदलून टाकला. आकाशातील ग्रह व तारे यांचा सबध भविष्य आणि अध्यात्म यांच्याशी जोडला जात असे. पण गॅलिलिओ हा पहिला शास्त्रज्ञ होता की ज्याने खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान व गणित यांचा परस्पर सबध सिद्ध केला आणि विश्वाच्या रचनेविषयीच्या पारपारिक कल्पनेत क्राती केली त्याने ॲरिस्टॉटलच्या

विश्वविषयक कल्पना चुकीच्या आहेत हे मत आग्रहाने मांडले आणि त्याच्या पुष्ट्यर्थ पिसाच्या टॉवरवरून प्रयोगही करून दाखविले पृथ्वी स्वत भोवती फिरते व सूर्याभोवतीही फिरते (अर्थात् डबल मोशन) हा महत्त्वाचा सिद्धांत गॅलिलिओने मांडला त्याविरुद्ध अनेकांनी बायबलमधले आधार दिले, तेव्हा विज्ञानाच्या क्षेत्रात धर्माचे दाखले कुचकामी आहेत असे निःसंदिग्ध मत गॅलिलिओने धैर्याने मांडले. अर्थातच चर्चचा त्याच्याविरुद्ध रोष झाला आणि त्याला तत्त्वासाठी अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागले तो काही काळ पादुआ व रोमला गेला, पण फ्लॉरेन्सवर त्याचा इतका जीव होता की, अखेरच्या काळात गॅलिलिओ याच गावात आला आणि तेथेच मरण पावला डान्टे, मायकेल अँजेलो, गॅलिलिओ अशी नावे शाळेत–कॉलेजात असल्यापासून आम्ही ऐकत होतो त्या विश्वविख्यात श्रेष्ठींची जन्मभूमी आणि कर्मभूमी पाहून प्रवासाचे व जीवनाचे सार्थक झाले असे वाटते

आर्य चाणक्य हा आपल्याकडील श्रेष्ठ राजनीतीतज्ज्ञ, तसाच युरोपमधला मॅकव्हॅली त्याचेही गाव फ्लॉरेन्सच सांस्कृतिक पुनरुज्जीवनातील आघाडीवरचा कवी पेट्रार्कही इथलाच !

फ्लॉरेन्स म्हणजे मूर्तिकला, देखण्या इमारती, चित्रकला यांचा जगातील एक अत्यंत भव्य असा ठेवा आहे हे सारे शहरच एक विशाल वस्तुसंग्रहालय आहे. सौंदर्यदेवतेची इथे अहोरात्र पूजा चाललेली असते मोझाईक, फ्रेस्को, तेराकोटा अशा सर्व पद्धतींची शिल्पकला व वास्तुकला यांचे सर्वोत्कृष्ट नमुने फ्लॉरेन्समध्ये पाहता येतात विशेषत अनेक चर्चमधील स्टेन ग्लासवरचे कलाकौशल्य अप्रतिम आहे. या शहरातील सर्वांत महत्त्वाच्या अशा दोन इमारती म्हणजे कॅम्पानील चर्च आणि पॅलेझो व्हेचिओ या दोन इमारतींच्या परिसरात फ्लॉरेन्सचा बहुतेक इतिहास घडला आहे या दोन इमारतींच्या चौकात राजकीय नेत्यांचे खून झाले, ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणाऱ्यांना जाहीर फाशी देण्यात आले किंवा जाळले गेले याच परिसरातील जगातील काही अत्यंत श्रेष्ठ कवी, चित्रकार, शिल्पकार यांनी आपल्या अजरामर कृती तयार केल्या म्हणूनच या भागाला ' सेंटर ऑफ ब्यूटी हॉरर्स ' (सौंदर्य आणि भीती यांचे केंद्र) असे म्हटले जाते

कॅम्पानील चर्च अकराव्या शतकातले असले, तरी पुढे तीनशे वर्षे यात कलात्मक भागांची भर पडतच होती बॅप्टीस्ट्री, घुमट आणि मनोरा असे त्या काळच्या इटालियन पद्धतीप्रमाणे त्याचे तीन भाग आहेत मुख्य चर्च हे या लाल घुमटाखाली आहे हे सेंट जॉन याचे चर्च आहे या जागी जे जुने चर्च होते त्याचा काही भाग अद्यापही नव्या चर्चमध्ये समाविष्ट केलेला आहे जुने चर्च बांधण्याल सहाव्या शतकात सुरुवात झाली, यावरून त्यांचे पुरातत्त्वविषयक महत्त्व लक्षात येते रोमन पॅन्थिअॉन पद्धतीचे हे चर्च मध्यभागी नेहमीप्रमाणे गोल नसून अष्टकोनी

आहे डान्टे कवीचा बाप्तिस्मा याच चर्चमध्ये झाला हे जेव्हा मला आमच्या गाईडने सांगितले, तेव्हा स्ट्रटफर्ड अपॉन ॲव्हन या गावी शेक्सपीअरचा बाप्तिस्मा ज्या चर्चमध्ये झाला, ते चर्च पाहिल्याची मला आठवण झाली डान्टे अलिघरी (१२६५ ते १३२१) हा इटलीचाच नव्हे, तर जगातील एक श्रेष्ठ कवी त्याने युरोपच्या सांस्कृतिक जीवनावर खोल ठसा उमटविला

या चर्चच्या भिंतींवर आणि दरवाजावर चित्राची जी पॅनेल्स आहेत, त्यातील काही मायकेल अँजेलोने रंगविली आहेत पिसानो, घिबर्टी, ब्रुनेटोशी आणि डोनेटेलो यानीही दीर्घ परिश्रमाने रंगविलेली पॅनेल्स आहेत त्यापैकी काही भव्य पॅनेल्स चितारण्यासाठी पंधरा ते वीस वर्षांचा कालावधी लागला या सर्व पॅनेल्सच्या चित्राचे विषय अर्थातच बायबलमधील प्रसंगांवरून घेतले आहेत मुख्य घुमटाखालील चर्चमध्ये सेंट जॉनचा साधा पुतळा आहे तसेच 'सेंट मेरी ऑफ द फ्लॉवर्स' या फुलराणी मेरीचाही कलात्मक पुतळा आहे ही फ्लॉरेन्स शहराची देवता हे कॅथेड्रल हिला समर्पण करण्यात आले आहे. या चर्चचा बहुतेक कलात्मक भाग अर्नोलफो दि कँबियोने बांधला आहे चर्चचा वरचा विटांचा भव्य घुमट हे फ्लॉरेन्स शहराचे एक वैभव आहे त्यावर बसविलेला संगमरवरी कळस इतका जड आहे, की तेथे तो चढवणे धोक्याचे आहे, असा आक्षेप घेण्यात आला होता पण ब्रुनेटोशी या कल्पक वास्तुरचनाकाराने तो अवजड कळस चढवला आणि आता अनेक शतके तेथे तो दिमाखाने झळकत आहे

सॅन्ता मारिया चर्चचा इतिहास रक्तरंजित आहे. याच पवित्र चर्चमध्ये गिइलानीद मेडिसीच्या शरीरात जंबिये खुपसून त्याचा खून करण्यात आला लॉरेन्झोला ठार करण्यासाठी याच ठिकाणी मारेकरी आले, पण तो कॉयरमधून पळून गेला सॅव्हॅनोरेलाने याच चर्चमध्ये शेकडो विरोधकाना कोंडून ठेवले आणि त्याना घुमसटवून मारण्याची धमकी दिली.

या कलात्मक चर्चजवळच्या चौकात मायकेल ॲन्जेलोच्या कलाकृतीचे वस्तुसंग्रहालय आहे. फ्लॉरेन्सला येणाऱ्या प्रवाशानी हे संग्रहालय पाहिलेच पाहिजे तेथील 'दका' (पिटी) नावाचे त्याचे शिल्प जगातील एक सर्वोत्कृष्ट कलाकृतीपैकी एक आहे कापानील व मायकेल ॲन्जेलो चौकाच्या मध्ये उंच मनोरा आहे हा चौकोनी मनोरा गोथिक पद्धतीचा असून त्यात व्हर्जिन मेरीचे मोठे तैलचित्र आहे हे दोन्ही चौक आणि फ्लॉरेन्समधील बहुतेक रस्ते हे विटांसारख्या लांबट दगडांचे आहेत. कौलारू घरे, उंच मनोरे, घुमट आणि दगडी रस्ते यामुळे आजही फ्लॉरेन्स शहर मध्ययुगीन वाटते जुन्या परंपरेची शान त्याच्या नसानसात आहे व्हर्जिन मेरीच्या मनोऱ्याजवळच जुना राजवाडा किंवा पॅलेझो व्हेशिया ही प्राचीन शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने असलेली भव्य इमारत आहे. मनोऱ्यावरचे घड्याळ बहुधा सर्वात उंच जागी असते. पण या वाड्याच्या मनोऱ्याच्या सुरुवातीला घड्याळ आहे

आणि त्यानंतर नक्षीदार, सुंदर मनोरा डोंगराच्या सुळक्यासारखा आकाशात घुसतो या चौकात अत्यंत कलात्मक असे ग्रीक पद्धतीचे अनेक पुतळे उभे आहेत. हा फ्लॉरेन्सचा सर्वांत गजबजलेला चौक 'टूरिस्ट सीझन' (जुलै ते सप्टेंबर) मध्ये या चौकात परकीय प्रवाशांची नुसती झुंबड उडते अर्थात त्यांच्या मागोमाग खाद्य-पेये, सोविनीयर्स वगैरे विकणाऱ्यांच्या गाड्या आल्याच एखाद्या जत्रेचे स्वरूप या चौकाला येते सतराव्या शतकात या ठिकाणी एक रोमन प्रेक्षागृह होते, पण कालांतराने ते प्राचीन बांधकाम पडून गेले उरलेला भाग आक्रमक सैन्याच्या विध्वंसाला बळी पडला ही जागा मोकळी करून १२९९ ते १३१४ या काळात सध्या दिमाखात उभा असलेला पॅलेझो व्हेशिओ हा राजवाडा बांधण्यात आला याच वाड्यात सॅव्हॅनोरेला अधिकारावर आला तो इतका धार्मिक होता की नग्न स्त्रियांची चित्रे व त्याला अश्लील वाटणारी पुस्तके त्याने या वाड्याच्या चौकात जाहीरपणे जाळून टाकली

पंधराव्या आणि सोळाव्या शतकात या वाड्याच्या चौकात सार्वजनिक खेळ व ऑपेरा, संगीत यांचे कार्यक्रम आम जनतेसाठी होत असत गेल्या महायुद्धाच्या अखेरीस ११ ऑगस्ट १९४४ रोजी जनतेने याच चौकात स्वातंत्र्योत्सव साजरा केला आजही फ्लॉरेन्सचे सर्व मोठे जाहीर कार्यक्रम याच चौकात होतात. आपण ज्याला दरबार हॉल म्हणतो, तसा या राजवाड्यातला 'ग्रॅन्ड कौन्सिल हॉल' हा भव्यता आणि सौन्दर्य यात व्हर्सायच्या राजवाड्याची आठवण करून देणारा आहे पुतळे आणि चित्रे हे फ्लॉरेन्सचे वैशिष्ट्य. त्याचा भरपूर प्रत्यय या दरबार हॉल-मध्ये येतो हॉलच्या खिडक्यांच्या काचावरही उत्तमोत्तम स्टेनग्लासच्या कलाकृती आहेत 'चेंबर ऑफ द फाईव्ह हड्रेड' हे दुसरे सभागृह त्यात पाचशे प्रतिनिधींची बसण्याची सोय आहे. या सभागृहाच्या भिंतीवरही मायकेल अँजेलो, व्हेरोशियो अशा श्रेष्ठ चित्रकारांच्या कलाकृती आहेत 'इनर कोर्ट' हे दालन तर सर्वस्वी मायकेल अँजेलोमयच आहे.

पियाझा देला सिनोरिया या चौकात मध्यभागी सुंदर कारंजा आहे त्याभोवती नेपच्यून व इतर ग्रीक मूर्ती आहेत. मेडिसी कॉसिनोचा अश्वारूढ पुतळाही आहे लंडनच्या ट्रफलगार चौकाप्रमाणे या चौकातही कारंजाच्या पायऱ्यांवर अनेक श्रांत प्रवासी विश्रांती घेताना दिसतात त्याच्या पुढचा चौक म्हणजे पियाझा सॅन फिरेन्झ (फ्लॉरेन्स चौक) या चौकातील बडिया मॉनेस्ट्री व मनोरा एक हजार वर्षांचे जुने आहेत या चर्चमध्ये फिलीपिनो लिपी यांचे सर्वांत प्रसिद्ध असे अपॅरिझन ऑफ व्हर्जिन टू सेंट बर्नर्ड' हे तैलचित्र आहे या चर्चसमोरच 'नॅशनल म्युझियम ऑफ टस्कन स्कल्प्चर' हे श्रेष्ठ वस्तुसंग्रहालय आहे. आकृतीचे सौन्दर्य (ब्यूटी ऑफ शेप) या ठिकाणाइतके जगात इतरत्र कोठेही पाहायला मिळत नाही,

असे मत अनेक कलासमीक्षकानी व्यक्त केले आहे मायकेल अँन्जेलो, बलोना, डोन्टेलो, व्हेरोशियो अशा अनेक जगप्रसिद्ध शिल्पकारांच्या शेकडो निवडक कलाकृती पाहून या क्षेत्रातील रसिकाच्या नेत्रांचे पारणे फिटते हे म्युझियम एके काळी तुरुग म्हणून वापरले जात होते, यावरून फ्लॉरेन्समधील अनेक प्रेक्षणीय स्थळाना भीतीचाही गडद रंग आहे हे पटते याच आवारात अजूनही एक जुने स्कॅफोल्ड आहे प्राचीन काळी त्यावर मान ठेवून अपराध्याची मुंडकी उडविली जात आता तेही एक 'प्रेक्षणीय स्थळ आहे.

या म्युझियसमोर जुन्या फ्लॉरेन्समधील सरदार-दरकदाराचे कलात्मक वाडे आहेत. त्यापैकी काहींना आता उतरती कळा आली असली तरी बहुतेक वाडे चांगल्या अवस्थेत ठेवण्यात आले आहेत

महाकवी डांटे याचे घर अजूनही तसेच ठेवण्यात आले आहे हे दुमजली घर बरीच डागडुजी करून राखून ठेवले आहे घरावर डांटेचा पुतळा आहे व जवळच त्याची त्रोटक माहिती देणारा इटालियन भाषेतील फलक आहे ऑनिसॅन्टी चर्च १२५६ साली बाधण्यात आले याच चर्चच्या आवारात नेपोलियनची बहीण आणि जगप्रसिद्ध चित्रकार बॉटिसेली याचे देह पुरण्यात आले आहेत सेंट फ्रॅन्सिस ऑफ ॲसिसीचा वेष अजून या चर्चमध्ये भक्तांना पाहण्यासाठी ठेवलेला आहे धिर्लीडिओ या ख्यातनाम चित्रकाराचे 'लास्ट सपर' हे सर्वांत गाजलेले तैलचित्र या चर्चमध्ये आहे लिओनॅर्डो द व्हिन्सी हा जगप्रसिद्ध चित्रकारही याच फ्लॉरेन्सच्या उपनगरातला व्हिन्सी हे त्या उपनगराचे नाव म्हणून त्याला व्हिन्सीचा लिओनॅर्डो हे नाव पडले लिओनॅर्डो द व्हिन्सीचा जन्म ज्या चद्रमौळी घरात झाला, ते कौलारू बैठे घर अजून तसेच राखून ठेवले आहे लिओनॉर्डो हा मायकेल अँजेलोपेक्षा तेवीस वर्षांनी मोठा होता लिओनार्डो हा एवढा मोठा चित्रकार, पण फ्लॉरेन्सहून मिलानला जाऊन त्याने मिलिटरी एंजिनीयरची नोकरी केली ! पण ती सोडून तो फ्लॉरेन्सला काही वर्षांनी परतला पण अखेरपर्यंत तेथे राहिला नाही दुसरा जगप्रसिद्ध चित्रकार रॅफेल स्टॅन्झिओ हाही व्हिन्सी व मायकेल अँजेलो यांच्याप्रमाणे फ्लॉरेन्सला काही वर्षे होता पण पोप यांनी त्याला बोलाविल्याने त्याने पुढे रोमला जाऊन तेथेच आपल्या कलाकृती तयार केल्या पण फ्लॉरेन्सच्या वास्तव्याने त्याच्या चित्रकलेवर कायमची छाप पाडली

मराठी माणसाच्या दृष्टीने फ्लॉरेन्सला एक खास महत्त्व आहे ते असे की, १८७० साली छत्रपती राजाराम महाराज हे युरोपचा प्रवास करीत असताना याच शहरात स्वर्गवासी झाले त्यावेळी त्यांचे वय अवघे वीस वर्षांचे होते फ्लॉरेन्सला कर्सीन पार्कमध्ये 'अव्हेन्यू ऑफ द इंडियन' या नावाचा एक भाग आहे तेथे छत्रपती राजाराम महाराजाचा अर्धपुतळा आहे. त्याला महाराजाची छत्री असे नाव आहे प्रिन्स राजाराम छत्रपती आणि त्यांचे सहकारी इटलीची सफर करीत असताना

फ्लॉरेन्समध्ये आले तेथे छत्रपती राजाराम निधन पावले ज्या जागी त्यांचे दहन करण्यात आले, तेथेच त्यांचा पुतळा नंतर उभारण्यात आला त्यांचे रक्षाविसर्जन अर्नो आणि म्युगोग या नद्यांच्या संगमात करण्यात आले या पुतळ्याच्या भोवती ऑलिव्ह आणि सायप्रस वृक्षांची सुंदर राई आहे. या कर्सीन पार्कमध्ये अब्राहम लिंकन, जॉर्ज वॉशिंग्टन अशा स्पष्ट नावाचे चौक व रस्ते असताना वास्तविक 'प्रिन्स राजाराम छत्रपती अव्हेन्यू' असे या पुतळ्याच्या भागास नाव द्यायला हवे होते त्याऐवजी 'अव्हेन्यू ऑफ द इंडियन' हे सर्वनाम विचित्रच वाटते

युफिझी वस्तुसंग्रहालयात अनेक जगविख्यात कलाकृती आहेत बॉरिसेली यांनी काढलेले 'बर्थ ऑफ व्हीनस' हे अमर तैलचित्र येथे आहे तसेच ब्रुनेलेशी, डोनॅटेली, गियोटो, मायकेल अँजेलो याच्याही जगप्रसिद्ध कलाकृती या संग्रहालयात आहेत मॅसॉशिया हा चित्रकार तर वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी निधन पावला कलेच्या क्षेत्रातील अशी एक आख्यायिका आहे 'ग्रेट मेन ऑफ फ्लॉरेन्स, या नावाच्या दालनात या शहरातील साहित्य, चित्रकला, संगीत, शिल्पकला इत्यादी क्षेत्रांतील नामवंत अतिरथी–महारथींचे पुतळे आहेत फ्लॉरेन्समधील शभरावर महत्त्वाची चर्चेस् धार्मिक स्थळे आहेतच, पण अव्वल दर्जाची चित्रकला व शिल्पकला, यांची तीर्थक्षेत्रेही आहेत सतामारिया नॉव्हेला, सेंट मार्क, सँता क्रोशे, सॅन् लोरेन्झो अशा ख्यातकीर्त चर्चेस्मध्ये राफेल, मायकेल अँजोलो, बॉहिसेली, लिओनॅर्डो द व्हिन्सी अशा धुरीणांनी आपल्या उत्कृष्ट कलाकृती येशू ख्रिस्ताच्या चरणी अर्पण केल्या. सँता मारिया चर्चभोवतीची हिरवळ, झाडे आणि तलाव यांनी त्या प्रगल्भ वास्तूला खास निसर्गसौंदर्याचे कोंदणही दिले आहे चॅपेल ऑफ द मेडिशीज्मध्ये मायकेल अँजेलोने तयार केलेले दिवस, रात्र, पहाट आणि संध्याकाळ याचे पुतळे अप्रतिम आहेत काळाच्या कल्पनेला रूप देणाऱ्या या शिल्पकाराची उत्तुंग प्रतिभा या पुतळ्यांत दिसते

अर्नो नदीवरील जुना पूल साडेसातशे वर्षांचा जुना आहे १९४४ साली जर्मनांनी माघार घेताना इतर पूल उडवून दिले, पण हा एकमेव पूल शाबूत ठेवला १२१५ साली एका उमरावाच्या कन्येबरोबर ज्याचा विवाह ठरलेला होता, तो नवरदेव लग्नासाठी आलाच नाही. याच पुलाच्या एका टोकाला वधू, तिचा पिता व इतर कुटुंबीय आणि स्नेहीमंडळी चर्चकडे वरासह जाण्यासाठी थांबली होती पण नवरदेवाने गुंगारा दिला हे लक्षात येताच वधूपिता इतका खवळला की त्याने त्या तरुणास पकडून आणले आणि याच पुलावर सर्वांसमक्ष त्याचा शिरच्छेद केला ! फ्लॉरेन्समधील अनेक सुंदर स्थळे अशी रक्तरंजित झाली आहेत या पुलाजवळ आता सुवर्णकार आणि जवाहिरे यांची दुकाने आहेत

पॅलेझो पिट्टी आणि बोबोली गार्डन्स पाहून कुणालाही पॅरिसजवळच्या व्हर्सायच्या

राजवाड्याच्या जगप्रसिद्ध उद्यानाची आठवण होईल. विशेषतः मधला तलाव पॅलेझो पिट्टीच्या चित्रसंग्रहात प्रामुख्याने सोळाव्या शतकातील पाचशेवर तैलचित्रे आहेत. फ्लॉरेन्सला भेट दिल्यावर माझ्या मनात विचार आला तो असा, की स्वीत्झर्लंड-सारख्या मोठ्या देशाला शेकडो वर्षांची शांतता आणि समृद्धी लाभूनही तो जगाच्या संस्कृतीत कसलीही भर घालीत नाही उलट फ्लॉरेन्ससारखे छोटेसे गाव सबंध जगाचे सांस्कृतिक पुनरुज्जीवन करते हा एवढा मोठा चमत्कार !

□ □ □

## युरोपची राजधानी

# ब्रुसेल्स

ब्रुसेल्स ही बेल्जियमची राजधानी तसे लंडन–पारिस–न्यूयॉर्कच्या तुलनेने हे लहान शहर आहे पण फार वैशिष्ट्यपूर्ण आहे मी या गावाला निदान आठ–दहा वेळा तरी गेलो आहे, किंवा या गावातून पुढे गेलो आहे कारण हे अगदी मोक्याच्या जागी आहे म्हणजे मुंबईहून हैद्राबादला जावे, दिल्लीला जावे किंवा अहमदाबादला जावे तरी दादर हे लागतेच, तसेच या ब्रुसेल्सचे आहे. बेल्जियम हा शब्द आपल्या कानी लहानपणापासून पडत आला आहे, तो आरशाच्या संदर्भात एखादा आरसा सर्वोत्कृष्ट आहे असे सांगायचे झाले तर 'बेल्जियम काच आहे साहेब, उगीच गावठी नाही' असे दुकानदार सांगतो कारण बेल्जियमची काच म्हणजे त्या क्षेत्रातला अखेरचा शब्द आहे

बेल्जियम हे फारच लहान राष्ट्र आहे हॉलंड व जर्मनी, फ्रान्स आणि लक्झेंबर्ग यांच्या कोंदणात हे फक्त अकरा हजार सातशे ऐंशी चौरस मैलाचे आणि एक कोटी लोकसंख्येचे राष्ट्र आहे मी प्रथम इंग्लंडहून पॅरिसला गेलो, तेव्हा ब्रुसेल्समध्ये थांबलो होतो मग पॅरिसहून हॉलंडला जाताना पुन्हा ॲमस्टरडॅमहून येताना, मग जर्मनीहून लक्झेंबर्गला जाताना आणि अशाच अनेक फेऱ्या करताना ब्रुसेल्स या अटळ शहरात थांबावेच लागते मग तो मुक्काम दोन तासांचा असो की दोन दिवसाचा स्वेच्छेचा असो! ब्रुसेल्स या शहराची प्रकृती आणि आकृती पाहण्यापूर्वी आपल्याला बेल्जियम हे काय प्रकरण आहे हे पाहिले पाहिजे. हा लहानसा देश तीन भाषांनी विभागला आहे हॉलंडजवळच्या भागात डच भाषा प्रचलित आहे जर्मनीजवळच्या भागात जर्मन भाषा आहे फ्रान्स व लक्झेंबर्गला लागून असलेल्या भागात फ्रेंच भाषेचा प्रभाव आहे आणि खुद्द ब्रुसेल्समध्ये डच आणि फ्रेंच या भाषा चालतात.

या चार पट्टयापैकी सर्वांत महत्त्वाचा भाग डच भाषेचा. त्याला फ्लॅंडर्स म्हणतात त्याखालोखाल महत्त्व आहे ते फ्रेंच भाषिक भागाला जर्मन भाषेचा भाग आकाराने व लोकसंख्येने फारच लहान आहे फ्रेंच भाषेचा भाग वालोनिया या नावाने प्रसिद्ध आहे फ्लॅंडर्स म्हणजे उत्तरेकडचा बेल्जियम आणि वालोनिया म्हणजे दक्षिण बेल्जियम यांच्यात एवढे वितुष्ट आहे, की या दोन्ही भागाचे प्रशासन वेगळे आहे. राज्यघटना वेगळ्या, कायदे वेगळे जवळ-जवळ हे दोन वेगळे देशच आहेत ! कधी बेल्जियमची फाळणी होऊन हे दोन तुकडे अलग पडतील याचा नेम नाही, अशी सद्य स्थिती आहे.

खुद्द ब्रुसेल्सची गमत अशी आहे की, हा जरी द्विभाषिक भाग असला, तरी ब्रुसेल्सचा विमानतळ आहे फ्लॅंडर्समध्ये. त्यामुळे विमानतळावर डच किंवा डच भाषेचा एक प्रकार फ्लेमिश ही एकमेव भाषा चालते ! विमानतळावर फ्रेंच भाषेचे अगदी वावडे तिथले फॉर्म्स, पाट्या सगळ्या फ्लेमिशमध्ये विमानतळावरचे अधिकारी आणि पोलीस याना फ्रेंच भाषा येत असली, तरी ते तसे कबूल करणार नाहीत फ्रेंच भाषेत प्रश्न केला तर ते उत्तर देणार नाहीत इग्रजी, जर्मन कोणतीही भाषा विमानतळावर चालणार नाही फक्त फ्लेमिश भाषेचे राज्य. मात्र विमानतळाची हद्द सोडली, की तीच अधिकारी धडाधड फ्रेंच भाषेत बोलू लागेल आपण महाराष्ट्र-कर्नाटकात भाषिक कडवटपणा आहे असे म्हणतो पण बेल्जियममध्ये ही कटुता शिगेला पोचली आहे ब्रुसेल्सच्या विमानतळावर उतरलेल्या एका वकील उतारूने एकदा टॅक्सीवाल्याला फ्रेंचमधून विचारलं, "ग्रॅंड फ्लासला येणार का ?" टॅक्सीवाला मस्तपणे बसून राहिला. उतारूने इग्रजीतून विचारले, तरीही तो गप्पच उतारूने पोलिसांकडे तक्रार केली पोलिसाने उलट उतारूलाच दम दिला, "नो फ्रेंच,, स्पीक फ्लेमिश !" उतारूने मोडक्या-तोडक्या फ्लेमिशमध्ये टॅक्सीवाल्याला विचारले तेव्हाच तो तयार झाला विमानतळाची हद्द ओलांडल्यावर टॅक्सीवाल्याने उतारूला सागितले, " विमानतळावर फ्रेंचमधून बोलण्यास बंदी आहे बाहेर ती भाषा चालते "

बेल्जियमच्या दोन भागांतली ही कटुता गेल्या पन्नास वर्षांत वाढतच आहे. तिचा इतिहासही मनोरजक आहे. हा देश रोमन साम्राज्याच्या काळात, नवव्या शतकात रोमनानी वसवला दक्षिणेकडील या अर्थी त्याचे बेल्जी हे नाव त्यांनी ठेवले. पुढे फ्रान्सचा उदय झाला, तेव्हा फ्रेंच औद्योगिक क्रांतीचे फायदे वालोनियाला मिळाले कारण फ्रान्सला तो भाग भौगोलिकदृष्टचा जवळचा होता शिक्षण, उद्योगधदे, राज्यकारभार यात वालोनियाची प्रचड प्रगती झाली या उलट फ्लॅंडर्स मात्र शेतीवर निर्वाह करणारा, अडाणी असा भाग राहिला त्या काळात वालोनियाने फ्लॅंडर्सला उपहासाने, अन्यायाने आणि भेदभावाने वागवले त्या अपमानाच्या खुणा अजून बुजलेल्या नाहीत.

पहिल्या महायुद्धानंतर मात्र या दोन भागांत झपाट्याने फरक पडू लागला.

वालोनियात आधी उद्योगधंदे सुरू झाल्याने सर्व औद्योगिक देशांप्रमाणे तेथेही कामगार संघटना, पगारवाढीच्या मागण्या आणि संप सुरू झाले अर्थात नवे उद्योगधंदे वालोनियाऐवजी फ्लॅंडर्समध्ये निघू लागले. त्या भागात कामगार असंघटित होते, स्वस्ताई होती, कामगाराचे वेतनही कमी होते आणि नव्या कारखान्यांना भरपूर जागा होती काही कारखान्यानी तर वालोनियापासून फ्लॅंडर्समध्ये स्थलांतर केले, आता फ्लॅंडर्समध्ये शिक्षणाचा, कुशल कामगारांचा आणि संघटित राजकीय चळवळींचा प्रभाव वाढू लागला फ्लॅंडर्सला वालोनियाच्या बरोबरीने राज्यकारभारात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे ही फ्लॅंडर्सची मागणी मान्य झाली

हळूहळू फ्लॅंडर्सची लोकसंख्या वालोनियापेक्षा अधिक झाली पार्लमेंटमध्ये फ्लॅंडर्सचे बहुमत झाले आता त्या भागाचे पारडे जड झाले आणि आत्तापर्यंत मिळालेल्या अन्याय्य वागणुकीचा फ्लॅंडर्सने वचपा काढण्यास सुरुवात केली फ्रेंच भाषा म्हणजे फ्लॅंडर्सला शत्रूच मानला गेला

अँटवर्प हे जगातील एक अत्यंत महत्त्वाचे बंदर ते फ्लॅंडर्समध्ये आहे त्याचा विकास झाला आणि उद्योगाबरोबर व्यापारातही फ्लॅंडर्सने आघाडी मारली दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा युरोपियन कॉमन मार्केटची स्थापना झाली, तेव्हा या समाईक बाजारपेठेची राजधानी म्हणून ब्रुसेल्सची निवड झाली ब्रुसेल्समध्ये फ्लेमिश आणि फ्रेंच अशा दोन्ही भाषा चालत असल्या तरी फ्लेमिशचा प्रभाव फ्रेंचपेक्षा अनेक पटीने आहे कारण बहुतेक प्रमुख व्यापार व उद्योगधंदे यांची सूत्रे फ्लॅंडर्सच्या लोकांच्या हाती आहेत बेल्जियममधील हा जगावेगळा भाषिक वाद, किंवा भाषिक द्वेष लक्षात घेतला तरच ब्रुसेल्स शहर समजायला सोपे जाते.

मी या शहरात प्रथम गेलो त्याला आता वीस वर्षे होऊन गेली तेव्हाचे ब्रुसेल्स आणि आत्ताचे यात बराच फरक पडला असला तरी, त्यावेळेची या शहराची दोन वैशिष्ट्ये आजही मौजूद आहेत एक म्हणजे फूटपाथवर टेबल–खुर्च्या टाकून निवांतपणे गप्पा मारीत बियर पिणारे लोक. अर्थात बर्लिन, पॅरिस, ॲमस्टरडॅम इथेही ते दिसतात, पण ब्रुसेल्सचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक चौकांत मध्येच बियरच्या टेबलांच्या रांगा असतात आणि दोन्ही बाजूंची वाहनांची व लोकांची वर्दळ तशीच चालू असते दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ब्रुसेल्सची रेस्टॉरंट्स ती मात्र फारच मोहक आहेत. आपण आपल्याकडच्या 'क्षुधा शांति गृहात' किंवा मालवणकर यांच्या वेंगुर्लेकर उपहारगृहात जातो, ते एखादे काम उरकून पटकन बाहेर पडण्यासाठी ! म्हणजे आत शिरायचे, गर्दीत एखादी रिकामी खुर्ची दिसली तर धावत जाऊन म्युझिकल चेअरसच्या खेळातल्यासारखी ती पटकन पकडायची. मग पाची बोटे बुचकळून आणलेले पाण्याचे चार ग्लास हॉटेलचा पोऱ्या आपल्यापुढे आदळणार. "एक वडा, एक चहा" अशी आपण ऑर्डर दिली, की तो तीच

ऑर्डर अंगात आल्यासारखी किंचाळणार वडा–चहा आला की तो फस्त करून आपण बिलाची चिठ्ठी हातात घेऊन वाघ मागे लागल्यासारखे धावत जाऊन कौंटर-वर बिल दिले की समोरून जोराने जाणारी बस पकडून आपण पसार! म्हणजे खाण्यापिण्यातला आनंद यात कुठेच दिसत नाही

पण ब्रुसेल्सच्या रेस्टॉरांमध्ये मी प्रथम गेलो, तेव्हा आतले दृश्य पाहून आपण उपहारगृहात आलो आहोत की चुकून एखाद्या खाजगी खानदानी क्लबमध्ये असा मला प्रश्न पडला कारण प्रशस्त वातानुकूलित हॉलमध्ये अर्ध्यावर अधिक टेबले रिकामी होती सर्व टेबलांवर छान फ्लॉवरपॉट्स आणि त्यात ताजी फुले होती बहुतेक लोक आरामपणे बियर किंवा कॉफी घेता–घेता चक्क खेळत होते जवळच हाताने फेकून बाण मारण्याचा डार्टचा खेळ चालला होता

हा खाजगी क्लब आहे असे समजून मी परतण्याच्या बेतात होतो माझा हा संभ्रम कौंटरवरच्या बाईने बरोबर ओळखला कौंटर सोडून ती पुढे आली आणि मला खुर्चीवर बसण्याचा आग्रह करून इंग्रजीतून म्हणाली, "आपल्याला कॉफी, बियर, काही खाद्यपदार्थ हवेत का?" मी धीर करून बसलो आणि सँडविच व बियर मागवली त्या बाईने वेट्रेसला सांगितले. विशेष म्हणजे वेट्रेसने आधी मला इंग्रजी वर्तमानपत्र आणून दिले मग सॅन्डविच व बियर आणली आणि विशेष म्हणजे पत्त्याचा जोडही आणून दिला 'सॉलिटरी' सारखा एखादा खेळ मला एकट्याने खेळायचा असता तर हिने त्याची सोय केली होती

ब्रुसेल्सच्या रेस्टॉरांमध्ये जाणे म्हणजे केवळ गटागट काही गिळून येणे नव्हे, तर चवीने अन्नाचा, पेयांचा आणि खेळांचा आस्वाद घेत रसिकतेने आनंदात वेळ घालवणे आहे हे मला तेव्हाच पटले त्या लोभसवाण्या रेस्टॉरंट्सना नंतर मी अनेकदा भेटी दिल्या. 'राहायला स्वस्त आणि चांगली जागा कुठं मिळेल?'– त्याचीही चौकशी मी केली

ॲमस्टरडॅमप्रमाणे ब्रुसेल्समध्येही खाजगी घरांचा हॉटेल म्हणून वापर करायला परवानगी आहे वीस वर्षांपूर्वी अशा घरात रोज फक्त पाच डॉलर्सना खोली मिळत असे कॉमन मार्केट झाल्यानंतर हे भाव एकदम कडाडले. आता तीस ते पस्तीस डॉलर्स पडतात

ब्रुसेल्सच्या रेस्टॉरंट्सचे आणखी एक वैशिष्ट्य असे, की त्यांचे मेन्यू बाहेरून येता-जाता सहज वाचता येतील अशा पद्धतीने काचेमागे ठेवलेले असतात अर्थातच आत कोणते पदार्थ मिळतात आणि त्यांचे दर काय आहेत याची गिऱ्हाईकाला बाहेरूनच कल्पना येते. आपण काय घ्यायचे आणि त्यासाठी किती रक्कम मोजावी लागेल याची कल्पना येणे हे प्रवाश्यांच्या दृष्टीने फार आवश्यक असते, याची ब्रुसे-

ल्सच्या उपहारगृहांना चांगली जाणीव असावी. पुण्याला एका उपहारगृहात मी पाहिलेली परखड पाटी तेव्हा मला आठवली ती पाटी अशी होती– ' आधी खिशाचा अदाज घ्या, आणि मगच जिभेचे चोचले पुरवा.' स्पष्टवक्तेपणा म्हणतात तो हाच !

मुबईला फ्लोरा फौंटन, लडनचा पिकॅडिली सर्कस चौक, न्यूयॉर्कचा टाईम्स स्क्वेअर, तसा ब्रुसेल्सचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा चौक म्हणजे ग्रान प्लास किंवा ग्रँड चौक ब्रुसेल्सचा बहुतेक रस्त्याप्रमाणे या भव्य चौकाची जमीनही विटासारख्या दगडांनी केलेली आहे सभोवती गोथिक पद्धतीच्या, उंच मनोऱ्याच्या इमारती आहेत त्यामुळे या ग्रान प्लासमध्ये एक प्रकारचे मध्ययुगीन वातावरण आहे या चौकात कुठेही थांबले, तरी तास न् तास कसे निघून जातात हे कळतही नाही निरनिराळ्या देशाचश प्रवाशांनी हा चौक सतत फुलून गेलेला असतो जुलै– ऑगस्ट या मोसमाच्या दिवसांत तर त्याला जत्रेचे स्वरूप येते

गिल्ड हाऊस, किंग्ज हाऊस या दोनशे वर्षांपूर्वीच्या इमारतींत एकदम उंच मनोरा असलेला टाऊन हॉल एखाद्या रक्षकासारखा भव्य आणि सतत दक्ष असा दिसतो हा मनोरा तीनशे फूट उंच आहे आणि हौस, शक्ती, वेळ असेल तर मनोऱ्याच्या आतील पायऱ्या चढून पार बाल्कनीपर्यंत जाता येते. तिथून ब्रुसेल्सचे दिसणारे विहगम दृश्य डोळ्याचे पारणे फेडते रात्रीच्या वेळी ग्रान प्लास हा फ्लड लाईटमध्ये न्हाऊन निघतो ऑगस्टमध्ये फुलांचा महोत्सव होतो, तेव्हा या चौकात दोनशे फूट लाब आणि पाऊणशे फूट रुंदीचा फुलाचा गालिचा घालतात ते दृश्य तर अविस्मरणीय असते त्याशिवाय बँडवादन, नृत्य, नाटचप्रसग असे अनेक करमणुकीचे कार्यक्रम या चौकात होतात चौकाच्या कडेला फूथापवर टाकलेल्या खुर्च्यांवर बसून बिअरचे घुटके घेत ब्रुसेल्सचे मुक्त सौंदर्य निरखणे हा जीवनातील फार मोठा आनद आहे

या चौकाजवळ 'मॅनकेन पीस' हा पुतळा कम् कारंजा आहे ब्रुसेल्समधील हे शिल्प जगप्रसिद्ध आहे फार वर्षांपूर्वी एक हरवलेला मुलगा इथे लघुशका करताना सापडला त्या मुलाचा त्याच अवस्थेतील पुतळा या चौकात उभारण्यात आला आहे. मुलाचा हा उद्योग सतत चालू असतो आणि देशोदेशीहून आलेले प्रवासी तो मोठ्या कौतुकाने पाहतात बऱ्याच वेळी हा मुलगा नागडा असतो पण कधीकधी कौतुकाने त्याला वेगवेगळे कपडे घालण्यात येतात ३ सप्टेंबर १९४४ रोजी वेल्श पलटणीने जर्मनांच्या ताब्यातून ब्रुसेल्स मुक्त केले तेव्हापासून दरसाल ३ सप्टेंबरला या मुलाला वेल्श शिपायाचे कपडे घालण्यात येतात त्या मुलाचे विविध वेष 'मेझो द रॉय' मधील प्रदर्शनात ठेवण्यात आले आहेत

मी प्रथम ब्रुसेल्सच्या हॉटेलात राहिलो तेव्हा मला वाटले होते की, हॉटेलच्या हॉलमध्ये, खोलीत, बाथरूममध्ये सर्वत्र आरसेच आरसे असतील. कारण बेल्जियम

म्हटले की तेव्हा फक्त आरसाच आठवत असे पण प्रत्यक्षात मात्र माझ्या खोली-तील एक लहानसा आरसा वगळला तर दुसरा आरसा हॉटेलात कुठे आढळतच नाही 'पिकते तिथे विकत नाही' हा न्याय बेल्जियमच्या आरशालाही लागू पडत असावा !

ब्रुसल्स ही युरोपियन कॉमन मार्केटची राजधानी झाल्यानंतर त्या संघटनेची मुख्य कचेरी म्हणून बीर्लेजाँट बिल्डिंग ही अद्ययावत प्रशस्त गोलाकार इमारत बांधण्यात आली आहे या पधरा मजली इमारतीसमोर युनोप्रमाणे युरोपियन कॉमन मार्केटच्या सभासद राष्ट्रांची निशाणे फडकत असतात. ब्रुसेल्स हे 'नाटो' (नॉर्थ अटलांटिक) राष्ट्रांचेही मध्यवर्ती केंद्र आहे पण नाटो ही मुख्यत लष्करी संघटना असल्याने नाटो केंद्राचा व सर्वसामान्य नागरिकांचा फारसा संबध येत नाही पण सामाईक बाजारपेठ हा विषय मात्र सर्वांनाच जवळचा असल्याने त्या निमित्ताने अनेक देश, उद्योगधदे, विमा कंपन्या, व्यापारी कंपन्या यांच्या कचेऱ्यांचे जाळेच ब्रुसेल्समध्ये निर्माण झाले आहे. बेल्जियम सरकारचे प्रवासी खाते दक्ष आहे त्यामुळे ब्रुसेल्सला भेट देणाऱ्यांनी प्रथम ६१ ग्रासमार्केट या रस्त्यावरच्या नॅशनल टूरिस्ट ऑफिसमध्ये प्रथम जावे तिथे प्रवाशांना माहिती देण्यात तत्पर असलेला नोकरवर्ग माहितीपत्रिका, नकाशे, पुस्तिका वगैरे साहित्य देऊन प्रवास, निवास वगैरेबद्दल उत्तम मार्गदर्शन करतो.

पॅरिसच्या मानाने ब्रुसेल्स हे लहान शहर असले, तरी येथील कलासंग्रह विख्यात आहे एजन्सी रस्त्यावरचे 'म्युझियम ऑफ फाईन आर्टस्' हे सर्वात मह-त्वाचे संग्रहालय पूर्णपणे पाहण्यास तीन दिवस पुरणार नाहीत एवढे मोठे आहे त्यातील फ्लेमिश चित्रकारांच्या कलाकृती विशेष लक्षणीय आहेत रुबेन्स, रेम्ब्रा, डिव्हिन्सी, मेम्लिन अशा विश्वविख्यात चित्रकारांच्या निवडक कलाकृती या सग्रहा-लयात् आहेत ब्रुसेल्समध्ये तीसवर वस्तुसग्रहालये आहेत. यावरून येथील लोकांची कलाप्रियता लक्षात येते म्युझियम ऑफ मॉडर्न आर्टमध्ये पिकॅसो आणि इतर आधु-निक चित्रकारांच्या कलाकृती ठेवण्यात आल्या आहेत म्युझियम ऑफ आर्ट अँड हिस्टरी हे वस्तुसग्रहालय तर एवढे मोठे आहे की ते एक दिवसाआड अर्धे-अर्धेच उघडण्यात येते एका दिवसात एक भाग पाहिला, की दुसरा भाग पाहण्यासाठी दुसऱ्या दिवसापर्यंत थांबावे लागते.

फक्त मुलांच्यासाठी अलीकडे उघडण्यात आलेले एक वस्तुसंग्रहालय लुई अव्हेन्यूजवळ आहे. या सर्व म्युझियम्समध्ये गाईड्स असतात आणि नाममात्र वर्गणी दिल्यावर ते सर्व चित्रे व इतर वस्तू यांची माहिती देतात.

ब्रुसेल्सचा 'रॉयल पॅलेस' जुलै ते ऑक्टोबरपर्यंत प्रेक्षकांच्यासाठी खुला असतो. या वाड्यातही फ्लेमिश व इतर चित्रकारांच्या कृती, फ्रेंच व जर्मन शिल्पकला यांचे

उत्कृष्ट नमुने पाहता येतात या रॉयल पॅलेससमोरच पॅलेदला नेशन म्हणजे बेल्जियमचे पार्लमेंट आहे १७८३ मध्ये बांधलेली ही संसदेची इमारत भव्य आणि जुन्या वास्तुशिल्पकलेचा उत्तम नमुना म्हणून प्रसिद्ध आहे या इमारतीजवळच कॉलन द कॉंग्रेसची इमारत आहे तिच्या पायथ्याशी अज्ञात सैनिकांचे स्मारक आहे पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या बेल्जियमच्या सैनिकाचे हे स्मारक आहे

बर्सची (स्टॉक एक्चेंज) इमारत येथे शभर वर्षांहून अधिक काळ आहे पण युरोपियन समाईक बाजारपेठ स्थापन झाल्यापासून या शेअरबाजारला विलक्षण गती आली आहे दररोज कोटथावधी डॉलर्सचे व्यवहार या शेअरबाजारात होतात. ब्रुसेल्स ही युरोपची राजधानी असल्याने अमेरिका, इग्लड, जपान अशा अनेक प्रगत देशाचे प्रतिनिधी या शेअरबाजारात काम करतात या शेअरबाजाराजवळच सेंट निकोलस चर्च आहे धर्म आणि व्यापार यांची ही अशी सागड का घालण्यात आली आहे, याची कल्पना येत नाही मात्र या चर्चच्या प्रवेशद्वाराजवळच पुतळा इतर धर्मस्थळाच्या आसपासच्या पुतळ्यांहून अगदी वेगळा आहे एक गौळण एका भाड्यात दूध ओतीत असल्याचा हा पुतळा वेगळेपणामुळे लक्षात राहतो. पूर्वी बेल्जियम हा शेतीप्रधान देश होता आणि जवळच्या हॉलंडप्रमाणेच इथेही दुग्धदुभत्याचा मोठा व्यवसायच होता त्या काळातले हे प्रतीक आहे हे चर्च चौदाव्या शतकातील आहे त्या काळी औद्योगिक क्रातीचा स्पर्श बेल्जियमला झाला नव्हता. सेंट मायकेल चर्चही चारशे वर्षांचे जुने आहे त्यातील धार्मिक पुतळे आणि स्टेन ग्लासवरील रगीत चित्रे अप्रतिम आहेत.

ब्रुसेल्सचे 'फ्ली मार्केट' म्हणजे जुना बाजार किंवा मुबईच्या भाषेत चोरबाजार मात्र ब्रुसेल्सच्या या बाजाराचा आणि चोरीचा काही सबंध नाही हजारो जुन्या वस्तू या बाजारात अत्यत स्वस्त दराने मिळतात त्यात मुख्यत· बेल्जियमचे जगप्रसिद्ध काचसामान, भाडी, छोटे–मोठे पुतळे, जुन्यापुराण्या वस्तू (अँटिक्स), तयार कपडे, फर्निचर अशा विविध प्रकारच्या वस्तूंनी हा बाजार भरलेला असतो. मात्र तो फक्त शनिवारी व रविवारीच भरतो आपल्याला काही खरेदी करायची असो अथवा नसो, पण दोन–तीन तास मुक्तपणे भटकायला आणि मोफत करमणूक करून घ्यायला हा आदर्श बाजार आहे प्रवासी आणि विशेषतः अमेरिकन प्रवासी या बाजारात मोठ्या प्रमाणावर भटकताना दिसतात काही तरी जुनी मोडकीतोडकी वस्तू स्वस्तात घेऊन ती आपल्या दिवाणखान्यात अॅन्टिक म्हणून ठेवल्याशिवाय अमेरिकन प्रवाशांना चैन पडत नाही. या जुन्या बाजारातल्या वस्तूंपेक्षाही त्या वस्तू घेण्यासाठी आलेली गिऱ्हाईके अधिक मनोरंजक असतात.

शहराच्या बाहेर पण लागूनच 'रॉयल म्युझियम फॉर सेन्ट्रल आफ्रिका'मध्ये

आफ्रिकन लोक, त्यांची कला, आफ्रिकेचा इतिहास याचे उत्कृष्ट प्रदर्शन आहे. याच ठिकाणी १९५८ मध्ये ब्रुसेल्सला आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरले होते. त्याची खूण म्हणून प्रचंड ॲटोमियम शिल्प उभारण्यात आले आहे अणुयुगाचा प्रारंभ दाखविणारे नऊ मोठे अल्युमिनियमचे गोळे शंभर मीटर्स उंचपर्यंतच्या शिल्पावर अणुशक्तीचे प्रतीक म्हणून ठेवले आहेत सर्वात वरच्या गोळ्यात जाण्यासाठी लिफ्टची व्यवस्था आहे व तेथून पारदर्शक भागातून ब्रुसेल्स व आसमंताचे विहंगमावलोकन करता येते त्याच्या जवळच 'न्यूक्लीअर एक्झीबिशन' हे अणुशक्तीवरचे प्रदर्शन भविष्यकाळात दैनंदिन जीवनात अणुशक्ती कशी वापरली जाईल याचे दर्शन घडवते

खरेदी करणाऱ्यांना ब्रुसेल्समध्ये भरपूर वाव आहे कट् ग्लासच्या वस्तू हे बेल्जियमचे सर्वात मोठे वैशिष्ट्यच त्याबरोबरच तांब्याची नक्षीकाम केलेली भांडी आणि नाजूक विणकाम केलेला लेसचा कपडा घेऊन आपल्या देशी जाणारे हजारो प्रवासी असतात अँटवर्प हे हिऱ्याबद्दल जगप्रसिद्ध आहे ज्या श्रीमंत प्रवाशांना हिरे-खरेदीसाठी अँटवर्पला जाणे कठीण असते, त्यांच्यासाठी ब्रुसेल्समध्ये खास हिऱ्यांची बाजारपेठ आहे लंडनमध्ये मला एक भारतीय जवाहिरे भेटले होते ते म्हणाले की, हिरे आणि हिऱ्यांना पैलू पाडणे यासाठी जी जगप्रसिद्ध शहरे आहेत, त्यात ॲम-स्टरडॅम, ब्रुसेल्स आणि अँटवर्प ही आघाडीवर आहेत भारतातील सुरत हे शहरही अलीकडे हिऱ्यांना पैलू पाडण्याबाबत जागतिक बाजारपेठेत प्रसिद्धीला येऊ लागले आहे. ब्रुसेल्सपेक्षा पैलू पाडणारे कुशल कामगार सुरतला बऱ्याच कमी किंमतीत उत्तम काम करून देतात ब्रुसेल्स हे कातडीकामाबद्दलही मशहूर आहे विशेषत लेडीज हॅन्डबॅग्जसाठी स्त्री–प्रवाशांची येथील बाजारपेठेत चिक्कार गर्दी होते. अद्य-यावत् तयार कपड्याची ही युरोपमधील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. पॅरिस, लंडन, बॉन, ॲमस्टरडॅम अशा युरोपियन समाईक बाजारपेठेतील सर्व देशांतून त्या-त्या देशांचे वैशिष्ट्यपूर्ण कपडे आणि कापड ब्रुसेल्समध्ये येते तेथील वस्तूंची विवि-धता आणि विपुलता यामुळे ब्रुसेल्सला 'शॉप विंडो ऑफ द वर्ल्ड' हे नाव मिळाले आहे नक्षीदार, छोट्या काचेच्या बाटलीतील सेंटसाठी ग्रँड सॅल्लॉन प्रसिद्ध आहे छोट्या पुतळ्यात हिकमतीने बसविलेली घड्याळे हेही बेल्जियमचे एक वैशिष्ट्य आहे

बेल्जियम हे लहान राष्ट्र असले तरी तेथील महोत्सव मात्र भव्य असतात फ्लॅन्डर्स आणि वालोनिया या दोन भागांची त्याबाबत स्पर्धा हे या भव्यतेचे एक कारण आहे. फेस्टिव्हल ऑफ फ्लॅन्डर्स हा सर्वात मोठा महोत्सव अँटवर्प व ब्रुसेल्स-मध्ये होतो. त्यात मुख्यत. संगीत व ऑपेरा याचे कार्यक्रम होतात. त्या पाठोपाठ फेस्टिव्हल ऑफ् वालोनिया लीज आणि ब्रुसेल्समध्ये होतो. हे महोत्सव एखाद्या जुन्या किल्ल्याच्या पटांगणात होतात. त्यामुळे अभिजात संगीताला अनुरूप अशी

पार्श्वभूमी तयार होते मात्र खराब हवा किंवा पाऊस असला तर रोको नाट्यगृहात हे महोत्सव घेतले जातात युरोपमधील अनेक देशांतील रसिक या महोत्सवासाठी खास बेल्जियमला भेटी देतात हिवाळी आणि उन्हाळी अशा दोन ऋतूत हे महोत्सव घेतले जातात एकमेकापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर महोत्सव करून आपले श्रेष्ठत्व टिकविण्याचे प्रयत्न दोन राष्ट्रांच्या चढाओढीच्या जिद्दीने फ्लॅन्डर्स आणि वालोनियाला करावे लागतात

म्युनिकप्रमाणे ब्रुसेल्समध्येही नव्या बियरच्या आगमनानार्थ ऑक्टोबरमध्ये बियर महोत्सव होतो शिकारीच्या पद्धतीची आठवण म्हणून शिकारीच्या वेळी वाजवण्याच्या बिगुलांची स्पर्धाही होते 'परेड ऑफ द जायट्स' या मिरवणुकीत पंधरा–वीस फूट उंच बाहुल्या डोकीवर घेऊन जाणाऱ्यांचा महोत्सव होतो बेल्जियममधील अलास्ट या गावी कांद्याचा महोत्सव होतो यावेळी कांद्याचे बुरखे घेतलेल्या लोकांची भव्य मिरवणूक निघते, तर आयपर गावी 'फेस्टिव्हल ऑफ कॅट्स'मध्ये सर्वांना आवडणाऱ्या मांजराचा महोत्सव होतो यावेळी दहा–बारा फूट उंचीचे मांजराचे मुखवटे घालून मार्जारप्रेमी लोक मिरवणूक काढतात मॉन या गावी 'फेस्टिव्हल ऑफ ड्रॅगन'मध्ये चिनी ड्रॅगनबरोबरचे युद्ध दाखवण्यात येते.

ब्रुसेल्समध्ये मे महिन्यात 'प्लँटिंग ऑफ मे ट्री' नावाचा वृक्षांचा महोत्सव होतो ब्लँकनबर्ज येथे फुलराणीची मिरवणूक हा वर्षातील सर्वात महत्त्वाचा सण असतो यापैकी काही महोत्सव ब्रुसेल्सपासून काही अंतरावर होत असले तरी बेल्जियम हा इतका लहान देश आहे की, ब्रुसेल्समध्ये राहून सकाळी त्या गावी जाऊन उत्सव पाहून रात्री अगदी सहजपणे परत येता येते

बेल्जियमला निवांत आणि सुंदर समुद्रकिनारा लाभला आहे डच सरहद्दीवर तर चाळीस मैलांची सुंदर, स्वच्छ चौपाटी आहे या चौपाटीवर अनेक उत्सव आणि खेळ होतात शिडाच्या गाड्यांना चाके लावून केवळ वाऱ्याच्या साहाय्याने धावणाऱ्या गाड्यांची शर्यत ही त्यापैकी एक वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धा आहे. या किनारपट्टीवर घोडे आणि गाढवे रपेटीसाठी ठेवण्यात आली आहेत मुलांच्यासाठी तंबू–तंबूतून कठपुतळीचे खेळही होतात 'क्वीन एलिझाबेथ इंटरनॅशनल कॉम्पिटिशन फॉर म्युझिक' ही संगीतविषयक जगातील सर्वात मोठी स्पर्धा ब्रुसेल्समध्ये भरते. त्यात विविध देशांतील शेकडो गायक व वादक भाग घेतात फेब्रुवारी महिन्यात ही स्पर्धा होते तसेच फुग्यांचा महोत्सव, चित्रपट महोत्सव, कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाचा महोत्सव अशा विविध कार्यक्रमांनी वर्षभर ब्रुसेल्स गजबजलेले असते.

नाटके, नाईट क्लब्ज, कॅसिनो, बॅले इत्यादींचे कार्यक्रम तर दररोजच असतात. ब्रुसेल्स ही युरोपची राजधानी असल्याने थकल्याभागल्या श्रीमंत उद्योगपती व

व्यापाऱ्यांच्या करमणुकीसाठी येथील नाईट क्लब्ज सज्ज असतात. ला फ्रेझी, शेझ् पॉल आँ गेटी, ला शेव्हाल हे नाईट क्लब्ज खास गाजलेले आहेत. मात्र पॅरिसच्या नाईट क्लब्जपेक्षाही हे महाग आहेत एका रात्रीच्या करमणुकीसाठी येथे सुमारे चारशे ते पाचशे रुपये पडतात पॅरिसमध्ये चांगला नाईट क्लबही दोनशे ते अडीचशे रुपयांपर्यंत पाहता येतो

वर्षभर जबरदस्त सांस्कृतिक कार्यक्रम चाललेले असूनही ब्रुसेल्स तसे शांत असते म्हणजे तिथे गुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे लंडन, न्यूयॉर्क, पॅरिस या शहरांत गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर चालते चोऱ्या, खून, मारामाऱ्या यांनी रात्री-अपरात्री त्या शहरात एकट्या-दुकट्या प्रवाशाला फिरणे धोक्याचे वाटते. पण ब्रुसेल्समध्ये मात्र तशी अडचण येत नाही याचे एक कारण असे असेल की पोलीस संघटना अत्यंत कार्यक्षम आहे आणि बेल्जियम देश लहान असल्याने गुन्हेगारांविरुद्ध परिणामकारक उपाय योजणे पोलिसांना शक्य होते

मी वीस वर्षांपूर्वी जेव्हा प्रथम बेल्जियमचा व्हिसा मिळविण्यासाठी अर्ज केला, तेव्हा त्या फॉर्मवरील काही रकाने मला गुंतागुंतीचेच नव्हे तर हास्यास्पदही वाटले होते. उदाहरणार्थ, तुमच्या वडिलांचे व आईचे लग्न केव्हा आणि कुठे झाले ? वडिलांची जन्मतारीख, आजीचे माहेरचे नाव, आजीच्या व आजोबांच्या लग्नाची तारीख. .आपला कुलवृत्तान्त कुणालाही इतका तपशीलवार पाठ नसतो मी माझी अडचण लंडनमधील बेल्जियम वकिलातीच्या व्हिसा अधिकाऱ्याला सांगितली तेव्हा तो म्हणाला, " तुमचे म्हणणे बरोबर आहे वास्तविक तुमच्यासारख्या आशियाई प्रवाशांसाठी हे रकाने नाहीत पण सर्व रकाने भरल्याशिवाय व्हिसा मिळणार नाही असा नियम आहे तेव्हा तुम्ही असं करा की, अंदाजाने कोणतीही नावं नि तारखा भरा. मी व्हिसा देतो."

त्याप्रमाणे मी केले आणि मग त्या अधिकाऱ्याला तो तपशील मागण्याचे कारण विचारले, तेव्हा तो म्हणाला, " बेल्जियम हा अनेक देशांच्या मध्येच खोवणीतला देश आहे अनेकदा जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड अशा परदेशातले गुन्हेगार तिकडे गुन्हे करून बेल्जियममध्ये येण्याचा प्रयत्न करतात त्यांना थोपवणे व व्हिसा नाकारणे हे या रकान्यांचे मुख्य कारण आहे या गुन्हेगारांनी नावे बदलली, तरी त्यांचे आई-वडील, आजोबा-आजी यांचा गुन्हेगारीशी संबंध आहे काय किंवा होता काय हे आमच्या रेकॉर्डवरून काढता यावे म्हणून हा तपशील आम्ही मागतो "

बेल्जियमच्या पोलिसांच्या या दक्षतेमुळे ब्रुसेल्समधील परकीय प्रवाशाचा मुक्काम सुखद होतो, हे मात्र खरे ! सध्या भारतात बेल्जियमचा व्हिसा देताना 'बेनेलक्स 'चा एकदम व्हिसा मिळतो. ' बेनेलक्स ' म्हणजे बेल्जियम, नेदर्लंड व लक्झेंबर्ग या तीन लहान राष्ट्रांनी बहुतेक देशांत स्वतंत्र व्हिसाच्या कचेऱ्या स्थापन

न करता आपसात त्यांचे वाटप करून एकदमच तिन्ही देशाचा व्हिसा देण्याची पद्धत सुरू केली आहे.

जगाच्या आर्थिक उलाढालीत या लहान देशाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. सबंध सोवियत रशियाच्या निर्यातीपेक्षा बेल्जियमची निर्यात अधिक मोठी आहे. आपला छोटा देश बड्या देशाच्या औद्योगिक चढाओढीशी समर्थपणे तोंड देऊ शकणार नाही, हे ओळखून पहिल्या महायुद्धानतर लगेच बेल्जियमने निरनिराळ्या देशांशी आर्थिक व औद्योगिक सहकार्य करण्याचे धोरण आखले १९२१ मध्ये बेल्जियम व लक्झेंबर्ग याची आर्थिक सघटना झाली १९४४ साली हॉलंड-बेल्जियम लक्झेंबर्ग सघटना तयार झाली. १९४८ मध्ये आणखी राष्ट्रे त्यांना मिळून वेस्टर्न युरोपियन युनियन स्थापन झाले १९५८ मध्ये युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी (ई ई सी) ही युरोपची समाईक बाजारपेठ स्थापन झाली आणि ब्रुसेल्सचा आर्थिक सहकार्यातील दीर्घ अनुभव लक्षात घेऊन तीच या बाजारपेठेची राजधानी झाली

आज बेल्जियम हे आर्थिक व व्यापारीदृष्ट्या जगातील नवव्या क्रमांकाचे राष्ट्र आहे काचेच्या उत्पादनात बेल्जियमचा जगात पहिला आणि पोलादाच्या उत्पादनात दुसरा क्रम आहे. इग्लडची लोकसख्या बेल्जियमच्या पाचपटीहून अधिक आहे. पण हा लहान देश इग्लडच्या निर्मितीच्या ७० टक्के निर्यात करतो कोबाल्ट, जर्मेनियम आणि रेडियमच्या उत्पादनातही बेल्जियमचा जगात पहिला क्रमाक आहे सबीना ही बेल्जियमची विमान कपनी पहिल्या दर्जाची आहे ब्रुसेल्स हे इतके मध्यवर्ती ठिकाण आहे, की लंडन, पॅरिस, रोम, फ्रँकफुर्ट, जिनिव्हा या युरोपमधील प्रमुख शहरी जाण्यासाठी येथून फक्त एक ते सव्वा तासच लागतो तांत्रिकदृष्ट्या बेल्जियमला अद्यापही राजा आहे, पण देशाच्या कारभारात तो हस्तक्षेप करीत नाही पार्लमेंटमध्ये सपूर्णपणे लोकशाही पध्दतीने निवडलेले खासदार असतात व इंग्लडप्रमाणे तेच पक्षबळाप्रमाणे मंत्रिमडळ बनवितात

झूरिकप्रमाणेच ब्रुसेल्स हेही आंतरराष्ट्रीय गुप्तहेरांचे आवडीचे संकेतस्थळ आहे. महत्वाचे कारण म्हणजे ब्रुसेल्सची भौगोलिक रचना. युरोपमधील सर्व महत्त्वाच्या शहरांपासून विमानाने हे शहर तास–सव्वातासच अतरावर आहे 'नॅटो' आणि 'समाईक बाजारपेठ' यांचे हे प्रमुख केंद्र असल्याने निरनिराळ्या राष्ट्राची गुप्त माहिती काढून ती इतर राष्ट्रांना पोचविण्यासाठी हे आदर्श स्थळ आहे. पूर्वी निर्जन जागी भेटण्याची गुप्तहेराची पद्धत होती. पण निवांत जागी भेटल्यावर प्रतिहेरांनी नजर ठेवण्यात सुरुवात केल्यापासूने बियर हॉल्स, सुपर मार्केट, भर रस्त्याचे चौक अशा गर्दीच्या जागी एकमेकांना भेटण्याची नवी पद्धत 'आतरराष्ट्रीय हेरां' नी सुरू केली आहे.

अशी गर्दीच्या जागेची सार्वजनिक ठिकाणे ब्रुसेल्समध्ये मुबलक आहेत. दोन हेरांनी एकाच बियरच्या टेबलावर बसायचे, एकाच प्रकारच्या सिगारेटच्या पेटया समोर ठेवायच्या, एकमेकांशी काहीही न बोलता चुकून सिगारेट बॉक्सची अदलाबदल झाली असे दाखवून गुप्त संदेश, फिल्म्स, पैसे वगैरेंची देवघेव करायची ही ब्रुसेल्समधील हेरांची आता 'मोडेस ऑपरेंडी' म्हणजे गुन्हे करण्याची पद्धत झाली आहे अशा संशयितांवर पाळत ठेवून, त्यांचे गुप्तपणे चित्रपट काढून घेऊन व भरपूर पुरावा गोळा करून मग त्यांना अमेरिकन व ब्रिटिश पोलिसांनी अटक केल्याची अनेक उदाहरणे घडली आहेत त्यामुळे ब्रुसेल्सला जाणाऱ्या निरपराध प्रवाशांनी सुपर मार्केट किंवा बियरच्या पब्मध्ये आपली सिगारेटची किंवा कपडयाची पेटी चुकून बदलली जाणार नाही याची दक्षता घ्यावी हे बरे ! कारण गिऱ्हाईकांच्या हालचालींचे 'क्लोज सर्किट टी व्ही' वर निरीक्षण करणारे गुप्त पोलिसांचे पथक सज्ज असते सुपर मार्केटमध्ये साबणाच्या पावडरच्या बंद बॉक्समध्ये आधीच लपवून ठेवलेले गुप्त संदेश कौंटरवर त्या साबणाचे पैसे देऊन उघडपणे नेणाऱ्या काही हेरांना ब्रुसेल्समध्ये अटक झाल्याची उदाहरणे आहेत.

ब्रुसेल्सचे सौंदर्य यात आहे, की ती युरोपची राजधानी असूनही लंडन, न्यूयॉर्क, नवी दिल्ली या शहरांचा अवाढव्य गबाळेपणा त्यांना आलेला नाही. हे गाव अजून टुमदार आहे, घरगुती आहे. रस्त्यात, चौकात, उघडया किंवा बंद उपहारगृहात आपुलकी आढळते निर्व्याज मोकळेपणा असतो लघुशंका करतानाच मुलाचा पुतळा उभारून त्याचे कौतुक करणारे हे गाव उपचाराच्या कृत्रिम आडाव्यापलीकडचे आहे १९५६ पासून अगदी अलीकडे म्हणजे १९८१ पर्यंत अनेकदा या गावी जाऊनही मला पुन्हा एकदा ब्रुसेल्सच्या फूटपाथवरच्या खुर्चीवर बसून बियरचे घुटके घेऊ जनांच्या प्रवाहाकडे पाहत बसण्याचा मोह आवरत नाही.

□ □ □

अमेरिकेतील सर्वांत प्रेक्षणीय शहर

# लॉस एंजेलिस

अमेरिकेतील सर्वांत प्रेक्षणीय शहर म्हणजे लॉस एंजेलिस जागतिक महत्त्वाची अशी तीन सर्वोत्कृष्ट प्रेक्षणीय स्थळे इथे आहेत. डिस्नेलँड, हॉलिवुड आणि सफारी अमेरिकेला प्रथमच जाणारे लोक म्हणतात, 'न्युयॉर्कहून मी लॉस एजेलिसला जाणार आहे' पण त्याच्यापैकी बहुतेकाना एकाच देशातील या दोन शहरांतील अतराची कल्पना नसते. हे अतर आहे अडीच हजार मैल ! बसने जवळजवळ सतत प्रवास केला तरी लॉस एजेलिसला पोचायला साडेतीन दिवस लागतात. त्यामुळे अमेरिकेला भेट देणारे बरेच भारतीय प्रवासी न्युयॉर्क, वॉशिग्टन, नायगारा अशा पूर्वेकडील किनाऱ्यावर फिरूनच येतात. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्याजवळ लॉस एंजेलिस, सॅन्फॅन्सिस्को आणि व्हेगस ही खास आकर्षणे आहेत, त्याना बरेच प्रवासी मुकतात.

लॉस एजेलिसला मी प्रथम गेलो ती आठवण अविस्मरणीय आहे. लास व्हेगसहून मी सकाळी सात वाजता विमानाने निघालो विमानात अजिबात गर्दी नव्हती फार तर दहा–बारा उतारू असतील. लॉस एजेलिसला मी पारसनीस याच्याकडे उतरणार होतो त्यांना मी आधीच पत्र टाकून मी केव्हा येणार हेही कळवले होते आणि विमानतळावर आल्यानतर फोन करीन असेही लिहिले होते. त्यामुळे मी अगदी निश्चित होतो सकाळी साडेआठच्या सुमाराला मी लॉस एंजेलिस विमानतळावर उतरलो आणि सामान वगैरे घेऊन नऊ वाजता टेलिफोन केला. पारसनीस हे मूळचे कोल्हापूरचेच. गेली पन्नास वर्षे ते लॉस एंजेलिसला राहत होते. त्यांची जीवनकथा एवढी विलक्षण होती, की मी त्यांची मुलाखत घेतली व ती 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये प्रसिद्धही झाली होती. पारसनीस मला

म्हणाले होते, "लॉस एंजेलिसमध्ये तुम्ही माझ्याकडे उतरा मी एकटाच राहतो आणि माझं घर खूप मोठं आहे" हे पारसनीस आणि त्याचे दोन मित्र १९१४ साली अमेरिकेला आले, ते अगदी विचित्र परिस्थितीत कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी तीन तरुणांना अमेरिकेला पाठवयाचे ठरवले. त्या तिघांत पारसनीस हे एक होते त्यांची बोट मुबईहून निघाल्यावर अचानक पहिले महायुद्ध सुरू झाले फ्रान्सजवळ त्याच्या बोटीवर जर्मन बॉंब पडून ती फुटली हे तिघे फळीला धरून पोहत फ्रान्सच्या किनाऱ्याला लागले आणि तिथून थेट बोटीने लॉस एजेलिसला उतरले

पारसनीसांना मी फोन केला तेव्हा याचा आवाज ऐकू येण्याऐवजी मला टपरेकॉर्ड केलेला पुढील सदेश इग्रजीतून ऐकू आला, "श्री पारसनीस याचा पत्ता बदलला असून नवा पत्ता त्यांनी दिलेला नाही!" झाले! आता या अफाट लॉस एजेलिसमध्ये राहायचे कुठे? अर्थात भरपूर पैसा ज्याच्या गाठी आहे, त्याने या प्रश्नाचे उत्तर 'हॉटेलमध्ये' असे दिले असते पण माझ्या त्यावेळच्या आर्थिक परिस्थितीत तो पर्याय अशक्य नसला तरी अवघड होता म्हणून मी माझ्याजवळचे इतर पत्ते शोधले त्यात अजली कुलकर्णी हा पत्ता मिळाला तिला फोन केला व माझे नाव सांगितले, तेव्हा ती म्हणाली, "अहो, मी तुमच खूप वाचल आहे तुम्ही माझ्याकडेच उतरा" मी त्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन तिच्या '६४२६ पश्चिम चौऱ्याऐंशी रस्त्या' वर टॅक्सीने गेलो अजली व तिचे पती रवींद्र याचा नि माझा इतका स्नेह जमला की त्यांनी मला अनेक दिवस अतिशय आग्रहाने आपल्याकडे ठेवून घेतले योगायोगाने त्याच दिवशी दसरा होता त्या सुमुहूर्तावर मी सीमोल्लघन करून या जगप्रसिद्ध शहरात आलो होतो

सध्या लॉस एजलिसची लोकसख्या पासष्ट लाख आहे अमेरिकेतले हे तिसरे मोठे शहर पहिले न्युयॉर्क, दुसरे शिकागो आणि हे तिसरे पण दोनशे वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती, की इथे वस्ती करावी म्हणून लोकांना प्रलोभने दाखवावी लागत असत कारण अमेरिकेची बहुतेक वस्ती अडीच हजार मैलांवर न्युयॉर्क, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन, बोस्टन या भागात केंद्रित झाली होती रोम, इस्तबूल या जगप्रसिद्ध शहरांसारखा या शहराला प्रदीर्घ इतिहास नाही सबध अमेरिकेलाच नाही

१७६९ साली कॅप्टन गॅस्पर द पोर्टोला या इटालियन सशोधकाच्या पथकाला या ठिकाणी रेड इंडियन लोकांची लहानशी वस्ती आढळली. त्यावेळी या गावाचे नाव यांग–ना असे होते इटालियनांनी त्याचे नाव इटलीतील एका चर्चवरून पॉसिन्कुला असे ठेवले या पथकात बरेच ख्रिश्चन मिशनरी होते त्यांनी तेथील मूळ रेड इंडियनांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा द्यायला सुरुवात केली. अमेरिकन क्रांतीनतर

१७८१ साली कॅलिफॉर्नियाचा गव्हर्नर डॉन फिलिप याने सैन्यासह या गावात प्रवेश केला गावातून प्रशस्त नदी वाहत होती आणि शहर वसविण्यास हे उत्तम ठिकाण होते. या गावची वस्ती वाढावी म्हणून या गव्हर्नरने इथे वसाहत करणाऱ्यांना मोफत जमिनी दिल्या आणि वस्तीचा विकास करण्यास उत्तेजन दिले आज लॉस एंजेलिस-मध्ये एका चौरस फुटाला हजारो डॉलर्स मोजावे लागतात, त्याच ठिकाणी एकरच्या एकर जमीन दोनशे वर्षांपूर्वी सरकारतर्फे मोफत देण्यात येत होती.

त्यावेळी येथे फक्त सत्तर कुटुंबे होती घराची संख्या फक्त तीस होती व दहा-बारा तंबू होते १८०५ मध्ये पहिले अमेरिकन जहाज लॉस एंजेलिसच्या किनाऱ्याला लागले या जहाजाचा कॅप्टनने जेव्हा पूर्वेच्या किनाऱ्यावरील अमेरिकनांना लॉस एंजेलिस भागातील फळाची, पिकाची समृद्धी सांगितली आणि तेथील हवामान उत्तम आहे असे सांगितले, तेव्हा त्या भागात जाण्याची हजारो लोकांना इच्छा झाली. पण अडीच हजार मैलांचा खुष्कीचा प्रवास त्या काळी अत्यंत कठीण होता पण तुरळक जहाजांतून अमेरिकन लोक या किनाऱ्यावर येऊ लागले. मेक्सिकोतून पळून आलेले सैनिक आणि गुन्हेगारही येथे राहण्यासाठी येऊ लागले १८४८ साली अमेरिकेने कॅलिफॉर्नियातील परकियाना जिंकून हा भाग आपल्या अधिपत्याखाली आणला

मात्र कॅलिफोर्नियात मोठ्या प्रमाणावर अमेरिकनांच्या झुंडी येऊ लागल्या, त्या १८४९ सालापासून ! या भागात सोने सापडू लागल्याने सुवर्णाच्या शोधात हजारो लोक दुर्गम प्रवास करून येऊ लागले चार्ली चॅप्लीन याचा अत्यंत गाजलेला, विनोदाने व कारुण्याने ओथंबलेला 'गोल्ड रश' हा चित्रपट याच काळावरच्या पार्श्वभूमीवरचा आहे

एक वर्षात लॉस एंजेलिसची लोकसंख्या दहा हजारावरून पन्नास हजारांवर गेली इतक्या अल्पावधीत एखाद्या गावाची लोकसंख्या पाचपट झाल्याचे हे कदाचित एकमेव उदाहरण असेल. त्यानंतर आगगाडी आली, त्या काळात (व अमेरिकेत आजही) आगगाड्या खाजगी मालकीच्या होत्या दोन रेल्वे वर्षाभराच्या अंतराने लॉस एंजेलिसला आल्या व त्यांच्यात अपूर्व चढाओढ सुरू झाली सदर्न पॅसिफिक व सॅन्ता फे या दोन रेल्वेजनी या चढाओढीत मिसिसिपीपासून लॉस एंजेलिसचे आगगाडीचे दर शभर डॉलर्सवरून नव्वद, सत्तर, पन्नास करीत–करीत अखेर दीड हजार मैलांच्या प्रवासाला सॅन्ता फे रेल्वेने फक्त एक डॉलर भाडे आकारायला सुरुवात केली जगात अशी प्रखर चढाओढ कुठेही झाली नाही याचाच परिणाम म्हणजे दररोज हजारो लोक या भागात येऊन थडकू लागले जेथे हवी तेवढी जमीन मोफत मिळत असे, तेथे दर चौरस वाराला एक हजार डॉलर्सचा दर झाला. लॉस एंजेलिसला प्रचंड धक्का बांधण्यात येऊन मोठ्या बोटींची सोय करण्यात आली

१९२० साली या शहराची लोकसंख्या सहा लाखांपर्यंत वाढली. कॅलिफोर्नियात

तेलाच्या खाणी निघाल्या, हॉलिवुडमध्ये चित्रपट निघू लागले, फळाच्या अवाढव्य बागा झाल्या, गाईबैलांचे खांड आले, विमानतळ आले आणि या शहरावर पैशाचा समृद्धीचा व कीर्तीचा पूरच कोसळला. १९२९ साली यु सी एल. ए (युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफॉर्निया अॅट लॉस एंजेलिस) या जगप्रसिद्ध विद्यापीठाची स्थापना झाली या ख्यातनाम विद्यापीठात आज जगाच्या सर्व भागातून विद्यार्थी येतात आणि ज्यानी नोबेल पारितोषिके मिळवली आहेत असे अनेक ज्येष्ठ प्राध्यापक येथे शिक्षण देतात

एखादे शहर प्रेक्षणीय असणे त्याचे अनेक अर्थ होऊ शकतात एक तर रोम-सारखी दीर्घ परपरा आणि प्राचीन वैभवाचे अवशेष त्याला प्रेक्षणीय करू शकतात, किंवा नायगारा धबधब्यासारखे निसर्गाचा चमत्कार असलेले गाव प्रेक्षणीय होऊ शकते. पण लॉस एंजेलिस हे शहर आहे की त्याला मानवनिर्मित प्रेक्षणीय शहर असे म्हणता येईल डिस्नेलँड, मॅलिवुड आणि लायन कन्ट्री हे या शहराचे तिन्ही विशेष निसर्गाची देणगी नसून मानवाने आपल्या श्रमाने आणि कल्पकतेने निर्माण केलेली ही ठिकाणे आहेत त्यात डिस्ने लँड हे सर्वात अद्‌भुत आहे आबालवृद्धांना एखाद्या स्वप्ननगरीत घेऊन जाणारे ते ठिकाण आहे ते प्रत्यक्ष लॉस एंजेलिस शहराच्या भौगोलिक मर्यादेत नाही याचे कारण उघड आहे डिस्नेलँडचा विस्तार एवढा प्रचड आहे, की आधीच दाटीवाटी झालेल्या लॉस एंजेलिसमध्ये तशी जागा मिळणे अशक्यच होते म्हणून जवळ ॲनहीम येथे वॉल्ट डिस्ने यानी अनेक वर्षांच्या परिश्रमांतून आणि कोटयावधी डॉलर्स खर्च करून १९५५ साली ही नगरी उभारली अमेरिकेत येणारे बहुतेक प्रवासी किनाऱ्याकडे म्हणजे न्यूयॉर्कच्या आजूबाजूला असतात त्यांना लॉस एंजेलिस फार दूर पडते, म्हणून न्यूयॉर्क ते मायामीच्या रस्त्यावर ओरलँडो येथे आता दुसरे डिस्नेलँड उभारण्यात आले आहे त्याला डिस्ने वर्ल्ड असे नाव आहे. मी ही दोन्ही नगरे पाहिली आहेत पण त्यात लॉस एंजेलस नगर सर्वच दृष्टींनी सरस आहे

बेव्हर्ली हिल्टन हॉटेलमध्ये ग्रेलाईन बसचे केंद्र आहे तेथे फोन करून मी डिस्ने लँडच्या सफरीसाठी जागा राखून ठेवली ही सफर सकाळी नऊ ते सध्याकाळी साडेपाच अशी दिवसभर असते मी सकाळी साडेआठलाच हिल्टन हॉटेलमध्ये पोहो-चलो हे हॉटेल म्हणजे जगातील एक अत्यत बादशाही हॉटेल म्हणून प्रसिद्ध आहे हॉलिवुडमधील अत्यत श्रीमंत निर्माते, दिग्दर्शक, कलावंत इत्यादी या बीव्हर्ली हिल्स विभागात राहतात हिल्टन हॉटेलची शान काही वेगळीच आहे या हॉटेलच्या लॉबीएवढी भव्य लॉबी म्हणजे प्रवेशद्वाराजवळचा हॉल मी इतरत्र कोठेही पाहिला नाही त्याचे छत जवळजवळ तीन मजले उंच होते आणि वरून लोंबणारी झुंबरे बैलगाडीच्या चाकाएतढी मोठी होती त्या लॉबीमध्ये मी ग्रेलाईनच्या कचेरीत गेलो. फोनवर रिझर्व्हेशन केल्याचे सागितले आणि तिकीट घेतले. थोड्याच वेळात बस

आली मी आणि माझ्यासारखेच आपले चार–पाच प्रवासी बसमध्ये चढलो. तिथे आमच्या जागा आधीच राखून ठेवल्या होत्या तिथून सुमारे पचवीस मैलावर ॲनहीन हे ठिकाण आहे

आम्ही डिस्ने लॅंडला पोचलो, तेव्हा पार्किंग लॉटमध्ये आमची बस उभी राहिली ही जागा एवढी मोठी आहे, की एका वेळी दहा हजार मोटारी इथे उभ्या राहू शकतात त्या जागेपासून डिस्ने लॅंडच्या हद्दीपर्यंत जाण्यासाठी ट्रॉलीज् आहेत. कारण हे अतरच अर्धा मैल ते एक मैल आहे आम्ही डिस्नेलॅंडच्या हद्दीत गेलो, तेव्हा आमच्या बसमधील चार उतारूंचे चार गट करण्यात आले. प्रत्येक गटाला स्वतंत्र तरुणी गाईड म्हणून देण्यात आली डिस्ने लॅण्ड ही एवढी विशाल नगरी आहे की ती पाहताना गर्दीत चुकामूक होण्याची शक्यता असते म्हणून प्रत्येक गटा-तील प्रत्येक उतारूला ठराविक रगाची रिबन कोटाला किंवा शर्टला छातीजवळ लावण्यात आली. आमच्या गाईड मुलीनेही तशीच रिबन लावली होती. शिवाय तिच्या हातात त्याच रगाचे निशाण होते गर्दीत आमच्या गटाचे सभासद कुठे हर-वले, तर ती मुलगी ते निशाण उच धरीत असे सबघ डिस्ने लॅन्ड सपूर्णपणे पाहायचे तर चार दिवस लागतात पण बहुतेक प्रवासी हे काम एकाच दिवसात उरकून घेतात डिस्ने लॅन्डचा विस्तार दोनशे एकर एवढा आहे आणि ही नगरी सहा प्रमुख विभागांत विभागणी आहे त्या नगरीची विहगम कल्पना यावी म्हणून प्रथम आम्हाला एका आगगाडीत बसविण्यात आले ही गाडी संपूर्ण डिस्ने लॅंडवरून थांबत–थांबत फेरी मारते गाईड त्या–त्या वेळी त्या भागाची माहिती मायक्रो-फोनवरून देत असते आमची गाडी अशी चालू लागली, तेव्हा एका विभागावर थांबली खाली दिसणारे दृश्य अद्‌भुत होते कारण ती आधुनिक अमेरिका नव्हतीच दीडशे वर्षांपूर्वीचे अमेरिकेतील जीवन त्या विभागात पाहायला मिळत होते. घोड्याच्या गाड्या होत्या, जुन्या वाईल्ड वेस्टमधील लोकांचे पोषाख घालून लोक हिंडत होते, नदीतून स्टीमबोट किंवा वाफेवर चालणाऱ्या नावा दिसत होत्या, जुने मद्याचे बार होते, दारूच्या रिकाम्या पिंपावर बसून लोक बियर पीत होते, काही-जण तर चक्क घोड्यावरूनच रपेट करीत होते आमची गाईड म्हणाली, "या नगरीच नाव आहे फ्रटीयर लॅन्ड अमेरिकेत प्रथम वसाहत करणाऱ्यांचे जीवन या भागात तुम्हाला दिसेल " फ्रटीयर लॅन्डवर पधरा मिनिटे थाबून आमची गाडी पुढे निघाली

त्यापुढची नगरी होती, ॲडव्हेंचर लॅन्डची! म्हणजे धाडस नगरी या नगरीत अमेरिकेतील रेड इडियन्स विषारी बाण घेऊन तयार होते, प्रवाशाना घट्ट करण्या-साठी भल्या मोठ्या सुसरी सज्ज होत्या, गलबते लुटण्यासाठी लूटारी (पायरेट्स) हातात तलवारी घेऊन हल्ला करण्याच्या बेतात होते, हत्ती वाघ–सिंह असे जगली

आली मी आणि माझ्यासारखेच आपले चार-पाच प्रवासी बसमध्ये चढलो. तिथे आमच्या जागा आधीच राखून ठेवल्या होत्या तिथून सुमारे पचवीस मैलांवर अॅनहीन हे ठिकाण आहे

आम्ही डिस्ने लँडला पोचलो, तेव्हा पार्किंग लॉटमध्ये आमची बस उभी राहिली ही जागा एवढी मोठी आहे, की एका वेळी दहा हजार मोटारी इथे उभ्या राहू शकतात त्या जागेपासून डिस्ने लँडच्या हद्दीपर्यंत जाण्यासाठी ट्रॉलीज् आहेत कारण हे अतरच अर्धा मैल ते एक मैल आहे आम्ही डिस्नेलँडच्या हद्दीत गेलो, तेव्हा आमच्या बसमधील चार उतारूचे चार गट करण्यात आले. प्रत्येक गटाला स्वतत्र तरुणी गाईड म्हणून देण्यात आली डिस्ने लॅण्ड ही एवढी विशाल नगरी आहे की ती पाहताना गर्दीत चुकामूक होण्याची शक्यता असते म्हणून प्रत्येक गटा-तील प्रत्येक उतारूला ठराविक रगाची रिबन कोटाला किंवा शर्टला छातीजवळ लावण्यात आली. आमच्या गाईड मुलीनेही तशीच रिबन लावली होती. शिवाय तिच्या हातात त्याच रगाचे निशाण होते गर्दीत आमच्या गटाचे सभासद कुठे हर-वले, तर ती मुलगी ते निशाण उंच धरीत असे सबध डिस्ने लॅन्ड सपूर्णपणे पाहायचे तर चार दिवस लागतात पण बहुतेक प्रवासी हे काम एकाच दिवसात उरकून घेतात डिस्ने लॅन्डचा विस्तार दोनशे एकर एवढा आहे आणि ही नगरी सहा प्रमुख विभागांत विभागणी आहे त्या नगरीची विहगम कल्पना यावी म्हणून प्रथम आम्हाला एका आगगाडीत बसविण्यात आले ही गाडी सपूर्ण डिस्ने लँडवरून थांबत-थांबत फेरी मारते गाईड त्या-त्या वेळी त्या भागाची माहिती मायक्रो-फोनवरून देत असते आमची गाडी अशी चालू लागली, तेव्हा एका विभागावर थाबली खाली दिसणारे दृश्य अद्भुत होते कारण ती आधुनिक अमेरिका नव्हतीच दीडशे वर्षांपूर्वीचे अमेरिकेतील जीवन त्या विभागात पाहायला मिळत होते घोडयांच्या गाडया होत्या, जुन्या वाईल्ड वेस्टमधील लोकांचे पोषाख घालून लोक हिंडत होते, नदीतून स्टीमबोट किंवा वाफेवर चालणाऱ्या नावा दिसत होत्या, जुने मद्याचे बार होते, दारूच्या रिकाम्या पिंपावर बसून लोक बियर पीत होते, काही-जण तर चक्क घोडयावरूनच रपेट करीत होते आमची गाईड म्हणाली, "या नगरीचं नाव आहे फ्रंटीयर लॅन्ड अमेरिकेत प्रथम वसाहत करणाऱ्यांचे जीवन या भागात तुम्हाला दिसेल " फ्रंटीयर लॅन्डवर पधरा मिनिटे थाबून आमची गाडी पुढे निघाली

त्यापुढची नगरी होती, अॅडव्हेंचर लॅन्डची! म्हणजे धाडस नगरी या नगरीत अमेरिकेतील रेड इडियन्स विषारी बाण घेऊन तयार होते, प्रवाशाना घट्ट करण्या-साठी भल्या मोठ्या सुसरी सज्ज होत्या, गलबते लुटण्यासाठी लूटारी (पायरेट्स) हातात तलवारी घेऊन हल्ला करण्याच्या बेतात होते, हत्ती वाघ-सिंह असे जंगली

प्राणी दबा धरून होते ही दृश्ये सावध अंतरावरून आम्ही पाहिली मग फार प्रसन्न दृश्य दिसले, ते फॅन्टसी लॅंडचे ! अद्‌भुतरम्यतेत आधीच वॉल्ट डिस्ने हा जगातील सर्वश्रेष्ठ कलावत त्याने निर्माण केलेले 'स्नो व्हाईट', 'बॅंबी', 'पिनॅचिओ' असे चित्रपट मुलाप्रमाणेच प्रौढांनाही अत्यंत आवडलेले या फॅन्टसी नगरीत वॉल्ट डिस्नेने पऱ्या, किल्ले, राजपुत्र, राजकन्या, बाहुल्या याचे अप्रतिम जग उभे केले आहे त्यानंतर 'मेन स्ट्रीट' हा भाग त्यात १८९० ची अमेरिका हुबेहूब उभी केली आहे. 'टुमॉरो लॅन्ड' मध्ये चन्द्रावरचा प्रवास, अणूचे विभाजन, उद्याच्या जगातील रेल्वे आणि अवकाशयाने याची झलक दाखविली आहे

सुमारे दीड तास विहंगमावलोकनच चालले होते मग आम्हाला चहापाणी घेण्यासाठी पधरा मिनिटे देण्यात आली डिस्ने लॅन्डमध्ये उपहारगृहाची मुबलकता आहे खरे तर सबध अमेरिकेतच स्वच्छ, रुचकर, स्वस्त खाद्यपदार्थ सर्वत्र मुबलक मिळतात शाकाहारी अगर मांसाहारी माणसाला कसलेही अन्न मिळते मात्र आपल्यासारखे भरपूर मसाला घातलेले जेवण भारतीय, चिनी किंवा इटालियन स्टॉलसवरच मिळते अर्थात डिस्ने लॅन्डला भेट देणाऱ्या प्रवाशाचे लक्ष खाण्यापिण्यापेक्षा प्रेक्षणीय विभाग पाहण्याकडेच अधिक असते. एका दिवसात इतके अद्‌भुतरम्य स्थळ उरकून घेणे हे अन्यायाचेच आहे असे मला वाटले, आणि आज अर्धे पाहून पुन्हा उद्या उरलेले अर्धे नगर पाहण्यासाठी येण्याचे मी ठरवले

चहा घेतल्यानतर आम्हाला आमच्या गाईडने बरोबर एक तासाची वेळ ठरवून दिली आणि ज्याला त्याला हव्या त्या विभागात वाटेल तेथे फिरून पुन्हा एक तासाने मूळपदावर येण्यास सागितले मी ॲडव्हेंचर लॅन्डला प्रथम पसती दिली तिथे आम्ही एका नावेत बसलो नावेचा वाहक मोठा गमत्या होत्या तो म्हणाला, " या नावेत किती उतारू सुरुवातीला होते ते मी नेहमी मोजतो प्रवास सपल्यावर किती उरतात, हेही मी मोजतो. जेवढा आकडा कमी पडत असेल, तेवढ्या प्रवाशांना या प्रवासात सुसरीने खाल्ले किंवा रेड इडियनांच्या विषारी बाणाना ते बळी पडले असा रिपोर्ट मी मग वरिष्ठांना देतो दर ट्रिपला निदान आठ–दहा लोकाचा बळी द्यावा लागतो."

आमची नाव नदीतून निघाली नदीच्या काठाला एका टोपलीत मानवी कवटयांचा ढीग होता त्या ढिगाऱ्याकडे बोट दाखवून आमचा कप्तान म्हणाला, " माझ्या पहिल्या सफरीतील हे प्रवासी त्यावेळी मला अनुभव नव्हता. त्यामुळे मी त्यांचे नीट सरक्षण करू शकलो नाही पहिल्या प्रवासातील सगळे उतारू दगावले. पण या नावेतील निदान निम्म्या उतारूना तरी मी जिवंत परत नेऊ शकेन असे मला वाटते." असे तो बोलतो न बोलतो तोच दोन अक्राळविक्राळ सुसरी अचानक नदीतून आमच्यावर हल्ला करण्यासाठी आल्या त्याचे भयंकर उघडे जबडे पाहून

आमच्या नावेतील बायकामुलांनी किंकाळचाच फोडल्या पण आमच्या नावेच्या कप्तानाने झटकन आपली बंदूक काढली आणि सटासट गोळचा झाडल्या, तेव्हा त्या दोन्ही सुसरी मरून पडल्या नावाडी म्हणाला, "चला, एक तरी धोका टळला" थोडचा वेळानंतर आमच्या लक्षात आले, की त्या सुसरी कृत्रिम होत्या आणि यंत्राने त्यांच्या हालचाली होत होत्या, तेव्हा आम्हाला आमच्या घाबरटपणाचे खूपच हसू आले इतक्यात आमचा नावाडी म्हणाला, "शांत राहा त्या प्रचंड वृक्षा-मागे उभा राहून तो जंगली माणूस आपल्यावर विषारी बाण मारतो आहे" नावा-डचाने आपल्या रिव्हॉल्व्हरची गोळी त्या आदिवासीवर मारली, त्याबरोबर तोही मरून पडला थोडे पुढे गेल्यावर जंगलातून अनेक हत्ती आमच्या नावेवर चालून येत असल्याचे दिसले पण नावाडचाने नावेची गती एवढी वाढवली की हत्ती पाण्यात शिरण्यापूर्वीच आमची नाव खूपच पुढे गेली होती आणखी काय आता संकट येते, याची आम्ही चिंता करीत असतानाच नदीच्या काठावर एक गमतीदार दृश्य दिसले एक मोठा गेंडा एका झाडाला ढुशा देत होता आणि त्या गेंडचाला भिऊन झाडावर चढलेले चार लोक झाडाला घट्ट धरून वर–वर जाण्याचा प्रयत्न करीत होते आमची नाव अंधारातून गेली, प्राचीन उद्ध्वस्त अवशेषातून गेली आणि वाघ–सिंहाच्या जवळूनही गेली पहिल्या सुसरीच्या प्रवासानंतर अर्थातच हा सर्व यंत्राचा खेळ आहे हे सर्वांच्याच लक्षात आले आणि त्यातील गंमत आम्ही कौतुकाने अनुभवली प्रवासाच्या शेवटी सर्व प्रवासी मोजून आमचा नावाडी म्हणाला, "या ग्रुपमधील सर्वच प्रवासी मोठे पुण्यवान असले पाहिजेत एकही प्रवासी न गमावण्याची ही माझी पहिलीच खेप आहे" हे तो प्रत्येक ट्रिपच्या वेळी सांगत असला पाहिजे हे उघडच आहे.

मग आम्ही भूतमहालामध्ये गेलो. तेथे स्मशानात पेटीत पुरलेली प्रेते पेटी उघडून वर येताना आम्हाला दिसली हडळींनी आमच्या अंगावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर काही कुत्रे अचानक अदृश्य होऊन परत आमच्या पुढे उभे राहत असत. या अंधाऱ्या भूतमहालात अनेक स्त्री–प्रवाशाच्या किंकाळचा ऐकू येतात. प्रचंड भूतमहालातील अखेरचे दृश्य अविस्मरणीय होते तो चमत्कार कसा करतात याचे कोडे बराच वेळ विचार करूनही मला सुटलेले नाही शेवटच्या फेरीत एका छोटचा उघडचा आगगाडीत सर्व प्रवाशांना बसविण्यात येते प्रत्येक डब्यात दोनच प्रवासी असतात गाडी सुरू होताना घोषणा ऐकू आली, 'इथून जाताना तुमच्या-पैकी प्रत्येकाबरोबर एक–एक भूत येईल समोरच्या आरशात पाहा.' गाडी सुरू झाली भिंतीला लांबलचक आरसे लावले होते त्यात प्रथम आम्हाला दोन–दोन प्रवासी दिसले पण थोडचाच वेळात असा चमत्कार झाला की माझ्याबरोबरच्या अमेरिकन प्रवाशाऐवजी आरशात मला एक भूत दिसले. त्या प्रवाशालाही माझ्या-ऐवजी एक भूत दिसले आणि त्याचे स्वतःचे प्रतिबिंब मात्र अचूक दिसले!

मग एका अधाऱ्या मार्गावरून आपला प्रवास सुरू होतो त्या वाटेवर पूर्वीचाचे लोक जहाचे लुटून प्रवाशाचे खून कसे करीत असत, बायकांचे भर बाजारात लिलाव कसे पुकारले जात असत, फाशीची शिक्षा कशी दिली जाई ही दृश्ये दिसतात त्यात माणसांच्या आकारांच्या बाहुल्याची कामे असतात. पण त्या इतक्या हुबेहूब असतात, की ती खरी माणसे आहेत असाच भास होतो या ॲडव्हेंचर लँड-नतर मी 'टुमॉरो लॅन्ड' मध्ये गेलो तेथे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे अवकाश-यानात बसून चद्रावरचा प्रवास करणे. अमेरिकेने चद्रावर पाठविलेल्या यानासारख्या यानात आम्ही बसलो. आम्हाला पट्टे आवळून घेण्यास सांगण्यात आले यानांच्या खाली दोन मोठ्या खिडक्या होत्या. त्याच्या काचेतून आम्हाला अग्निबाण दिसत होता १०, ९, ८, ७, असे आकडे पुकारता–पुकारता शून्यानतर क्षणभरातच खाली प्रचड ज्वाळा दिसल्या आणि आमचे यान हलू लागले.

खिडक्यातून आम्ही खाली पाहिले, तेव्हा पृथ्वी लहान–लहान होताना दिसली मग तारे आमच्या यानाजवळून जाऊ लागले. थोड्या वेळाने चंद्र मोठा होत आमच्या जवळ आला आमचे यान चद्रावर उतरले. तिथून आम्ही पृथ्वीकडे दृष्टि-क्षेप टाकला तर ती पाणी आणि जमीन यांचा एक लहानसा चेंडू होऊन स्वत भोवती संथ फिरताना दिसत होती. बाहेर चद्रावरची जमीन आणि दूर, लक्षावधी मैल अंतरावर छोटीशी पृथ्वी हे दृश्य विलक्षण परिणामकारक होते खरे तर हा सारा आभास चित्रपट, स्लाईड्स, प्रकाश–अंधार याच्या साहाय्याने निर्माण केलेला होता पण तो इतका परिपूर्ण होता की अर्ध्या तासात आम्ही चद्रावरची सफरच करून आलो असे आम्हाला वाटू लागले. यानातून बाहेर पडल्यावर अनेकांना खरोखरच गरगरू लागले, एवढी ती किमया वास्तव होती याच टुमॉरो लॅंडमध्ये 'अणूचे अंतरग' दाखविण्याची सोय आहे अणू आणि परिमाणू यांच्या गर्भात घेऊन जाणाऱ्या गाडीत आपण बसलो की प्रकाश आणि रग याचे विलक्षण चैतन्य-शाली जग पाहायला मिळते.

डिस्ने लॅंडच्या रस्त्यावर अस्वल, ससा, मिकी माऊस याचे वेष घातलेले लोक उभे असतात या 'प्राण्या'च्या बरोबर आपले फोटो काढून घेणे मुलानाच नव्हे तर त्यांच्या पालकांनाही अतिशय आवडते मेन स्ट्रीट हा डिस्ने लॅंडचा आणखी एक आकर्षक भाग त्या भागातील इमारती, दुकाने, त्या दुकानातील विक्रेते, विक्रीचा माल वगैरे सर्व त्या काळातल्या अमेरिकेसारखेच ठेवलेले आहे या भागातील 'डायमड हॉर्स शू' हे उपहारगृह हे विशेष पाहण्यासारखे आहे. १८९० सालाप्रमाणेच या भागात घोड्यावरून काऊबॉईज येतात आणि या लाकडी उपहारगृहात उलट्या पिंपावर ठेवलेल्या बियर ग्लासेस्मधून बियर घेतात. एवढेच नव्हे, तर त्या काळातल्याप्रमाणे लाब झगे घालून गिटारच्या तालावर नृत्य

करणाऱ्या सुंदरीही इथे पाहायला मिळतात. अनेक प्रवासी या ठिकाणी बियर घेऊन ऐंशी–नव्वद वर्षे मागे जातात

या भागात 'वॉल्ट डिस्ने चित्रमंदिर' आहे त्यात वॉल्ट डिस्ने याचा जीवनपट व त्यांच्या निवडक व्यंगपटांतील निवडक भाग दाखविण्यात येतात लिबर्टी चौकात 'हॉल ऑफ प्रेसिडेंट्स' आहे या ठिकाणी अब्राहम लिंकनचा पुतळा आहे तो भाषण करतो आणि भाषणाच्या शेवटी इकडे तिकडे फिरतो तेव्हा आपल्या लक्षात येते की बोलत्या पुतळ्याची नक्कल करणारा तो एक अभिनयकुशल नट आहे.

फॅन्टसी लॅंडमध्ये मध्ययुगीन अवाढव्य किल्ला आहे या भागात घोडे घोड्याच्या गाड्या सर्वत्र दिसतात इतकेच नाही, तर मध्ययुगीन काळाप्रमाणे अनेक सरदार व शिलेदार त्या वेळच्या पोषाखात दिसतात, जगातील शकडो प्रकारच्या बाहुल्यांचे अतिशय देखणे प्रदर्शनही या भागात आहे 'स्नो व्हाईट अँड सेव्हन ड्वार्फ्स' (हिमगौरी आणि सात बुटके), बँबी, फॅन्टासिया इत्यादी डिस्ने चित्रपटातील अनेक पात्रे या भागात सजीव झालेली दिसतात फ्रंटियर लॅंडमध्ये अस्वलाचा अप्रतिम ऑर्केस्ट्रा आहे या नाट्यगृहातील भिंतीवर गव्हू रेडा, हत्ती, सिंह, वाघ यांची डोकी भिंतीवर लावलेली आहे गमत म्हणजे अस्वलांचा आर्केस्ट्रा चालू होतो तेव्हा ही निर्जीव वाटणारी डोकी माना हलवून संगीताला दाद देतात

एका नदीच्या काठावर पाणबुड्या आहेत त्या पाणबुडीत आपण बसून खाली जाऊ शकतो त्यावेळी ऑक्टोपस, देवमासे असे अनेक प्रकारचे जलचर आदी जवळून पाहायला मिळतात तसेच पाण्यात बुडालेल्या जुन्या बोटीचे अवशेष आणि त्यातील दुर्दैवी खलाशाचे सांगाडेही पाण्याच्या तळाशी दिसतात 'सर्कल व्हिजन ३६०' हा चित्रपटाचा अद्‌भुत प्रकार आहे त्यात प्रेक्षक मधोमध उभे राहतात आणि चित्रपटाचा पडदा प्रेक्षकाच्या भोवती संपूर्ण गोलाकार असतो प्रत्यक्ष जीवनात ज्याप्रमाणे सर्व बाजूला दिसते, त्याप्रमाणेच हा गोल चित्रपटही सर्व बाजूंना दिसतो डिस्ने लॅंडची ही अशी अद्‌भुत कथा न संपणारी आहे, निदान कधीच संपू नये अशी आहे ती अद्‌भुत नगरी दोन दिवस पाहून मी तृप्त झालो

आता लॉस एंजेलिसचे दुसरे मोठे आकर्षण हॉलिवुड ! मी लहानपणी कोल्हापुरात होतो, तेव्हा आमच्या घराजवळच हंस टॉकीज नावाचे चित्रमंदीर होते फेरीस मार्केटजवळ अमेरिकन सिनेमा नावाचे दुसरे चित्रमंदिर होते मुख्य गावापासून दूर, दीड-दोन मैलांवर व्हीनस नावाचे तिसरे सिनेमाचे थिएटर होते या व्हीनसची तिकिटे गावातील ज्यांनी काढली असतील, त्यांना सिनेमाला नेण्यासाठी आणि सिनेमा संपल्यावर परत पोचवण्यासाठी सिनेमावाल्याची सर्व्हिस मोटार मोफत मिळत असे. सिनेमाचे तिकीट दोन आणे त्यातच या दोन फेऱ्याही करता येत असत. त्या काळा-

पासून म्हणजे सुमारे चाळीस–पंचेचाळीस वर्षांपासून हॉलिवुड या नावाची खोल छाप आमच्या मनावर पडली होती जिथून ग्रेटा गार्बो, चार्ली चॅपलिन, लॉरेल–हार्डी, पॉल म्युनी, मेरिलीन मन्रो, चार्ल्स बॉयर अशा जगविख्यात नटनट्यांचे चित्रपट निघाले, ते मूळ चित्रपट पीठ याचि देही याचि डोळा कधी मला पाहायला मिळेल असे लहानपणी स्वप्नातही वाटले नव्हते कारण ही मंडळी कुठे तरी स्वर्गात मुक्काम करीत असतील आणि त्यांचे दर्शन फक्त रुपेरी पडद्यावर घ्यायचे हीच आमची कल्पना. पण आता साडेतीन तपानंतर अघटित घडले होते आणि हॉलिवुडच्या मुख्य दरवाजासमोर उभा होतो

हॉलिवुडने सुसंस्कृत जगावर पन्नासवर वर्षे साम्राज्य गाजवले स्त्री–सौंदर्य, प्रेम आणि साहस यांची स्वप्ने जगाला याच हॉलिवुडने अर्ध शतकाहून अधिक काळ पुरवली लॉस एंजेलिसवर दीर्घकाळ तळपणारा सूर्य, निसर्गसौंदर्य आणि मुबलक पाणी व जमीन यामुळे अमेरिकन चित्रपटसृष्टी या भागाकडे आकर्षित झाली मात्र त्या चित्रसृष्टीचा जन्म हॉलिवुडमध्ये झालेला नसून १९०८ साली शिकागो येथे झाला 'माऊंट ऑफ क्रेस्टो या पहिल्या चित्रपटाचे चित्रीकरण हा अमेरिकन चित्रपटसृष्टीचा प्रारंभ. पण त्या कामात चित्रीकरण मुख्यत सूर्यप्रकाशात करावे लागत असे आणि त्या कामासाठी शिकागो हे आदर्श गाव नव्हते शिकागोचे ढगाळ आकाश, वादळी वारे आणि कामगारवर्गाला कारखान्यात अधिक सुरक्षित कामे मिळत असल्याने चित्रपटासारख्या अस्थिर व नव्या क्षेत्राकडे येण्याविषयीची त्यांची उदासीनता यामुळे शिकागोऐवजी इतर ठिकाण शोधण्याला सुरुवात झाली १९१० साली लॉस एंजेलिसला चित्रपटाचे चित्रीकरण सुरू झाले १९१४ मध्ये सेमिल बी डिमिल हे भव्य चित्रपट काढणारे निर्माते तेथे आले त्यांच्या मागोमाग चार्ली चॅप्लीन, हॅरोल्ड लॉईड, डग्लस फेअरबँक्स, ग्रेटा गार्बो इत्यादी कलावंत आणि मेट्रो गोल्डविन मेयर, युनिव्हर्सल, वॉर्नर ब्रदर्स, ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स, कोलंबिया अशा कंपन्या तेथे येऊन हा भाग गजबजून गेला. आता पन्नाशीच्या पुढे आलेल्या बहुतेकांना बालपणातील व तरुणपणातील अत्यंत सुखद क्षण दिले, ते या हॉलिवुडने ! ग्रेटा गार्बो, मर्लिन डिट्रिच, मेरिलिन मन्रो, एलिझाबेथ टेलर अशा हॉलिवुडच्या अभिनेत्री हे सौंदर्याचे जागतिक आदर्श मानले जाऊ लागले.

हॉलिवुडच्या चित्रपटांनी जगभर नव्या–नव्या चित्रपटनिर्मात्यांनाही स्फूर्ती दिली. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटाली या पाश्चात्त्य देशांत आणि भारत, जपान, हाँगकाँग अशा पौर्वात्य देशांत जोमाने चित्रपटांची निर्मिती सुरू झाली आज भारत हा संख्येच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचा चित्रपट–निर्माता देश असला तरी चाळीस –पन्नास वर्षांपूर्वीच्या हॉलिवुडच्या चित्रपटाच्या गुणवत्तेचा एक अंशही भारतीय चित्रपटात सर्वसाधारणपणे दिसत नाही १९६० नंतर टेलिव्हिजन सर्वत्र लोकप्रिय

झाला त्यानंतर मात्र हॉलिवुडचा सुवर्णकाळ ओसरत चालला असूनही हॉलिवुडमध्ये चित्रपटांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होते पण ग्रिफिथ, चार्ली चॅपलीन, पॉल म्युनी, चार्ल्स बॅयर, ग्रेटा गार्बो यांचा काळ जगाला मात्र कधीही अनुभवायला मिळणार नाही ज्यानी तो भोगला, ते धन्य।

सुमारे तीस एक प्रवाशाचा आमचा गट हॉलिवुडमधील युनिव्हर्सल स्टुडिओ-च्या दरवाजात आला, तेव्हा स्टुडिओतर्फे आमचे एका प्रसन्न सुदरीने स्वागत केले. मग प्रथम तिने आम्हाला हॉलिवुडचा थोडक्यात इतिहास सांगितला आम्ही गेलो, त्या आधी दोन–तीन महिनेच जॉन केनेडी यांच्या जीवनावर 'टी पी नाईन' नावाचा एक चित्रपट युनिव्हर्सलमध्ये काढण्यात आला होता त्या चित्रपटात जॉन केनेडी हे वादळी समुद्रातून एक लहानशी मोटरबोट मोठ्या धैर्याने नेतात असे दृश्य होते, ते आम्हाला दाखवण्यात आले. मग आमची गाईड म्हणाली, "हे दृश्य पाह-ताना तुम्हाला वाटल असेल की, केनेडीच काम करणारा नट आणि त्याच्याबरोबर प्रवास करणारी नटी यांनी आपला जीव किती धोक्यात घातला असेल! पण हे दृश्य कस घेण्यात आल याच आता आम्ही तुम्हाला प्रात्यक्षिक दाखवतो त्यासाठी तुमच्यापैकी एक पुरुष आणि एक स्त्री यानी या दृश्यात काम करण्यासाठी पुढं याव"

आम्हा प्रवाशापैकी एक ब्रिटिश तरुण आणि एक इटालियन तरुणी पुढे झाली एका प्लॅटफॉर्मवर एक लाकडी नाव ठेवली होती त्या नावेत तें दोघे उभे राहिले त्याच्या मागे पांढरा पडदा होता त्या पडद्यावर समुद्राच्या प्रचड लाटा खाली–वर होत असल्याचे दृश्य दिसू लागले आता चित्रीकरण सुरू झाले स्प्रिंगच्या साहाय्याने ती लाकडी नाव हलू लागली मागे सागराच्या लाटा उसळत होत्या, वरून कारं-ज्याच्या साहाय्याने त्या तरुण–तरुणीवर पाण्याचा शिडकावा होत होता चित्रीकरण सपल्यावर थोड्या वेळाने आम्हाला ते दृश्य दाखविण्यात आले, तेव्हा ती दोघे खरोखरोच भयंकर खवळलेल्या सागरातून अतिशय धोक्याचा प्रवास करीत आहेत, असे दिसले. आम्ही हॉलिवुडच्या कल्पकतेचे कौतुक केले शेवटी आमची गाईड म्हणाली, "इतक्या धोक्याच्या प्रवासातून आपल्याला सुखरूप आणल्याबद्दल आत्ताच्या प्रात्यक्षिकातील सुदरीनं आपल्या सहकाऱ्याला चुबन द्याव अशी मी विनती करते" त्याप्रमाणे त्या इटालियन तरुणीने चुबन दिले, तेव्हा आपण हा 'धोका' पत्करून चित्रपटात काम करायला हवे होते असे आमच्यापैकी अनेकाना वाटले.

मग आम्ही एका छोट्या आगगाडीत बसलो आणि युनिव्हर्सलचे औटडोअर सेट्स पाहायला निघालो स्टुडिओचे आवार कित्येक मैलांचे आहे ते सर्व पायी जाऊन पाहणे अशक्य आहे या विस्तीर्ण आवारात अनेक दृश्ये माडण्यात आली होती. एका विभागात इजिप्तमधील एक खेडेगाव तयार करण्यात आले होते.

मातीची, धाब्याची घरे, औत, जवळच उभे असलेले उंट याद्वारे इजिप्तमधील वातावरण हुबेहुब उभे करण्यात आले होते

पुढे एका ठिकाणी अमेरिकेतील वाईल्ड वेस्ट या भागातले शभर वर्षांपूर्वीचे दृश्य होते लाकडी घरे, बियरच्या पिपाचे पानगृह, घराजवळचे घोडे आणि चामड्याचे गुडघ्यापर्यंत उंच बूट घातलेले व उंच हॅट्स घातलेले पिस्तुलधारी काऊबॉईज यांनी ते दृश्य परिपूर्ण केले होते एका ग्रामीण गुत्त्यातल्या मारामारीचे प्रात्यक्षिक आम्हाला दाखवण्यात आले त्या मारामारीत गुत्त्यातल्या अनेक बाटल्या फुटल्या गुंडाच्या दोन गटांतल्या लोकांनी उलट बाजूच्या गुंडाच्या डोक्यावर आपटूनही काही बाटल्या फोडल्या दोघांनी चाकूचे हल्ले केले एक जखमी होऊन पडला आणि त्याच्या छातीतून रक्त वाहू लागले एका तीन मजली इमारतीला आग लागल्याचे एक दृश्य दाखवण्यात आले त्यावेळी अंगावरील कपडे जळत असतानाही स्टंटमॅन तिसऱ्या मजल्यावरून कशी उडी मारतो हेही आम्ही पाहिले

नंतर फारच मजेशीर दृश्य दाखवले गेले त्यापूर्वी आम्हाला नेपोलियनच्या काळातील एका युद्धपटातील काही भाग दाखवण्यात आला त्या दृश्यात प्रचंड बोटीवर तोफा डागल्या जातात, काहींना आग लागते व बोटी बुडतात, असे दाखवले होते मग हे दृश्य कसे चित्रित केले गेले हेही आम्हाला आमच्या गाईडने दाखवले ही सारी लढाई चार फूट रुंद आणि सहा फूट लांब अशा एका पत्र्याच्या हौदात आयोजित करण्यात आली होती त्या हौदात पाणी भरले होते हौदाच्या नळाला तोटचा जोडल्या होत्या व त्यातून वारा खेळवून लाटांचा आभास निर्माण केला होता चार–सहा इंच लांबीच्या छोटचा बोटी तयार करण्यात आल्या होत्या व अगदी जवळून त्यांची फिल्म घेऊन त्या प्रचंड बोटी आहेत असा आभास निर्माण करण्यात आला होता

पण मला हॉलिवुडमधील सर्वांत संस्मरणीय असा कोणता प्रकार दिसला, तो म्हणजे बटन दाबल्याबरोबर पाऊस पाडण्याचा ! एका खेड्याचे दृश्य होते, आणि आमची गाईड म्हणाली, "आता या गावावर मी पाऊस पाडून दाखवते." तिने जवळचे एक बटन दाबले आणि आमच्या डोळ्यासमोर आकाशात एकही ढग नसताना त्या गावावर पाऊस पडू लागला त्यातली झाडे, घरे, खांब यांच्यावर बारीक झरे ठेवले होते आणि त्यातून उडणारे प्राणी अगदी खराखुरा पाऊस पडत असल्याचा अभास निर्माण करीत होते. स्टुडिओच्या या फेरफटक्यात आम्हाला स्त्रियांचे आणि पुरुषांचे रंगपटही दाखविण्यात आले आम्ही लहानपणापासून ज्यांची नावे ऐकून भारावून जात असू, त्यांनी याच ठिकाणी रंगभूषा केली होती या कल्पनेने आम्ही रोमांचित झालो, मग आम्हाला एका बसमधून हॉलिवुडचा इतर भाग दाखविण्यात आला. सध्याच्या नटनटचांची घरे आणि काही माजी कला-

कारांची घरेही आम्हाला दाखवण्यात आली अर्थात बाहेरूनच लक्षावधी डॉलर्स मिळवणाऱ्या त्या कलाकारांची घरे म्हणजे प्रचड प्रासाद नसून कॉन्टिनेन्टल किंवा विशेषतः स्पॅनिश पद्धतीची एकमजली किंवा फार तर दुमजली लहान घरे होती पण त्यांच्यासमोर विस्तीर्ण बागा, स्विमिंग पूल्स वगैरे होती बहुतेक घराचा रंग पांढराशुभ्र होता सनसेट बुलेव्हार्ड या सुप्रसिद्ध रस्त्यावर रविशंकर यांचे घरही आम्ही पाहिले

'चायनीज थिएटर' ही हॉलिवुडमधील नामवंत वास्तू आहे. या चित्रमंदिरात हॉलिवुडमध्ये तयार असलेल्या चित्रपटांचे शुभारंभाचे खेळ होतात त्यावेळी त्यात काम करणाऱ्या प्रमुख नटनट्यांचे हाताचे किंवा पायाचे ठसे सिमेंटच्या जमिनीत तयार करून घेण्यात येतात व त्याची स्वाक्षरीही असते. ग्रेट गार्बो चॅर्ली चॅप्लीन, एलिझाबेथ टेलर, मर्लिन ब्रँडो अशा जागतिक कीर्तीच्या कलाकाराच्या हाताचे ठसे व स्वाक्षऱ्या येथे आहेत एकदा अशाच एका सहर्षांच्या समारभात गडबडीत एक अभिनेत्री पाय घसरून ओल्या सिमेंटवर पडली तेव्हा तिच्या नितबांचाही ठसा सिमेंटमध्ये उमटला आणि तो तसाच जपून ठेवण्यात आला आहे.

'लायन कंट्री' किंवा सफारीची कल्पना आता भारतासह जगातल्या अनेक देशांत प्रत्यक्षात आणण्यात आली आहे पण लॉस एंजेलिसची लायन कंट्री ही अगदी सुरुवातीच्या सफारीपैकी एक आहे शहराच्या जवळच असलेल्या लॅगून हिल्स या जगलाचा फार मोठा भाग 'लायन कंट्री' साठी राखून ठेवण्यात आला आहे या भागात हत्ती, सिंह, गेंडा, वाघ, चित्ते, जिराफ, पाणघोडे वगैरे प्राणी नैसर्गिक जगलातल्याप्रमाणेच मोकळे सोडलेले आहेत त्यांना पाहायला जाणाऱ्या लोकानी मात्र बंद मोटारीतून जायचे असते. लायन कंट्रीची बस सफर जवळ जवळ तीन तास चालते या बसेस् अगदी सथ चालतात व अधूनमधून थाबतात त्यावेळी सिंह, वाघ वगैरे पशू अगदी जवळ येतात व काही वेळा तर ते सरळ मोटारीच्या बॉनेट-वर जाऊन आरामात बसतात लायन कंट्रीला भेट देणाऱ्यांच्यावर काही अनवस्था प्रसंग येऊ नये म्हणून तेथील रक्षक बद जीपमधून व हातात भरलेल्या बंदुका घेऊन फेऱ्या मारीत असतात हिंस्त्र प्राण्याचा मुक्त संचार अगदी जवळून पाहणे ही एक मोठी मौजेची गोष्ट आहे

लॉस एंजेलिस आणि सॅनफ्रॅन्सिस्को या अमेरिकेच्या पूर्वेकडील किनाऱ्या-वरच्या दोन्ही शहरात ओसडून जाणारे चैतन्य आहे दर क्षणी काही तरी नवे–नवे घडत राहते. नाटक, चित्रपट, ऑपेरा, सगीत याचे लॉस एंजेलिस हे अत्यंत प्रसिद्ध असे केंद्र आहे येथील 'म्युझिक सेन्टर फॉर द परफॉर्मिंग आर्टस्' हे कलाकेंद्र तर कोणत्याही शहराला त्याचा हेवा वाटावा असे आहे साडेतीन कोटी डॉलर्स खर्च करून १९६६ साली उभारलेल्या या भव्य केंद्राने सात एकर जागा व्यापली आहे.

त्यावर चार प्रेक्षागृहे आहेत. त्यापैकी सर्वात मोठ्या प्रेक्षागृहाचा रंगमंच १६९ फूट रुंद, ४० फूट उंच व १०४ फूट खोल–म्हणजे पडद्यापासून शेवटची भिंत १०४ फुटांपर्यंत आत आहे हा रंगमंच लहान–मोठा करता येतो, म्हणजे १६९ फुटांपैकी मधला पन्नास फुटांचाच भाग वापरायचा असेल तर तसाही वापरता येतो या चार प्रेक्षागृहात साडेतीनशेपासून तीन हजारापर्यंत प्रेक्षक बसतील अशी वेगवेगळ्या सोयींची नाट्यगृहे आहेत त्यापैकी एक नाट्यगृह तीन पातळींवरचे (लेव्हल्स) आहे कॅलिफॉर्नियातील सर्वात मोठे असे हे 'म्युझिक सेंटर' आहे याशिवाय अमेरिकेतील इतर प्रमुख शहराप्रमाणे लॉस एंजेलिसमध्येही चित्रकलेची अनेक वस्तुसंग्रहालये, उत्कृष्ट उद्याने, चित्रपटगृहे यांची रेलचेल आहे जेवण भरपूर प्रकारचे आणि स्वस्त मिळते

लॉस एंजेलिस बंदरही अतिशय भव्य आहे दरसाल हजारो बोटीतून कोट्यावधी डॉलर्सचा माल येथे येतो आणि येथून निर्यात होतो एके काळी पश्चिम किनाऱ्यावरील हे सर्वात मोठे बंदर होते. पण गेल्या दोन तपात सॅनफ्रॅन्सिस्कोने हा मान आपल्याकडे घेतला आहे विमानवाहतूक सुरू झाल्यापासून प्रवासी वाहतुकीसाठी बोटीचा वापर कमी होत असला तरी अजूनही लॉस एंजेलिसहून होनोलुलू व व जपानकडे जाणाऱ्या लक्झरी बोटींचा दिमाख कमी झालेला नाही लॉस एंजेलिसचा विमानतळ या शहराच्या कीर्तीला साजेसाच आहे तेथे रोज अठराशे ते दोन हजार विमानांचे उड्डाण व आगमन होते या विमानतळावर मालवाहतूक एवढी मोठी आहे की त्यासाठी 'कार्गो सिटी' हा स्वतंत्र विमानतळ बांधावा लागला

बाकीचे लॉस एंजेलिस शहर साधारण मुंबईच्या धर्तीवरच आहे अर्थात अत्यंत शिस्तीचे आणि स्वच्छ सुमारे दीडशे मराठी कुटुंबे या शहरात आहेत आणि त्यांचे उत्तम महाराष्ट्र मंडळही आहे आणि वॉशिंग्टनपेक्षा एकंदरीत वातावरण खेळीमेळीचे असल्याने मराठी माणसाला लॉस एंजेलीस हे शहर विशेष जवळचे आहे

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

एक प्राचीन शहर

# रोम

रोम हे जगातील असे एकमेव शहर आहे, की जे सर्वांनाच माहीत आहे, पण कुणालाच समजले नाही. या शहराचा तीन हजार वर्षांचा इतिहास इतक्या विरोधाभासांनी भरला आहे, की त्यातील खरे काय आणि खोटे काय याबद्दल मोठमोठ्या पंडितांना आणि तत्त्ववेत्त्यांनाही संभ्रम पडावा. खवळलेल्या सिंहांच्या पुढे भक्ष्य म्हणून निष्पाप ख्रिश्चनांना टाकणाऱ्या रोमन सम्राटाचे क्रौर्य खरे, की मृदुल फुलाहूनही भावस्पर्शी महाकाव्य लिहिणाऱ्या महाकवी डांटेसारख्या कवीचे अमर काव्य खरे? कोलिसियम हे जगातले सर्वात रक्ताळलेले मैदान खरे की ख्रिस्ताची अमर करुणा चितारणाऱ्या आणि दगडालाही महत्त्व देणाऱ्या मायकेल अँजेलोच्या कलाकृती खऱ्या? सीझरचा पराक्रम, मार्क अँन्टनीचे वक्तृत्व, क्लिओपात्राचे जगविख्यात लावण्य, अर्ध्या जगाची धार्मिक राजधानी असलेल्या व्हॅटिकनची अध्यात्मिक अधिसत्ता, मुसोलिनीने जगावर आणलेले महायुद्धाचे संकट, गॅलिलिओचे मानवी जीवनाच्या कक्षा क्षितिजापार नेणारे विज्ञान, यातील सत्यासत्यता यांचा पडताळा घेणे कठीण! सबंध महासागर डोळ्यांच्या टप्प्यात मावणे कठीण, तसे सबंध रोम शहर समजणे दुर्लभ! शेक्सपीयरपासून शॉपर्यंतच्या सर्वश्रेष्ठ साहित्यिकांना स्फूर्ती देणारे चिरंतन रोम खरे की आजचे आळशी, गलथान ऐषआरामी रोम खरे? सहा हजार गुलामांची प्रेते भर रस्त्यावर लटकत ठेवणारे रोम हेच आणि सेंट पीटरचे साखळदंड शेकडो वर्षे जपून ठेवून त्याची पूजा करणारे भावनाप्रधान रोम हेच! इतके गुंतागुंतीचे, परस्परविरोधी आणि तरीही लोभसवाणे व्यक्तिमत्त्व जगातील इतर कोणत्याही शहराला लाभलेले नाही.

टायबर नदीच्या काठी एका टेकडीच्या आसपास इसवी सन पूर्व ७५३ मध्ये

रोमची स्थापना झाली त्यानंतर अडीचशे वर्षे या शहरावर रोमन राजांनी राज्य केले शहराचा विस्तार वाढून सात टेकड्या आणि त्यामधला भाग मिळून हे शहर झाले. व्हीनस व मगळ या देवतांच्या आशीर्वादाने हे शहर जन्मले आणि सर्व ज्ञात जगतावर राज्य करण्यासाठीच या दैवी शहराचा जन्म झाला अशी रोमनांची भावना होती इ स पूर्व ५०९ मध्ये रोमन प्रजासत्ताकाची स्थापना झाली इ स. पूर्व ३९० मध्ये गॉल या जमातीने रोमवर हल्ला केला पण रोमनानी तो परतवून लावला शहराच्या रक्षणासाठी त्यावेळी शहराभोवती भिंत बांधण्यात आली इ स २१६ मध्ये जगप्रसिद्ध हानिबालने रोमचा पाडाव केला. इ स पूर्व ४४ मध्ये सम्राट सीझरचा खून झाला त्यानंतर पराक्रमी ऑगस्टस याने इ स २७ मध्ये रोमन साम्राज्याची स्थापना केली हे वैभवशाली साम्राज्य एक हजार वर्षे टिकले इतके दीर्घकाल टिकलेले आक्रमक, पराक्रमी, क्रूर, कलात्मक आणि चैतन्यमय साम्राज्य जगाच्या इतिहासात दुसरे झालेले नाही

इ. स ६४ मध्ये रोमन सम्राट नीरो याने ख्रिश्चनांची कत्तल करण्यास सुरुवात केली. त्यातच सेन्ट पीटरचा वध झाला त्यानतर तीनच वर्षांनी सेन्ट पॉल यांना रोममध्येच हौतात्म्य आले सम्राट मार्कस् आरुलस याने इ स १७६ मध्ये जर्मन आणि सॅमाटिटन्स यांच्यावर मिळविलेल्या विजयाचे स्मारक म्हणून विजयस्तभ उभारण्यात आला २०३ मध्ये असीरियावर रोमने विजय मिळवला म्हणून सेप्टिमस सेव्हिटसची विजय कमान उभारण्यात आली २८४ मध्ये रोमच्या अफाट साम्राज्याची पश्चिमेचे साम्राज्य आणि पूर्वेचे साम्राज्य अशी विभागणी झाली इ.स. ३३० मध्ये सम्राट कॉन्स्टन्टाईनने रोमन साम्राज्याची राजधानी रोमहून हलवून ती बिझंटाईन येथे नेली आणि त्या नगरीचे नामकरण कॉन्स्टन्‌टिनोपल उर्फ पूर्वेचे रोम असे करण्यात आले

कॉन्स्टनटाईन हा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करणारा पहिला रोमन सम्राट इ स. ४४० मध्ये लिओ द ग्रेट हे पोप झाले नतरच्या तीस वर्षात रोमन साम्राज्याचा ऱ्हास झाला इ स ८०० मध्ये चॅर्लेमन याचा रोमन सम्राट म्हणून सेंट पीटर्स चर्चमध्ये पोप लिओ तिसरे यांनी राज्याभिषेक केला नीरो या सम्राटाने ज्या पीटरचा ख्रिश्चन असल्याबद्दल वध केला, त्याच पीटरच्या स्मृतीसाठी बांधलेल्या चर्चमध्ये साडेसातशे वर्षांनी रोमन सम्राटाने अधिकारग्रहण करावे हा नियतीचा सूडच होता त्यानतर फेडरिक, ऑटो अशा अनेक सम्राटाचे राज्यभिषेक पोप यांच्या हस्ते याच सेंट पीटर्स चर्चमध्ये झाले १३७७ साली पोप अकरावे जॉर्ज यांनी पोप यांचे निवासस्थान सेंट लॅटरन चर्चमधून व्हॅटिकनमध्ये आणले. तेव्हापासून व्हॅटिकन ही ख्रिश्चन जगताची राजधानी झाली आहे. १५०६ साली सध्याच्या सेन्ट पीटर्स चर्चची कोनशिला घालण्यात आली. १५१२ मध्ये मायकेल अँजेलोने जगप्रसिद्ध

सिस्टिम चॅपेलमधील तक्तपोशीवरील चित्रे पूर्ण केली. पण त्याच चॅपेलमधील भिंतीवरील चित्रे पूर्ण करण्यास त्याला आणखी तीस वर्षे लागली

१६२६ साली जगातील सर्वात मोठे चर्च म्हणून सेंट पीटर्सचे उद्घाटन पोप अर्बन याच्या हस्ते झाले १७९८ साली फ्रेंचांनी रोमचा ताबा घेतला १८०६ साली अखेरचा रोमन सम्राट फ्रॅन्सिस दुसरा याने राज्यत्याग केला आणि त्याचबरोबर रोमन साम्राज्य सपुष्टात आले. १८०९ मध्ये सम्राट नेपोलियन याने रोम व व्हॅटिकन यांचा फ्रेंच साम्राज्यात समावेश केला. गॅरीबाल्डी या थोर इटालियन देशभक्ताने क्रांती करून १८४९ साली फ्रेंच लष्कराबरोबर सामना दिला. १८६१ साली इटली पुन्हा स्वतंत्र झाला १९२९ मध्ये व्हॅटिकन हे स्वतंत्र राज्य म्हणून घोषित झाले दुसऱ्या महायुद्धात १९४४ साली अमेरिका, ब्रिटन व फ्रान्स या दोस्त राष्ट्रांनी रोमचा ताबा घेतला मुसोलिनीचा अंत झाला १९४६ साली व्हिक्टर इमॅन्युएल तिसरा याने राज्यत्याग केला व आताचे इटलीचे प्रजासत्ताक राज्य स्थापन झाले

रोमचा हा अगदी त्रोटक, धावता इतिहास आहे पण या इतिहासात युद्धे, क्रौर्य, प्रेम, काव्य, कला, पराक्रम यांची जी महाकाव्ये घडली त्यांचे वर्णन करता-करता एडवर्ड गिबनलाही हजारो पृष्ठांचे 'हिस्टरी ऑफ द डिक्लाईन अँड फॉल ऑफ द रोमन एम्पायर' सारखा अनेक खंडांचा ग्रंथ लिहावा लागला. उद्ध्वस्त रोमचे अवशेष पाहताना गिबनच्या डोळ्यांपुढे हा विलक्षण देदिप्यमान इतिहास उलगडत गेला आयुष्यातील अनेक वर्षे संशोधनासाठी खर्च करून त्याने हा अमर ग्रंथ लिहिला

रोमला चिरंतन शहर (इटर्नल सिटी) असे नाव आहे या चिरंतन शहराला मी गेलो, तो मिलानहून, रेल्वेने. माझा पहिल्या वर्गाचा पास होता. तरीही गाडी इतकी ठेचून भरली होती की पंढरपूरच्या यात्रेला पूर्वी बार्शी लाईट रेल्वेच्या डब्यातून मेंढरासारखी माणसे गच्च भरून नेत, त्याची आठवत होत होती. या गर्दीचे कारण असे की ती शुक्रवारची रात्र होती वीकएण्डला अनेक गावातून रोमला जाणाऱ्या गबाळ्या इटालियनांची ती गर्दी होती रात्रभर दाटीवाटीचा प्रवास करून अगदी उजाडता-उजाडता आमची गाडी रोमला पोचली पण ती मुख्य 'रोमा' स्टेशनवर न जाता लहानशा स्टेशनवर थांबली अर्थात 'रोमा' ला जाण्यासाठी बस घ्यावी लागली पण माझ्याकडे इटालियन चलन नव्हते. बसचे तिकीट दोनशे लिरा होते पण जगात सर्वत्र एक्सचेंज विभाग जवळजवळ रात्रंदिवस उघडा असतो म्हणून मी निश्चिंत होतो पण आळशी इटालीत मात्र स्टेशनवरची 'एक्सचेंज' ही खिडकी बंदच होती सुदैवाने मला मिलान-रोम या प्रवासात दोन भारतीय तरुण भेटले, त्यांनी माझे तिकीट काढले.

'रोम' ला इटालियन भाषेत 'रोमा' म्हणतात कदाचित 'रोमान्स' हा प्रणय

या अर्थाचा शब्द याच 'रोमा' वरून रूढ झाला असावा आम्ही तिघेही मुख्य रोमा स्टेशनवर गेलो तिथे आमचे जड सामान ठेवले रोममध्ये दोन–तीन दिवस राहण्यापुरते सामान छोटया बॅगांतून घेतले आता साडेसात वाजून गेले होते. आता या मुख्य रोमा स्टेशनवर तरी मला डॉलर्सच्या लिरा मिळतील म्हणून मी एका पोलिसाला एक्सचेंज कुठे आहे आणि ते केव्हा उघडणार असे विचारले, तेव्हा मोडक्यातोडक्या इंग्रजीत तो म्हणाला, " आज शनिवार उद्या रविवार आता एकदम सोमवारी एक्सचेंज उघडणार तुम्हाला डॉलर्स किंवा पौंडाच्या लिरा हव्या असतील तर त्या मी देतो. "

मी विचार केला, की बँका उघडल्यावर शभर डॉलर्सच्या लिरा घेता येतील तूर्त चहा–कॉफी, बस यासाठी दहा डॉलर्सच्या लिरा घ्याव्यात म्हणून मी त्याला एक्स्चेंजचा दर विचारला, तेव्हा तो म्हणाला, " एक डॉलरला सतराशे लिरा " मला तो फारच कमी वाटला कारण अधिकृत दर १९५० लिरा होता. मी त्याला तसे सांगितले, तेव्हा तो म्हणाला, "तो दर तुम्ही काल सकाळचा सांगता त्यानंतर डॉलर भयंकर गडगडला "

मी विचार केला की हा पोलीस आपल्याला बनवतो आहे खरा, पण चहा–पाण्यापुरते तरी पैसे बदलून घ्यायलाच हवेत म्हणून मी त्याला दहा डॉलर्स दिले लिरा घेतले आणि रोमांचकारक रोममधली पहिली कॉफी घेतली हा कॉफीचा कप चार चमचे मावतील इतका लहान होता आणि दूध हवे तर वेगळे पैसे द्यायला लागणार होते. कॉफी इतकी कडक होती की दूध घ्यायलाच हवे होते थोडक्यात म्हणजे मी स्टेशनवर उतरल्याबरोबर मला लुबाडायला रोमच्या पोलिसापासून हॉटेलवाल्यापर्यंत प्रत्येकजण कोशीस करीत होता मी कॉफी घेऊन उपहारगृहातून बाहेर पडलो तो आठ वाजले आणि बरोबर आठ वाजता स्टेशनवरचा फॉरेन एक्सचेंज विभाग उघडला तिथे डॉलरचा त्या दिवसाचा दर दोन हजार लिरा लावला होता. याचाच अर्थ असा की ज्याच्या हाती सुव्यवस्था व कायदा यांचे रक्षण करण्याची जबाबदारी, त्या पोलिसानेच मला धडधडीत फसवले होते, खोटी माहिती दिली होती !

शभर डॉलर्सच्या लिराच्या भाराभर नोटा घेऊन मग मी हॉटेलच्या शोधार्थ निघालो रोम हे युरोपमधील एक अत्यंत महाग शहर आहे असे मी ऐकले होते तरी पण स्टेशनच्या आसपास त्यातल्या त्यात स्वस्तात हॉटेल्स असतात असा माझा सर्वत्र अनुभव होता मला काही डिलक्स किंवा लक्झुरियस हॉटेल नको होते दिवसभर भटकंती केल्यावर अंग पसरण्यापुरते पण सुरक्षित हॉटेल असले तरी माझे भागणार होते रोमा स्टेशनजवळची चार–पाच हॉटेले पाहून मी रोज साडेतीनशे लिराचे पण रोमच्या मानाने स्वस्त असे एक हॉटेल निवडले खोलीत सामान ठेवून आंघोळ करून कॉफी घेतली. इटलीत चहा मिळणे कठीणच. कॉफी, बियर,

वाईन ही आवडीची पेये व्हिस्कीचा क्रम त्याखाली मग शहर फिरण्याची काय व्यवस्था आहे असे मॅनेजरला विचारले तो म्हणाला, "सिटी टूरची बस इथून जवळच्याच इंपिरियल हॉटेलजवळ आणखी वीस मिनिटांनी थांबते, तिथे जा"

मी लगेच त्या हॉटेलच्या लॉबीत गेलो आणि सकाळी नऊ ते एकच्या शहर सफरीचे तिकीट काढले कोणत्याही शहरात मी प्रथम अशी तयार शहर सफर घेतो आणि मग त्यातली निवडक ठिकाणे पुन्हा एकट्याने, माझ्या सवडीने पाहतो. त्याचे अनेक फायदे असतात एक तर महत्त्वाचे असे काही चुकत नाही आणि दुसरे असे की एकदर शहराची कल्पना आधीच साकल्याने येते

रोमची अनत रूपे आहेत प्राचीन रोम, मध्ययुगीन रोम, आधुनिक रोम, युद्धकालीन रोम, धनाढ्य रोम, दरिद्री रोम, सौंदर्याचे रोम, ठकाचे रोम, कामचुकाराचे रोम, विचारवंताचे रोम, प्रवाशांचे रोम आणि स्थायिकाचे रोम ही त्या अनतापैकी अगदी थोडी, वानगीदाखल सांगितलेली रोमची रूपे 'गॉडफादर' चित्रपटात दाखवलेले गुन्हेगारांचे, माफियाचे क्रूर रोम अजूनही प्राचीन रोमन सम्राटांच्या रोमचा वारसा सांगते, तर व्हॅटिकनच्या सेंट पीटर्स चर्चमधील पोप यांचे अतीव करुणेचे रोम येशू ख्रिस्ताच्या त्यागाची कहाणी सांगते प्लाझा व्हेनिझियामधील इमॅन्युएल स्मारकाचे रोम हे भव्योदात्ततेची कथा सांगते तर व्हिला बोर्गेसीच्या आसपास गिऱ्हाईके शोधीत फिरणाऱ्या वेश्यांचे जग वखवखलेली दुनिया दाखवते दोन हजार वर्षांपूर्वीच्या वैभवाची लक्तरे रोमन फोरममध्ये जुन्या, पडक्या विटांच्या भयाण बांधकामात दिसतात, तर चित्रकला आणि शिल्पकला यांचा रोमन झेंडा त्रिखडात गाजविणाऱ्या मायकेल अँजेलोचे रोम एका शहराची नव्हे, तर कलेची चिरतनता दाखवते

आमची बस प्रथम पियाझा व्हेनिझियात म्हणजे व्हेनिस चौकात गेली तिथे सर्व प्रवासी बसमधून उतरले आमची गाईड म्हणाली, "रोम हे जगातले सर्वात पराक्रमी शहर आहे आपण ज्या चौकात आता उभे आहोत, तो चौक म्हणजे या चिरतन शहराचा केंद्रबिंदू आहे शहरातील सर्व प्रमुख रस्ते ह्या चौकातून निघतात All roads lead to Rome – सर्व रस्ते रोमकडे जातात आणि या सर्व रस्त्यांच्या केन्द्रबिंदवर तुम्ही उभे आहात म्हणजेच तुम्ही आता जगाच्या केंद्रस्थानी आहात या चौकाला पियाझा व्हेनिझिया हे नाव ज्या वाड्यावरून पडले आहे तो समोरचा पॅलेझो व्हेनिझिया हा वाडा १४५५ साली कार्डिनल पिअॅट्रो बार्बो यानी बांधला पुढे ते व्हॅटिकनचे धर्मप्रमुख, पोप पॉल दुसरे झाले रिनायसन्स (सांस्कृतिक पुनरुत्थान) काळातील वास्तुशिल्पाचे हे जगातील एक उत्कृष्ट उदाहरण आहे. रोझेलिनो या त्या काळातील अग्रेसर वास्तुशिल्पकाराने या वाड्याची आखणी व बांधणी केली आहे. पूर्वी येथे पोप राहत असत पोप यांची गादी व्हॅटिकनला गेली, तेव्हा व्हेनिस हे स्वतंत्र राज्य होते व्हेनिसचे राज्यप्रतिनिधी नतर या वाड्यात

राहायला आले म्हणून त्याला पॅलेझो व्हेनिझिया व या चौकाला पियाझा व्हेनिझिया अशी नावे पडली १७९७ साली या वाड्यात ऑस्ट्रियाची वकिलात आली इटलीत फॅसिस्ट सरकार आले, तेव्हा सबंध इटलीचा कारभार याच वाड्यातून चालत असे फॅसिस्ट सरकारचा पाडाव झाल्यानंतर १९४३ मध्ये या वाड्यात कलाप्रदर्शन ठेवण्यात आले आहे "

या ऐतिहासिक महत्त्वाच्या वाड्याजवळचे सेंट मार्कस् बॅसिलिका म्हणजे चर्च आहे हे मूळ चर्च चौथ्या शतकातील होते त्यानंतर ते अनेकदा पाडून नवे बांधले गेले. सध्याचे चर्च पंधराव्या शतकातले आहे पण त्यातील मोझाईक्सचा भाग अकराव्या शतकातला आहे काही ज्येष्ठ इटालियन चित्रकाराच्या कलाकृती या चर्चमध्ये आहे या चर्चच्या समोरील चौकात एक मजेशीर पुतळा आहे रोममध्ये काही पुतळे बोलतात अशी समजूत आहे, त्यापैकीच हा एक आहे मॅडम लक्रेझियाच हा पुतळा अडचणीच्या वेळी रोमन संदेश देऊन त्याना मार्गदर्शन करतो असे धर्मगुरु सांगतात. पण या पुतळयाला प्रत्यक्ष बोलताना पाहिल्याचे कोणी आढळले नाही यावरून इटालियन लोकाना कधीच अडचण येत नसावी असा तर्क मी साहजिकच केला!

रोममध्ये असे अनेक चमत्कार आहेत उदाहरणार्थ, एका बागेच्या भिंतीतून एका जुन्या संगमरवरी पुतळयाच्या हात बाहेर आला आहे तुम्ही त्या हातात हात दिला, तर तो दगडी हात तुमचा हात प्रेमाने दाबतो, अशी एक समजूत आहे अनेकजण 'होय, पुतळ्याने माझा हात दाबला' असे सांगत असतात. सॅन्ता मारिया चर्चमध्ये एक पुतळा आहे त्या पुतळ्याचे तोंड उघडे आहे त्या पुतळ्याच्या तोंडात हात घालून आरोपीने आपले निरपराधित्व सिद्ध करायचे अशी प्राचीन रोमची पद्धत होती कारण, हा पुतळा म्हणे खोटे बोलणाऱ्याच्या हाताचा चावा घेतो. अजनही अनेक प्रवासी या पुतळ्याच्या जबड्यात हात घालून व हात चावला गेला नाही हे दाखवून आपले निरपराधित्व सिद्ध करतात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री जनाब अतुले यांना प्रतिष्ठानप्रकरणी आपण निरपराध आहोत हे सिद्ध करण्याची रोममध्ये चांगली संधी आहे रोममधील या उघड्या तोंडाच्या पुतळ्याला 'सत्याचे मुख' (माउथ ऑफ ट्रूथ) असे नाव आहे आजच्या इटालियनाचे बेधडक खोटे बोलणे ऐकून या पुतळ्याने आपले तोंड आश्चर्याने सदाचे उघडे टाकले असावे असे मला वाटले.

पियाझा व्हेनिझियातील व्हिक्टर इमॅन्युएल सेकंड याचे संगमरवरी, पांढरेशुभ्र स्मारक एवढे भव्य व महाप्रचंड आहे की, मानवाला क्षुद्र व खुजे वाटण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यात आहे इटालियन राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त हे उत्तुंग स्मारक बांधण्यात आले त्याला अनेक श्रेष्ठ शिल्पकारांचा हात लागला आहे. जन्मभूमीचे हे स्मारक आहे इटलीचा आणि इटलीसाठी प्राणत्याग करणाऱ्या अज्ञात

सैनिकाचा या स्मारकात गौरव आहे या स्मारकात अनेक पुतळे आहेत. त्यात सर्वात प्रमुख आहेत तो व्हिक्टर इमॅन्युअल यांचा हा पुतळा अश्वारूढ आहे आणि ब्राँझचा आहे. पाढऱ्याशुभ्र अवाढव्य स्मारकात मध्यभागी असलेला हा पुतळा त्यामुळे अधिकच उठून दिसतो शभरावर पायऱ्यानतर हा पुतळा लागतो. त्यामागे जवळ—जवळ पाच-मजली उच अशी सगमरवरी कलात्मक इमारत आहे त्या इमारतीवर अश्वांच्या रथावर इटलीची स्वातत्र्यदेवता आणि एकतेची देवता याचे ब्राँझचे पुतळे आहेत इमॅन्युएल याच्या पुतळ्याच्या डाव्या बाजूला पहिल्य शतकातील बिबुलास याचे थडगे आहे देशासाठी धारातीर्थी मरण पावलेल्या अज्ञात सैनिकाच्या पुतळ्याजवळ इटलीतील बहुतेक राष्ट्रीय सभा घेतल्या जातात सॅकोनी, चियारेडिया अशा अनेक नामवत शिल्पकारानी परिश्रमपूर्वक या भव्य स्मारकाची उभारणी केली आहे.

रोम शहर ज्या सात टेकड्यावर प्रथम वसले, त्यापैकी एका टेकडीवर कॅपिटॉलीन हा चौक आणि पुरातन महत्त्वाची वास्तू आहे रोमचे हे प्रमुख धार्मिक केंद्र आहे रोमचा पहिला सम्राट रोमुलस याच्या कारकीर्दीत त्याच्या विश्वासू लोकाना या ठिकाणी आश्रय दिला जात असे. पूर्वी या टेकडीवर ज्युपिटरचे मदिर होते पुढे ते उद्ध्वस्त झाले त्या मदिराचे अवशेष आता व्हेनिझिया म्युझियममध्ये ठेवले आहेत गेल्या दोन हजार वर्षांत या टेकडीवरील धार्मिक इमारतींची अनेक रूपांतरे झाली आज दिसणारे तिचे रूप ही मुख्यत मायकेल अँजेलोची कर्तबगारी आहे ही टेकडी रोमन लोकानी सॅबीन्सकडून प्रथम जिंकून घेतली आणि रोमच्या विजयाची मुहूर्त-मेढ रोवली कॅपिटॉल टेकडीला विशेष ऐतिहासिक महत्त्व आहे

या टेकडीवरील कॅम्पिडॉग्लियो चौक हा मायकेल अँजेलोने पोप पॉल याच्या सूचनेवरून १५४६ ते १५५० या काळात तयार केला या चौकाच्या मध्यभागी त्याने मार्कस् ऑरेलिस याचा पुतळा बसवला त्याच्या दोन बाजूला नाईल आणि टायबर या नद्याचे पुतळे उभारले. या जुन्या सीनेटर्स पॅलेसमध्ये सध्या रोमच्या महापौराची कचेरी आहे. रोमचा नागरी कारभार या ठिकाणाहून चालतो. सीनेटर्स पॅलेसची मूळ इमारत तेराव्या शतकात बाधण्यात आली त्यापूर्वी या ठिकाणी टॅब्युलेरियम नावाची कायदेमडळाची प्राचीन रोमच्या काळातील इमारत होती या कायदेमंडळात जे कायदे समत होत, ते एका दगडी पाटीवर म्हणजे 'टॅब्लेट' वर कोरले जात म्हणून या इमारतीला टॅब्युलेरियम असे नाव पडले होते

या सीनेटर्स पॅलेसच्या उच मनोऱ्यावर प्राचीन रोमन काळातील मोठी घटा आहे दरसाल रोमच्या स्थापनेचा वाढदिवस २१ एप्रिलला साजरा करण्यात येतो तेव्हा आणि नाताळसारख्या सणाच्या वेळी ही घंटा वाजविण्यात येते. सीनेटर्स पॅलेसमधील वस्तुसग्रहालयात महापालिकेचा हॉल, सीझरचा हॉल आणि क्लिओ-पात्राचा हॉल असे तीन मोठे हॉल्स आहेत सीझरच्या हॉलमध्ये सीझरचा फार जुना पुतळा आहे तो विशेष प्रेक्षणीय आहे हा पुतळा इ स. १५० मधील आहे

याच वाड्यात स्वतंत्र वस्तुसंग्रहालय आहे त्यात दोन 'बोलके' पुतळे आहेत पास्किनेडसचा पुतळा तर नुसता बोलतो एवढेच नव्हे तर विनोदीही बोलतो हे ऐकून मला फारच बरे वाटले रोमसारख्या प्राचीन शहरात विनोदाला एवढे महत्त्वाचे स्थान मिळाल्यावर विनोदी लेखकांना का बरे आनंद होणार नाही ? या वस्तुसंग्रहालयात 'डाईंग गाउल' हा पुतळा दोन हजार वर्षांपूर्वीचा आहे पॅलेस कॉन्झर्वेटोरी या वस्तुसंग्रहालयात लांडगिणीचा एक पुतळा आहे, तो विश्वविख्यात आहे. त्यात रोम ही एक लांडगीण आहे असे दाखविले असून तिच्या आठ स्तनांपैकी दोन स्तनातून रोमुलस आणि रेमस हे प्राचीन रोमन नेते लहान वयात असताना दूध पीत आहेत असे दाखविले आहे रोमचे शौर्य लांडग्याच्या रूपात प्रभावीपणे प्रतिबिंबित केले आहे.

या प्रदर्शनात जुनी तैलचित्रे आहेत, तसेच टॅपेस्ट्री म्हणजे रेशमी कापडावर विणकाम करून तयार केलेली चित्रेही आहेत प्राचीन रोममधील काही भांडी व मोठी काचपात्रे अजूनही इथे जपून ठेवलेली आहेत या इमारतीतील चित्रसंग्रहालयात व्हॅन डाईक, व्हेरोनीज, टिटेरेट्टो अशा जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या कलाकृती आहेत यापैकी काही चित्रे दहा बारा फूट उंच आणि पंधरा ते वीस फूट लांब एवढी मोठी आहेत

रोमन फोरम हे रोममधील एक अत्यंत महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ सीनेटर्स पॅलेसच्या उजव्या हाताने थोडे पुढे गेले, की हे उद्ध्वस्त विश्व दिसते प्राचीन रोममध्ये जाहीर सभा भरण्याचे हे ठिकाण, फोरम–खुले व्यासपीठ वैयक्तिक क्षेत्रातले अथिरथी महारथी दोन हजार वर्षांपूर्वी याच विशाल जागेत सभा घेत, वादविवाद करीत प्राचीन रोमचे सामाजिक आणि राजकीय जीवन याच ठिकाणी घडले ही जागा अपुरी पडू लागली, तेव्हा जवळच आणखी फोरम्स बांधण्यात आले इंपीरियल फोरम, सीझर्स फोरम, ट्रोजन फोरम, ऑगस्टस फोरम या सर्वांना प्राचीन रोमनच्या पराक्रमी नेत्यांची नावे देण्यात आली

बार्बेरियन हा शब्द आता इंग्रजी भाषेत जंगली या अर्थी वापरतात पण प्राचीन रोमच्या काळी बार्बेरियन ही एक टोळी जमात होती, तिच्यावरून इंग्रजीत हा शब्द आला आहे जसा व्हँडाल या जमातीपासून व्हँण्डालिझम (निष्कारण विध्वंस करणे) हा शब्द आला आहे या बार्बेरियन लोकांनी रोमवर चढाई केली, तेव्हा बहुतेक रोमन फोरम पाडून-तोडून टाकला त्या उद्ध्वस्त जागेवर नंतर गुरांचा बाजार भरू लागला, एवढी त्याला अवकळा आली माती व दगड याच्याखाली गाडलेल्या या शिल्पाचे उत्खनन अठराव्या शतकात करण्यात आले आणि उरलासुरला रोमन फोरम आत्ताच्या अवस्थेत राखून ठेवण्यात आला आता या जागी

काही तुरळक, तुटक असे रोमन पद्धतीचे उंच नक्षीदार खांब विषण्णपणे उभे आहेत.

एके काळी या ठिकाणी रोमन देवताची मदिरे होती जाहीर सभा आणि न्यायदान यांचे दोन हजार वर्षांपूर्वीचे हे प्रमुख केंद्र होते ज्युलियस सीझरच्या ब्राँझच्या पुतळ्यासमोर या ठिकाणी व्हीनसचे प्रचड आणि सुदर मदिर होते मॅक्सोनियसने सुरू केलेल्या आणि नतर कॉन्स्टटानने पूर्ण केलेले चर्च होते याच कॉन्स्टटाईनच्या नावावरून इस्तंबूलला कॉन्स्टटिनोपाल असे नाव पडले होते चौथ्या शतकात कॉन्स्टन्टाईनने मिळविलेल्या विजयाची कमान रोमन फोरमपासून जवळच कोलोसियमसमोर उभारण्यात आली होती या मार्गावरून एकदा सम्राट सीझरचे पराक्रमी सैन्य गेले होते. या रोमन फोरममध्ये त्याकाळी टेंपल ऑफ् सॅटर्न (शनिमदिर) होते शनी ही रोमन काळात शेतीची देवता होती

रोमन फोरममध्ये टेंपल ऑफ कॉन्कार्ड या नावाचे एक मदीर होते पार्टिशियन्स आणि प्लेबियन्स याच्यातील दीर्घ काळ चाललेल्या लढाईत दोन्ही पक्षाचा समेट झाला, त्या आनदाप्रीत्यर्थ हे समेटाचे मदिर बांधण्यात आले होते ज्यूलियस सीझरचेही एक मदिर या ठिकाणी होते दोन तुरुगाच्या इमारती होत्या त्यात फक्त फाशीची शिक्षा झालेला कैदी किंवा युद्धकैदी यांनाच ठेवण्यात येई क्यूरिया ही प्रशस्त इमारत म्हणजे प्राचीन रोमचे पार्लमेंटगृह रोमन लोक संसदेला सिनेट म्हणत असत टयूशियस होस्टिलस याने ते तिसऱ्या शतकात बांधले होते व नतर त्याची पुनर्रचना करण्यात आली जुने सगमरवरी दगड उकरून काढून हा भाग आता शक्य तेवढा प्राचीन रोमन इमारतीसारखा करण्यात आला आहे.

या क्युरियाजवळ बॅसिलिका अमेलिया हे चर्च होते ते इ स १७९ साली बांधण्यात आले होते पुढे ते आगीच्या भक्ष्यस्थानी पडले, पण पुन्हा बांधण्यात आले दीड हजार वर्षांपूर्वीच्या आगीच्या खुणा या चर्चच्या काही उद्ध्वस्त भागावर अजूनही दिसतात रोमन बॅसिलिका या चर्चमध्ये दिवसा न्यायदान चालत असे आणि सध्याकाळनंतर प्रमुख व्यापारी जमून त्याच त्याच ठिकाणी व्यापाराचे करारमदार करीत असत क्युरिया इमारतीसमोरच्या प्रशस्त जागेला कॉमिटन् असे नाव होते. या ठिकाणी लोकाचे प्रतिनिधी जमून देशांचे आणि सम्राटांचेही भवितव्य ठरवीत असत

कॉमिटनसमोरच्या लपिस नैगर या इमारतीत रोमच्या इतिहासातील दोन अत्यत महत्त्वाच्या वास्तू आहेत एका काळ्या फत्तरावरच्या शिलालेखात लॅटिन भाषेतील धार्मिक मजकूर लिहिलेला आहे लॅटिन भाषेतील हा सर्वात प्राचीन मजकूर म्हणून आद्य लॅटिनचे महत्त्व त्याला आहे आपल्याकडे श्रवणबेळगोळच्या गोमतेश्वराच्या मूर्तीच्या पायाशी मराठी भाषेतील पहिला मजकूर आहे तसाच हा

लॅटिन भाषेतील. तो सहाव्या शतकातील आहे दुसरी अत्यंत महत्त्वाची वास्तू म्हणजे रोम हे नाव ज्याच्यावरून पडले, त्या रोमुलस या सम्राटाचे थडगे या ठिकाणी आहे.

या रोमन फोरममध्ये पूर्वीच्या जवळजवळ पूर्ण स्वरूपात असलेली एकच वास्तू आहे ती म्हणजे आर्च ऑफ सेप्टिमियस सोव्हिट्स ही कमान तिसऱ्या शतकात उभारण्यात आली सुदैवाने ती एवढी बळकट आणि प्रचंड आहे, की विध्वसक वारा, पाऊस यापैकी कोणाच्याही आक्रमणाला न जुमानता ती ताठ मानेने सतराशे वर्षे उभी आहे या भव्य कमानीजवळ एक गोल संगमरवरी अवशेष आहे हा रोमचा भौगोलिक मध्य बिंदू होता शहरातील प्रमुख नेत्याना भाषणे करता यावीत म्हणून जवळच रोस्ट्रा नावाचे व्यासपीठ आहे त्यावरूनच रोस्ट्रम हा शब्द इंग्रजी भाषेत आला आहे रेगीया भागात रोमच्या सम्राटाचे प्रासाद होते याच ठिकाणी सीझरचा खून झाला, आणि याच जागेवर त्याच्या प्रेतासमोर मार्क अँन्टनीने जगप्रसिद्ध भाषण करून ढोंगी राजकारण्याविरुद्ध रोमन लोकांना बड करण्यासाठी स्फूर्ती दिली हे आठवून माझे अग थरारले अशा विश्वविख्यात स्थळाची छाप मनावर कायमची राहते यात शका नाही

रेगियाच्या (यावरून रीगल हा शब्द आला आहे) समोर वेस्टा मदिर आहे हे गोलाकार आहे प्राचीन रोमन काळात गोलाकाराला महत्त्व होते कारण गोल कधी संपत नाही न्यूमा पॉंपिलस याने रोमचे अखडत्व आणि चिरतनत्व प्रस्थापित करण्यासाठी हे वेस्टा मदिर गोलाकार बांधले होते. रोमचे चैतन्य कायम आहे हे दर्शविण्यासाठी या मदिरातील अग्नी सतत पेटलेला असे हा पवित्र अग्नी कायम धडधडत ठेवण्याचे काम रोमन कुमारींच्यावर सोपविण्यात आले होते या कुमारी व्हेस्टल व्हर्जिन्स या जवळच्याच इमारतीत राहत असत एखाद्या स्मारकाजवळ कायमची ज्योत ठेवण्याची कल्पना या प्राचीन रोमच्या व्हेस्टा मदिरात प्रथम उगम पावली आता पॅरिसच्या आर्क द ट्रायम्फ, वॉशिंग्टनच्या केनेडी स्मारकात व दिल्लीलाही जवानाच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशी अखड ज्योत पेटत असते

या रोमन फोरमचे जेव्हा उत्खनन झाले, तेव्हा एका मदिराचे काही अवशेष तेथे सापडले मदिराच्या भिंती जवळजवळ नष्ट झाल्या आहेत देवीच्या गाभाऱ्यात जेथे देवी असते, त्या ठिकाणी एक गोल चबुतरा सापडला, पण मूर्ती बेपत्ता असल्याने हे कोणाचे मदिर आहे हे कळले नाही बहुधा ही मूर्ती फोडण्यात आली असावी किंवा तेथून उचकटून पळविण्यात आली असावी या मदिराचा विशेष म्हणजे त्याचा ब्रॉंझचा दरवाजा मात्र जशाचा तसा उभा होता दारे बंद होती आणि त्याचे भले कुलूपही जसेच्या तसेच होते. म्हणजे दार कुलूपबद होते पण सर्व भिंती पडल्यामुळे नुसता दरवाजाच आत्ता कशाचे रक्षण करावे या चिंतेत उभा होता. 'रोमचे मदिर' हेही आता उध्वस्तच आहे रोम या चिरतन शहराचे हे मंदिर म्हणजे त्या काळचे वैभव होते अशी अनेक मंदिरे, स्मारके, व्यासपीठे आणि चर्चेस

यानी दीड–पावणेदोन हजार वर्षांपूर्वीचा रोमन फोरम गजबजलेला होता जगातील सर्वात महत्त्वाचे सत्तास्थान म्हणून मिरवीत होता

या रोमन फोरमजवळच इटलीतील सर्वात प्रसिद्ध वास्तू आहे ही सुप्रसिद्धही आहे आणि कुप्रसिद्ध आहे या ठिकाणी मानवाचे आणि पशूचे जेवढे रक्त सांडले, तेवढे जगातल्या इतर कोणत्याही जमिनीच्या तुकड्यावर सांडलेले नाही या भयाण वास्तूचे नाव आहे कोलोसियम कोलोसेस म्हणजे महाप्रचंड या वास्तूजवळ सम्राट नीरोचा महाप्रचंड पुतळा होता म्हणून या क्रीडास्थानाला कोलोसियम हे नाव पडले तीन टेकड्याच्या खोबणीत हे प्रचंड स्टेडियम आहे या ठिकाणी दोन हजार वर्षांपूर्वी दलदल होती ती हटवून तेथे हे लववर्तुळाकार अवाढव्य प्रेक्षागृह बांधण्यात आले इ स ७० साली बांधलेल्या या प्रेक्षागृहाचे उद्घाटन मात्र दहा वर्षांनंतर, इ स ८० मध्ये झाले याची मूळ कल्पना ग्रीक नाट्यगृहावरून घेण्यात आली प्राचीन ग्रीसमधील नाट्यगृहे अर्धगोलाकार असत. त्याच्या दुप्पट आकाराचे म्हणून हे कोलोसियम पूर्ण गोलाकार बांधण्याची आधीची योजना होती. पण अधिक प्रेक्षकाची सोय व्हावी म्हणून ते लववर्तुळाकार व अनेक मजली करण्यात आले पन्नास हजार प्रेक्षकाची सोय ह्या काळी–दोन हजार वर्षांपूर्वी–करणारे हे जगातील सर्वात मोठे प्रेक्षागृह होते त्याला चार मजले आहेत खांब डोरिक पद्धतीचे, नक्षीदार आहेत रोमन सम्राटाच्या अनेक क्रूर खेळाचे हे केंद्र होते या कोलोसियममध्ये बसून रोमन सम्राट मद्याच्या सुरया रिचवीत, खाद्यपदार्थांचे डोंगर संपवीत, सुंदर मदालसाच्या सहवासात माणसे मारण्याचे खेळ पाहत असत. माणसाचे वध करण्याचे अनेक भिन्न प्रकार सम्राटाच्या उपस्थितीत पन्नास हजार रोमन स्त्री–पुरुष दाटीवाटीने बसून आनंदाने पाहत आणि एखाद्या माणसाची चिरफाड झाली की हर्षाने टाळ्या वाजवून मद्याचे पेले उंच करून जल्लोष करीत असत

—ग्लाडएटस नावाचे योद्धे या मैदानावर हातात लांब भाले घेऊन घोड्यावर बसून वेगाने एकमेकांच्या अंगावर जात आणि प्रतिस्पर्ध्याच्या छातीत भाला घुसवून त्याला गतप्राण करीत अशा युद्धात दोघेही अचूक नेमबाजी करणारे असले तर दोघांचेही भाले एकमेकांच्या अंगात घुसून दोघेही मृत्यु पावत कधी तलवारीने युद्ध होई, तर कधी पोलादी हातोड्यासारखा जड आयुधाने कुस्त्यात एका पैलवानाने दुसऱ्याला फक्त लोळवायचे असा नियम नसे, तर सर्वांच्या करमणुकीसाठी एका पैलवानाने दुसऱ्याला ठार मारले तरच कुस्ती निकाली लागली असे समजण्याची पद्धत होती रोमन सम्राटांना कधीकधी पाण्यातली लढाई पाहण्याची हौस येई तेव्हा मधल्या प्रचंड हौद्याची दारे बंद करून ती बुजविण्यात येत आणि हौद्यात लक्षावधी गॅलन पाणी सोडून त्या पाण्यात जहाजे तरंगती ठेवण्यात येत मग दोन पक्ष तयार करण्यात येत त्यासाठी गुलाम आणि कैदी यांचा उपयोग करण्यात येई

दोन्ही बाजूचे तुबळ युद्ध होई नावा बुडवण्यात येत, वध होत आणि प्रेतांचा खच पडे जी बाजू विजयी होईल त्या बाजूच्या गुलामांना व कैद्याना बक्षिस म्हणून स्वतंत्र करण्यात येई

कोलोसियममधील कोणताही क्रूर खेळ एका पक्षाचा पूर्ण वध झाल्याशिवाय बंद होत नसे 'कॅलिगुला' या चित्रपटात मी रोमन सम्राटाच्या क्रौर्याचे दृश्य पाहिले होते ते मूळ सत्य घटनेवरच आधारलेले होते ते दृश्य इतके भीषण होते की, काही क्षण ते पाहिल्यावर अक्षरश ते पाहणे असह्य होऊन डोळे मिटून घ्यावे लागत ते दृश्य असे होते की, कोलोसियमच्या जमिनीत शेकडो गुलामाना खाद्या-पर्यंत जमिनीत पुरले होते मानेपासून वरचा भाग फक्त जमिनीवर होता पाच-सहा फूट लाब धारदार पाती असलेले एक प्रचड कापणीयंत्र धडधडत येते त्यावर अर्धनग्न स्त्रिया मद्यपान करीत आनदाने हसत उभ्या असतात हे यत्र शेतातली पिके कापावीत तशा गुलामाच्या माना कापीत सबध कोलोसियमभर फिरते. जमिनीवर नुसत्या मडक्यांचा खच पडतो या दृश्याला अनेक देशांत बंदी घातली होती पण मी ते पॅरिसच्या चित्रपटगृहात पाहिले तिथे हा चित्रपट पूर्णपणे दाख-विण्यात येत होता.

माणसानी माणसाचे केलेले अनन्वित हाल व वध हा रोमन सम्राटांच्या करमणुकीचा विषय होता, तसाच हिंस्त्र पशू आणि माणसे यांच्या लढाया लावून त्यापैकी कोणीही मेला की त्याना परम आनद होत असे त्यासाठी कोलोसियमच्या मधल्या मैदानाचे स्वरूप बदलण्यात येई मध्ये कृत्रिम टेकड्या, जलाशय तयार करण्यात येत, प्रचड वृक्ष तोडून आणून तेथे रोवण्यात येत मग त्या कृत्रिम जग-लात वाघ, सिह, चित्ते, हत्ती असे हिंस्त्र प्राणी आणि माणसे सोडण्यात येत. माणसांनी भाले किंवा तलवारी घेऊन वाघावर हल्ला करावा आणि त्याच वेळी एखाद्या चित्त्याने माणसावर उडी टाकून त्याच्या चिंधड्या करून त्याला खावा अशीही भयकर क्रूर योजना असे रोमन सम्राटानी जेव्हा ख्रिचन धर्माविरुद्ध शिग फुंकले, तेव्हा शेकडो नि शस्त्र, निरपराध ख्रिश्चनाना याच कोलोसियममध्ये खवळ-लेल्या वाघ-सिहाच्या समोर सोडण्यात येई सिह त्या ख्रिश्चनांचे लचके तोडून खाताना क्रूर सम्राट व रोमन जनता मद्यमान करून व टाळ्या वाजवून त्या दृश्याचे कौतुक करीत असे

रोमच्या व्हिया एपिया रस्त्यावर एक लहानसे चर्च आहे पीटर या कोळ्याचे ते स्मारक आहे तो ख्रिश्चन होता रोमन सम्राट आपल्याला सिहापुढे टाकतील म्हणून तो भीतीने रोममधून पळून जाऊ लागला, तेव्हा येशु ख्रिस्ताने त्याला दर्शन दिले ख्रिस्त तेव्हा उलट बाजूला म्हणजे रोमकडेच जात होता. पीटरने त्याला विचारले, "को व्हेडिस ?" (कुठे जाणार ?) ख्रिस्त म्हणाला, "मी रोमला

जातो आहे–जिथे मला पुन्हा निश्चितपणे क्रुसावर चढावे लागेल" ख्रिस्ताचे हे बोल ऐकून मरण कुणालाही चुकवता येत नाही याची पीटरला प्रचीती आली तो रोमला परत आला त्याचा रोमन सम्राटानी वध केला 'को व्हेडिस ?'– हा त्याचा प्रश्न जगाच्या साहित्यात आता अमर झाला आहे हा पीटर म्हणजेच सेंट पीटर एके काळी जगात क्रौर्याचा विक्रम करणाऱ्या कोलोसियमची आज भग्न अवस्था झाली आहे निरुद्योगी सम्राटांच्या क्रौर्याच्या नुसत्या आठवणीनींच मी त्या दोन हजार वर्षांच्या पुरातन वास्तूत सुन्न झालो

रोमला आग लागली असता बेगुमानपणे फिडल् वाजणारा नीरो हा सम्राट अत्यंत क्रूर म्हनून इतिहासात प्रसिद्ध आहे अजूनही अत्यंत महत्त्वाच्या सार्वजनिक आपत्तीत बेदरकार असणाऱ्याना नीरोची उपमा देण्यात येते. एकदा नीरोला जेवताना मांस नीट भाजले गेले नाही असे लक्षात आले त्याने हुकूम दिला आणि ते जेवण तयार करणाऱ्या आचाऱ्याला सर्वांच्या समोर प्रचंड चुलीतल्या आगीत फेकून जिवंत जाळण्यात आले

कारंजाचे रोमइतके विविध प्रकार जगात इतरत्र कोठेही पाहायला मिळणार नाहीत एका रोमन सम्राटाने तर केवळ पाण्याचाच नव्हे, तर वाईन हे मद्य ज्यातून सतत वाहत आहे, असाही एक कारंजा रोमच्या मध्यवर्ती चौकात ठेवला होता कारंजावर कोणीही मनसोक्त वाईन पिऊ शकत असे दुसऱ्या सम्राटाने बांधलेल्या एका कारंजात घोड्याचा पुतळा होता या घोड्याच्या एका नाकपुडीतून पाणी आणि दुसऱ्या नाकपुडीतून वाईन वाहत असे रात्रीच्या वेळी रोममधील शेकडो कारंजावर रंगीबेरंगी प्रकाश सोडण्यात येतो आणि रोम हे खरोखरच स्वप्नमय, रोमांचकारक शहर होऊन जाते

स्पॅनिश स्टेप्स या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अनंत पायऱ्यांच्या चवडीवर चवडी हे रोममधील अत्यंत पवित्र आणि प्रसिद्ध ठिकाण आहे या शेकडो पायऱ्यांच्यावर ट्रिनिटा द मॉन्टी हे चर्च आहे. फ्रॅन्सिस या वास्तुशिल्पकाराने या पायऱ्याचा डोंगर तयार केला आहे या पायऱ्या म्हणजे रोममधील चित्रकार, प्रवासी आणि फुलविके यांचे एकत्र येण्याचे ठिकाण आहे रंगीबेरंगी फुलांनी या पायऱ्या खच्चून भरलेल्या असतात आणि त्यामुळे एक अत्यंत नयनमनोहर व अविस्मरणीय असे दृश्य आपल्याला दिसते रोममधील काही जगप्रसिद्ध रस्ते या चौकातून निघतात व्हिया कॉन्डोटी हा सर्वांत फॅशनेबल दुकानांचा रस्ता याच चौकाला मिळतो. बॅबियनो या रस्त्यावर रोममधील जास्तीत जास्त खाजगी कलासंग्रह आहेत तोही रस्ता याच चौकातून निघतो. मार्गारिटा या रस्त्यावर चित्रकाराच्या स्टुडिओंच्या रांगाच्या रांगा आहेत. इटालीतील कलावंत, साहित्यिक, धनाढ्य आणि विचारवंत यांचा हा खानदानी भाग आहे या स्पॅनिश स्टेप्सच्या समोरच बर्निनीच्या वडिलांनी

तयार केलेला सुप्रसिद्ध बार्सेसिया हा भव्य कारंजा आहे. याच भागात इटलीतील सर्वांत प्रसिद्ध कॅफे ग्रेसो हे उपहारगृह आहे अठराव्या शतकातील हे उपहारगृह जगातील अत्यंत नामवंत साहित्यिक, कलावंत, चित्रपट निर्माते, नाट्य–व्यावसायिक यांचे अत्यंत आवडीचे एकत्र येण्याचे ठिकाण आहे स्पॅनिश स्टेप्सच्या वरच्या टोकाचे चर्च फ्रेंच असून सोळाव्या शतकातील आहे या स्टेप्सजवळ पिन्सियो ही रोमच्या सात टेकड्यांपैकी एक सुंदर टेकडी आहे. जवळच व्हिला मेडिसीमध्ये फ्रेंच अकॅडमी असून अनेक फ्रेंच चित्रकारांच्या कलाकृती या ठिकाणी आहेत

या स्पॅनिश स्टेप्सजवळच पिअॅझा द स्पॅग्ना या चौकात एक चारमजली घर आहे त्याला कीट्स–शेले घर असे नाव आहे कारण याच घरात इंग्लंडचा जगप्रसिद्ध कवी जॉन कीट्स २३ फेब्रुवारी १९२१ रोजी निधन पावला त्याला क्षय झाला होता आणि डॉक्टरांच्या सूचनेवरून तो कुंवट व थंड इंग्लंड सोडून स्वच्छ सूर्यप्रकाश आणि मोकळी हवा यासाठी रोममध्ये राहत होता मी लंडन-मधील हॅम्प्स्टेड हीथ भागातील कीट्सचे घर पूर्वी पाहिले होते आता रोममध्ये ज्या घरात त्याचे निधन झाले तेही घर पाहिले या घरात कीट्स आणि शेले यांची पत्रे व दौत, खुर्ची इत्यादी वस्तू जपून ठेवल्या आहेत १९४६ साली मी इंग्रजी भाषेतील पीएच् डी साठी नाव घातले, तेव्हा माझा विषय होता कीट्स, शेले आणि बायरन यांच्या पत्रांतील साहित्य समीक्षा त्यावेळी मी ज्या छापील पत्रांचा अभ्यास केला होता, त्यांतील अनेक मूळ पत्रे पाहून मला त्या योगायोगाचे कौतुक वाटले या घरात कीट्स आणि त्याची स्फूर्तिदेवता प्रेयसी फॅनी ब्राऊन यांची सुंदर तैलचित्रे आहेत.

स्नानगृहे हे प्राचीन रोमचे एक जगप्रसिद्ध वैशिष्ट्य होते अशी भव्य आणि विलासी स्नानगृहे जगाच्या इतिहासात इतरत्र कोठेही झालेली नाहीत 'रोमन बाथ्स' म्हणून ती प्रसिद्ध आहेत. 'रोमन बाथ' या नावाचे फार गमतीचे नाटकही एका अमेरिकन नाटककाराने अलीकडे लिहिले आहे आधुनिक इटलीत राहणाऱ्या एका मध्यमवर्गीयाच्या घरी किरकोळ दुरुस्तीसाठी जमीन खणली असता तेथे प्राचीन रोमन स्नानगृह सापडते हा त्या नाटकाचा मुख्य विषय आहे. 'बाथ्स ऑफ कॅराकला' या नावाच्या प्राचीन रोममधील स्नानगृहाचे अवशेष अजूनही पाहावयास मिळतात सम्राट कॅराकलाने तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीस ही बादशाही स्नानगृहे बांधली होती. हे केवळ स्नानाचे केंद्र नव्हते, तर या ठिकाणच्या अवाढव्य इमारतीत ग्रंथालय, व्यायामशाळा, उद्याने वगैरेंचीही व्यवस्था होती गरम, कोमट व थंड अशा विविध तपमानांचे वेगळी कुंडे होती. तेथे सामुदायिक स्नानाची सोय होती. तसेच चाळीस फूट लांब–रुंद अशा संगम-रवरी दगडाची भव्य स्नानगृहेही होती. प्राचीन रोमन लोकांच्या दृष्टीने स्नान हा

अंगावर दोन तांबे घेऊन उरकून टाकण्याचा प्रकार नव्हता, तर पूजाअर्चेसारखा तास दोन तास चालणारा तो विलासाचाच प्रकार होता

या बाथ्सपासून थोड्याच अंतरावर अपियन वे हा प्राचीन रोममधील सर्वांत महत्त्वाचा रस्ता आहे याच रस्त्यावरून रोमच्या सम्राटाच्या भव्य मिरवणूका निघत असत स्पार्टाकसने केलेले गुलामाचे बंड फसले, तेव्हा या रस्त्यावर सहा हजार गुलामाना खांबाला बांधून ठेवण्यात आले होते आणि अनेक दिवस त्याची प्रेते पक्ष्याचे भक्ष्य बनली होती गुलामानी पुन्हा बंड करू नये म्हणून हा राजरस्ता दुतर्फा प्रेतानी दोन–तीन आठवडे सडत ठेवलेला होता अपियस क्लॉडियसने खिस्तपूर्व ३१२ मध्ये बांधलेल्या या रस्त्यावरून 'ऑल द अपियन वे' हा चित्रपटही हॉलिवुडमध्ये तयार झाला आहे

याच रस्त्याच्या एका बाजूला महायुद्धात जर्मनांनी सूडबुद्धीने ठार केलेल्या ३२० इटालियन नागरिकांची थडगी आहेत अपियन रस्त्यापासून अर्ध्या किलोमीटरवर खिश्चनाची भुयारे आहेत रोमच्या क्रूर सम्राटांच्या छळाला भिऊन प्राचीन काळी अनेक खिश्चन या भुयारात लपून बसत

अपियन रस्त्यावर कॅसल रोटंडा हा प्राचीन गोल किल्ला आहे ऑगस्टसच्या काळात या ठिकाणी व्हॅलेरियस कोल याचे दफन करण्यात आले होते चर्च ऑफ सॅन पिअॅट्रो इन व्हिन्कोली या चर्चमध्ये एक साखळदंड ठेवलेला आहे याच साखळदंडाने सेंट पीटर्सला बांधण्यात आले होते. आपल्याकडे बिबी का मकबरामध्ये एक साखळदंड आहे. औरंगजेबची मुलगी झेबुन्निसा ही संभाजीच्या निर्भयतेवर अनुरक्त झाली तिने आपल्या पित्याला अखेरची इच्छा म्हणून सांगितले की ज्या साखळदंडाने संभाजीला गिरफदार केले, तो साखळदंड आपल्याबरोबर कबरीमध्ये ठेवावा. या ऐतिहासिक घटनेवर श्री. ना. ग गोरे यानी लिहिलेली 'झेबुन्निसेचे स्वप्न' ही विलक्षण प्रत्ययकारी कथा मला सेंट पीटर्सचा साखळदंड पाहताना आठवली

बॅसिलिका ऑफ सेंट मरिया मॅगिओरी हे रोममधील एक विख्यात चर्च! पाचव्या शतकात पोप लायबेरीयस यांना या ठिकाणी मेरीने साक्षात्कार दिला आणि भर उन्हात त्याना या ठिकाणी बर्फ दिसले त्यांनीच या पवित्र ठिकाणी हे चर्च उभारले त्या काळी हे जगातील एक अत्यंत भव्य चर्च होते. चर्चच्या गाभाऱ्यातील तक्तपोशीवर दीड हजार वर्षांपूर्वीची नक्षी व चित्रे अद्यापही जवळजवळ मूळ स्वरूपात आहेत असेच आणखी एक ऐतिहासिक महत्त्वाचे चर्च म्हणजे सेंट क्लेमंटचे चर्च या दुमजली चर्चमध्ये दोन्ही मजल्यांवर दोन स्वतंत्र चर्चेस् आहेत. हे चर्च चौथ्या शतकातील आहे रोमन कॅथॉलिक धर्माची रोम ही राजधानी

असल्याने चर्चेस् आणि बॅसिलिका याच्या बाबतीत हे शहर जगात अग्रेसर असावे हे साहजिकच आहे. अमेरिकन चर्च ऑफ सेंट पॉल, सेंट कॅटेरिना चर्च, सेंट अँड्रिया चर्च, एजल्स चर्च अशी अनेक उदाहरणे देता येतील

प्राचीन व अर्वाचीन कलाकृतींच्या संग्रहाबाबतही रोमचा क्रमांक पॅरिसच्या खालोखाल लागतो नॅशनल म्युझियम ऑफ रोममध्ये व्हीनसचा चौथ्या शतकातील पुतळा, निओबची पाचव्या शतकातील मूर्ती, दुसऱ्या शतकातील संगमरवरी चर्चचा गाभारा आणि अनेक ख्यातनाम चित्रकाराच्या कलाकृती आहेत 'म्युझियम ऑफ एन्शट आर्ट 'मध्ये प्राचीन रोममधील अनेक कलाकृती पाहावयास मिळतात त्यापैकी काही दोन हजार वर्षांहून अधिक काळ चांगल्या टिकून राहिल्या आहेत व्हिला बोर्गझी या रोममधील सर्वात मोठ्या उद्यानात बोर्गझी गॅलरी आहे. कार्दिन बोर्गझी यांनी १६१६ साली स्थापन केलेल्या या वस्तुसंग्रहालयात मायकेल अँजेलो, द व्हिन्सी, रॅफेल अशा दिगत कीर्तीच्या चित्रकाराच्या आणि शिल्पकारांच्या काही उत्कृष्ट कलाकृती आहेत बर्निनीची ' रेप ऑफ प्रॉस्पेर्पाईन ' टिटनची ' सॅक्रेड अँड प्रोफेन लव्ह ', कॅरॅव्हार्गओची ' व्हर्जिन अशा सुप्रसिद्ध कलाकृतींचा त्यात समावेश आहे. ' गॅलरी ऑफ एम्परर्स ' हा अत्यंत महत्त्वाचा भाग या बोर्गझीत आहे त्यातील पॉलीनचा सर्वांगसुंदर पुतळा कॅनोव्हाने केला आहे. बर्निनीचा अपोलो अँड डॅफ्ने हा जगप्रसिद्ध पुतळाही याच संग्रहालयात आहे गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टमध्ये अनेक आधुनिक चित्रकारांच्या कलाकृती ठेवण्यात आल्या असून चित्रकलेतील आधुनिक प्रवाहांचे विश्लेषण करणारी भाषणे येथे होत असतात.

मात्र जगातील सर्वोत्कृष्ट शिल्पे पाहण्यासाठी रोममध्ये एखाद्या वस्तुसंग्रहालयातच प्रवेश करायला हवा असे नाही प्रत्येक चौकात, रस्त्यावर, भिंतीवर किंवा उद्यानात पुतळ्यांचा अगदी खच पडला आहे सार्वजनिक ठिकाणी मुक्तपणे अशी शिल्पकलेची पखरण केलेले दुसरे शहर नाही. पिअॅझा नव्होना हा रोममधील अत्यंत देखणा आणि अविस्मरणीय चौक. त्यात तीन मोठे कारंजे आहेत आणि अनेक शिल्पकृती आहेत. फौंटन ऑफ फोर रिव्हर्स (चार नद्यांचा कारंजा) ही बर्निनीची अजोड कलाकृती याच चौकात आहे जगातील चार महत्त्वाच्या नद्यांचे पुतळे येथे आहेत विशेष म्हणजे या चार नद्यांत भारताची गंगा नदी आहे. इतर नद्यांत डॅन्यूब व नाईल याचा समावेश आहे पोप याच्या अधिपत्याखालील चार खंड या नद्यांच्या पुतळ्याखाली दाखविण्यात आले आहेत

सेंट अॅन्जेलो किल्ला हे रोममधील एक महत्त्वाचे ऐतिहासिक स्थळ आहे या किल्ल्यात सम्राट हेड्रियनचे थडगे आहे. रोमच्या इतिहासाशी या किल्ल्याचा घनिष्ट संबंध आला आहे. सम्राट अल्लीनने या किल्ल्याभोवती तटबंदी करून संरक्षणाच्या दृष्टीने हा मजबूत केला. त्याचा बराचसा भाग अजून शाबूत आहे. अनेक सम्राट

आणि पोप यांनी या किल्ल्यात बिकट प्रसंगी वास्तव्य करून रोमचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले आता या किल्ल्यात उत्तम वस्तुसंग्रहालय असून त्यात प्राचीन रोमची चिलखते, शस्त्रे आणि अनेक महत्त्वाची कागदपत्रे ठेवण्यात आहेत रोमच्या इसेडरा चौकात अनेक रस्ते मिळतात तेथील सर्वांगसुंदर कारंजा रूटेली या वास्तुशिल्पकाराने विसाव्या शतकाच्या सुरुवातीस तयार केला रोमला भेट देणाऱ्या प्रवाशांचे हे आवडते ठिकाण आहे

ज्या रोममध्ये ख्रिश्चन असणे हा भयंकर गुन्हा होता आणि त्या गुन्ह्याला शिरच्छेदाची शिक्षा होती, त्याच रोममध्ये ख्रिश्चन जगताची राजधानी स्थापन झाली ही राजधानी म्हणजे राजकीयदृष्ट्या स्वतंत्र राज्य आहे त्याचे नाव व्हॅटिकन या व्हॅटिकनमधून पोप अर्ध्या जगावर धार्मिक राज्य करतात रोमन कॅथलिक जगाचे हे सर्वोच्च धर्मगुरु जगातील सर्वात मोठे चर्च सेंट पीटर्स चर्च हा व्हॅटिकनचा आणि सर्व ख्रिश्चन धर्मीयांचा मानबिंदू आहे ज्या जागेवर सेंट पीटरचा वध झाला, त्याच जागेवर सम्राट कॉन्स्टन्टाईनने पहिले चर्च बांधले. ते चौथ्या शतकातले चर्च फारच लहान होते आजचे अतिभव्य चर्च सोळाव्या शतकातले आहे प्रामुख्याने ब्रॅमन्ट आणि मायकेल अँजेलो यांची ही कलाकृती आहे. १५४७ साली हे चर्च बांधण्यास सुरुवात झाली व चर्चसमोरचा विस्तीर्ण गोलाकार १६५७ साली बर्निनी या विख्यात वास्तुशिल्पकाराने पूर्ण केला जगातील हा सर्वात मोठा चौक आहे त्याला सेंट पीटर प्लाझा असे नाव आहे हे चर्च, व्हॅटिकनचे वस्तुसंग्रहालय आणि समस्त आवार इतके भव्य आणि महत्त्वाचे आहे, की रोममध्ये असताना मी संपूर्ण दोन दिवस या एकाच ठिकाणी घालविले त्याशिवाय त्याची प्रगल्भता आपल्या आवाक्यात येतच नाही तरीही ती पूर्णपणे येते असे नाही, पण निदान एवढा तरी वेळ द्यायलाच हवा व्यापारी कंपनीच्या बसमधून प्रवासी लोकांना या विशाल व महत्त्वपूर्ण वास्तूतून तासा–दीड तासात गरगर फिरवून पुन्हा बसमध्ये घुसडण्यात येते म्हणून तर मी एकट्याने मनमुराद प्रवास करणे नेहमीच पसंत करतो.

सेंट पीटर्स चर्चच्या आवारात प्रवेश केल्यावर प्रथमदर्शनीच एक भव्य गोलाकार कॉनन्डेल दिसतो. या गोलाकार चौकाभोवती रोमन पद्धतीच्या कमानी आहेत त्या पलीकडे सुमारे पंधरा फुटांवर पुन्हा तशाच कमानी आहेत व या दोन्हींतील वरचा भाग झाकला असून त्यावर देवदेवता व संत यांचे लहान पुतळे आहेत या प्रचंड गोलाकारात बरोबर मध्यभागी एक उंच स्तंभ आहे तो सम्राट नीरोच्या ‘ सर्कस 'मधून म्हणजे क्रीडांगणावरून आणला असून त्याच्यावर एक मोठा क्रूस आहे. ज्या नीरोने हजारो ख्रिश्चनांना बळी दिले, त्याच नीरोच्या स्तंभावर अशा ख्रिश्चन जगताचा विजयी क्रूस तळपत आहे. या चौकात शेकडो

मोटारी आणि टूरिस्ट बसेस् उभ्या असतात. याच चौकात पोप पॉल दुसरे यांच्या-वर एका माथेफिरूने गोळ्या झाडल्या. ती जागा पाहण्यासाठी म्हणून मी पुढे गेलो नीरोच्या स्तंभाच्या उजव्या बाजूला ही जागा असून तिथे आता एक फलक लावण्यात आला आहे. मे १९८१ मध्ये एका सायकाळी पोप हे पधरा हजार भक्तांच्यात मिसळून उघडच्या मोटारीतून त्याना आशीर्वाद देत असतानाच अगा नावाच्या एका तुर्की तरुणाने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या पण पोप या घातकी हल्ल्यातून बचावले या गोळीबाराने जगभर भयकर खळबळ उडाली. अनेक ख्रिश्चन लोक या जागेजवळ गुडघे टेकून बसतात व त्या जागेचे चुबन घेऊन आपल्या छातीवर हातवाऱ्यानी क्रुसाची खूण करतात

या गोलाकारातून चर्चकडे जाण्यासाठी अनेक पायऱ्या चढाव्या लागतात. प्रथम उचच उच स्तंभ दिसतात त्या वरच्या पट्टीवर ज्या पॉल पाचव याच नाव कोरण्यात आले आहे त्यानीच हे बांधकाम करण्यासाठी माडर्नोची योजना तयार केली होती या पट्टीवर ज्या खिडक्या आहेत, त्यापैकी मधल्या खिडकीत उभे राहून पोप समोरच्या चौकातील लक्षावधी भक्तांना आशीर्वाद देतात 'अर्बी ए ऑर्बी' हा लॅटिन भाषेतील त्याचा आशीर्वाद असतो चर्चचे मुख्य दरवाजे आहेत त्यातील ब्रॉझ दरवाजा हा मूळ चर्चचा आहे 'होली डोअर' हा दरवाजा धार्मिक सणांच्या दिवशीच उघडला जातो. आत शिरल्यावर छतावर व भितीवर जगातील सर्वोत्कृष्ट कलाकृतीचे दर्शन घडते. विशेषत' मायकेल अँजेलोच्या काही अमर कलाकृती या चर्चच्या छतावर आहेत त्या पाहणे हे सोपे काम नाही वास्तविक जमिनीवर आडवे होऊनच त्या निवातपणे पाहिल्या पाहिजेत, पण गर्दी व सकोच या कारणांनी तिरप्या माना करूनच या अमर चित्रकलेचा आस्वाद घ्यावा लागतो

या चर्चच्या जमिनीकडे पाहिल्यावर मला वाटले की, ख्रिश्चन जगातील या सर्वात मोठ्या धार्मिक केंद्रातही माणसाचा अहकार गळालेला दिसत नाही. कारण या जमिनीवर जगातील इतर चर्चेस् कुठपर्यंत येतील हे दाखविले असून सेंट पीटर्स हेच जगातील सर्वात मोठे चर्च कसे आहे याचे प्रात्यक्षिकही दाखविले आहे. उदाहरणार्थ, लडन येथील सेंट पॉल हे चर्च या रेषेपर्यंत येईल, पॅरिसमधील सॅक्रेड हार्ट चर्च या रेषेपर्यंत येईल, असे पांढऱ्या रेषा काढून त्यावर लिहिले आहे आपणच सर्वश्रेष्ठ आहोत हे सेंट पीटर्ससारख्या पोपचे अधिष्ठान असलेल्या चर्चने आग्रहाने सांगावे हे मला नम्रता व लीनता या ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वाशी काहीसे विसगत वाटले, हे मात्र खरे!

या चर्चमध्ये अनेक चॅपेल्स आहेत. त्यात चॅपेल ऑफ पाइटी—दयेचे धर्मस्थान हे सर्वात प्रसिद्ध आहे. या चॅपेलमध्ये 'दया' हे मायकेल अँजेलोचे सर्वात प्रसिद्ध

असे शिल्प आहे. त्याशिवाय चॅपेल ऑफ रेलिक्स, ब्लेसेड सॅक्रॅमेंट, सेबॅस्टिअन अशी अनेक इतर चॅपेल्स आहेत चॅपेल ऑफ सेंट मायकेल हे प्रार्थनामदिर अतिशय सुदर आणि शांतचित्त करणारे आहे सेंट पीटरची खुर्ची जेथे ठेवली आहे, ती जागा बर्निनीने अत्यत कलात्मकतेने सजवली आहे पण सेंट पीटरची ही खुर्ची मात्र लाकडाची, नक्षीदार व चित्रमय आहे हजारो ख्रिश्चन लोक भक्तिभावाने या जागेचे चुबन घेतात

सेट पीटर्स चर्चचा घुमट इतका भव्य आहे की तो नजरेत मावत नाही. त्याची उची एकशेवीस मीटर्स आहे अनेकरगी उत्कृष्ट सजावटीच्या स्टेण्ड ग्लासने तो सुशोभित करण्यात आला आहे. बॅसिलिका किंवा गाभारा हा अतिशय उदात्त, नयनमनोहर आणि एकंदर चर्चच्या भव्यतेची छाप पाडणारा असावा हे साहजिकच आहे याच पलापिट किंवा व्यासपीठावरून पोप प्रवचन देतात घुमटाच्या खाली लाकडी कॅनपी किंवा तक्तपोशी असून बर्निनीने तयार केलेल्या चार उंच नक्षीदार खाबावर ती आधारलेली आहे सेट पीटरचे यडगे हे ख्रिश्चनांना विशेष पवित्र असून त्या जागेकडचे दर्शन घेण्यासाठी रीघ लागलेली असते

'व्हॅटिकन पॅलेस' या नावाने ओळखला जाणारा भाग या सेट पीटर्स चर्चजवळ आहे पण हा राजवाडा–किंवा पोपवाडा–म्हणजे एकच इमारत नसून अनेक इमारतींचा गट आहे यापैकी एक इमारत पोप याचे निवासस्थान आहे आणि दुसरीत पोप यांचे न्यायालय आहे बाकीच्या इमारतीत जगातील काही अत्यत मौल्यवान चित्रे आणि इतर कलात्मक वस्तू आहेत धार्मिक विषयावरचे जगातील सर्वात मोठे ग्रथालय या पॅलेसमध्ये आहे त्यात ग्रथाबरोबरच प्राचीन दुर्मिळ हस्तलिखितेही आहेत गेल्या शेकडो वर्षांत अनेक पोपना राजे, महाराजे धनाढ्य लोक कलावत इत्यादींनी भेटी म्हणून दिलेल्या मौल्यवान वस्तूचा सग्रह या वाड्यात आहे तो पाहताना डोळे दिपून जातात

'क्रूसिफिकेशन ऑफ सेट पीटर' आणि 'कन्व्हर्जन ऑफ सेंट पॉल' ही मायकेल अँजेलोची दोन जगप्रसिद्ध चित्रे या सग्रहात आहेत. व्हॅटिकन म्युझियम-मधील चित्रसग्रहालयात पधरा मोठे विभाग आहेत. त्यात 'लास्ट जजमेंट' हे अकराव्या शतकातील चित्र अविस्मरणीय आहे बिझटाईन काळातील काही कलाकृतीही येथे आहेत गियोटो आणि लॉरेन्झेटी याची निवडक चित्रे क्रमांक दोनच्या गॅलरीत आहेत अँजेलिको व फॅब्रियानो यांची चित्रे तिसऱ्या गॅलरीत आहेत तेराव्या व पधराव्या शतकांतील चित्रकारासाठी चौथी व पाचवी गॅलरी राखून ठेवली आहे 'डिपोझिशन' हे ख्रिस्ताला सुळावरून काढतानाचे कॅराव्हेगियो याचे चित्र या सग्रहालयात आहे तसेच व्हर्जिन मेरीचे अँजेलिको याचे जगप्रसिद्ध चित्रही येथे पाहावयास मिळते. रॅफेल यांनी काढलेले व्हर्जिन मेरीचे चित्रही याच

संग्रहात आहे लिओनार्डो द व्हिन्सी यांचे 'सेंट जेरोम', रिटन यांचे 'मॅडोना', व्हॅन डायईक यांचे 'सेव्हिरियो' अशी क्लासिकल (अभिजात) चित्रे म्हणजे कलाकारांच्या जगतातील अमोल ठेवा आहे याच गॅलरीजवळ 'म्युझियम ऑफ कॉन्टेम्पोररी आर्ट' हा विभाग असून त्यात आधुनिक चित्रकारांच्या नवचित्रकलेच्या उत्कृष्ट कलाकृती आहेत क्लेमन्टिनो आणि शियारामॉन्टी या दोन संग्रहात जगातील उत्कृष्ट पुतळे ठेवलेले आहेत.

सिस्टिन चॅपेल हा व्हॅटिकनमधील कलेचे केंद्रस्थानच आहे. पोप सिक्टस याच्यावरून हे सिस्टिन चॅपेल नाव देण्यात आले आहे धार्मिक चित्रांचा एवढा उत्कृष्ट संग्रह पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र कोठेही नाही येथील छतावरची मायकेल अँजेलोच्या चित्रांची अनेक शतकांतील चित्रकलासमीक्षकानी सर्वोत्कृष्ट म्हणून वाखाणणी केली आहे त्यातील 'लास्ट जजमेंट' हे चित्र ख्रिश्चन जगतात प्रतिकृतींच्या रूपाने घरोघर पोचले आहे मायकेल अँजेलोच्या भित्तीचित्रात (फ्रेस्को) चंद्र-सूर्याची निर्मिती, अॅडमची निर्मिती, महान् पूर, स्वर्गातून हकालपट्टी ही बायबलवरील आधारलेली चित्रे जगन्मान्य आहेत त्याशिवाय बॉटिसेली (टेम्प्टेशन ऑफ ख्राईस्ट), रोझली (सर्मन ऑन द माऊट), घिरालँडिओ (कॉलिंग ऑफर अपॉस्टल) अशा अनेक अमर कलाकृतींनी सिस्टिन चॅपेल धार्मिक क्षेत्राप्रमाणेच चित्रकलेच्या क्षेत्रातही त्रिखंडात गाजत आहे रॅफेलच्या कलाकृतींसाठी खास विभाग आहे व्हॅटिकन पॅलेसच्या आवारात व्हॅटिकन गार्डन्स हे टुमदार पण अत्यंत सुंदर असे उद्यानही आहे

रोममध्ये वस्तुसंग्रहालये, पुतळे, जुन्या इमारती याची अखंड रेलचेल आहे आणि तरीही इथल्या लोकांच्या इतके मनोरंजन आणि उद्बोधन त्यातला एकही पुतळा करू शकणार नाही आजचे इटालियन लोक म्हणजे चार्वाकाचे आधुनिक अवतारच आहेत 'ऋण कृत्वा घृत पिबेत' असे चार्वाक सांगत होता पण आजच्या रोमनांची घोषणा 'ऋण कृत्वा मद्य पिबेत' अशी आहे शिन्झानो वाईन हे त्याचे आवडते पेय आहे. काम टाळण्यात याचा हात जगातील इतर कोणत्याही देशाचा नागरिक धरणार नाही बहुतेक इटालियन लोकांची दुपारची जेवणाची वेळ बारा ते तीन असते हे लोक खुशाल बारा वाजता कचेऱ्या बंद करून सायकलवरून किंवा स्कूटरवरून घरी जातात जाताना भाजी, मासे, पाव वगैरेची खरेदी करतात. वाटेत जमल्यास एखाद्या बारमध्ये मित्राबरोबर गप्पा मारीत वाईनचा आस्वाद घेतात पुन्हा घरी गेल्यावर बायको ताजे मासे तळेपर्यंत वेळ जाण्यासाठी ते वाईन घेतात. मग जेवणावर भरपूर ताव मारतात एवढे जड जेवण झाल्यावर विश्रांती ही पाहिजेच म्हणून ते मग झोपी जातात. पावणेतीन-तीनच्या सुमाराला जागे होतात, कॉफी घेतात आणि अगदी नाइलाज म्हणून पुन्हा कामावर जातात.

इंग्रज माणूस घरात राहतो घर हा त्याचा किल्ला असतो अमेरिकन माणूस विमानात किंवा मोटारीत राहतो कुठेतरी घाईघाईने पोचण्यासाठी तो एकसारखा प्रवास करीत असतो तर इटालियन माणूस रेस्टॉरंट्समध्ये राहतो तेही रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या उपहारगृहात तिथे वाईन घेत मित्रमैत्रिणींच्या सहवासात रिकामटेकडचा चकाटचा करीत बसणे हा त्याचा सर्वात आवडता छंद असतो

इटालियन लोक नुसते तोंडाने बोलत नाहीत ते सर्वांग शरीराची हालचाल करीत बोलतात एखादा विषय सांगताना ते हातवारे करतील, तोंड वेडेवाकडे करतील अधूनमधून प्रसंगानुरूप पाय हवेत उचलतील आणि मोठमोठ्याने ओरडून एखाद्या नाटकात काम केल्यासारखे संभाषण करतील लांबून रोमन लोकांना बोलताना कोणी पाहिले तर हा एखादा लोकनृत्याचाच प्रकार आहे असे वाटेल वेषाच्या बाबतीत वॉशिंग्टनचा माणूस अत्यंत टापटिपीचा आणि सर्वात निर्दोष कपडे परिधान करणारा, तर रोमचा नागरिक सर्वात गबाळ्या व कपड्याबाबत बेफिकीर असतो डोकीवर लोकरी टोपी, मळकट शर्ट, सुरकुतलेला कोट आणि कसलाही आकार नसलेली काळपट पँट हा त्याचा वेष असतो नेकटाय, बो वगैरे लावण्याचे सोपस्कार तो करीत नाही

आजची रोमन स्त्री ही आधीच युरोपियन स्त्रियांच्या मानाने जरा बोजड. त्यात तीही सौंदर्यप्रसाधने किंवा उत्तम वेषभूषा याबाबत उदासीन. अगदी अविवाहित तरुण व विवाहेच्छू तरुणी सोडल्या तर बाकीच्या इटालियन स्त्रिया अनाकर्षकच दिसतात आणि तरीही या स्त्रियांच्या नितबांना चिमटे घेणे हा रोमन लोकांचा आवडता छंद आहे त्याची ही कीर्ती ऐकून अनेक हौशी अमेरिकन म्हाताऱ्या मुद्दाम गर्दीत मिसळतात आणि मग मैत्रिणींना 'आज चार लोकांनी माझ्या नितबांना चिमटे काढले' असे अभिमानाने सांगतात कोणी लढाईत आघाडी लढविणारे पराक्रमी वीर असतात तर कोणी शांततेत पिछाडी लढविणारे ! चालायचेच ! कालिदासाने 'पिंडेपिंडे रुचिर्हि भिन्न ' असे म्हटलेच आहे.

आळशीपणाच्या बाबतीत रोमच्या टपालखात्याला जगात पहिला क्रमांक दिला पाहिजे खुद्द रोममध्ये एका भागातून दुसऱ्या भागात पत्र पोचण्यास दोन ते तीन आठवडे लागतात ! बरेच पोस्टमन कामावर येतच नाहीत. कामावर वेळेवर येणाऱ्या रोमच्या पोस्टमनाचे प्रमाण सरासरी फक्त अडतीस टक्के असते त्यात सुधारणा व्हावी म्हणून रोमच्या टपालखात्याने वेळेवर कामावर येणाऱ्या पोस्ट-मनाना खास भत्ता सुरू केला जगात इतरत्र कोठेही कामगारानी वेळेवर यावे म्हणून असा भत्ता दिला जात नाही कारण अचूक वेळ सांभाळणे हे कर्मचाऱ्यांचे कर्तव्यच आहे, असे मानले जाते पण रोम त्याला अपवाद आहे. गमत म्हणजे रोममध्ये खास भत्ता सुरू करूनही वेळेवर येणाऱ्याचे प्रमाण अडतीसवरून शेकडा बेचाळीसवरच गेले !

रोममधील पोस्टमनाची बदली ग्रामीण भागात केली तर तेथे जाण्याऐवजी तो आजारीपणाचे खोटे सर्टिफिकेट डॉक्टरकडून घेतो आणि आरामपणे घरी वाईन पीत बसतो पोस्टमन प्रचंड प्रमाणावर गैरहजर किंवा उशीरा येणारे असल्याने टपाल एवढे साचते की ते ठेवायलाही जागा नसते अशा वेळी रोमचे पोस्टमन टपाल खुशाल जाळून टाकतात आणि आपल्यावरचा भार कमी करतात याचा परिणाम असा झाला आहे की, रोममध्ये येणाऱ्या पत्रांपैकी बारा ते पंधरा टक्के पत्रे नागरिकांना मिळतच नाहीत उद्योगपती आणि व्यापारी यांचे या प्रकारामुळे अवाढव्य नुकसान होऊ लागले तेव्हा अनेक कंपन्यांनी आता स्वतःच्या खाजगी 'कुरिअर सर्व्हिस' किंवा टपालसेवा सुरू केल्या आहेत रोममध्ये जितक्या खाजगी टपालसेवा आहेत तेवढ्या इतरत्र जगात कुठेही नाहीत पोस्टातून पत्रे वाटायला म्हणून सकाळी दहाला निघालेला पोस्टमनही अकराला बारमध्ये जातो, बाराला घरी जातो आणि विश्रांती घेऊन तीन वाजता पुन्हा पत्रे वाटण्यासाठी बाहेर पडतो, असा रोमचा पेशवाई कारभार आहे पत्रे ही आवश्यक बाब आहे आणि ती ज्याची त्याला वेळेवर पोचवायची असतात हे टपालखात्याचे मूलतत्त्वच रोमच्या पोस्टमनला मान्य नाही मला वाटते, तो स्वतःची महत्त्वाची पत्रे खाजगी 'कुरिअर सर्व्हिस' मार्फतच पाठवत असावा रोमच्या टपाल खात्यातील अदाधुंदीची तुलना फक्त मुंबईच्या सेंट्रल रेल्वेच्या लोकल गाड्यांच्या अदाधुंदीशीच होऊ शकेल विद्यार्थीदशेत असताना मी लंडनच्या पोस्टात काही दिवस काम केले आहे तेथील वक्तशीरपणा आणि उत्कृष्ट व्यवस्थेचा अनुभव घेतल्यावर तर मला रोमच्या त्या व्यवस्थेचा किंवा अव्यवस्थेचा विशेषच चमत्कार वाटू लागला आम्ही लंडनमध्ये सहा वाजता सकाळी कामावर हजर होत असू आणि सकाळी आठ ते साडेआठ वाजता इंग्रज जेव्हा ब्रेकफास्टला बसतो, तेव्हा त्याची पहिली पत्रे त्याला मिळत असत

आजच्या रोममध्ये प्राचीन रोमन लोकांच्या पराक्रमाचा अंशही राहिला नसला, तरी आपल्या पूर्वजांची सुखलोलुपता आणि आळस मात्र आजचे रोमन लोक भरपूर उपभोगीत आहे आजचा रोमन हा चार्वाकाचा पट्टशिष्य आहे. स्पॅगेटी (शेवया), मासे खावेत, वाईन प्यावी आणि आराम करावा हे त्याचे आयुष्याचे तत्त्वज्ञान आहे. अगदी नाइलाज म्हणूनच तो काम करतो कोणताही इटालियन हा कामचुकारपणा करण्यास अत्यंत तरबेज असतो निरुद्योग हाच इटलीचा आजचा प्रमुख उद्योग आहे त्यामुळे कारखाने–व्यापार यांची वाढ करण्यासाठी परिश्रम करण्याऐवजी इटलीचे प्राचीन वैभव अवशेष रूपात तरी पाहावेत या उद्देशाने आलेल्या परकीय प्रवाशांना जास्तीत जास्त लुबाडणे हे प्रत्येक इटालियन आपले परम कर्तव्य मानतो. उपहारगृहाची बिले फुगवणे आणि अव्वाच्या सव्वा टिप

बिलातून आधीच कापून घेणे हे त्याचे हातखंडा खेळ आहेत. रोममधील अनेक उपहारगृहांतील खाद्यपदार्थांचे दर सकाळी दहा वाजता कमी असतात तर लंच टाईम किंवा डिनर टाईमला ते सव्वापट किंवा दीडपट असतात! अशी लुबाडणूक जगात इतरत्र कोठेही होत नाही टॅक्सीवाला खोटे दर आकारतो–कधीकधी स्वत' पोलीसही प्रवाशांना बनवून पैसे काढतो।

रोममधला वाहतूक म्हणजे एक प्रचंड गोंधळ आणि गुतागुत असते. रस्त्यात छोटया मोटारी आणि व्हेस्पा स्कुटर्स सुसाट धावत असतात मध्ये ट्रॅफिक लाईट किंवा अपघात यामुळे थांबावे लागले तर सारे वाहक एकमेकांवर उच्च आवाजात भांडाभांडी करून, हॉर्न वाजवून सारा आसमत दणाणून सोडतात. पोलिसाची शिस्त त्यांना अजिबात मानवत नाही रोमच्या शहर प्रशासनाकडे पुरेसे पोलीस ठेवण्याइतके पैसे नाहीत जे तुटपुंजे पोलीस आहेत, त्यातील बरेच रजेवर असतात त्यामुळे वाटेल तेथे मोटारी किंवा स्कूटर्स ठेवणे, वाहतुकीचे नियम धुडकावून कसेही जोरात जाणे, कर्कश हॉर्न्स वाजवणे हे सर्व प्रकार रोमसारखे जगात इतरत्र कोठेही चालत नाहीत।

दोन हजार सातशे वर्षांचा क्रूर, पराक्रमी, कलात्मक इतिहास असलेले रोम शहर सोडताना मला एखाद्या जिव्हाळयाच्या मित्राला सोडून दूरदेशी जात आपल्यासारखे वाटले. पुन्हा कधीतरी रोमला यायचेच असा निश्चय करून मी रोम ते स्वित्झलँडच्या गाडीत बसलो

□ □ □

खरेदीदारांचा स्वर्ग

# हाँगकाँग

जेम्स बाँड ही आता जागतिक कीर्तीची व्यक्ती झाली आहे तिचा लेखक इयान फ्लेमिंग हा लंडनच्या 'संडे टाईम्स'मध्ये उपसंपादक होता रात्रपाळी, दिवसपाळी आणि कामाचा बोजा यांनी तो कंटाळून गेला एका रात्री त्याने सरळ आपल्या नोकरीचा राजिनामा दिला आणि तो घरी गेला दुसऱ्या दिवशी संपादकांनी त्याला बोलावून घेतले आणि विचारले, "तू ही नोकरी का सोडतो आहेस ? तुझी काही तक्रार आहे का, की जी दूर केल्यावर तू पुन्हा काम करू शकशील ?"

फ्लेमिंग म्हणाला, "माझी काहीही तक्रार नाही, पण मला कामाचा कंटाळा आला म्हणून मी नोकरी सोडतो आहे."

'संडे टाईम्स'चे संपादक म्हणाले, "मित्रा, नोकरी सोडणं हा त्यावर उपाय नाही रोज तेच-तेच काम अनेक वर्षं करण्याचा तुला कंटाळा यावा हे साहजिकच आहे तू असं कर मी तुला तीन महिने पगारी रजा देतो तू आमच्या खर्चानं जगाचा प्रवास कर आणि जगातील अनेक रोमांचकारक शहरांची वर्णनं तू आमच्याकडे पाठव या तीन महिन्यांनतरही जर तुला नोकरी सोडावीशी वाटली तर सोड, राहावंस वाटलं तर राहा !"

इयान फ्लेमिंगला ही सूचना फारच पसंत पडली त्यानं ताबडतोब पृथ्वी-प्रदक्षिणेची योजना आखली लंडन, न्यूयॉर्क, टोकियो, होनोलुलू, हाँगकाँग, मकाव, लॉस एन्जेलिस, पॅरिस, रोम अशा अनेक शहरांचा फेरफटका केला त्या-त्या शहरांची प्रवासवर्णनं त्यानं 'संडे टाईम्स'कडे पाठविली पुढे 'थ्रिलिंग सिटीज' या नावाने दोन खंडांत ही वर्णनं प्रसिद्धही झाली या पुस्तकात त्याने म्हटले आहे, Hongkong is the most vivid and exciting city I have ever

seen .It is a little paradise ! इयान फ्लेमिंगसारखा जगप्रवासी आणि जेम्स बाँडचा निर्माता ज्याला जगातील सर्वांत रोमांचकारक शहर म्हणतो ते हाँगकाँग 'होते कसे आननी' हे पाहावे म्हणून जनू बाँडचा निर्माता मी त्या शहरात मोठ्या उत्सुकतेने गेलो आणि माझ्या अपेक्षा त्या शहराने शभर टक्के पूर्ण केल्या फ्लेमिंगने या शहराला १९५९ साली भेट दिली होती. त्यानंतरच्या बावीस वर्षांत हाँगकाँग-मध्ये खूपच बदल झाला होता हे खरे असले तरी या शहराने आपली मूळची बहुतेक वैशिष्टये शाबूत ठेवली होती

हाँगकाँग हा जगातील अत्यंत विलक्षण प्रदेश आहे. जेथे पिण्याचे पाणीसुद्धा परदेशातून विकत आणावे लागते, असा हा एकमेव प्रदेश जिथून पाणी विकत घ्यायचे, तो देशही मित्रराष्ट्र नाही, तर चीनसारखा ब्रिटनचा कट्टर शत्रू चीनने पाण्याचे नळ बंद केले, की भोवती अथांग सागर असूनही Water everywhere, but not a drop to drink अशी हाँगकाँगची अवस्था होईल हा प्रदेश ब्रिटनच्या अखत्यारीतला पण इथले नव्याण्णव टक्के लोक चिनी या बेटाचे एकंदर क्षेत्रफळ फक्त १०६० चौरस किलोमीटर्स आहे पण इतक्या छोट्या जागेत पन्नास दैनिके आणि तीनशेवर नियतकालिके प्रसिद्ध होतात. हाँगकाँगमधील एकंदर कुटूंबांच्या संख्येपेक्षा तेथील टी व्ही संचांची संख्या अधिक आहे. कारण अनेक घरांत एकाहून अधिक टी व्ही आहेत शिवाय कचेऱ्यातून, मोटारींतून आणि ट्रॅन्झिस्टर्ससारखे हातातून कोठेही नेता येण्यासारखे पोर्टेबल टी व्ही आहेत हे मुक्त बंदर आहे तेथे माल नेण्यासाठी आणि तेथून परदेशी पाठविण्यासाठी कोणताही कर भरावा लागत नाही त्यामुळे हाँगकाँग हे जगातील सर्वांत मोठे रीएक्स्पोर्टिंग केंद्र आहे जपानी माल खुद्द जपानपेक्षा हाँगकाँगला स्वस्त मिळतो कारण हे करमुक्त बंदर आहे 'वर्ल्ड ऑफ सुझी वाँग' या जगप्रसिद्ध कादंबरीत वर्णन केले आहे तसे जोरदार नाईट लाईफ आजच्या हाँगकाँगमध्ये नाही तो मान आता बँकॉककडे जातो तरी या लहानशा बेटावर अश्वशर्यतींचे वेड जेवढे आहे, तितके जगात इतरत्र कोठेही नाही तसेच हुबेहूब मूळ मालासारखा दिसणारा बनावट माल तयार करण्यातही हाँगकाँगचा हात इतर कोणताही देश धरू शकणार नाही हाँगकाँगच्या या कीर्तीत किंवा दुष्कीर्तीत आमच्या भारतीय सिंधी व पंजाबी बंधूनी बरीच भर घातली आहे

मी बँकॉकहून हाँगकाँगला विमानाने गेलो सकाळी साडेसातला सुटलेले पॅन अमेरिकेचे विमान साडेअकराला हाँगकाँगला पोचले विमान उतरताना नाही म्हटले तरी भीतीच वाटते कारण इतर देशातील विमानतळासारखा हाँगकाँगचा विमानतळ विशाल सपाट जमिनीवर नाही उलट अनेक पर्वतांच्या आणि समुद्राच्या वेचक्यातच लहानशा जागी मोठ्या कष्टाने विमान उतरते विमानतळावर कस्टमची

किंवा इमिग्रेशनची काहीच अडचण आली नाही प्रथम पन्नास डॉलर्सचे हाँगकाँग डॉलर्स घेतले आणि गावात जाण्यासाठी टॅक्सी पाहू लागलो सुदैवाने हाँगकाँगलाच राहणाऱ्या एका सिंधी व्यापाऱ्याने मला कौलून या गजबजलेल्या भागात सोडले. हाँगकाँगमध्ये स्वस्त हॉटेल कुठे असेल याची मी मुंबईतच चौकशी केली होती कौलून भागातील 'चुंकिंग हाऊस'मध्ये दररोज बारा ते पधरा डॉलर्सपर्यंत हॉटेलची खोली मिळेल असे मला कळले होते मी जेथे उतरलो, त्या जागेसमोरच 'चुंकिंग हाऊस' ही डोंगरासारखी अवाढव्य इमारत उभी होती हातात दोन बॅगा घेऊन मी त्या इमारतीत गेलो मी 'नॅथेन हॉटेल'ची चौकशी केली ते चौदाव्या मजल्यावर होते पण ते पूर्ण भरलेले होते. पण त्याच इमारतीत आणखी दहा-बारा हॉटेले होती त्यामुळे मला पधरा डॉलर्सला जागा मिळण्यात अडचण पडली नाही अर्थात हे हॉटेल अगदी सामान्य होते. समाईक स्नानगृह होते आणि खोली लहानशीच होती पण त्याची मला क्षिती नव्हती रात्रीचे पाच-सहा तास अंग टेकायलाच सुरक्षित जागा हवी होती

माझे मुंबईचे स्नेही बाळासाहेब जोशी यानी हाँगकाँग कॅप्टन एस पी गोखले यांना फोन करून मी तेथे येणार असल्याची कल्पना दिली होती मी गोखले यांना फोन केला त्यांनी मला दुसऱ्या दिवशी रात्री आपल्या घरी जेवायला बोलावले आता दुपारचे साडेबारा वाजत आले होते मी हॉटेलच्या बाहेर पडलो आणि शहराची सफर घडवणारी व्यवस्था जवळपास कोठे आहे याची चौकशी करू लागलो. ही व्यवस्था शोधून काढणे अगदी सोपे असते कोणत्याही मोठ्या हॉटेल-मध्ये त्या-त्या शहराची सफर करणाऱ्या कंपन्यांच्या कचेऱ्या असतात मी राहत असलेल्या हॉटेलपासून पाचच मिनिटांच्या अतरावर शेरेटन हाँगकाँग हे हॉटेल होते तिथल्या लॉबीत मी गेलो आणि पन्नास हाँगकाँग डॉलर्स देऊन दुपारी दोन वाज-ताच्या शहर सफरीचे तिकिट काढले आता प्रश्न आला जेवणाचा शहरदर्शनाची बस यायला चागला सव्वा तास होता मी ज्या शेरेटन हॉटेलमध्ये त्यावेळी होतो, त्याचा एका खोलीचा दर सव्वाशे डॉलर्स आणि दुपारच्या जेवणाचा चाळीस डॉलर्स होता अर्थातच मी रस्त्यावर कोपऱ्याकोपऱ्यावर असलेल्या स्वस्त अन्नाचा आश्रय घेतला आमच्या चुकींग हाऊसमध्येही तळमजल्यावर एक गुजराथी पद्धतीचे जेवण देणारे उपहारगृह होते पण त्यापेक्षा दोन-अडीच डॉलर्सला चिनी जेवण देणारी फिरती उपहारगृहे अधिक सोयीची होती आणि जिथे चीनचा अड्डाच आहे, अशा हाँगकाँगमध्ये डाळभात खाण्यात काय मौज आहे ?

जेवण घेऊन मी शेरेटनच्या लॉबीत आलो ही लॉबीच तीन मजली आहे आणि या तीन मजल्यावरून उतरण्यासाठी व चढण्यासाठी एस्केलेटर्स उर्फ फिरते जिने आहेत वैभव, श्रीमंती, ऐषआराम याची नुसती रेलचेल आहे त्या तिन्ही

मजल्यावरच्या दुकानातून थोडा वेळ भटकून मी तळमजल्यावर आलो आणि ग्रेलाइन बसच्या कचेरीत बसलो इतक्यात बसची गाईड आली आणि मेंढरे हाकावीत तशी तिने आम्हा सात–आठ दर्शनेच्छू प्रवाशाची मेंढरे हाकून बसमध्ये नेली "वेलकम् टु एक्सायटिंग हाँगकाँग" असे म्हणून त्या चिनी गाईड पोरीने आमचे स्वागत केले आणि ती या बेटाची माहिती सांगू लागली, "आपण आता ज्या भागात आहोत, त्याचं नाव कौलून कौलून याचा चिनी भाषेतील अर्थ नऊ ड्रॅगन्स असा आहे शेकडो वर्षांपूर्वी जे पहिले चिनी लोक या बेटावर आले, त्याना सभोवती उत्त्च उंच आकाशात जाणारे डोंगर हे ड्रॅगन्ससारखे दिसले वास्तविक कौलूनभोवती आठच डोंगर आहेत पण त्याकाळी गणित शास्त्र आजच्या इतकं प्रगत झालं नसावं, म्हणून त्या आदिवासी चिनी लोकानी नऊ डोंगर मोजले आणि कौलून असं नाव या बेटाला दिलं आज कौलून हे जगातील सर्वात मोठं खुल्या बाजाराचं केंद्र आहे कौलून आणि हाँगकाँग या बेटाच्या मध्ये पूर्वी फक्त जलवाहतूकच होती पण आता मोटारीसाठी आणि रेल्वेसाठी समुद्राखालून बोगदे काढण्यात आले आहेत हाँगकाँग या शब्दाचा अर्थ सुगंधी फुल आहे कांग म्हणजे चिनी भाषेत बदर आणि हाँग म्हणजे सुगंधी फुल प्रथम येथे आलेल्या चिनी लोकांना येथील सुगंधी फुलांनी मोहित केलं त्याचंच नाव या बंदराला देण्यात आलं. अजूनही मकाँव हा चीनचा प्रदेश हाँगकाँगपासून फक्त काही मैलांवर आहे मकावची नऊ तासांची सफर आम्ही करतो. ज्यांना इथे सकाळी जाऊन सध्याकाळी परत येण्याची इच्छा आहे, त्यांनी माझ्याकडे नाव नोंदवावी"

कौलून विभागात आमची बस प्रथम टिम् शात्सुई या सांस्कृतिक केंद्रात गेली. तेथे संगीत, नाटक, नृत्य इत्यादींच्या कार्यक्रमासाठी एक भव्य प्रेक्षागृह आहे त्यात अडीच हजार लोकांची बसण्याची सोय होऊ शकते येथे पाच भव्य हॉल्स आहेत ते विविध प्रकारच्या प्रदर्शनासाठी राखून ठेवलेले आहेत. या पाच भव्य जागात दरसाल तीमकी प्रदर्शने भरतात. त्यात फुलाचे प्रदर्शन, नव्या मोटारी, यत्रसामग्री, हस्तकला अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो जवळच प्लॅनिटेरियमचा भव्य घुमट आहे हाँगकाँगच्या सरकारने त्यासाठी सहा कोटी डॉलर्स खर्च केले आहेत माणसाला उघडया डोळ्याने रात्री जास्तीत जास्त तीन हजार तारे दिसतात, पण या प्लॅनिटे-रियममध्ये दुर्बिणीच्या साहाय्याने नऊ हजार तारे दाखवण्याची सोय आहे आमची चिनी गाईड म्हणाली, "इतकी अद्ययावत् आकाशदर्शनाची सोय अमेरिकेत आणि कौलूनमध्येच आहे"

नतर आम्ही टायगर बाम गार्डन' या जगप्रसिद्ध उद्यानाकडे गेलो तो जूनचा शेवटचा आठवडा होता हळूहळू पाऊस पडायला सुरुवात झाली आम्ही टायगर बाम गार्डनजवळ पोहोचलो, तेव्हा तर पाऊस खूपच वाढला होता हे उद्यान

पाहायचे तर बसच्या बाहेर पडून उद्यानात फेरफटका करायला हवा होता. मी तर भारतातून छत्री आणली नव्हती, केवळ छत्री नाही म्हणून हे जगप्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळ पाहायचे टाळणे योग्य नव्हते पण पावसात भिजलो आणि आजारी पडलो तर पुढच्या जगप्रवासाचे काय होणार असाही प्रश्न पडला मात्र हाँगकाँगच्या चतुर व्यापाऱ्यांनी प्रवाशांच्या या सर्व अडचणींचा चांगलाच विचार केला होता हे दुसऱ्याच क्षणी माझ्या नजरेला आले कारण आमची बस उद्यानासमोर उभी राहते न राहते तोच एक चिनी स्त्री प्लॅस्टिकच्या सुंदर छत्र्यांचा भारा घेऊन बसच्या दरवाजाजवळ आली तिने प्रत्येकी फक्त एक अमेरिकन डॉलरला या छत्र्या दिल्या ती छत्री अतिशय देखणी होती पारदर्शक प्लॅस्टिकच्या पांढऱ्या कापडावर निळी-पांढरी नाजूक फुले छापली होती मी ती छत्री आनंदाने घेतली आणि त्या बाघाच्या बागेकडे निघालो

नेहमीच्या उद्यानासारखी ही टायगर बाम गार्डन नाही इतर बागा या सपाट जमिनीवर असतात, तर हे उद्यान टेकडीवर आहे वर चढण्यासाठी पायवाटा आहेत जागोजाग पुतळे, चिनी पॅगोडा, पाणपोया बांधल्या आहेत विश्रांतीसाठी सुंदर छपरे आहेत. शेकडो जातीची फुलझाडे, फळझाडे आणि फळाफुलांचा सोस नसलेले विशाल वृक्ष पसरले आहेत हाँगकाँगमध्ये अपुन हाँग नावाचा चिनी व्यापारी होता त्याला तीन मुली होत्या तिन्ही मुलींची लग्ने सुखवस्तु घरात झाली. वृद्धापकाळी या व्यापाऱ्याकडे अमाप संपत्ती राहिली वारस मुलगा नव्हता, अपुन हाँगने ही टेकडीच विकत घेतली, तिच्यावर सुंदर उद्यान बांधले आणि ते उद्यान जनतेला देऊन टाकले आम्ही त्या उंच उद्यानावर गेलो तेव्हा पाऊस भुरभुरू पडत होता आमच्या अंगावरून विरळ ढग जात होते आणि त्या सुंदर, धूसर वातावरणात हाँगकाँगचा किनारा व त्यापलीकडचा विस्तीर्ण निळा सागर दिसत होता अतिशय देखणे असे ते दृश्य सुखद होते पाऊण तास या उद्यानात स्वच्छंद भटकून आम्ही बसमध्ये परत आलो

तिथून आम्ही व्हिक्टोरिया पीक या डोंगराच्या माथ्यावर गेलो या टेकडीवर एक केबलकारही जाते एकाच तारेला लटकत जाणारी ही छोटी आगगाडी लांबून अतिशय छान दिसते खेळण्यातल्या आगगाडीसारखी छोटी दिसते व्हिक्टोरिया पीकवरून हाँगकाँगचे विहंगम दर्शन घडते आईच्या अंगावर चढून खेळणाऱ्या माकडाच्या पिलांसारख्या इथे डोंगरकपारीवर चढून बसलेल्या सिमेंट काँक्रीटच्या उंचच उंच इमारती दिसतात गेल्या पन्नास वर्षांत हाँगकाँगचा व्यापारउदीम दोनशेपटींनी वाढला पण हे बेट असल्याने इथे जमिनीच्या विस्ताराला अजिबात वाव नाही शेवटी डोंगरावर शक्य असेल तिथे इमारती बांधणे आणि त्या इमारती जास्तीत जास्त आकाश व्यापतील अशा बांधणे एवढेच वास्तुशास्त्रज्ञांना शक्य

होते. याचाच परिणाम असा झाला आहे की, हाँगकाँगमधील जमिनीचा दर जगात सर्वात अधिक आहे. एका चौरस फुटाला इथे पस्तीस हजार रुपये पडतात.

व्हिक्टोरिया पीकवरून आम्ही जंबो नावाच्या धक्क्यावर गेलो हा जगातील सर्वात मोठा धक्का. इथे दहा हजार नावा आहेत. या नावांपैकी निदान सात–आठशे नावा म्हणजे फिरती उपहारगृहे आहेत अशाच एका उपहारगृहात मी गेलो नावेच्या डेकवर छानपैकी खुर्च्या–टेबले मांडली होती. मी बियर मागवली आणि चिनी जेवण करायला सांगितले. इथे जेवण तयार ठेवीत नाहीत. कारण प्रत्येक गिऱ्हाईकाला हवा तो आणि हवा तसा पदार्थ अत्यंत थोड्या वेळात तयार करून देणे हे तर या तरंगत्या उपहारगृहाचे वैशिष्ट्य जेवणापूर्वी सर्वच गिऱ्हाईके बियर, जिन, व्हिस्की असे कोणते ना कोणते पेय घेतातच, त्यामुळे स्वयंपाक करायला फुरसत मिळते समोर अथांग सागर पसरला आहे, त्यावर असंख्य छोट्या मोठ्या नावा डुलत आहेत, समुद्राचा खारा वारा अंगाखांद्यावर खेळतो आहे, चिनी जेवण तयार होत असल्याचा मस्त सुवास येत आहे, अशा वेळी थंड बियर घेताना मंदपणे डुलणाऱ्या उपहारगृहात घालवलेला तो वेळ अतिशय सुखद होता

जंबो धक्क्यावर आम्हाला मुक्तपणे फिरता यावे म्हणून आमच्या गाईडने हा वेळ दिला होता मी जेवणाची वाट पाहत बीयर घेताना आमच्याच बसमधली पन्नाशी ओलांडलेली एक इटालियन बाई माझ्या टेबलाजवळ येऊन म्हणाली, " मी इथं बसू का ?" मी म्हटले, " अवश्य ! तिने वाईन मागवली आणि दोन–चार औपचारिक वाक्ये बोलल्यावर ती बाई आपण होऊनच म्हणाली, " हाँगकाँग मला अतिशय आवडलं. वाटलं, मी तरुण होते तेव्हा इथं जायला हवं होतं. फार एक्सायटिंग आहे हे बंदर." ती रोमजवळच्या एका लहानशा गावातली एकटीच या सफरीत सामील झाली होती ती अत्यंत अनपेक्षितपणे मनातले बोलून गेली, " तीस वर्षांपूर्वी इथं वेश्याव्यवसाय करण्यात खूप मौज होती, असं रोममधली माझी एक मैत्रीण सांगते !"

जेवण झाल्यावर आम्ही शाळेतल्या मुलांच्यासारखे गाईड भोवती जमलो ती म्हणाली, " जंबो हा पाच मजली धक्का आहे. वर्षातून एकदा हे सर्व खलाशी सागरसण साजरा करतात त्या रात्री दहा हजार नावा आकाशकंदील आणि रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा लावून बंदरात फिरत असतात. नाच–गाणी याना ऊत येतो. जंबो धक्क्याच्या गच्चीवर पाच हजार लोकांची नृत्य करण्याची व्यवस्था आहे त्या रात्री ही गच्ची खच्चून भरलेली असते मद्य, नृत्य, प्रणय आणि संगीत याचा जल्लोष होतो"

या हजारो नावांच्यामुळे हाँगकाँगचा व्यापार जोरात चालला आहे हे खरे ... उपासमार टाळण्यासाठी ... नावांमुळेच गरीब चीनमधून

हजारो चिनी हाँगकाँगमध्ये बेकायदा प्रवेश करतात. हाँगकाँगच्या सरकारची ही सर्वात मोठी डोकेदुखी आहे. हाँगकाँगमध्ये आधीच स्थायिक झालेले नातेवाईक आणि मित्र याना निरोप पाठवून जवळच्या चिनी प्रदेशातून हे भुकेकंगाल चिनी पैशांची व्यवस्था करतात, छोटया मासेमारी होडयांत लपून बसतात आणि जंबो धक्क्यावर नागरून ठेवलेल्या हजारो नावाच्या साहाय्याने हाँगकाँगच्या नागरिकांत मिसळून जातात त्याना प्रतिबंध करणे किंवा ते नकळत आलेच तर त्यांना शोधून काढून सरकारी खर्चाने परत चीनमध्ये पाठवणे हा हाँगकाँग पोलिसांचा सर्वात मोठा उद्योग आहे दरसाल असे सुमारे पन्नास हजार बेकायदा चिनी परत पाठवले जातात, तरीही निदान दहा हजार चिनी लोक बेकायदा प्रवेश करून स्थायिक होण्यात यश मिळवतात असा अंदाज आहे मी हाँगकाँगहून टोकियोला जात होतो, तेव्हा असे एक हजार बेकायदा चिनी लोक क्वॉरंटाईनमध्ये ठेवलेले मी विमानतळावर पाहिले मुंबईच्या झोपडपट्टीप्रमाणेच हाँगकाँगच्या या बेकायदा निर्वासितांचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करत आहे

हाँगकाँग हा खरेदी करणाऱ्यांचा स्वर्ग आहे मी ज्या चुंकिंग हाऊसमध्ये राहत होतो, ती तर सबंध हाँगकाँगमधील सर्वात मोठी बाजारपेठ तळमजल्यावर इतकी दुकाने आहेत आणि त्यात माल इतका ठेचून भरला आहे की त्या मालाचे ढीगच्या ढीग पाहून डोळे दुखून येतील किंमती तर इतक्या कमी आहेत की आश्चर्याने आपण स्तिमित होतो नुसत्या जीन्स विकणारीच निदान पन्नास दुकाने आहेत. आणि ज्या जीनला युरोप–अमेरिकेत दीडशे ते दोनशे रुपये पडतील ती जीन इथे अठरा ते वीस रुपयांना ! काही 'सेल'मधल्या जीन्स तर एक डॉलर म्हणजे नऊ रुपये ! टेपरेकॉर्डर्स, कॅसेट्स, व्हिडिओज, कॅमेरे, नायलॉनच्या साडया, उंची कापड, जगातील उत्कृष्ट सेंट्स, लिपस्टिक्स, ट्रॅन्झिस्टर्स, दूरचित्रवाणीचे संच, घडयाळे, दागिने, तयार कपडे, बॅगा, कॉम्प्युटर्स, खेळणी–जगातली प्रत्येक चीज इथे विपुल आणि स्वस्त किंमती विचारल्या तर आपला विश्वास बसणार नाही इतक्या कमी कारणे दोन करमुक्तता आणि बनावट माल मुंबईला दोनशे रुपयाना मिळणारी जपान नायलॉनची साडी मी हाँगकाँगला फक्त पस्तीस रुपयांना घेतली ! सहसा मी परदेशात खरेदीला फार हात आखडता घेतो वस्तू खरेदी करण्यापेक्षा तिथे त्याच किंमतीत काही नवे पाहावे, नवा अनुभव घ्यावा असा माझा दृष्टिकोन असतो. पण हाँगकाँगच्या स्वस्ताईची कीर्ती आमच्या घरापर्यंत एवढी पोचली होती की मी जगप्रवासाला निघण्यापूर्वीच हाँगकाँगमध्ये निदान हजार रुपयांची खरेदी झालीच पाहिजेच असा दम मला घरातून मिळाला होता. म्हणून मी चुंकिंग हाऊसमध्येच साडया, घडयाळे, छत्र्या, मनीपर्सेस्, कापड वगैरे हजार–बाराशे रुपयांचा माल खरेदी केला.

होते याचाच परिणाम असा झाला आहे की, हाँगकाँगमधील जमिनीचा दर जगात सर्वांत अधिक आहे एका चौरस फुटाला इथे पस्तीस हजार रुपये पडतात.

व्हिक्टोरिया पीकवरून आम्ही जबो नावाच्या धक्क्यावर गेलो हा जगातील सर्वांत मोठा धक्का इथे दहा हजार नावा आहेत. या नावांपैकी निदान सात-आठशे नावा म्हणजे फिरती उपहारगृहे आहेत अशाच एका उपहारगृहात मी गेलो. नावेच्या डेकवर छानपैकी खुर्च्या-टेबले मांडली होती मी बियर मागवली आणि चिनी जेवण करायला सांगितले इथे जेवण तयार ठेवीत नाहीत कारण प्रत्येक गिऱ्हाईकाला हवा तो आणि हवा तसा पदार्थ अत्यंत थोड्या वेळात तयार करून देणे हे तर या तरगत्या उपहारगृहाचे वैशिष्ट्य जेवणापूर्वी सर्वच गिऱ्हाईके बियर, जिन, व्हिस्की असे कोणते ना कोणते पेय घेतातच, त्यामुळे स्वयपाक करायला फुरसत मिळते समोर अथांग सागर पसरला आहे, त्यावर असंख्य छोट्या मोठ्या नावा डुलत आहेत, समुद्राचा खारा वारा अंगाखांद्यावर खेळतो आहे, चिनी जेवण तयार होत असल्याचा मस्त सुवास येत आहे, अशा वेळी थंड बियर घेताना मंदपणे डुलणाऱ्या उपहारगृहात घालवलेला तो वेळ अतिशय सुखद होता

जबो धक्क्यावर आम्हाला मुक्तपणे फिरता यावे म्हणून आमच्या गाईडने हा वेळ दिला होता मी जेवणाची वाट पाहत बीयर घेताना आमच्याच बसमधली पन्नाशी ओलांडलेली एक इटालियन बाई माझ्या टेबलाजवळ येऊन म्हणाली, "मी इथ बसू का ?" मी म्हटले, "अवश्य !" तिने वाईन मागवली आणि दोन-चार औपचारिक वाक्ये बोलल्यावर ती बाई आपण होऊनच म्हणाली, "हाँगकाँग मला अतिशय आवडलं. वाटल, मी तरुण होते तेव्हा इथ जायला हव होतं. फार एक्सायटिंग आहे हे बंदर." ती रोमजवळच्या एका लहानशा गावातली एकटीच. या सफरीत सामील झाली होती ती अत्यंत अनपेक्षितपणे मनातले बोलून गेली, "तीस वर्षांपूर्वी इथ वेश्याव्यवसाय करण्यात खूप मौज होती, अस रोममधली माझी एक मैत्रीण सांगते !"

जेवण झाल्यावर आम्ही शाळेतल्या मुलांच्यासारखे गाईड पोरीभोवती जमलो ती म्हणाली, "जबो हा पाच मजली धक्का आहे. वर्षातून एकदा हे सर्व खलाशी सागरसण साजरा करतात त्या रात्री दहा हजार नावा आकाशकंदील आणि रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा लावून बंदरात फिरत असतात. नाच-गाणी यांना ऊत येतो जबो धक्क्याच्या गच्चीवर पाच हजार लोकांची नृत्य करण्याची व्यवस्था आहे त्या रात्री ही गच्ची खच्चून भरलेली असते मद्य, नृत्य, प्रणय आणि संगीत यांचा जल्लोष होतो"

या हजारो नावांच्यामुळे हाँगकाँगचा व्यापार जोरात चालला आहे हे खरे असले, तरी या छोट्या नावांमुळेच गरीब चीनमधून उपासमार टाळण्यासाठी

हजारो चिनी हाँगकाँगमध्ये बेकायदा प्रवेश करतात. हाँगकाँगच्या सरकारची ही सर्वांत मोठी डोकेदुखी आहे हाँगकाँगमध्ये आधीच स्थायिक झालेले नातेवाईक आणि मित्र यांना निरोप पाठवून जवळच्या चिनी प्रदेशातून हे भुकेकगाल चिनी पैशाची व्यवस्था करतात, छोटया मासेमारी होडयांत लपून बसतात आणि जवो धक्क्यावर नागरून ठेवलेल्या हजारो नावांच्या साहाय्याने हाँगकाँगच्या नागरिकांत मिसळून जातात त्याना प्रतिबंध करणे किंवा ते नकळत आलेच तर त्यांना शोधून काढून सरकारी खर्चाने परत चीनमध्ये पाठवणे हा हाँगकाँग पोलिसांचा सर्वांत मोठा उद्योग आहे दरसाल असे सुमारे पन्नास हजार बेकायदा चिनी परत पाठवले जातात, तरीही निदान दहा हजार चिनी लोक बेकायदा प्रवेश करून स्थायिक होण्यात यश मिळवतात असा अदाज आहे. मी हाँगकाँगहून टोकियोला जात होतो, तेव्हा असे एक हजार बेकायदा चिनी लोक क्वॉरंटाईनमध्ये ठेवलेले मी विमान-तळावर पाहिले मुंबईच्या झोपडपट्टीप्रमाणेच हाँगकाँगच्या या बेकायदा निर्वासिताचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करत आहे

हाँगकाँग हा खरेदी करणाऱ्यांचा स्वर्ग आहे. मी ज्या चुंकिंग हाऊसममध्ये राहत होतो, ती तर सबंध हाँगकाँगमधील सर्वांत मोठी बाजारपेठ तळमजल्यावर इतकी दुकाने आहेत आणि त्यात माल इतका ठेचून भरला आहे की त्या मालाचे ढीगच्या ढीग पाहून डोळे दुखून येतील किमती तर इतक्या कमी आहेत की आश्चर्याने आपण स्तिमित होतो नुसत्या जीन्स विकणारीच निदान पन्नास दुकाने आहेत आणि ज्या जीनला युरोप–अमेरिकेत दीडशे ते दोनशे रुपये पडतील ती जीन इथे अठरा ते वीस रुपयाला ! काही ‘सेल’मधल्या जीन्स तर एक डॉलर म्हणजे नऊ रुपये ! टेपरेकॉर्डर्स, कॅसेट्स, व्हिडिओज, कॅमेरे, नायलॉनच्या साड्या, उंची कापड, जगातील उत्कृष्ट सेंट्स, लिपस्टिक्स, ट्रान्झिस्टर्स, दूराचश्रवणाच सच, घड्याळे, दागिने, तयार कपडे, बॅगा, कॉम्प्युटर्स, खेळणी–जगातली प्रत्येक चीज इथे विपुल आणि स्वस्त किमती विचारल्या तर आपला विश्वास बसणार नाही इतक्या कमी कारणे दोन करमुक्तता आणि बनावट माल मुंबईला दोनशे रुपयाना मिळणारी जपान नायलॉनची साडी मी हाँगकाँगला फक्त पस्तीस रुपयाना घेतली ! सहसा मी परदेशात खरेदीला फार हात आखडता घेतो वस्तू खरेदी करण्यापेक्षा तिथे त्याच किमतीत काही नवे पाहावे, नवा अनुभव घ्यावा असा माझा दृष्टिकोन असतो. पण हाँगकाँगच्या स्वस्ताईची कीर्ती आमच्या घरापर्यंत एवढी पोचली होती की मी जगप्रवासाला निघण्यापूर्वीच हाँगकाँगमध्ये निदान हजार रुपयाची खरेदी झालीच पाहिजेच असा दम मला घरातून मिळाला होता म्हणून मी चुंकिंग हाऊसमध्येच साड्या, घड्याळे, छत्र्या, मनीपर्सेस्, कापड वगैरे हजार–बाराशे रुपयांचा माल खरेदा केला.

येथील बाजारपेठेत सत्तर टक्के व्यापारी उत्तर भारतीय म्हणजे सिंधी आणि पंजाबी आहेत मूळ मालाप्रमाणे हुबेहूब दिसणारा डुप्लिकेट माल तयार करण्यात दोघेही वाकबगार सोनीचा टी व्ही. किंवा टेपरेकॉर्डर घेतलात तर खरा मूळचा कोणता आणि बनावट कोणता हे कळणार नाही विशेष म्हणजे हा बनावट मालही जवळजवळ मूळच्या मालाइतकाच टिकाऊ आणि कार्यक्षम असतो त्यामुळे हाँगकाँग-च्या बाजारात किमतींचा प्रचंड गोंधळ आहे ज्या कॉम्प्युटरला एका दुकानात पचावन्न डॉलर्स पडतात, त्यालाच शेजारच्या दुकानात चौदा डॉलर्स पडतील जो टेपरेकॉर्डर एका दुकानात चाळीस डॉलर्सला घेऊन आपण बाहेर पडतो आणि त्या पलीकडचा दुकानदार तुम्हाला सांगतो, " साहेब, कशाला एवढे पैसे दिलेत ? मी हाच टेपरेकॉर्डर अठरा डॉलर्सला देतो " थोडक्यात म्हणजे हाँगकाँगला खरेदी करणाऱ्याने आधी निदान चार–पाच दुकानांत जाऊन किंमती विचारून खरेदी करावी आणि सर्वांत कमी किंमत सांगणाऱ्यालाही खुशाल तीस–चाळीस टक्के कमी करत असलास तर घेतो असे म्हणावे तो निदान वीस टक्के कमी करून माल देतो मी ज्या दुकानात काही माल घेतला, तो सिंधी गेली पस्तीस वर्षे कौलूनमध्ये होता. पंधरा फूट रुंद आणि वीस फूट लांब जागेत त्याचे दुकान होते. कोपऱ्यात ठेवलेल्या स्टोव्हवर त्याची बायको दुकानातच स्वयपाक करते आणि तो दुकानदार हातात जेवायची थाळी घेऊन ' ब्यूफे लंच 'सारखा इकडे तिकडे हिंडत, गिऱ्हाईक पटवतो देखावा, विक्रेत्या मुली, भपका वगैरेवर त्याचा काहीही खर्च होत नाही जगातील पन्नास–पाऊणशे देशाशी व्यापार करणारी सिंधी माणसाची पेढी फार तर आठ फूट रुंद व दहा फूट लांब असते फोनवर त्याचा सारा व्यवहार होतो त्याच्या दुकानात कोणताही माल दिसत नाही तो परदेशाशी फोनवर संपर्क साधून मालाची ऑर्डर घेतो, हाँगकाँगमधील ठोकबंद व्यापाऱ्याला फोन करून त्या पत्त्यावर माल पाठवायला सांगतो आणि पाच–दहा टक्के मिळेल ते कमिशन घेतो. एवढ्याशा जागेत राहून दरमहा एक कोटी रुपयांवर व्यवहार करणारे शेकडो सिंधी व्यापारी हाँगकाँगमध्ये आहेत. आमची आम मराठी जनता मात्र केवळ चाकरमानी आहे हाँगकाँगचे कमिशनर श्री रंगनाथन् यांना मी भेटलो, तेव्हा ते म्हणाले, " इथे चौदा हजार भारतीय आहेत. त्यापैकी तीस ते पस्तीस मराठी कुटुंबे आहेत पण हे सर्व मराठी कुटुंबप्रमुख कोठे ना कोठे तरी नोकरी करतात एअर इंडिया, स्टेट बँक, भारताची कमिशनरची कचेरी, फायझर अशा संस्थांत ते काम करतात इथे व्यापाराला एवढा प्रचंड वाव असताना माझ्या माहितीप्रमाणे एकही महाराष्ट्रीय व्यापारी नाही भारताचा हाँगकाँगबरोबरचा व्यापार शंभर कोटी रुपयांचा आहे इथे सात भारतीय बँकांच्या शाखा आहेत."

श्री रंगनाथन् म्हणाले, " हाँगकाँगचे क्षेत्रफळ इतके लहान आहे पण जगाचा बारा टक्के व्यापार इथे होतो इलेक्ट्रॉनिक्सवर चालणाऱ्या खेळण्यांचे हे जगातील

सर्वात मोठे केंद्र आहे. हिरे आणि हिऱ्यांना पैलू पाडणे या क्षेत्रात भारत–हाँगकाँगचा जास्तीत जास्त व्यापार होतो "

हिऱ्यांवरून आठवले, हाँगकाँगच्या मुक्कामात मी पेनन्शुला नावाच्या प्रचंड हॉटेलमध्ये गेलो होतो कोरियातील भारताचे राज्यप्रतिनिधी श्री पराजपे तिथं आले आहेत असे मला कळले त्यांची चौकशी करण्यासाठी मी रिसेप्शन कौन्टरवर गेलो आणि तिथून परत येत होतो समोरून एक सुदर, लहानशी चिनी तरुणी आली. तिने माझ्या हातात एक रंगीत पुस्तिका दिली मी ती उघडून पाहिली तर 'अजू ज्युवेलरी लिमिटेड, कैसर इस्टेट, हुंगहॉम हाँगकाँग' या कपनीची ती पुस्तिका होती त्या माहितीपत्रकात म्हटले होते 'विश्वसनीय असे हिरे, माणक, इतर जड-जवाहीर होलसेल किमतीत किरकोळ विक्री लडनच्या जगप्रसिद्ध लाईड्स कपनी-कडून तुमच्या जडजवाहराचा विमा उतरण्याची व्यवस्था दोष आढळल्यास माल परत घेण्याची हमी अद्ययावत् डिझाईन्स ' या गुळगुळीत, अनेक रंगीत पुस्तिकेत हिरे, माणिक, पाचू, नीळ इत्यादी रत्नाच्या विविध दागिन्यांचीही छायाचित्रे दिली होती त्यातील एक–एक हिरा म्हणजे या पृथ्वीतलावरील माझ्या सबध मालमत्तेची किंमत होती.

" मी हिरे–माणकं घेऊ शकतो असं आपल्याला वाटल, हाच माझा बहुमान आहे " असं मी त्या चिनी पोरीला सांगितल ती प्रसन्न हसून म्हणाली, " महाशय, आपण सौजन्यान आपल्याकडे कमीपणा घेत आहात आमच्या कपनीची एक शाखा आपल्या या हॉटेलमध्येच आहे आपण काही खरेदी केली नाही तरी चालेल, पण आपण माझ्याबरोबर याच लॉबीतल्या आमच्या दुकानी आलात तर मी आपली फार ऋणी होईन "

हळूहळू माझ्या लक्षात तो घोटाळा आला पेनन्शुला हे जगातील एक अतिशय बडे हॉटेल आहे तिथेच मी राहत असेन असे तिला वाटून ती मला आपल्या हिऱ्यामाणकांवर एक कृपाकटाक्ष टाकण्याची विनती करीत होती तिला परावृत्त करण्यासाठी मी म्हटले, " हे सुदरी, माझ्या या बावळट चेहऱ्यावरून आणि अस्ताव्यस्त, सामान्य कपड्यांवरून तरी तुला कळायला हवं की मी तुझ्या दुकानातला अर्धा हिरासुद्धा विकत घेणार नाही " त्यावर तिने उत्तर दिले, "तसंच काही नाही साहेब बावळट चेहऱ्याचे खूप लोक चिकार श्रीमत असतात !" हा माझा नक्की गौरव आहे की निंदा आहे याची शहानिशा मनातून करीतच मी तिचा निरोप घेतला

बँकिंग हा हाँगकाँगचा प्राण आहे. या व्यापारी केंद्रात जगातील सर्व मोठ्या आणि विमाकंपन्या यांच्या शाखा आहेत मात्र वैयक्तिक नागरिकाचे ९५ टक्के बँकेचे व्यवहार बँकेच्या इमारतीत न शिरताच इलेक्ट्रॉनिक्सच्या पद्धतीने होतात. बँकेच्या

प्रत्येक खातेदाराला एक कार्ड दिलेले असते बँकेच्या इमारतीबाहेर रस्त्याच्या बाजूला एक कौन्टर असतो तो बंद असतो पण एका विशिष्ट जागी खातेदाराने आपले कार्ड ठेवले की कौंटर उघडतो. त्या खात्यावर किती रक्कम शिल्लक आहे हे कॉम्प्युटरच्या साहाय्याने दाखवले जाते मग खातेदाराला जेवढे पैसे हवे असतील तेवढे काढण्यासाठी बटने दाबायची तेवढी रक्कम कौंटरमधून येते त्या खातेदाराची नवी शिल्लकही दाखविली जाते पैसे ठेवायचे असले, तर कौंटरमध्ये नोटा सोडायच्या आणि किती पैसे ठेवले त्याची बटन दाबायची खाते उघडताना आणि बंद करतानाच काय तो वैयक्तिक गिऱ्हाइकाचा आणि बँकेच्या कर्मचाऱ्यांचा संबंध येतो मात्र मोठमोठ्या कंपन्या, कचेऱ्या यांच्या कार्डांचे किंवा प्रचंड रकमांचे व्यवहार व्यवस्थापकांच्या मार्फत प्रत्यक्षच करावे लागतात पन्नास लाख वस्तीच्या या छोट्या हाँगकाँगमध्ये बँकांच्या अठराशे शाखा आहेत

करमुक्त बंदर असल्याने हाँगकाँगला सोन्याची अत्यंत मोठी जागतिक बाजारपेठ आहे. येथील 'चायनीज गोल्ड अँड सिल्व्हर एक्स्चेंज' मध्ये दररोज अब्जावधी डॉलर्सचे सोन्या–चांदीचे व्यवहार होतात चारशे औंसांच्या सोन्यांच्या विटांची देवघेव येथील एक्सचेंजमध्ये होते सोन्या–चांदीचे आंतरराष्ट्रीय दर निश्चित करण्यात हाँगकाँगचा मोठा वाटा आहे येथील बँकांच्या सेफ डिपॉझिट लॉकरमध्ये सोन्याच्या विटांच्या थप्प्या लागलेल्या असतात आधुनिक जगात सोन्याच्या विटा लंकेमध्ये नसून हाँगकाँगमध्ये आहेत प्रत्येक बँकेने आपले आर्थिक स्थैर्य सिद्ध करण्यासाठी किमान दोन कोटी डॉलर्सच्या सोन्याच्या विटा ठेवल्या पाहिजेत असा हाँगकाँग सरकारचा नियम आहे सोन्याचे कायदेशीर स्मगलिंग करणारे अनेकजण हाँगकाँगला आपल्याबरोबर स्त्रियांना आणतात, इथे सोन्याचे दागिने बनवून घेतात आणि कस्टमच्या नजरेसमोर मोठ्या दिमाखाने आपल्या देशात जातात हे दागिने अधिक दराने विकून त्याना हाँगकाँगच्या सफरीचा खर्च भागवूनही चांगला फायदा मिळतो

या प्रचंड आर्थिक उलाढालीत मला अगदी अचानक एक असे शांत, निवांत स्थळ गवसले हे म्हणजे हाँगकाँगचे हिंदु मंदिर. भारतीय वकिलातीच्या कचेरीजवळच, रेसकोर्सला लागून असलेल्या एका उंच टेकडीवर हे देऊळ आहे मी टेकडी चढून गेलो वर चांगले पटांगण, सुरुवातीला मारुतीचे छोटेसे देऊळ आणि त्यासमोर चार मजली, प्रशस्त मुख्य मंदिर आहे मंदिरात शंकर–पार्वती, गणपती लक्ष्मी–विष्णूच्या मूर्ती होत्या, तसेच वरूण हा सिंधी लोकांचा देवही होता नाशिकजवळच्या शकुंतलाबाई ओझरकर नावाच्या एक बाई गेली अनेक वर्षे त्या मंदिरात राहत आहेत 'मी तुम्हाला लेखक म्हणून ओळखते' असे त्यांनी मला सांगितले, तेव्हा मला आश्चर्य आणि अभिमान वाटला. हाँगकाँगच्या एका निवांत टेकडीवरही

मी लेखक असल्याची नोंद झाली होती मदिराचे व्यवस्थापक रमेशचद्र द्विवेदी नावाचे उत्तर भारतीय होते ते स्वत कवी आहेत आणि त्यानी मला आपला एक काव्यसग्रहही भेट म्हणून दिला मदिरात उत्तम धार्मिक ग्रथांचा सग्रह आहे तीन–चार लोकांची राहण्याची सोय होईल अशी जागाही आहे श्री द्विवेदी यांनी मला तेथे मोफत राहायला व जेवायला येण्याचे आग्रहाचे निमत्रण दिले पण माझे पुढचे विमानाचे तिकिट रिझर्व्ह झाले होते म्हणून मी त्यांच्या निमत्रणाचा स्वीकार करू शकलो नाही

मदिराजवळून मी समोरच्या रेसकोर्सकडे पाहत होतो. कारण हाँगकाँगला अश्वशर्यतींचे जेवढे वेड आहे, तितके जगात इतरत्र कोठेही नाही दर बुधवारी आणि शनिवारी इथे शर्यती होतात त्याचे एक दिवसाचे उत्पन्न आठ ते दहा कोटी हाँगकाँग डॉलर्स असते. रेसचा खर्च वजा जाता उरलेल्या फायद्यातून हॉस्पिटल्स, शिक्षण, नाट्यसंगीत इत्यादी कला यांच्या लोककल्याणाच्या योजना हाती घेतल्या जातात अशाच शर्यतीच्या फायद्यातून ओशन पार्क नावाचे प्रचंड मत्स्यालय बाधण्यात आले आहे. हे जगातील दुसऱ्या क्रमाकाचे सर्वात मोठे मत्स्यालय पहिल्या क्रमांकाचे मत्स्यालय अमेरिकेत मायामी येथे आहे ओशन पार्कमध्ये चार हजार प्रेक्षकाची सोय आहे. येथे डॉल्फिन, देवमासे, सील, पेन्गुईन इत्यादी जलचराचे कसरतीचे खेळ पाहायला मिळतात तीनशे प्रकारचे जलचर ओशन पार्कमध्ये आहेत. हाँगकांगमध्ये आशियाई कलांचा महोत्सव (फेस्टिव्हल ऑफ एशियन आर्टस्) भरतो त्यात भारत, श्रीलका, थायलड इत्यादी आशियाई [illegible] व हाँगकाँगमधील एक हजार कलावत भाग घेतात सगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला इत्यादी अनेक कलांचा हा महोत्सव दरसाल सुमारे चार लक्ष लोक पाहतात हाँग-कॉग हे जवळ जवळ शभर टक्के चिनी असल्याने चिनी सण मोठ्या दणक्यात इथे साजरे होतात. चिनी नवे वर्ष हा त्यातील सर्वात मोठा सण त्या दिवशी अवाढव्य ड्रॅगन्सची सोंगे काढण्यात येतात. कोट्यावधी डॉलर्सच्या फटाक्याचा धूमधडाका होतो मेजवान्या, भेटीदाखल वस्तूची देवाणघेवाण होते. 'कुग हे फॅयॉय' च्या (नवे वर्ष तुम्हाला भरभराटीचे जावो) गर्जना सर्वत्र एकू येतात

हाँगकाँग हे अवलिया शहर आहे तिथे अद्ययावत, उंची अमेरिकन, जपानी मोटारी टॅक्सी म्हणून वापरतात प्रत्येक टॅक्सीचे आपल्या मुख्य कचेरीशी सतत रेडिओद्वारा दळणवळण असते आपण यावेळी कुठे आहे, ते ड्रायव्हर मुख्य कचेरीला अधूनमधून सांगतो. मुख्य कचेरीकडे टॅक्सीसाठी एकसारख्या विचारणा होत असतात. अशा वेळी जी टॅक्सी मागणी करणाऱ्याच्या जवळ असेल तिला सूचना देऊन तत्काळ व्यवस्था करण्यात येते. खाणेपिणे, राहणे, व्यापार करणे, भटकणे या सर्वांना मुक्तता आहे. मात्र गेल्या वीस वर्षांत येथील 'नाईट लाईफ' बरेच सौम्य करण्यात आले आहे.

याबाबत माझ्याशी बोलताना युनोचे एक अधिकारी श्री फँ म्हणाले, " नाईट क्लब्जच्या आधाराने गुंडगिरी वाढू नये म्हणून ही खबरदारी घेण्यात आली आहे. आता हाँगकाँगचे बहुतेक हॉट नाईट क्लब्ज बँकॉकला गेले आहेत इथे आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींवर भर देण्यात येत असल्याने गुन्हेगारीवर आळा घालून हे शहर सुरक्षित करणे हे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे त्यामुळे येथील रात्रीचे जीवन तुम्हाला बँकॉक–पॅरिसच्या तुलनेने बरेच मिळमिळीत वाटेल एकेकाळी हाँगकाँगची या बाबतीत ख्याती होती, पण आर्थिक प्रगतीसाठी तीवर बरीच नियंत्रणे घातली गेली आहेत वेश्याव्यवसाय आणि भीक मागणे यावर हाँगकाँगमध्ये बंदी आहे अर्थात नाईटक्लबमध्ये या स्त्रिया गिऱ्हाईके पटवतात मात्र लंडन–पॅरिसप्रमाणे रस्त्यावर सिगरेट फुकीत गिऱ्हाईके शोधणाऱ्या वेश्या हाँगकाँगमध्ये आढळणार नाहीत "

शिंपी या प्रकाराबद्दल आपला भारतीय अनुभव असा, की तो कधीही वेळेवर कपडे शिवून देत नाही आठ दिवसांत खमीस शिवून देतो म्हणणारा आपला एतद्देशीय शिंपी महिना–महिनाभर कापड फाडायलाही घेत नाही आपण चौकशी केलीच तर 'सगळा शिवून तयार आहे, पण फक्त काज करायची राहिलीत' असं तो दर्दी दर्जी सांगेल पण हाँगकाँगचा टेलर मात्र याला अपवाद आहे काही तासातच संपूर्ण सूट शिवून देण्याबद्दल त्याची ख्याती आहे स्वत शिंपी किंवा त्याचा एजंट प्रवासी बरोबर हेरून त्यांचा पिच्छा पुरवतात आश्चर्यजनक कमी किंमतीत आणि तीन–चार तासांत सूट शिवतात ज्या सूटला मुंबईला हजार–आठशे रुपये, दीड महिना आणि पन्नास फेऱ्या पडतात तो सूट हाँगकाँला दीडशे ते अडीचशे रुपयांत आणि तीन तासांत शिवून मिळतो शिवाय तो फिट बसतो हेही नसे थोडके। अर्थात मला स्वत ला या माहितीचा काहीच उपयोग नव्हता कारण सुटाच्या या जंजाळात न अडकण्याचा मी निश्चय केला होता.

हाँगकाँगचे भवितव्य आता काळाच्या तडाख्यात आहे कारण १८९८ साली इंग्लंडने चीनशी केलेला ९९ वर्षांचा करार आता संपत आला आहे. १९९७ साली या करारान्वये मिळालेला ताबा वास्तविक इंग्लंडने सोडायला पाहिजे पण इतका संपन्न भाग सोडण्याची त्याची तयारी नाही. चीनची मनोभूमिकाही काहीशी द्विधा आहे कारण हा करार संपून जर हाँगकाँग हा चीनचा भाग झाला, तर चीनला फारच मोठ्या अडचणीच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल चीनच्या अवाढव्य मुख्य प्रदेशातून लाखो चीनी उघडपणे हाँगकाँगमध्ये कायमचे येऊन राहतील आणि आजच्या हाँगकाँगची रयाच जाईल. चीनचे सर्व कायदे हाँगकाँगला लागू करावे लागतील म्हणजेच बँकांचे व उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करावे लागेल. अर्थात ते संकट टाळण्यासाठी हाँगकाँगमधील पाश्चात्य देशांच्या बँका आधीच त्या बंद कर-

तील आणि उद्योगधंदे आपला गाशा गुंडाळतील थोडक्यात म्हणजे आजची भरभराट हाँगकाँगला सोडून जाईल आणि केवळ उंच इमारतींचा एक भूभाग चीनला मिळेल. त्या भागातील स्वच्छता आणि वैभवाच्या खुणा पाहून चीनच्या इतर भागातील जनतेला आपण आतापर्यंत निकृष्ट जीवनमान जगत होतो याचा साक्षात्कार होईल ही जाणीवही चिनी राजकर्त्यांना अस्वस्थ करणारी आहे म्हणून हाँगकाँगच्या भवितव्याबद्दल इंग्लंड व चीनमध्ये सध्या वाटाघाटी चालू आहेत चीन हा करार आणखी पंचवीस किंवा पन्नास वर्षे वाढवून त्या बदल्यात इंग्लंड-कडून आर्थिक सवलती घेईल असा जाणकारांचा कयास आहे

अर्थात हे धोके मला भेडसावीत नसल्याने मी हाँगकाँगमध्ये मुक्त मनाने हिंडलो आणि तिथल्या सोयींचा उपभोग घेतला माझा मुक्काम संपवल्यावर मी टोकियोकडे जाणाऱ्या पॅन ॲमच्या विमानात बसलो आणि उंच इमारतींच्या त्या खरेदीदारांच्या स्वर्गाला निरोप दिला

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

## चैतन्याने ओथंबलेले प्रमाथी शहर

# शिकागो

मी जेव्हा प्रथमच न्यूयॉर्कहून शिकागोला गेलो, तेव्हा विमानतळावर सामान देताना मी स्पष्टपणे सांगितले, ' शिकागो ' तरीही बॅगला टॅग बांधणाऱ्या अमेरिकन अधिकाऱ्याने माझे न ऐकता ' O ' Hare ' असा टॅग बांधून सरकणाऱ्या पट्ट्यावर बॅग ठेवून आत पाठवूनही दिली मला भीती वाटली की, आता मोठीच पचाईत होणार कारण मी शिकागोला जाणार आणि माझं सामान मात्र ' ओहेर ' नावाच्या कुठल्या तरी दुसऱ्याच विमानतळावर उतरणार ! ती दुर्घटना टाळावी म्हणून मी त्या अधिकाऱ्याला हटकले, " माफ करा, पण माझ्या बॅगेवर ' शिकागो 'च लेबल नाही."

त्यावर तो म्हणाला, " काही हरकत नाही. तुम्हाला तिथेच सामान मिळेल ' ओहेर ' हे शिकागोच्या विमानतळाचच नाव आहे "

माझ्या माहितीत ही नवीच भर पडत होती आतापर्यंत सगळ्या विमानतळावर त्या-त्या गावाच्या नावाचे लेबल असते. उदाहरणार्थ, न्यूयॉर्क–NYK, मुंबईच BMY, टोकियोच TKY पण शिकागोचेच ' ओ-हेर ' हे गावाऐवजी तळाचे नाव का हे मला समजेना. वास्तविक, न्यूयॉर्कलाही तीन वेगळे विमानतळ आहेत आणि प्रमुख तळाचे नाव ' केनेडी ' असे आहे पण सामानावर लेबल लावतात ते NYK असच असत

मी विचार केला, त्यांचे अक्षराचे गणित त्याच्याबरोबर आपल्याला सामानासह शिकागो विमानतळावर उतरायला मिळाले की झाले ! प्रवास लहानसाच होता, दोन-अडीच तासांचा ! शिकागो विमानतळाभोवती आमच्या विमानाला काही फेऱ्या माराव्या लागल्या कारण विमान उतरायला जागा नव्हती आणि हे साहजिकच

होते. कारण शिकागोचा 'ओहेर' विमानतळ हा जगातला सर्वांत मोठा विमानतळ आहे. तेथून दररोज तीन हजार आठशे विमाने उड्डाण करतात दर साडेपाच ते सहा सेकंदाला एक विमान असे हे प्रमाण आहे. शिकागोवर घिरट्या घालताना मी खिडकीतून पाहिले तर मुंग्याच्या रांगेसारखी विमानांची रांग लागलेली दिसली अगदी आवश्यक तेवढेच अंतर मध्ये ठेवून ही विमाने पुढे सरकत होती. अखेर आमच्या विमानाला उतरण्याचा इशारा मिळाला आणि ते खाली झेपावले.

सामान घेऊन मी फोनच्या कक्षात आलो. शिकागोला मी शरद गोडबोले या माझ्या मित्रांकडे उतरणार होतो ते मला न्यायला विमानतळावर येणार होते पण ते आलेच नाहीत म्हणून त्यांच्या घरी फोन केला पण तो कोणी उचलेना त्याच वेळी माझे मित्र सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक सी रामचंद्र हे शिकागोत होते ते गांधी नावाच्या मित्राकडे उतरणार होते, त्याना फोन केला आणि गावात कसे यायचे ते विचारले, तर त्या खुद्द गांधीनीच मला सल्ला दिला, "तुम्ही लूप घ्या"

मी थक्कच झालो. विमानतळावरून शहरात यायचे तर त्यासाठी संतति-प्रतिबंधक साधन म्हणन लूप का घ्यायचे ते मला नवागताला कळेना शिकागो शहरात अशी ही चमत्कारिक पद्धत का पडली असावी त्याचाही बोध होइना माझ्या ऐकण्यात काही घोटाळा झाला असावा म्हणून मी विमानतळावरच्या 'इन्फर्मेशन' कक्षात गेलो तिथे एक जाम उफाड्याची अमेरिकन पोरगी अर्धे-अधिक उरोज बाहेर दिसतील असा मिनी स्कर्ट घालून माहिती आणि पाहणाऱ्या-च्या मनाला त्रास व आनंद देत होती मी तिला विचारले, 'मला फॅरेगट अव्हेन्यूला जायचं आहे कसं जाता येईल?'

"प्लीज टेक् द लूप!" तिने हसून सांगितले म्हणजे मी प्रथम ऐकले ते खरे तर! आता या गोड, हसऱ्या नाजूक प्रमदेला "लूप कुठे मिळेल?"– असे कसे विचारावे असा प्रश्न मला पडला, तेव्हा तो हेरून ती स्वतःच म्हणाली, "बाहेर रस्त्यावर जा, समोरच तुम्हाला लूप मिळेल"

मी सामान उचलून चालू लागलो विमानतळावर शेकडो बायका झपाझप इकडे तिकडे जात होत्या त्यांच्या तोकड्या स्कर्टमधून उन्नत उरोज आणि घसघशीत गोऱ्यापान मांड्या जणू आव्हानच देत दृष्टिपथात येत होत्या इतक्या कडक शहरात जायचे तर लूपची व्यवस्था करूनच जा असा संदेश नवागताला मिळावा इतके ते वातावरण उत्तेजक होते. बाहेर पोलीस उभा होता त्याला मी काहीशा संकोचाने म्हटले "मला लूप पाहिजे" त्याने थंडपणे समोरच्या रेल्वेकडे बोट दाखवून म्हटले, 'दॅट्स द लूप."

मी अविश्वासाने त्याच्याकडे पाहिले, तेव्हा तो म्हणाला, "होय, या रेल्वेलाच लूप म्हणतात ती तुम्हाला शहरात घेऊन जाईल तुम्ही 'पामर' हॉटेलजवळ उतरा ती शहरात कुठेही जायला मध्यवर्ती जागा आहे"

हात्तीच्या ! शिकागोत लूप म्हणजे रेल्वे असा अर्थ असेल याची मला काय कल्पना ! मी तिकीट काढले आणि लूपमध्ये शिरलो नंतर मला कळले, ही आगगाडी मध्य शिकागोत ज्या पुलावरून जाते, त्या पुलाचा आकार लूपसारखा आहे, म्हणून तिला लूप असे नाव पडले आहे

'पामर' हॉटेलातून फोन केला, तेव्हा गोडबोले भेटले ते म्हणाले, "तुम्ही तिथेच थांबा मी आणि सी रामचद्र येतो"

थोड्याच वेळात ते दोघे आले आणि शिकागोमधील माझ्या पहिल्या वास्तव्याला सुरुवात झाली

त्यानतर दोन वेळा मी त्या शहरात गेलो या शहराचे मला आवडणारे सर्वात लोभसवाणे वैशिष्टय म्हणजे दुथडी ओसडून वाहणारे चैतन्य न्यूयॉर्कप्रमाणेच शिकागोला गती आहे काहीतरी सतत घडत राहते भलेबुरे पण भव्य, प्रचड ! इथला धान्यबाजार हा जगातील सर्वात मोठा गहू, मका अशा अनेक धान्यांचे जागतिक भाव इथे ठरतात जगातील सर्वात मोठा विमानतळ शिकागोचा उद्योगधद्याच्या आधुनिक जगात परिषदाना अत्यत महत्त्व आले आहे. प्रत्येक सघटना, उद्योग, व्यापारी सस्था वर्षातून एक–दोनदा अवाढव्य परिषदा (कॉन्फरन्सेस्) भरवीत असतात आणि या परिषदांचा मेरुमणी म्हणजे शिकागो. या शहरात जेवढ्या परिषदा भरतात तेवढ्या जगात इतरत्र कुठेही भरत नाहीत खास परिषदांच्याच सोयी असलेली निदान शभर टोलेजग हॉटेले इथे आहेत. त्यापैकी 'पिक् कॉंग्रेस' हॉटेल हे सर्वात मोठे सुदैवाने मी दुसऱ्या वेळी शिकागोला गेला, तेव्हा याच 'पिक कॉंग्रेस हॉटेलमध्ये मला राहण्याची सधी मिळाली या हॉटेलमध्ये एकाच वेळी तीन हजार प्रतिनिधी बसू शकतील एवढे भव्य प्रेक्षागृह आहे या हॉटेलमध्ये एका जिन्यावरून दुसऱ्या जिन्यावर जाण्यासाठी भरपूर लिफ्ट्स तर आहेतच, पण परिषदाची गर्दी एवढी मोठी असते की लिफ्ट्सना ही गर्दी आवरत नाही म्हणून रेल्वे स्टेशन्स किंवा विमानतळावर असतात तसे सरकते जिनेही आहेत तीन-तीन हजार लोकाना एकाच वेळी न्याहरी किंवा मेजवानी देण्याची सोय 'पिक कॉंग्रेस 'मध्ये आहे मी एक भारतीय लेखक आहे हे समजताच या हॉटेलच्या व्यवस्थापकांनी माझ्या खोलीत येऊन मला एक लहान वस्तू भेट म्हणून दिली आणि 'पिक कॉंग्रेस हॉटेलचे सन्माननीय ग्राहक' असे माझे नाव घातलेले, प्रेम करण्यासारखे बी ए च्या सर्टिफिकेटसारखे सर्टिफिकेटही दिले. अर्थात त्यांचा उद्देश माझा सन्मान करणे हा नसून आपल्या हॉटेलची जाहिरात करणे हा होता हे ओळखण्याइतका मी पाश्चात्य जगात वावरलो होतो.

दुसऱ्या वेळी मी शिकागोला गेलो, तेव्हा 'पिक कॉंग्रेस' हॉटेलमध्ये माझ्या पत्नीसह राहत होतो एका रात्री झोपताना मी टेलिफोन ऑपरेटरला फोन करून

सांगितले, मी खोली क्रमांक ५६८ मधून बोलतो आहे मला सहा वाजता मॉर्निंग कॉल द्या आणि त्याच वेळी चहा पाठवा ' त्यावर ती म्हणाली, " सहा वाजता मी तुम्हाला फोन करते पण हॉटेलची रूम सर्व्हिस सात वाजता सुरू होते मात्र तळमजल्यावर कॉफी हाऊस आहे तिथे तुम्हाला पहाटे साडेपाच वाजल्यापासूनच कॉफी मिळेल " तिच्या या माहितीबद्दल आभार मानून मी फोन ठेवणार, तोच ती गोड आवाजात म्हणाली, " आपण भारतातून आला आहात काय ?" मी ' होय ' म्हणून सांगितल आणि हिन हे कस ओळखल असा प्रश्न केला. त्यावर ती म्हणाली, " इग्रजी उच्चारांवरून देश ओळखण्याचा मला सराव आहे तुमचा आवाज फार मधुर आहे, डिअर ! "

अरेच्या ! ' डिअर ' म्हटल्यावर मीही चक्रावलोच

मनात आले की, ही कोण ते माहीत नाही आणि अवाढव्य हॉटेलातल्या टेलिफोन ऑपरेटर्स कुठे तळघरात गुप्त असतात त्या कधीच दिसत नाहीत मग आपणही तिला ' डार्लिंग ' का म्हणू नये ! त्यावर मीही तिची प्रशसा करीत म्हटले " तुझाच आवाज मधुर आहे, डार्लिंग ! " त्यावर ती प्रेमाने ' गुड नाईट माय लव्ह ' असे चक्क म्हणाली मीही त्याच शब्दात प्रतिसाद दिला माझ्या पत्नीला मी थट्टेने म्हटले, ' ती टेलिफोन ऑपरेटर पोरगी माझ्या प्रेमात पडली बघ ! मला डिअर, लव्ह असे म्हणाली पण ती कशी दिसते आणि किती वयाची आहे ते कधीच कळणार नाही "

आम्हाला दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता बसने सिटी टूरसाठी जायचे होते बरोबर सहा वाजता काल रात्रीच्या त्या फोन सुदरीचा अगदी आठवणीने डार्लिंग, लव्ह ' म्हणून फोन आला मी मोठ्या खुषीत उठलो आणि मनाशी म्हटले शेकडो लोकांच्या गर्दीतही ही पोरगी काही आपल्याला विसरली नाही मी आणि माझी पत्नी तोंड धुऊन खाली तळमजल्यावर आलो कॉफी हाऊसमध्ये गरम कॉफी मागवली आम्ही कप उचलणार, तोच पासष्ट वर्षांच्या सुमाराची एक वृद्ध बाई आमच्या जवळ येऊन बसली आणि तिनेही कॉफी मागवली त्या भल्या सकाळी गर्दी नव्हतीच. रेस्टॉरंटमध्ये आम्ही तिघे होतो. मी माझ्या सौ बरोबर बोलत होतो आणि काय–काय पाहायला जायचे ते सांगत होतो

इतक्यात माझ्या जवळची ती वृद्ध बाई म्हणाली, " आर यू द जंटलमन इन रूम फाईव्ह सिक्स एट ?" मी ' होय ' म्हटले आणि " आपण कस ओळखलत ?" असे त्या आजीबाईला विचारले, तेव्हा ती म्हणाली, " अहो मीच तुम्हाला थोड्या वेळापूर्वी मॉर्निंग कॉल दिला माझी रात्रपाळी आत्ताच सपली "

माझा पडलेला चेहरा पाहून माझ्या सौ. ला इतके बरे वाटले की शिकागोला जपानी साड्या घेतल्या, तेव्हासुद्धा तिला मी इतकी खूष झालेली पाहिली नाही.



१०

रात्री कशी मला सुखाने झोप लागली होती त्या फोन–सुंदरीची माझी प्रतिमा तशीच राहिली असती तर काय बिघडले असते ? पण आमची प्रत्यक्ष गाठ घालून दैवाने असा वास्तववादी सूड उगवला होता !

रोम, अथेन्स अशा नामवंत शहरांना दोन–दोन हजार वर्षांचा इतिहास आहे त्या मानाने सबंध अमेरिका देशच अवघा तीन शतकांचा मग शिकागो शहराला कितीसा दीर्घ इतिहास असणार ? १८३० पर्यंत मिशिन तळ्याच्या काठी आणि एका नदीच्या मुखाशी असलेले ते एक लहानसे गाव होते जलवाहतुकीमुळे छोटा व्यापार चालत असे तेवढाच पण गेल्या दीडशे वर्षांत त्याने एवढी प्रगती केली आहे की आज न्यूयॉर्कच्या खालोखाल शिकागो हे अमेरिकेतील सर्वात मोठे लोकसंख्येचे शहर आहे या शहराची लोकसंख्या पचाऐंशी लक्ष आहे जगातील सर्वात मोठा 'ओ-हेर' विमानतळ शिकागोत आहे अमेरिका हे विशाल खंड आहे आणि शिकागो शहर त्या राष्ट्राच्या मध्यभागी आहे त्यामुळे अमेरिकेच्या कोणत्याही बाजूने या शहरात येणे सोपे आहे विमानाची मुबलकता असल्याने केव्हाही इथे येता येते आणि इथून प्रयाण करता येते परिषदाच्या खास सोयीसाठीच 'पिक कॉंग्रेस'सारखी महाप्रचंड हॉटेले बांधण्यात आली आहेत

अमेरिकेत १९२० ते १९३० पर्यंत दारूबंदी होती त्या काळात शिकागो हा गुन्हेगारांचा अड्डा झाला चोरून दारू गाळणे, जुगार, चोरटी शस्त्रे आयात करणे किंवा तयार करणे अशा बेकायदा कामात गुंतलेल्यांना जलवाहतूक आणि शिकागोचा बकालीपणा यांचा आधार वाटला ही प्रवृत्ती शिकागोमध्ये जवळ–जवळ शंभर वर्षे टिकली पण मधल्या काळात उद्योगधंद्याची अमाप वाढ झाली, मद्यपानावरील बंदी उठली, कोणासही शस्त्रे विकत घेता येऊ लागली आणि पोलिसांनी आधुनिक तंत्रांच्या साहाय्याने गुन्हेगारी काबूत आणली त्यामुळे ज्या 'गँगस्टरीझम' किंवा गुंडगिरीबद्दल शिकागो शंभर वर्षे कुप्रसिद्ध होते तो डाग हळूहळू पुसून गेला आणि उद्योगपती, व्यापारी, कलावंत यांनी गजबजलेले चैतन्यशाली शहर ही शिकागोची प्रतिमा जनमानसात रूढ होऊ लागली. या नव्या बदलाची कल्पना नसलेले प्रवासी अजूनही शिकागोत असताना धाबरून असतात पण आजचे शिकागो शहर तसे [illegible] न्यूयॉर्कसारख्या इतर मोठ्या शहरांपेक्षा तरी अधिक धोक्याचे नाही

प्रत्येक शहरात एखादा मानाचा रस्ता किंवा विभाग असतो. पॅरिसमध्ये शांझे लिझा अव्हेन्यू, लंडनचा पिकॅडली सर्कस, न्यूयॉर्कचा फिफ्थ अव्हेन्यू, मुंबईचा फ्लोरा फौंटन तसा शिकागोचा 'मिशिगन अव्हेन्यू' हा मानाचा रस्ता आहे मैलभराच्या या तुकड्याला 'द मॅग्निफिसंट माईल्स' असे आवडते नाव आहे एका बाजूला निवांत सुंदर मिशिगन तळे आणि दुसऱ्या बाजूला तितकी शोभायमान

निसर्गसुंदर उद्याने यातून हा देखणा रस्ता जातो शिकागो ज्या मोकळ्या वाऱ्याबद्दल प्रसिद्ध आहे, तो वारा या ठिकाणी भरपूर प्रमाणात उपभोगता येतो उद्यानाचा हा भाग इतका मोठा आहे की लंडनचा 'हाईड पार्क' सोडला तर मोठ्या शहरात इतकी गर्द झाडी आणि मोकळी हवा इतर कुठेही दिसणार नाही

या अवाढव्य शहराने अनेक घात–अपघात पचवले आहेत लंडन शहर एकदा जळून जवळजवळ नष्ट झाले होते, तसाच प्रकार शिकागो शहराच्या बाबतीतही १८७१ साली झाला होता त्यावेळी तीनशे लोक ठार झाले आणि पन्नास हजार लोक बेघर झाले शिकागो नदीत 'ईस्टलँड' ही बोट बुडून आठशे उतारूंना जलसमाधी मिळाली होती पोलीस आणि सपावरील प्रक्षुब्ध कामगार यांच्यात संघर्ष, गोळीबार मारामाऱ्या होऊन आतापर्यंत शेकडो लोक ठार झाले आहेत 'इरावक्स' या नाट्यगृहाला आग लागून अपरिमित वित्तहानी झाली पोलीस आणि रेल्वेचे सामान तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगारांच्या संघर्षात अनेकदा खून, अत्याचार, दंगली झाल्या शिकागो हे बलदंड लोकांचे गाव आहे कारण येथे शेकडो लहानमोठे कारखाने असल्याने दणदणीत निग्रो कामगारांची संख्या मोठी आहे कार्ल सँडबर्ग या कवीने 'सिटी ऑफ् ब्रॉड शोल्डर्स' असे या शहराचे वर्णन केले आहे. उद्योगधंद्यांच्या विकासाबरोबरच कामगारांना रोजगारी मिळू लागली म्हणून हजारो निग्रोंचे लोंढे अमेरिकेच्या दक्षिण भागातून शिकागो शहराकडे लोटले आणि आता त्यांना या शहरात महत्त्वाचे स्थान मिळाले आहे या कृष्णवर्णीय कामगारांच्या वास्तव्याने शिकागो शहराला एक प्रकारचे कणखर, काहीसे ओबडधोबड व्यक्तिमत्त्व मिळाले आहे शिकागोच्या अथांग चैतन्याचेही तेच कारण आहे वॉशिंग्टनमध्ये निग्रोंची वस्ती मोठी असली तरी येथील बहुसंख्य जनता नोकरदार किंवा 'व्हाईट कॉलर' आहे, तर शिकागोत 'ब्ल्यू कॉलर' किंवा कामगारांचे प्राबल्य आहे.

शिकागो शहराची स्थापना १६७३ च्या सुमाराला दोन फ्रेंच संशोधकांनी केली त्यांनी आपल्या रक्षणासाठी आपल्याबरोबर काही निग्रो सेवक नेले होते. तेव्हापासूनच या भागात निग्रोंच्या वसाहतीस सुरुवात झाली १७१५ साली अमेरिकन सरकारने या भागात आपला कारभार सुरू केला आणि येथील व्यापाराला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला पण शिकागोची खरी वाढ सुरू झाली, ती १८२५ साली इरी कालवा काढला गेला तेव्हाच १८३७ साली तेथे नगरपालिका स्थापन झाली, तेव्हा शिकागोची लोकसंख्या फक्त चार हजार होती नंतर १८४८ साली मिशिगन कालवा खोदला गेला आणि या शहराची भरभराट होऊ लागली. आगगाडी आल्यावर तर औद्योगिक प्रगतीला ऊत आला अमेरिकेच्या मध्यभागी हे शहर असल्याने जलवाहतूक, रेल्वे, मोटारी आणि विमाने ही फोफावली. १८९०

ते १९०० या काळात युरोपवर दारिद्र्य व दुष्काळ याची छाया पडली आणि हजारो गरीब लोक कामाच्या शोधार्थ अमेरिकेस गेले त्यातील बहुसख्य शिकागोस पोचले या नव्या लोकात रशियन ज्यू, इटालियन, स्पॅनिश, पोलीश, असे अनेक देशाचे व वर्शाचे लोक येऊन येथे स्थायिक झाले त्यामुळे आजही शिकागोच्या नागरिकात अतिशय विविधता आहे, तशीच काहीशी बेपर्वा, स्वच्छदी आणि स्वतत्र वृत्तीही आहे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला शिकागो येथे अमेरिकेचे सर्वात मोठे ग्रेन मार्केट (धान्याचा बाजार) स्थापन झाले कारण मका, गहू व इतर धान्य अमेरिकेच्या कोणत्याही भागातून या मध्यवर्ती बाजारात आणणे सोयीचे होते आता हा जगातील सर्वात मोठा धान्यबाजार झाला आहे भारतात धान्य-टचाई होती तेव्हा याच बाजाराने हजारो टन गहू भारताला पुरवला आहे जगाच्या कोणत्याही भागातील धान्यटचाईला तोंड देण्यास हा बाजार समर्थ आहे महाराष्ट्रातील काही शेतकऱ्यांना घेऊन त्यांना मी हा धान्यबाजार दाखवला न्यूयॉर्कच्या स्टॉक एक्स्चेंजमध्ये शेअर्सचा चढउतार जसा विद्युदणूच्या आकड्यांनी व गणकयत्रांच्या साहाय्याने दाखवला जातो, तसा शिकागोच्या या धान्यबाजारात गहू, तांदूळ, मका, ज्वारी, बाजरी इत्यादी सर्व प्रमुख धान्यांचे जगातील सर्व प्रमुख देशांतील साठे, त्याच्या किमती, इतकेच नव्हे तर पुढील तीन महिन्याचे अदाज गणकयत्रांच्या साहाय्याने पन्नास फूट उच फलकावर दाखवले जातात अर्थात हे होलसेल मार्केट आहे येथे फक्त हजारो टनाचाच व्यवहार होतो सर्व प्रमुख देशाचे शेतीविषयक प्रतिनिधी शिकागो ग्रेन मार्केटमध्ये जागरूकपणे फिरतात आपआपल्या देशांना अद्ययावत धान्य परिस्थिती कळवतात आणि खरेदी–विक्रीचे व्यवहार करतात व्यापार–उद्योगांचे हे प्रचड केंद्र असल्याने त्याला अनुषगिक अशा बँका, विमा कपन्या, वाहतूक व्यवस्था यांच्या हजारो कचेऱ्याही आपोआप आल्याच

'अमेरिकेचा तिठा' (क्रॉसरोड्स) हे सार्थ नाव शिकागो शहराला पडले आहे परकीय आणि स्वकीय प्रवाशाना हवे ते सर्व इथे आहे उत्कृष्ट वस्तुसग्रहालये आहेत, विशाल उद्याने आहेत, निवडक व धाडसी नाईट क्लब्ज आहेत, उंची हॉटेल्स आहेत, नाट्यगृहे, म्युझिक हॉल्स, ग्रंथालये, जलविहाराची सर्वोत्कृष्ट सोय, भुयारी रेल्वे, डोकीवरील (ओव्हर हेड) रेल्वे, जमिनीवरील रेल्वे असे आगगाड्यांचे सर्व संभाव्य प्रकार आहेत. तलाव, नदी आणि सागर असे जलवाहतुकीचे सर्व प्रकार असलेले हे एकमेव शहर आहे. पण मला या सर्वात शिकागोचे जे वैशिष्ट्य जाणवते, ते म्हणजे त्याचे चैतन्य, त्याची नवनवोन्मेषशीलता, त्याचा जोम (डायनॅमिझम)! झोंबऱ्या वाऱ्याबरोबरच चित्रकला, साहित्य, नाटक, सगीत अशा सर्व सास्कृतिक चळवळी शिकागोमध्ये फोफावल्या आहेत अलीकडेच नोबेल पारितोषिक मिळविणारे सॉल बेलो हे शिकागोमध्येच राहतात १९८१ साली मी

अमेरिकेला जाण्यापूर्वी त्यांना पत्र लिहून भेटण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा त्यांच्या सेक्रेटरी बाईचे पत्र आले की, ' आपण शिकागोमध्ये असणाऱ्या ज्या तारखा दिल्या आहेत, त्यावेळी सॉल बेलो हे परदेशात असतील त्यानंतर महिन्याभरातली तारीख दिलीत तर भेटीची वेळ ठरवता येईल पण तेव्हा मी जगप्रवासात असल्याने मला तारीख बदलता आली नाही शिकागो विद्यापीठात मराठी भाषेच्या शिक्षणाची सोय आहे. तेथे जाऊन तेथील मराठी विभागात मी माझे ' सह्याद्रीची चोरी ' हे पुस्तक पाहिले आणि मराठी भाषा शिकणाऱ्या एका अमेरिकन विद्यार्थ्याने ' सह्याद्रीची चोरी ' या पुस्तकावर मराठीत लिहिलेले समीक्षणही मला तेथील ग्रंथपालांनी दाखवले गगनभेदी (स्कायस्क्रेपर्स) बांधण्यात शिकागोने अलीकडे न्यूयॉर्कलाही मागे टाकले आहे ' न्यूयॉर्कची ' एम्पायर स्टेट ' ही इमारत अनेक तपे जगातील सर्वात उच इमारत होती. त्यानंतर न्यूयॉर्कमध्येच वर्ल्ड ट्रेडिंग सेंटरच्या दोन इमारतींनी हा मान हिसकावून घेतला. पण आता शिकागो येथील सीअर्स टॉवर ही इमारत जगातील सर्वांत उंच इमारत झाली आहे या इमारतीची उंची १४६८ फूट असून ती १०९ मजली आहे १ लक्ष २९ चौरस फूट जागा व्यापलेल्या या इमारतीत १६,५०० लोक काम करतात. शिकागोच्या जॉन हॅकॉक टॉवरपेक्षा सीअर्स टॉवरची उंची ३२५ फूट अधिक उंच असून न्यूयॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरपेक्षा १२५ फूट अधिक उच आहे जगप्रसिद्ध चित्रकार पाबलो पिकासो याचे वास्तव्य बरीच वर्षे शिकागोत होते ते नवचित्रकलेचे प्रणेते आहेत आधुनिक जगातील सर्वश्रेष्ठ वास्तुशिल्पकार फ्रँक लॉईड जॉर्ज आणि जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिक विजेते साहित्यिक अर्नेस्ट हेमिंग्वे यांची उमेदीची अनेक वर्षे शिकागोच्या ओक पार्क विभागात गेली आहेत. या शहराचे बलदंड, काहीसे आदिमानवाचे व्यक्तिमत्त्व हेमिंग्वे यांनी उचलले आहे फ्रँक लॉईड राईट यांनी बांधलेल्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण इमारती आजही शिकागोचे वैभव वाढवीत आहेत

उद्योगधंदे, कारखाने, अखंड वाहतूक या सर्वांनी गजबजलेल्या या शहरात अत्यंत शांत, प्रगल्भ आणि चिंतनपर वातावरण जर कोठे असेल तर ते विवेकानंद आश्रमाच्या इमारतीत मध्यभागी विस्तीर्ण पटांगण असलेल्या या इमारतीत अनेक भारतीय आणि परकीय शिष्य हिंदू धर्माचा आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतात. मी या आश्रमात गेलो तेव्हा सुदैवाने भाष्यानंद हेच आश्रमाचे प्रमुख होते. ते यवतमाळचे गेली अकरा वर्षे ते या आश्रमाचे कार्य करीत होते आश्रमाची स्वतःची शेतीवाडी असून त्यातून येणारे उत्पन्न व देणगीदारांचे साहाय्य यातून आश्रमाचे काम उत्तम चालले आहे आश्रमाच्या अमेरिकेत इतरत्र शाखा आहेतच, पण शिकागो येथे मुख्य कचेरी असावी याला विशेष अर्थ आहे. कारण स्वामी विवेकानंद यांचे आणि शिकागो शहराचे अतूट नाते आहे. १८९३ साली शिकागो

येथे सर्वधर्म परिषद भरली होती या परिषदेसाठी स्वामी विवेकानद येथे आले. पण तेथे त्याना कळले की व्यक्तीला या परिषदेत भाग घेता येत नाही, कोणत्या-तरी सस्थेच्या प्रतिनिधीलाच भाग घेता येतो म्हणून ते बोस्टन येथे गेले. तेथे हार्वर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक राईट यांना ते भेटले विवेकानदाची विद्वता आणि धर्मविषयक ज्ञान यांनी ते एवढे प्रभावित झाले, की त्यांनी उद्‌गार काढले, " आपल्यासारख्या अधिकारी व्यक्तीकडे प्रतिनिधित्वाचा परवाना मागणे म्हणजे सूर्याला प्रकाशण्याचा अधिकार नाकारणेच आहे आपण हार्वर्ड विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून परिषदेत भाग घ्या." विवेकानद प्रा राईट याचे अधिकारपत्र घेऊन शिकागोस आले तेव्हा त्यांच्याजवळ जेवण्याखाण्यासाठीही पैसा नव्हता मग हॉटेलमध्ये राहणे दूरच रात्रीचे शिकागो स्टेशनवर थडीच्या कडाक्यात ते एका मोडक्या खोक्यात रात्रभर पडून राहिले दुसऱ्या दिवशी भारतातील प्रथेप्रमाणे त्यानी रस्त्यात भीक मागितली पण अमेरिकेत भिकाऱ्यांना बदी होती त्याना भिक्षाही मिळाली नाही भुकेने ग्लानी येऊन विवेकानद याच शिकागो शहराच्या एका रस्त्यावर पडले, तेव्हा जवळच्याच घरातील एका अमेरिकन महिलेने त्याना घरात नेले आणि अन्न व निवारा दिला

११ सप्टेबर १८९३ रोजी सर्वधर्म परिषदेस प्रारभ झाला. या परिषदेचे नाव जरी 'सर्वधर्म' असे सोज्वळ असले, तरी मोठमोठ्या चर्चेसनी अवाढव्य रक्कम खर्च करून ही परिषद ख्रिश्चन धर्म हा जगातील सर्व श्रेष्ठ धर्म आहे असा निष्कर्ष काढण्यासाठीच बोलाविली होती पण स्वामी विवेकानंद यानी या परिषदेत अपूर्व ओजस्वी असे भाषण करून हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व प्रतिनिधींना पटवून दिले त्यामुळे परिषद सपल्यानतरही त्यांना अमेरिकेत सव्वादोन वर्षे राहावे लागले आणि हिंदू धर्मावर प्रवचने देऊन त्यांनी सबध अमेरिकेत भारताविषयी आदर निर्माण केला. परत येताना त्यांनी लडनमध्ये थाबून क्रातिवीर वासुदेव बळवत यांचे ज्या कारा-गृहात निधन झाले, त्या जागेचे दर्शन घेतले शिकागोच्या रस्त्यावर एकदा भुकेने मरणोन्मुख अवस्थेत पडलेले स्वामीजी जेव्हा कोलंबोला पोचले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी दोन मैल लांबीच्या पायघड्या घातल्या होत्या !

अमेरिकेत 'मेल ऑर्डर स्टोअर्स' नावाचा खरेदीचा प्रकार अत्यत लोकप्रिय आहे त्याची पद्धत अशी, की कोणत्याही मालाच्या खरेदीसाठी तुम्हाला दुकानात जाण्याचा त्रास नको, खर्च नको की त्यात वेळही घालवायला नको. कपनीचा एक प्रचंड म्हणजे पाचसहाशे पानी कॅटलॉग तुमच्या घरी मोफत येतो त्यात सर्व वस्तूची रगीत छायाचित्रे, त्याचे वर्णन आणि किमत दिलेली असते. तो कॅटलॉग वाचून कपनीला पत्रान्वये कोणता माल हवा ते कळवायचे. कपनी तो माल पोस्टाने घरपोच पाठवते तो मिळाल्यानंतर चेकने पैसे पाठवायचे. अशा जगातील सर्वात मोठ्या

कंपन्या शिकागोत आहेत. सी अर्ल–रोबक, मॉंटगॉमेरी वॉर्ड, स्विगेल या आघाडीवरच्या कपन्याच्या मुख्य कचेऱ्यांतून अमेरिकेच्या सर्व भागांत अब्जावधी डॉलर्सचा माल दरसाल रवाना होतो सीअर्स टॉवर हा याच सी अर्ल रोबक कपनीचा यावरून अशा कपन्यांच्या व्यवहाराची कल्पना येईल जगातील ज्ञानाचे भाडार अपरपार भरून ठेवणारा 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका' हा सर्वश्रेष्ठ ज्ञानकोश शिकागो येथेच तयार होतो जगातील सर्वांत चावट आणि सपन्न असे मासिक 'प्लेबॉय' येथूनच प्रसिद्ध होते आणि जगातील निग्रोंचे अग्रगण्य नियतकालिक 'एबनी' हेही शिकागोमधूनच निघते मॅक्‌डोनल्ड ही सबध अमेरिकेतच नव्हे तर जगातील इतर अनेक देशांत शाखा असलेली खाद्यपदार्थ तयार करणारी कपनी शिकागोचीच. 'टाईम' साप्ताहिकाने या कपनीचे चित्र मुखपृष्ठावर दिले होते यावरून हिचे महत्त्व लक्षात येईल विविध विषयांत नोबेल पारितोषिके मिळविणारे आठ प्राध्यापक शिकगो विद्यापीठात अध्यापन करतात अणुशास्त्रातील अनेक नवे शोध शिकागो विद्यापीठाने जगाला दिले आहेत अर्थशास्त्रात नोबेल पारितोषिक मिळविणारे मिल्ट फ्रीडमल हे शिकागोत राहतात 'एक्झॉसिस्ट'चे दिग्दर्शक फ्रीडकिन आणि त्यांची पत्नी जगप्रसिद्ध अभिनेत्री जॉन मॉरो यांचे निवासस्थानही शिकागोत आहे जगातल्या सर्व स्टॉक एक्स्चेजच्या वायदा–बाजाराची सुरुवात याच शिकागो शहरात झाली.

नोबेल पारितोषिक विजेते सॉल बेलो हे वयाच्या नव्वदाव्या वर्षी मॉंट्रीयलहून शिकागो येथे आले आणि स्थायिक झाले. ते म्हणतात, "हे शहर अत्यत वाईट आणि अत्यत चागलेही आहे पण मला ते आवडते कारण, इथे सतत काहीतरी घडत राहते हे चैतन्याचे शहर आहे"

काही वर्षांपूर्वी मी 'सिटी अँड द रायटर' हा अमेरिकन माहितीपट पाहिला होता. अमेरिकेतील बहुतेक श्रेष्ठ लेखक शहरात किंवा शहराच्या उपनगरात राहतात सर्वसाधारण वाचकाची अशी समजूत असते की, लेखक हा निवात, शांत जागीच राहत असावा कारण त्याला लेखनासाठी पूर्ण शातता लागते अशा अर्थाचा प्रश्न विचारला गेला, तेव्हा या माहितीपटातील लेखकानी सागितले, "आम्ही शहरात राहतो कारण तेथे काहीतरी महत्त्वाचे घडत असते ती प्रेरणा घेऊन, त्यावर विचार करून शांतपणे लेखन करण्यासाठी आम्ही निवात जागी जातो पण कायमचे वास्तव्य करतो ते मात्र चैतन्यशाली शहरात–न्यूयॉर्क, शिकागो, लॉस एंजिल्स अशा ह्या महानगरात"

स्वतःच्या बळावर शिकागो शहर पाहणाऱ्याला मिशिगन अव्हेन्यूवरील टूरिस्ट ब्यूरो सर्व प्रकारची मदत देईल वर्षभर शिकागोत विविध सण, सोहाळे, उत्सव चालू असतात फेब्रुवारीमध्ये चायना टाऊन विभागात नव्या चिनी वर्षाच्या

स्वागताचा महोत्सव होतो मार्च महिन्यात मॅकॉर्मिक प्लेसमध्ये जागतिक पुष्प-सोहळा असतो आपल्याकडील लता मंगेशकर, महंमद रफी वगैरे कलावंतांचे कार्यक्रम याच मॅकॉर्मिक हॉलमध्ये झाले आहेत मार्च महिन्यात शिकागोमध्ये खास प्रवास–जत्रा भरते 'बोट शो' या नौ–दिनास शिकागो नदीतून बोटींचे सर्वांगसुंदर कार्यक्रम होतात मे महिन्यात जलप्रकाश उत्सव असतो यावेळी शिकागो शहरातील नेहमीचे आणि खास तयार केलेले कारंजे रंगीबेरंगी प्रकाशात रात्रभर चमचमत असतात ऑगस्टमध्ये 'वॉटर परेड' असते यावेळी मिशिगन तलाव आणि नदीत विविध जलक्रीडांचा उत्सव होतो सप्टेंबरमध्ये संगीत महोत्सव होतो ऑक्टोबर-मध्ये लोक–कला महोत्सव होतो, त्यावेळी शंभर वर्षांपूर्वीचे कपडे घालून लोकनृत्ये आणि लोकसंगीत यांचे कार्यक्रम सादर केले जातात यावेळी रिंगलिंग, बार्नम, बेली अशा जगविख्यात सर्कशींचे मुक्काम शिकागोत असतात नोव्हेंबरमध्ये जागतिक गुरांचे प्रदर्शन भरते मग डिसेंबरचा नाताळ आणि जानेवारीचे नवे वर्ष हे सण तर अमेरिकेच्या इतर भागांसारखेच शिकागोतही भव्य प्रमाणावर होतातच. शिकागोचे वैशिष्ट्य असे की, तेथे प्रवाशांच्या सोयीसाठी खास 'इंडस्ट्रियल टूर्स' आखलेल्या असतात. निरनिराळ्या उद्योगधंद्यांना भेटी देऊन त्यांची माहिती देण्याची उत्तम व्यवस्था या सफरीतून केली जाते

या उद्योगप्रधान शहरात धनिकांची स ग मोठी असावी हे साहजिकच आहे. त्यापैकी अनेक धनिकांनी दिलेल्या देणग्यातून शिकागोत भव्य वस्तुसंग्रहालये उभारण्यात आली आहेत जॅक्शन पार्कमध्ये असलेले म्युझियम ऑफ सायन्स अँड इंडस्ट्री हे सर्वात मशहूर आहे विज्ञान आणि उद्योगधंद्यांची प्रगती दाखविणारी शेकडो मॉडेल्स, यंत्रे या वस्तुसंग्रहालयात आहेत अंड्यातून कोंबडीची पिले बाहेर येताना मी याच ठिकाणी पाहिली अमेरिकेतील पोलाद, कापड, साखर, मोटार इत्यादी व्यवसायांचा इतिहास, जुन्या उत्पादनांचे नमुने अद्ययावत् यंत्रे व मोटारी इत्यादी पूर्णपणे पाहण्यास दोन संपूर्ण दिवसही पुरणार नाहीत शिकागो शहराचा विकास कसा झाला ते दाखविणारे स्वतंत्र कायम प्रदर्शन लिंकन पार्कमध्ये आहे, ओरिएंटल इन्स्टिट्यूटमध्ये मानवाच्या विकासाचा आलेख पाहावयास मिळतो त्यातील काही वस्तू पाच हजार वर्षांपूर्वीच्या आहेत. आर्ट इन्स्टिट्यूट ऑफ शिकागो हे जगातील एक श्रेष्ठ चित्रकलासंग्रहालय आहे. विशेषत इम्प्रेशनिस्ट' चित्रकारा-च्या कलाकृतींचा सर्वोत्कृष्ट संग्रह या म्युझियममध्ये आहे. 'युक्रेनियन इन्स्टिट्यूट ऑफ मॉडर्न आर्ट'ने आधुनिक चित्रकला व शिल्पकला यांचे निवडक नमुने ठेवले आहेत जगातील चमत्कारिक वस्तू, प्रसंग, व्यक्ती यांचा संग्रह करणारे सुप्रसिद्ध अमेरिकन श्री. रिप्ले यांच्या संग्रहातील निवडक वस्तूंचे प्रदर्शन शिकागोमध्ये आहे. 'बिलीव्ह इट ऑर नॉट' हेच पुस्तकाप्रमाणे या प्रदर्शनाचेही नाव आहे. याशिवाय

आफ्रिकन आर्ट, कॉन्टेपोररी आर्ट इत्यादी अनेक वस्तुसंग्रहालये फोर्ड आणि इतर धनिकांच्या मदतीने शिकागोमध्ये दरसाल लक्षावधी रसिकांना आपल्याकडे खेचीत आहेत फोर्ट डीअर बॉर्न ही शिकागोमधील पहिली वसाहत, वॉटर टॉवर हे मिशिगन अव्हेन्यूवरील सर्वांग सुंदर ठिकाण, ओल्ड टाऊन हा जुना विभाग, नॅशनल मेमोरियल ही शिकागोमधील इतर प्रेक्षणीय स्थळे आहेत

शिकागोत असताना मला आणि माझ्या काही भारतीय मित्रांना एखाद्या चांगल्या नाईट क्लबमध्ये जायचे होते. अशी ठिकाणे टॅक्सीवाल्यांना चांगली माहीत असतात म्हणून आम्ही ' पिक काँग्रेस ' हॉटेलमधून रात्री नऊच्या सुमाराला बाहेर पडलो आणि समोरच्या उभ्या असलेल्या एका टॅक्सी ड्रायव्हरला विचारले, '' चांगल्याशा क्लबला नेणार का ? '

तो ड्रायव्हर अगदी तरुण–फार तर वीस–एकवीस वर्षांचा होता तो म्हणाला, " अवश्य ! बसा पण तुम्हाला खर सांगू का ? उंची हॉटेलातले फ्लोअर शोज फार महाग असतात आणि नामवंत नाईट क्लब्ज म्हणजे प्रवाशांना लुबाड- ण्याचे अड्डेच आहेत मी तुम्हाला त्यातल्या त्यात स्वस्त पण नाईट क्लबबद्दलच्या तुमच्या अपेक्षा पूर्ण करील अशा ठिकाणी नेतो "

आम्हालाही तेच हवे होते. टॅक्सी चालू झाल्यावर तो ड्रायव्हर म्हणाला, "मी फक्त रात्री आठ ते एकपर्यंत टॅक्सी चालवतो कारण मी दिवसा विद्यापीठात अर्थशास्त्राच शिक्षण घेतो. तुम्ही भारतातले का ?" मी 'होय' म्हणून सांगितल्यावर तो म्हणाला, "वा ! मग मला तुम्ही योगाच शिक्षण द्याल काय? मी शिकवणीची फी देईन मी तस योगाबद्दल वाचन केल आहे पण या शास्त्रात प्रत्यक्ष शिक्षणाला पर्याय नाही. "

मी म्हटले, " पण मी तीन–चार दिवसच इथ आहे ही एक अडचण. पण त्यापेक्षा खरी अडचण म्हणजे, मला योगविद्या अजिबात येत नाही " त्याची अशी कल्पना होती की योगविद्या ही भारतीय असल्याने प्रत्येक भारतीयाला तिचा थोडा- फार परिचय असावा

त्या विद्यार्थी–ड्रायव्हरने आम्हाला एका नाईट क्लबमध्ये नेले. त्याने वर्णन केल्याप्रमाणे खरोखरच तो क्लब तसा स्वस्त होता आणि अत्यंत देखण्या मुली त्या क्लबात होत्या अंगावर सर्प खेळविणाऱ्या एका तरुणीचा खेळ मी याच क्लबात पाहिला. एक जवळ–जवळ नग्न तरुणी मंचावर आली तिने अजगरासारखा एक प्रचंड साप गळ्यात घालून आणला होता मग त्या सर्पाने तिच्या अंगावरून सरसरत इकडे–तिकडे जाण्याची कसरत करून दाखवली. त्यानंतर ती बाई मंचावर आडवी झाली तिच्या अंगावर आणखी दोन साप सोडण्यात आले. एखाद्या थंड हिरवळीत रमावे तसे ते तिच्या उघड्या अंगावरून फिरत होते.

क्लबमध्ये ज्या अनेक तरुणी 'कंपनी' देण्यासाठी असतात त्यापैकी एकजण येऊन आमच्याजवळ बसली ती उन्मादक होतीच, पण तिने घातलेले— किंवा न घातलेले— कपडे अधिक मादक होते माझा भारतीय मित्र प्रथमच परदेशात आला होता. त्याने मला मराठीत विचारले, "ही बाई कोण ?" मी काही उत्तर देणार तोच तिने त्याला विचारले, "कॅन आय हॅव ए ड्रिंक वुईथ यू ?"

त्याला वाटले ही आपले मद्य स्वत. विकत घेऊन त्याच्याबरोबर गप्पा मारीत बसणार म्हणून त्याने 'यस्' म्हटले त्याबरोबर तिने जीन मागवली मी मनात म्हटले की, आता ही त्याला चांगला गडा घालणार पण पंचाईत अशी होती की तिचा अपमान न करता त्याला 'तू या जाळ्यात अडकतो आहेस, साभाळ' असे कसे सुचवणार ? परक्या भाषेत आपल्यासमोर कुणी आपसात बोललेले पाश्चात्यांना आवडत नाही त्यामुळे मराठीत तशी सूचना देणे शक्य असले तरी अवघड होते

इतक्यात तिची जीन आली. खरे तर ही जीन नसते नुसता सोडा किंवा पाणी असते कारण प्रत्येक गिऱ्हाईकाबरोबर या पोरी जर अशा जीन घ्यायला लागल्या तर तासाभरातच बेहोष होतील माझ्याबरोबर आणखी दोन मराठी मित्र होते तेही प्रथमच अशा नाईट क्लबमध्ये आले होते आपल्याबरोबरही अशीच कोणी मदनिका मद्य घेईल का या अपेक्षेने ते इकडे–तिकडे पाहू लागले नाईट क्लबमधील तरबेज पोरींनी ते हेरले आणि दोघीजणी त्यांच्याजवळ बसून मद्यपान करू लागल्या तिघेही खूष होऊन त्या पोरींच्याबरोबर नर्म प्रणय करीत समोरील हॉट दृश्ये पाहू लागले. मी मनात म्हटले, " लेकांनो, घी देखा लेकिन बडगा नही देखा !" तासाभरातच त्यांच्यासमोर प्रत्येकी पन्नास–पन्नास डॉलसची बिले आली. तेव्हा त्यानी तुरट–आंबट चेहऱ्याने पाकिटे उघडली आणि मी कोणत्याच पोरीला माझ्याबरोबर मद्यपान करण्यासाठी का उत्तेजन दिले नाही, ते त्यांच्या लक्षात आले जर्मनीतील हॅबुर्गप्रमाणे शिकागोमधील नाईट क्लबजही भरपूर पुढारलेले आणि 'आधुनिक' आहेत.

अमेरिकेत ज्या काही शहरात मराठी लोकाची दाट वस्ती आहे, त्यात शिकागोचा समावेश होतो न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया आणि शिकागोत जास्तीत जास्त मराठी लोक राहतात शिकागोचे महाराष्ट्र मडळ चागलेच कार्यक्षम आहे दर वर्षी या मडळातर्फे नाटक, गणेशोत्सव, दिवाळी व इतर सण साजरे होतात मराठी लेखक आणि कलावत यांच्याविषयी येथील मराठी लोकांत खूपच आस्था आहे अमेरिकेत गेल्यावर जी शहरे अवश्य पाहिली पाहिजेत, त्यापैकी चैतन्यशाली शिकागो हे एक आहे, यात शका नाही !

□ □ □

# धर्म आणि विलास यांचा संगम

## बँकॉक

**मी** प्रत्यक्ष बँकॉकला जाईपर्यंत मला त्या शहराची जवळ-जवळ शून्य माहिती होती माझे काही मित्र त्या गावी जाऊन आले होते आणि बँकॉकला मस्त 'नाईट लाईफ' किंवा निशा-जीवन आहे असे त्यांनी सांगितले होते एवढेच खरे तर सर्वच पौर्वात्य देशाविषयी आपले अज्ञान अगाध असते सिलोन, ब्रह्मदेश, थायलंड या जवळच्या देशांपेक्षा अमेरिका आणि इंग्लंड यांच्याविषयी आपल्याला अधिक ज्ञान असते दीडशे वर्षे इंग्रजांनी आपल्यावर केलेले राज्य, त्यावेळच्या क्रमिक पुस्तकात इंग्लंडची भलावण आणि अलीकडे तीस-चाळीस वर्षात कुठल्या भारतीयांच्या अमेरिकेकडे जाणारा लोंढा ही यांची कारणे आहेत तरीही हे मात्र खरे की, जर्मनी व फ्रान्स या देशांविषयी आपल्याला वाटणारे कुतूहल व कौतुक थायलंड-कोटालपूरच्या वाट्याला येत नाही. थायलंड हा हत्तींनी भरलेला, भारतासारखा एक मागासलेला देश आहे एवढीच माझी कल्पना होती मी इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असताना एक नाजूक, ठेंगणीठुसकी थाई मुलगी आमच्या वर्गात होती पण तिचे इंग्रजी इतके कच्चे होते की, तिच्याबरोबरचे माझे सांस्कृतिक संबंध कॉलेजच्या कँटीनमध्ये कॉफी घेण्यापलीकडे गेले नव्हते त्यामुळे तिच्याविषयी अगर तिच्या देशाविषयी मला वाटणारी प्रचंड ज्ञानपिपासा तशीच राहून गेली होती

मुंबईहून सहाच्या सुमाराला निघालेले आमचे विमान अकरा वाजता बँकॉकला पोहोचले तिथे माझ्या ओळखीचे कोणीही नव्हते, आणि कुठे उतरायचे हेही मी ठरवले नव्हते थायलंडमध्ये प्रवेश करण्यासाठी व्हिसा लागत नाही. कारण जास्तीत जास्त परकीय प्रवाशांनी थायलंडमध्ये यावे आणि जास्तीत जास्त पैसा खर्च करावा अशी थायलंड सरकारची अपेक्षा आहे. बँकॉकला पोचल्यावर विमान-

तळावरच तुमच्या पासपोर्टवर प्रवेशाच्या परवानगीची तारीख व शिक्का मारतात आणि तुमचे स्वागत करतात मी शभर डॉलर्सचे थाई चलन– त्याला बाथ म्हणतात– घेतले आणि विमानतळाबाहेर आलो गाव किती लांब आहे याची काहीच कल्पना नव्हती टॅक्सी पाहणार तोच एक अमेरिकन तरुण व तरुणी टॅक्सीसाठी थांबल्याचे पाहिले त्यानाही गावात जायचे होते त्यांचे हॉटेल रिझर्व्हेशन झाले होते मी त्याना म्हटले, "चला, जागा असेल तर मीही त्याच हॉटेलात उतरेन " परक्या गावी कोणीतरी ओळखीचे असले तर तेवढाच आधार असतो योगायोग असा की, ती दोघे पुण्याला डेक्कन कॉलेजमध्ये काही दिवस शिक्षण घेत होते आणि त्यांना हिंदी आणि मराठी बोलता येत होते त्यामुळे बँकॉकला माझ्या मुक्कामात त्याची आणि माझी चांगली मैत्री जमली

आम्ही बँकॉक शहरातील राजदमन अव्हेन्यू या राजरस्त्यावरच्या रॉयल हॉटेलमध्ये गेलो जाता–जाता त्या आठ–दहा मैलांच्या रस्त्यावर शहराचे जे दर्शन घडले, ते माझ्या बँकॉकविषयीच्या सर्व पूर्वकल्पनाना धक्का देणारे होते कोणत्याही भारतीय शहरापेक्षा हे शहर अधिक अद्ययावत, सुदर आणि स्वच्छ होते अगदी अमेरिकेतल्या लॉस एंजेलिससारख्या पहिल्या दर्जाच्या शहरातून आपण जात आहो असे वाटत होते उत्तम आधुनिक इमारतींच्या गराड्यातून मधूनच बुद्ध मदिरांचे सुळके आकाशापर्यंत जात होते रस्त्यातून पाश्चात्य पद्धतीचे पोषाख केलेले स्त्री–पुरुष दिसत होते आणि त्याच्यामधून पिवळ्या–नारगी कफन्या घातलेले, डोक्याचे मुडन केलेले आणि हातात कमडलू घेतलेले व अनवाणी चालणारे वृद्ध धर्मोपदेशकही दिसत होते भारतासारख्या अँबॅसडर्स वा फियाट अशा एकसुरी, अनाकर्षक मोटारी दिसत नव्हत्या, तर टोयाटो, मर्सिडिस, कॅडिलॅक, लिंकन, जगौर अशा विविध, मोहक रगांच्या, विविध आकाराच्या परदेशी बनावटीच्या मोटारी भरधाव होत्या. आमची टॅक्सीही टोयाटो होती आणि वातानुकूलित, रेडिओ सदेशानी व्यवस्था असलेली, आत रेडिओ व टी व्ही. ची सोय असलेली अशी होती रस्त्यावरची अद्ययावत् डिपार्टमेंटल स्टोअर्स इग्लड–अमेरिकेची आठवण करून देत होती

रॉयल हॉटेल अतिशय छान होते. पायरीवर पाऊल ठेवल्याबरोबर समोरचे काचेचे दार यान्त्रिक पद्धतीने उघडले जात होते दररोज सोळा डॉलर्स म्हणजे माफकच होता पुण्याच्या 'ब्ल्यू डायमड'लाही दोनशे रुपयापेक्षा अधिक पडतात, हॉटेलच्या खोलीला सुदर बाल्कनी होती समोरच राजदमन हा राजरस्ता, एका बाजला लहानसा ओढा. पलीकडे प्रचड मैदान, त्या मैदानावर भरलेला बाजार, फूटपाथवर चहा, खाद्यपदार्थ, फुलझाडे याचे स्टॉल्स हे सारे दृश्य अतिशय रमणीय होते हॉटेलच्या रिसेप्शनवर माझे नाव नोंदविल्यावर मी पासपोर्ट व रोख रक्कम ठेवून घेण्याची काही व्यवस्था आहे काय अशी चौकशी केली तेव्हा रिसेप्शनवरच्या

पोरीने मला एका लॉकरची किल्ली दिली प्रत्येक खोलीतील उतारूला हॉटेलकडून एक छोटा लॉकर मिळतो आपल्या मौल्यवान वस्तू आणि पासपोर्टसारखे महत्त्वाचे कागदपत्र ज्याचे त्याने लॉकरमध्ये ठेवायचे, तूर्त खर्चाला हवे तेवढे पैसे घ्यायचे आणि लॉकर बंद करून निश्चित मनाने गावभर भटकायचे ही सोय मला फारच उपयुक्त वाटली.

परदेशात गेल्यावर वेळेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे आवश्यक असते. म्हणून मी हॉटेलच्या खोलीतील उत्तम टबमध्ये लगेच स्नान केले आणि कपडे बदलून खाली लॉबीमध्ये आलो शहरसफरीची चौकशी केली पण सकाळची सफर होऊन गेली होती, दुपारची सहल नुकतीच सुटली होती मी प्रवासी एजन्सीच्या कौंटरवर चौकशी करीत असतानाच हॉटेलचा टॅक्सी ड्रायव्हर माझ्याजवळ येऊन हळू आवाजात म्हणाला,

"सर, आपण रात्रीची काही सोय केली आहे की नाही ?"

त्यांचा प्रश्न मला समजलाच नाही असे दाखवून विचारले,

"म्हणजे काय ?"

त्यावर त्याने आपला हेतू स्पष्ट केला,

"बँकॉकचे नाईट क्लब्ज पॅरिसपेक्षाही पुढारलेले आहेत मी तुम्हाला रात्री पॅटपॉंगला नेतो वाटेल तेवढे नाईट क्लब्ज, म्हणाल तितक्या पोरी ! बॉडी मसाज वीस डॉलर्स आणि हवी ती सुखे तुमचीच वाट पाहत आहेत. टॅक्सी दहा डॉलर्स, नाईट क्लब तुम्ही खर्च कराल तितके, रात्रभर उत्तम-देखणी थाई पोरगी तुम्हाला सहवासासाठी हवी तर तीस डॉलर्स अगदी घरपोच तुमच्या खोलीवर येईल"

दुकानातल्या साबण, पावडर, तेल, धान्य याच्या किंमती सांगाव्या तशा त्याने मला अगदी निःसंकोचपणे सर्व सुखांच्या किंमती सांगितल्या. एकदम काहीच कबूल करू नये म्हणून मी गुळगुळीतपणाने सांगितले,

"संध्याकाळी पाहू माझा एक मित्र येणार आहे"

अर्थात ती थाप होती

हॉटेलच्या बुकस्टॉलमध्ये मी थायलंडचे गाईड घेतले आणि सहज जवळपास चक्कर टाकायला बाहेर पडलो कुठे जायचे काहीच ठरले नव्हते जवळच्या फूटपाथवर शिजत असलेल्या अन्नाचा खमंग, मसालेदार वास येत होता चिनी, थाई अन्न शिजवले जात होते आणि थाळ्यांतून रस्त्यातच खाल्ले जात होते इथे मला चालत्या उपहारगृहाचा अगदी नवा आणि आटोपशीर प्रकार पाहायला मिळाला. आपल्याकडे हातगाडीवर खाद्यपदार्थ किंवा जेवण करतात पण बँकॉकमध्ये कावड असते त्या कावडीत स्टोव्ह, भांडी, तांदूळ, पाणी तिखट-मीठ-मसाला,

थाळया वगैरे सर्व वस्तू असतात साधारण पन्नाशी किंवा त्यापुढची थाई स्त्री हे हॉटेल अक्षरश चालवीत असते रस्त्यावर कुठेही तिला थांबून जेवण मागितले तर ती लगेच सूप तयार करून देते सूप संपेपर्यंत तिचा भात आणि कालवण तयार होते थाळीत जेवायचे, पाणी प्यायचे, आणि पैसे देऊन गिऱ्हाईक आपल्या वाटेला जाते आणि हे उपहारगृह आपल्या वाटेने जाते मला या कोणत्याही चालत्या किंवा एका बसलेल्या उपहारगृहात चहा मिळेना म्हणून मी गरम-गरम सूप घेतले ते फारच चवदार आणि अत्यत स्वस्त म्हणजे फक्त दीड रुपयाला मिळाले फिरता-फिरता मला दोन नाईट क्लब्ज दिसले. आता एक वाजत आला होता, दुपार होती तरी ते चालूच होते फूटपाथवर बसलेल्या थाई हॉटेलवाल्या बायका कसल्यातरी पानाच्या विडचा ओढीत होत्या विशेष म्हणजे आमच्या हॉटेलच्या आसपास असख्य रोपे विक्रीसाठी ठेवलेली मी पाहिली इतकी रोपे घेऊन बँकॉकचे लोक कशासाठी झाडे लावतात हे समजले नाही आमच्याकडे वनमहोत्सव असतो, तसे तिथे वनमत्र्याने अधिक झाडे लावा असे आवाहन केले असेल असे मला वाटले दुसऱ्या दिवशी शहर-सफरीवर मी गेलो, तेव्हा आमच्या गाईड पोरीला मी विचारले, तेव्हा ती म्हणाली, " आम्हाला घरात छोटी-छोटी रोप लावण्याची खूप हौस आहे प्रत्येक घरात तुम्हाला फुलाच्या आणि सुदर पानाच्या रोपाच्या कुड्या दिसतील "

तासभर भटकून आल्यावर मी एका उघडचा रेस्टॉरंटमध्ये बियर घेतली आणि अगदी स्वस्तातले पण फारच रुचकर असे चिनी जेवण माझ्यासमोर बनवून घेतले जेवणाआधी प्रत्येकजण तिकडे पेय घेतोच बियर नसेल तर कोकाकोला किंवा सूप ते होईपर्यंत गरम जेवण तयार होते आता रात्रीच्या जागरणाने आणि विमानप्रवासाने मला झोप येऊ लागली एवीतेवी रात्र जागूनच काढायची आहे म्हणून मी माझ्या खोलीवर गेलो आणि त्या वातानुकूलित, शांत जागेत निवांत झोपलो दोन-अडीच तासानी जाग आल्यावर खूपच उल्हसित वाटले थायलडबद्दल थोडी तरी माहिती घ्यावी म्हणून मघाशी घेतलेले पुस्तक चाळू लागलो

थायलड हा तसा लहानसा देश त्याची लोकसख्या फक्त चार कोटी पन्नास लक्ष म्हणजे महाराष्ट्राच्या लोकसख्येपेक्षाही कमीच आहे त्यापैकी दहा टक्क्यांहून अधिक-सुमारे पन्नास लक्ष लोक बँकॉकमध्ये राहतात येथील ६६ टक्के लोक थाई आणि ३० टक्के चिनी आहेत थायलडचा विशेष असा की, त्या देशावर परकीय सत्ता कधीच आली नाही भारताचा आणि थायलडचा अत्यत निकटचा सबध सम्राट अशोकाच्या काळात आला ख्रिस्तपूर्व २७४ ते २३६ या काळात अशोकाने बुद्धधर्माच्या प्रसारासाठी धर्मोपदेशक आणि भिक्षू पाठवले त्यामुळे थायलडचा धर्म बौद्ध झाला खुद्द भारतात हा धर्म अगदीच तुरळक दिसत असला तरी थायलडमध्ये

मात्र त्याने कायमचे भक्कम ठाण मांडले आहे बँकॉकमध्ये दर दहा मिनिटानी एक तरी बुद्ध मदिर लागते आणि दहा–वीस पावले चालल्यावर एक तरी बुद्ध भिक्षू रस्त्यात दिसतो मात्र बहुतेक थाई लोक हे मूळ दक्षिण चीनमधून येऊन या भागात स्थायिक झाले आहेत. हा शेतीप्रधान, धर्मावर गाढ श्रद्धा ठेवणारा, परपराप्रिय देश इ स १७०० पासून येथे राजेशाही आहे पण व्हिएटनाम युद्धाने या जुन्या देशाचा चेहरामोहरा एकदम बदलून टाकला थायलड हे अमेरिकेचे दोस्त राष्ट्र. व्हिएटनामशी युद्ध करणे सोपे जावे म्हणून अमेरिकेने आपले विमानतळ व लष्कर याचा तळ थायलडमध्येच टाकला अमेरिकेच्या पैशाचा प्रचड ओघ या छोटचा देशात आला आणि त्या देशात आमूलाग्र बदल झाला जुन्या परपरा मागे पडल्या सर्वत्र आधुनिकतेचा प्रभाव पडला पैसेवाल्या सैनिकाना खूष करण्यासाठी मद्यगृहे, नाईट क्लब्ज, वेश्यागृहे याचा जोरदार व्यापार सुरू झाला परदेशी चलनाला चटावलेल्या या देशाने व्हिएटनाम युद्ध सपले तरी परकीय प्रवासी यावेत म्हणून अधिकाधिक ‘धाडसी’ नाईट क्लब्ज आणि निशाजीवन याचा बाजार माडला आज अनेक बाबतींत बँकॉकने पॅरिसला मागे टाकले आहे बँकॉक हे आता पूर्वेचे पॅरिस म्हणून ओळखले जात आहे

यथावकाश रात्र झाली आणि जगातील सर्वात धाडसी असे रात्रीचे जीवन पाहण्यास मी सिद्ध झालो रॉयल हॉटेलचा टॅक्सीवाला माझी वाटच पाहत होता त्याने लगेच टॅक्सी काढली आणि पॅटपाँग या नाईट क्लब्जच्या भागाकडे आम्ही निघालो ड्रायव्हरच्या खूपच ओळखीतल्या दोन–तीन क्लबजमध्ये आम्ही गेलो पण तिथले वातावरण अतिशय तग आढळले दारातच पोलीस अधिकाऱ्याची छावणी होती चौकशी करता कळले की, बँकॉकमधील काही नाईट क्लब्ज कायद्याने दिलेल्या परवानगीबाहेर जाऊन अत्यत अश्लील व अतिधाडसी असे ‘कार्यक्रम’ करतात असा सुगावा लागल्याने आज अशा क्लब्जवर पोलिसांनी धाडी घातल्या होत्या पण आमच्या टॅक्सीतला फारच वाकबगार व हिकमती होता तो मला म्हणाला, “आपण काही काळजी करू नका सार्वजनिक नाईट क्लबजवर धाडी पडल्या असल्या, तरी माझ्या माहितीचे काही खाजगी नाईट क्लब्ज आहेत ते खाजगी घरात चालतात म्हणून पोलीस तेथे छापे टाकू शकत नाहीत ओळख असल्याशिवाय अशा जागी गिऱ्हाइकांना प्रवेश मिळत नाही माझ्या मित्राचाच हा अड्डा आहे मी तिथे तुम्हाला नेतो” मग त्याने दहा–बारा मिनिटे काळोखी रस्त्यातून नेऊन एका घरासमोर ती उभी केली

हा क्लब पहिल्या मजल्यावर होता आत गेल्यावर मॅडमने माझे स्वागत केले आजूबाजूला दहा–बारा थाई पोरी होत्या त्या माझ्या भोवती जमा होऊ लागल्या, तेव्हा मी मॅडमला म्हटले, “मला फक्त कार्यक्रम पाहायचा आहे पोरींचा ‘सहवास’

[illegible] लावले आणि मला [illegible] 'कोणते मद्य घेणार ?''—असे विचारले मी बियर मागवली थोड्या वेळाने मॅडमने बियर आणि तीनशे बाथ म्हणजे पधरा डॉलर्सचे बिल माझ्या हाती दिले पैसे देऊन मी बियरचे घुटके घेऊ लागलो आजू-बाजूला दहा-बारा लोक कोंडाळे करून बसले होते बहुतेकजण पाश्चात्य देशातील प्रवासी होते त्यानी आपल्याजवळ किंवा आपल्या मांडीवर एक-एक थाई पोरगी घेतली होती आणि तिच्याशी ते वरवरचा प्रणय करत होते समोर पडदा होता. त्यामगून पूर्णपणे नग्न असलेली एक तरुणी आली तिच्या दोन्ही हातात पेटत्या मशाली होत्या गिऱ्हाईकाच्या गोल कोंडाळयाच्या मध्ये उभी राहून तिने मशालीचे खेळ केले त्या पेटत्या मशाली ती आपल्या अगावरून बिनदिक्कतपणे फिरवीत होती एकदा तर तिने पेटती मशाल सरळ आपल्या तोंडात घातली आणि ती विझवली

मग ती पोरगी सभोवतालच्या पुरुषाच्या मांडीवर बसून मशालीचे खेळ करू लागली ती जेव्हा माझ्या मांडीवर बेधडक येऊन बसली, तेव्हा त्या जळत्या मशालीची धग मला लागत होती पण तिला त्या ज्वालांचे काहीच वाटत नव्हते. सर्व पुरुष गिऱ्हाईकांना पेटत्या प्रणयाचे सुख देऊन ती गेली मशाली फिरविण्यात तिची थोडी जरी चूक झाली असती, तरी गिऱ्हाईक प्रेमाने पेटण्याऐवजी अक्षरश पेटून निघाले असते, एवढा तो खेळ धोक्याचा होता

त्यानंतर आणखी थाई तरुणी आल्या कपडे काढून शेवटी पूर्णपणे नग्न होण्याचा ' स्ट्रिप–टीज ' कार्यक्रम चालला होता एक तरुण आला आणि त्या नग्न पोरींच्यापैकी एकीबरोबर प्रणय करू लागला तोच आतून एक कर्कश घटा वाजली त्याबरोबर सर्व पोरी व तो तरुण कपडे आणि जीव मुठीत धरून धावतच आत गेले क्लबचे प्रवेशद्वार उघडले गेले आणि दोन पोलीस अधिकारी आत आले त्यांच्या कमरेला रिव्हॉल्व्हर्स लटकत होती क्लबमध्ये भीतीचे वातावरण पसरले दरम्यान आतून अगभर कपडे घातलेली एक थाई तरुणी आली आणि तिने गाणे म्हणायला सुरुवात केली होती पोलीस अधिकाऱ्याच्या नजरेला एवढेच निरुपद्रवी दृश्य पडले. क्लबच्या मॅडमने त्याना 'मद्य घेता का ?'– असे विचारले पण त्यानी नकार दिला जरा बारकाईने अवतीभोवती पाहून ते निघून गेले त्यानंतर दोन घटा झाल्या आणि पूर्वीच्या नग्न पोरी व तरुण येऊन मागील पानावरून पुढे कार्यक्रम चालू झाला

त्या रात्री थाई स्त्री-पुरुषांनी बरेच धाडसी प्रकार दाखवले मद्य आणि स्त्री सहवास भरपूर होता. मादक सगीत होते आणि प्रवाशांनीही स्त्रियांच्या बाबतीत आक्रमक पवित्रा घ्यावा म्हणून प्रकाश मद होता, हळुवार पार्श्वसंगीत होते त्या

क्लबमध्ये मी रात्री दीड-दोन वाजेपर्यंत होतो. आता निशाजीवनाचे सारे प्रकार पाहून झाले होते आणि 'वन्समोअर' साठी पुढच्या चार रात्री होत्या म्हणून रात्री दोन वाजता रिक्षा केली आणि हॉटेलवर आलो बँकॉकमध्ये परकीय प्रवाशांना कोणत्याही वेळी कोठेही निर्धास्त जाता येते. टी. ओ टी म्हणजे टूरिस्ट अँथॉरिटी ऑफ थायलंड या सरकारी खात्याने बँकॉक व इतर शहरातील टॅक्सीवाले, रिक्शा-वाले, नाईट क्लबवाले याना सज्जड दम देऊन ठेवला आहे की, कोणत्याही परकीय प्रवाशांची त्यांच्याविरुद्ध तक्रार आली तर त्याचा परवाना रद्द केला जाईल आणि वर कडक कारवाई केली जाईल परकीय प्रवाशांनी थायलंडमध्ये येऊन बिनधास्त-पणे भरपूर पैसा खर्चावा म्हणून ही उपाययोजना करण्यात आली आहे.

सकाळी साडेसहालाच जाग आली खोलीतल्या फोनवरून मी चहा मागवला. पण मला सांगण्यात आले की 'इथ चहा नाही, कॉफी मिळेल!' थोड्या वेळाने कॉफी आली तिचे बिल होते पधरा रुपये! मी विचार केला की या हॉटेलातली ही पहिली आणि शेवटची कॉफी तासाभराने मी खाली गेलो तेव्हा फूटपाथवरच्या उपहारगृहात फक्त दोन रुपयाना चागला दीड-दोन कप चहा मिळाला

सकाळी नऊ वाजताच शहर सफरीचे मी तिकीट घेतले होते, म्हणून फार वेळ भटकती न करता हॉटेलवर परतलो लॉबीमध्येच एक पस्तीशीचा माणूस वर्त-मानपत्र वाचीत बसला होता तो मराठीभाषिक असावा असा माझा कयास झाला आणि तो खराही ठरला ते गृहस्थ पुण्याचे होते आणि जागतिक बँकेच्या कामा-करता बँकॉकला आले होतें त्यांनी मला सागितले की, भारताचे थायलंडमधील राज्य प्रतिनिधी हे मराठीभाषिक असून त्यांचे नाव अशोक गोखले आहे. मी लगेच गोखले याना फोन केला व त्यांना भेटायचे आहे असे सांगितले. तेव्हा ते म्हणाले,

"लेखक म्हणून मी तुम्हाला ओळखतो उद्या सकाळी अकरा वाजता आमच्या कचेरीत या."

मी ते तावडतोब मान्य केले. खोलीवर जाऊन मी कपडे बदलून पुन: लॉबी-मध्ये आलो. ठरलेल्या वेळी प्रवासी बसची छोट्या बांध्याची, नाजूक थाई युवती आली आणि सफरीची तिकिटे कोणी घेतली आहेत याची तिने चौकशी केली. लॉबी-मधून आम्ही पाचजण उठून बसमध्ये बसलो बसमध्ये वीस-पचवीस लोकांची सोय होती, पण आम्ही सातच जण त्या सफरीसाठी निघालो होतो बाकीचे सहा जण पती-पत्नी असल्याने मीच एकटा होतो आमची गाईड माझ्याजवळ येऊन बसली व म्हणाली,

"तुम्हाला स्त्री-सहवास आवडत असेलच! माझे नाव मिस् रतनाबनाल. बँकॉकमध्ये आलाच आहात, तशी जिवाची मौज करून घ्या माझी एक मैत्रीण

आहे, ती रात्रभर तुमच्या खोलीवर राहील फक्त तीस अमेरिकन डॉलर्स, वर टॅक्सीसाठी दहा अमेरिकन डॉलर्स शिवाय तिला ड्रिंक आणि जेवण तुम्ही द्यालच "

"तू नुसत डॉलर्स न म्हणता वारवार अमेरिकन डॉलर्स का म्हणतेस ?" मी विचारले ती फार तर वीस–बावीस वर्षांची कॉलेज–विद्यार्थिनी असावी

"इथ हाँगकाँग डॉलर्सही चालतात अमेरिकन डॉलर्स आणि हाँगकाँग डॉलस-मध्ये खूपच फरक आहे साधारण साडेसहा हाँगकाँग डॉलर्सचा एक अमेरिकन डॉलर होतो. एकदा गिऱ्हाईक पटल्यावर मग कोणते डॉलर्स ठरले होते असा अप्रिय वाद नको म्हणून आम्ही अमेरिकन डॉलर्स अस वारवार बजावतो " तिने सांगितले

मला तिच्या या उघड बोलण्याचे फारच आश्चर्य वाटले सरळ सरळ ती वेश्याव्यवसायासाठी गिऱ्हाईक पटवीत होती आणि तेही इतक्या बिनधास्तपणे की जणू ती पुस्तकांच्या किंवा खेळण्यांच्या खरेदी–विक्रीच्याच गोष्टी करते आहे ! मी तिला विचारले,

" तुझी ही मैत्रीण दिवसा इतर काही व्यवसाय करते का ?"

रतनाबनाल म्हणाली, " होय ती माझ्यासारखीच गाईड आहे खर तर मी तिच कॅन्व्हसिंग करते आणि ती माझ्यासाठी प्रयत्न करते तुम्हाला मीच हवी असेन तर आता सांगा "

बँकॉकमध्ये मदनिकांचा सहवास किती सुलभ असतो हे मला पटले. माझ्याशी 'धंद्या'च्या गोष्टी बोलून झाल्यावर ती मादक रतनाबनाल एकदम हातात मायक्रो-फोन घेऊन आपल्या गाईडच्या भूमिकेत प्रवेश करती झाली ती म्हणाली, "आमच्या या शहरसफरीत मी आपल हार्दिक स्वागत करते बँकॉक ही थायलंडची राजधानी आहे. देशातली एक दशांश लोकसंख्या इथे राहते थायलंडमधील ९० टक्के मोटारी आणि ८० टक्के विद्यार्थी बँकॉकमध्ये आहेत या शहराची ६० टक्के लोकसंख्या थाई, तीस टक्के चिनी आणि उरलेली इतर देशाची आहे आमचे सम्राट हे आमचे पवित्र दैवत आहेत रॉयल बँकॉक म्हणजे शाही बँकॉक, लष्करी बँकॉक, चिनी बँकॉक, धार्मिक बँकॉक, व्यापारी बँकॉक आणि रात्रीच बँकॉक किंवा विलासी बँकॉक ही प्रमुख आहेत आपण जेव्हा वतमध्ये म्हणजे बुद्ध मंदिरात जाऊ, तेव्हा प्रवाशांनी आमच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील असं काही करू नये अशी विनंती आहे म्हणजे धूम्रपान, पायात बूट घालून मंदिरात जाणं, मंदिराच्या आवा-रात चुंबन–आलिंगनादी प्रणय करणं वगैरे प्रथम आपण एमरल्ड बुद्धाच्या मंदि-रात जात आहात

आमची बस एका प्रशांत बुद्ध मंदिरासमोर थांबली आमच्या गाईडने प्रवेश-

द्वाराजवळ आम्हाला पादत्राणे काढून ठेवण्याची विनती केली आम्ही आतल्या आवारात गेलो, तेव्हा तिने या बुद्धमंदिराची माहिती सांगण्यात सुरुवात केली, "हे आमच्या सम्राटांचे पूजास्थान आहे जगातले हे एक अत्यंत भव्य, पवित्र आणि महत्त्वाचे मंदिर आहे या मंदिरातील बुद्धाची मूर्ती पंधराव्या शतकात उत्तर थायलंडमध्ये सापडली ती ओसला नेण्यात आली पण थायलंडचा राजा राम (पहिला) याने लढाई करून ती परत मिळवली ही मूर्ती सूर्यकांत मण्यांची (जॅस्पर) असून ती रत्नजडित आहे त्यात अनेक एमरल्ड म्हणजे पाचू आहेत संबंध थायलंडचे रक्षण ही बुद्धमूर्ती करते थायलंडचे राजे स्वत या मूर्तीची वस्त्रे बदलतात, इतकी ती पवित्र आहे" या वर्णनाने आम्ही धास्तावलेल्या पावलांनीच आस्ते कदम करीत गाभाऱ्यात शिरलो रत्नजडित बुद्धाची मूर्ती लहानच आहे, पण मनावर छाप पाडणारी आहे थोड्याच वेळापूर्वी अगदी उघडपणे धंद्याची बोलणी करणारी आमची गाईड पोरगी इथे गुडघे टेकून देवाची प्रार्थना करताना पाहून मला मौज वाटली धर्म आणि विलास यांचा या देशातला हा विचित्र संगम इतरत्र क्वचितच पहायला मिळतो

रत्नजडित बुद्धानंतर आम्ही त्रिमित्र मंदिर किंवा सुवर्णबुद्धाचे दर्शन घेतले. ही मूर्ती मात्र खूपच मोठी म्हणजे तीन मीटर्स उंचीची आहे दोनशे वर्षांपूर्वीची ही मूर्ती संपूर्णपणे सोन्याची असून तिचे वजन साडेपाच टन आहे ही मूल्यवान मूर्ती पूर्वी अयुथिया (अयोध्या या नावाचा अपभ्रंश) येथे होती पण अयुथियावर ब्रह्मदेशाने स्वारी केली तेव्हा शत्रूच्या हाती ती लागू नये म्हणून ती बँकॉकला जमिनीत पुरण्यात आली होती परचक्र गेल्यावर ती उकरून काढून भव्य मंदिरात तिची प्रस्थापना करण्यात आली. बँकॉकमधील बुद्ध मंदिरांच्या आवारातच धार्मिक शिक्षण देण्यासाठी भिक्षूगुरु आणि संस्था असतात ही परंपरा एक हजार वर्षांपूर्वीपासूनची आहे त्या काळी धार्मिक शिक्षण हेच शिक्षण होते शिक्षणाचा व्यवहारासाठी उपयोग करावा ही कल्पना तेव्हा थायलंडमध्ये नव्हती

ही मंदिरे पाहिल्यानंतर आमची बस छा ओ फॅ किंवा 'माता नदी' या थायलंडमधील सर्वात मोठ्या नदीच्या काठावर आली लंडनला टेम्स, पॅरिसला सीन, तशी बँकॉकला छेदून जाणारी ही महाकाय नदी हिला अनंत कालवे काढलेले आहेत नदीतून आणि कालव्यातून अखंड जलवाहतूक चालते या नदीतून आम्ही आता तरता बाजार (फ्लोटिंग मार्केट) पाहायला जाणार होतो आम्ही एका मोटर लाँचमध्ये बसलो ती वेगाने चालू झाली नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर लाकडी घरे, बुद्ध मंदिरे आणि झाडे दिसत होती गार वारा सुटला होता आणि मोटर लाँचच्या तुफान वेगाने तो अधिकच झोंबत होता पण त्यामुळे मोकळ्या वाऱ्याची 'रंगत' येऊन वातावरण उल्हसित होत होते अर्धा-पाऊण तास जलप्रवास केल्यावर आम्ही

तरत्या बाजाराजवळ आलो तेव्हा आमच्या लाँचचा वेग मंदावला. नदीत शेकडो छोट्या नावा तरंगत होत्या. त्या नावा नसून त्यावेळी दुकाने होती या नावा छोट्या वल्हेचान वल्हवीत हे दुकानदार भाजी, फळे, धान्य वगैरे वस्तू विकत होते बाजारहाटासाठी आलेली गिऱ्हाइकेही अशीच लहान-लहान नावांतून येत-जात होती आमच्या लाँचसारख्या आणखी दहा-बारा लाँचेस परकीय प्रवाशांना घेऊन तो तरता बाजार दाखवीत होत्या आमच्या गाईडने सांगितले, "हा बाजार पहाटे पाचपासून सकाळी बारापर्यंत चालू असतो. साधारण तीनशे होड्या दुकानदाराच्या असतात आणि खरेदी करणाऱ्यांच्या हजार-बाराशे होड्या या सहा-सात तासांत येऊन जातात " परकीय प्रवासी या तरंगत्या बाजाराची छायाचित्रे घेत होते काही तरंगती उपहारगृहेही होती. आम्ही अशा उपहारगृहात जाऊन फिश, चिप्स आणि बियर घेतली बँकॉकच्या मानान इथे हे पदार्थ खूपच स्वस्त मिळाले नदीच्या दोन्ही काठच्या घराना एक-एक छोटी नाव बांधलेली होती त्या घरातील मुलाना स्नानगृह म्हणजे ही नदीच ! विशेष म्हणजे काही बुद्ध भिक्षूही छोट्या नावांतून घराजवळ येत आणि त्याच्या कटोऱ्यात गृहिणी भिक्षा वाढीत

तासभर या तरत्या बाजारात रमतगमत वेळ काढल्यावर आमची लाँच परतली वाटेत येताना वत अरुण या जगप्रसिद्ध बुद्ध मंदिराजवळ आम्ही थांबलो नदीच्या काठचे हे भव्य मंदिर शिल्पकलेच्या दृष्टीने अत्यंत देखणे आहे त्याच्या कळसाजवळ उंच चढून जाऊन बँकॉकचे विहंग दर्शन घेता येते वत अरुण म्हणजे असमाच मंदिर किंवा प्रभात मंदिर या मंदिराचा सर्वात उंच कळस ८० मीटर्स उंच आहे थायलंडचा राजा तिसरा राम याने एकोणिसाव्या शतकात या मंदिराचे पुनरुज्जीवन केले पण मूळ मंदिर त्यापूर्वी, दीडशे वर्षांपूर्वी बांधलेले होते. पहाटेच्या प्रकाशात या मंदिराची शोभा अलौकिक दिसते असे आमच्या गाईडने सांगितले 'शूर मर्दांचा पोवाडा शूर मर्दान गावा' तसे वत अरुण हे अरुणोदयाच्या वेळी पाहावे असे तिला म्हणायचे होते ते खरे असेलही, पण बँकॉकच्या नाईट क्लबमध्ये रात्री तीन-तीन वाजेपर्यंत रंगेल जीवन व्यतीत केल्यावर निदान परकीय प्रवासी तरी इथे पहाटे पाच वाजता पोचणे कठीण आहे अशी माझी खात्री झाली राजा तक्षिण हा थायलंडवर राज्य करीत होता, तेव्हा थॉनबुटीला म्हणजे याच भागात थायलंडची राजधानी होती 'एमरल्ड' बुद्ध हा जसा सध्या थायलंडच्या राजघराण्याचा देव आहे, तसा या 'वत अरुण' मधील बुद्ध तक्षिण राजाच्या वेळी राजाचा देव होता. या राजदेवाचे दर्शन घेऊन आम्ही दुपारी एक दीडच्या सुमाराला आमची बस ठेवली होती त्या जागी लाँचने परतलो ही मोकळ्या हवेतली सफर फारच उत्साहवर्धक झाली.

बँकॉकजवळ 'रोझ गार्डन' या नावाचे एक उद्यान आहे पण ते उद्यान म्हणून

विशेष प्रेक्षणीय नसून त्या ठिकाणच्या एका विशाल प्रेक्षागृहात होणाऱ्या अत्यंत सुंदर कार्यक्रमांबद्दल अधिक प्रसिद्ध आहे बँकॉकला दोन-चार दिवसांसाठी येणाऱ्या परकीय प्रवाशांना थायलंडची संस्कृती व परंपरा यांची झलक दाखवावी हा या कार्यक्रमाचा उद्देश असतो त्याची तिकिटे ज्या त्या हॉटेलमध्येच मिळतात बँकॉक-पासून बावीस मैलांवर हे ठिकाण आहे आम्ही या उद्यानात पोचलो, तेव्हा पहिली मिरवणूक निघत होती. ते दृश्य अत्यंत विलोभनीय आणि अविस्मरणीय असे होते. समोर पन्नास-साठ थाई तरुणी जुन्या पद्धतीचा थाई पोषाख परिधान करून, केसांत व अंगावर भरपूर फुले माळून आणि हातात फुलांची तबके घेऊन आमच्या स्वागता-साठी उभ्या होत्या, त्यांच्या मध्ये थायलंडचे प्रतीक म्हणून एक शृंगारलेला हत्ती होता. स्वागत करीत दुतर्फा उभ्या असलेल्या मुलींच्या ओळीतून आम्ही आत गेलो तेथे सुमारे पाच हजार प्रेक्षक बसतील एवढे मोठे प्रेक्षागृह होते त्याच्या तीन बाजूंनी प्रेक्षकांना बसण्याची सोय होती एका बाजूला विशाल रंगमंच होता सुरु-वातीला प्रेक्षकांना अभिवादन करणारी मिरवणूक निघाली तीत सात-आठ हत्ती, शभरावर स्त्रीपुरुष कलावंत, वाद्ये वगैरे होती उंच सोंड करून हत्ती प्रेक्षकांना अभिवादन करीत होते. मिरवणुकीनंतर थाई नृत्य झाले. त्यानंतर थायलंडच्या युद्ध-कलाचे प्रात्यक्षिक झाले तलवारी, भाले वगैरे जुनी शस्त्रे घेऊन या लढाया दाखव-वण्यात आल्या एका दृश्यात एकच थाई महिला तलवारीने लढाई करून सहा-सात पुरुषांचा पराभव करते, ते दृश्य चित्तथरारक होते या युद्धानंतर प्रणययुद्धाचे प्रात्यक्षिक झाले एक थाई तरुण व एक तरुणी यांनी मंद संगीताच्या पार्श्वभूमीवर प्रणयगीत म्हटले व नृत्य केले मग थायलंडमध्ये विवाह समारंभ कसा होतो ते दाखविण्यात आले त्यानंतरच्या समूहनृत्यात प्रेक्षकांनाही सहभागी होण्याचे आवा-हन करण्यात आले. या पडत्या फळाची आज्ञा घेऊन वीस-पंचवीस उत्साही लोक प्रेक्षकांतून उठून लुसलुशीत थाई पोरींना कवेत घेऊन नृत्य करू लागले सुमारे अडीच तासांच्या या विविधतापूर्ण कार्यक्रमात थायलंडच्या सांस्कृतिक अंगाचे उत्तम दर्शन घडले

थायलंड म्हणजे 'स्वतंत्र देश' हे नाव सार्थ आहे, कारण हा देश कधीही पर-क्याच्या ताब्यात गेलेला नाही. मात्र गेल्या तीस वर्षांत इथे मिळणारा सुलभ व मुक्त स्त्रीसहवास लक्षात घेऊन 'थायलंड' म्हणजे ' रांडांचा देश ' असे त्याला थट्टेने म्हणण्यात येते. या देशातल्या अनेक बुद्ध मूर्ती अनेक प्रकारच्या आहेत म्हणजे उभ्या, बसलेल्या, आडव्या झालेल्या किंवा सरळ झोपी गेलेल्या हिंदूंचे बहुतेक देव हे उभे असतात बिचारा बाळकृष्ण तेवढा 'लंगडा' किंवा रांगता असतो. मारुती कधीही बसलेला नसतो. तो नेहमी उभा असतो--राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भाषेत तो 'सज्ज' असतो शेषशाई भगवानसारखे आडवे झालेले आपले देव म्हणजे अप-

वादच. बिचारा ख्रिस्त तर काय खिळे मारलेल्या अवस्थेत लटकतच असतो पण बँकॉकमध्ये 'रिक्लायनिंग बुद्ध' आणि 'निद्रिस्त बुद्ध' असे आडव्या बुद्धात दोन प्रकार आहेत त्याला वामकुक्षी करणारा बुद्ध आणि गाढ झोपी गेलेला बुद्ध अशी झोपेच्या प्रकारातली दोन वेगळी नावे देता येतील

बँकॉकमधील 'वत पो' या मंदिरात आडवा झालेला बुद्ध पाहायला जायचे तर ४३९ पायऱ्या चढून जाव्या लागतात अर्थात् बुद्धाबरोबरच या श्रमांनतर प्रवासीही आडवा न झाला तरच नवल ! ही निद्रिस्त बुद्धाची मूर्ती थायलंडमधील सर्वांत मोठी बुद्ध मूर्ती आहे या मूर्तीची लांबी ४६ मीटर्स व उंची १५ मीटर्स आहे मूर्तीचे तळवे १५ मीटर्स उंच आहेत व त्यावर १०८ शुभचिन्हे आहेत ती मोत्यांनी मढवलेली आहेत सबंध मूर्तीवर सोन्याची पाने लावली आहेत सर्वसंग-परित्यागाचा उपदेश करणाऱ्या बुद्धावर श्रीमती सोन्या-मोत्याची पखरण हे थाई लोक का करतात असा मला त्यावेळी प्रश्न पडला

बँकॉकच्या मुक्कामात मी एक दिवस पतैयाला गेलो ही चैतन्यशाली चौपाटी बँकॉकपासून शंभर मैलांवर आहे. नंतर मी होनोलुलूला जगप्रसिद्ध वायकीकी चौपाटी पाहिली तिच्यासारखाच हा पतैया समुद्रकिनारा आणि त्यावरचे अनेक प्रकारचे करमणुकीचे खेळ अविस्मरणीय आहेत एक तर स्विमिंग सूट—म्हणजे वास्तविक छातीवर एक आणि कमरेखाली एक अशा दोन पट्टया बांधून उरलेले शरीर अनावृत्त ठेवून किनाऱ्यावर विश्रांती घेणाऱ्या किंवा समुद्रात पोहणाऱ्या शेकडो नयनमनोहर सुंदरी या किनाऱ्यावर दिसतात त्याच्यावरूनच या देशाला 'थाय'लंड हे नाव पडले आहे की कुणास ठाऊक ! पतैया किनाऱ्यावर पाण्यावरून चालणाऱ्या स्कूटर्स आहेत फुग्याच्या किंवा हलक्या छत्र्याच्या साहाय्याने आपल्याला हवेत उंच सोडून अलगद खाली आणणाऱ्या क्लृप्त्या आहेत उघड मद्यपानाची अमाप सोय आहे स्त्रीसहवास हवा असेल तर त्याचीही मुबलकता आहे बादशाही हॉटेल्स आहेत किनाऱ्यावरच तुमच्यासमोर चिनी किंवा थाई अन्न शिजवून गरम-गरम वाढणारे फिरते स्टॉल्स आहेत. पाण्यात निवांतपणे पडून राहण्यासाठी रबरा-च्या तरत्या गाद्या आहेत आणि नौकाविहारासाठी नौकाही आहेत. दमलेल्या—पण पैसेवाल्या—प्रवाशाना प्रसन्न करणारी सर्व साधने इथे हात जोडून उभी आहेत. पतैया ही जगातील एक अत्यंत स्वच्छ, सुंदर, सधन आणि चैतन्याने भरलेली चौपाटी आहे

बँकॉकजवळ सुसरींचे एक अतिशय मोठे निपज केंद्र आहे त्याला पाकनाम क्रोकाडाईल सेंटर म्हणतात. या ठिकाणी वीस हजार सुसरी आहेत अनेक देशांतील प्राणीसंग्रहालयाना या केंद्रातून सुसरी पुरविल्या जातात. बँकॉक हे आणखी दोन वस्तूंबद्दल प्रसिद्ध आहे. या वस्तू म्हणजे हिरे आणि ताईत. थाई लोकांचा देवाधर्मा-

वर आणि भविष्यावर फारच विश्वास. देवाच्या मंत्राने भारलेले ताईत वापरणे ही त्याची धार्मिक गरज अशा ताईतांचा खास बाजारच बँकॉकमध्ये आहे आपल्याला ताईत घ्यायचा नसला तरी या बाजारात एक चक्कर मारली तर ती वाया जात नाही किती विविध प्रकारचे ताईत असतात आणि भुताखेतापासून देवदेवतांपर्यंत सारे 'परलोकवासी' मानवाच्या रक्षणासाठी आहे बँकॉकपासून तीनशे किलोमीटर्सवर 'चातुबरी' नावाचे गाव आहे तिथे हा हिऱ्यांचा व्यापार मोठ्या प्रमाणावर होतो खुद्द बँकॉकमध्येही शेकडो जवाहिरे आहेत. पण मला हे हिरे, ताईत आणि सुसरी यांच्यापैकी काहीच परवडणारे नव्हते त्यामुळे त्यांची मौज दुरून पाहूनच मी वेळ मारून नेली

रात्री मी पुन्हा 'पॅटपांग भागातल्या नाईट क्लब्जच्या भागाकडे गेलो पॅरिस, लंडन, ॲमस्टरडॅम अशा अनेक शहरात अशा नाईट क्लब्जचा एक वेगळा भाग असतोच त्यापैकी दहावीस क्लब्जमध्ये डोकावून पाहून किंवा पाच-दहा मिनिटे काढून मग एक-दोन निवडक क्लबात ठाण मांडणे नेहमीच फायद्याचे असते बँकॉकमध्ये 'सेव्हन नॉट' क्लबमध्ये मी दीड एक तास घालविला असेल तिथे मला फॅन ॲन युवान नावाची फार सुंदर चिनी तरुणी भेटली ती मूळची हाँगकाँगची पण गेली काही वर्षे बँकॉकमध्ये ती हा व्यवसाय करते तिला कोकाकोला द्यायचा, आपण बियर किंवा व्हिस्की मागवायची आणि मग तिला जवळ घेऊन किंवा मांडीवर स्थानापन्न करून भरपूर गप्पा मारायच्या, हाच या नाईटक्लबमधला शिरस्ता होता क्लबमध्ये चार ठिकाणी उंच जागा होत्या. त्या खोबणीत आरसे बसवले होते आळीपाळीने क्लबमधल्या पोरी बाकीचे कपडे काढून त्या खोबणीत नाच करीत. आरशामुळे ती पोरगी सर्व बाजूनी अंगप्रत्यंगासह दिसायची सोय होती बँकॉकमध्ये मदालसांनी पुरुषांना मालिश करून स्नान घालणे, दोन-दोन तरुणींनी 'सँडविच मसाज' नावाचा अंगमर्दनाचा प्रकार करणे असे अनेक विलास चालतात मुंबईहून शुक्रवारी रात्री बँकॉकला विमानाने जाऊन दोन रात्री मौज लुटून परत कामावर हजर होणारे अनेक लक्ष्मीपुत्र आहेत

बँकॉकला फुलांचा मनस्वी सोस आहे 'फुलांचा देश' असे त्याचे दुसरे नावच आहे इथे पाणी भरपूर आहे, हवा उत्तम आहे सर्व बाबतीत वातावरण मोकळे आहे, व्यापार व उद्योग यांना बरकत आहे पाश्चात्त्य देशाच्या मानाने थायलंडमध्ये खूपच स्वस्ताई आहे त्यामुळे इथे येणाऱ्या परकीय प्रवाशांच्या संख्येत दरसाल तुफान वेगाने भर पडत आहे बँकॉकच्या मुक्कामात मी भारताचे राज्यप्रतिनिधी अशोक गोखले यांना भेटलो, तेव्हा ते म्हणाले, "आपल्यासारख्या महाराष्ट्रीयन लोकांच्या कर्तबगारीला इथे भरपूर वाव आहे पण आजकाल सर्वांचे

डोळे इंग्लंड-अमेरिकेकडे लागले आहेत. आपले तरुण बँकॉकला उद्योग-व्यापार करायला आले तर त्यांना भविष्य आहे."

*थायलंडमध्ये* 'लॉय क्रॅथोंग' नावाचा एक सण असतो. या सणाच्या दिवशी थाई पानांच्या व फुलांच्या छोटया नावा करतात, त्यात आपली सारी दुःखे घालतात आणि त्या नावा नदीत किंवा नाल्यात सोडतात! रात्री या नावांत छोटया ज्योतीही तेवत असतात. भूतलावरची आपली दुःखे गंगार्पण करण्याची थाई लोकांची पद्धत मला फार आवडली हत्ती हा थायलंडचा राष्ट्रीय प्राणी आहे थाई विमानावर हत्तीचेच प्रतीक रंगवलेले असते. थायलंडमध्ये हत्तीचे सण साजरे होतात जंगलातील अनेक कामे हत्तींच्याकडून करून घेण्यात येतात.

बँकॉकमध्ये 'सामुक' हा शब्द फार लोकप्रिय आहे त्याचा अर्थ 'मौजमजाह' आहे असे मला कळले तेव्हा या गावाला तो अगदी तो अगदी सार्थपणे लागू पडतो हे मला पटले बँकॉकमध्ये चार दिवस आणि चार रात्री भरपूर मौजमजा करून मी हाँगकाँगकडे गेलो-पण पुन लवकरच बँकॉकला जाण्याची उमेद ठेवूनच.

□ □ □

## अनेक जागतिक विक्रम मोडणारे महानगर

# टोकियो

जगातील सर्वात मोठे शहर पश्चिमेकडे नसून पूर्वेकडे आहे त्याचे नाव टोकियो जपान या चिमुकल्या देशाची ही राजधानी. हे शहर अनेक चमत्कारांनी भरले आहे त्याने अनेक जागतिक विक्रम मोडले आहेत त्याची लोकसंख्या एक कोटी दहा लक्ष आहे पृथ्वीच्या पाठीवरील हे सर्वात अधिक मनुष्यवस्तीचे शहर आणि तरीही अत्यंत शिस्तबद्ध आहे लंडन, न्यूयॉर्क, शिकागो ही शहरेही अफाट आहेत पण टोकियोचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा सुसबद्ध अफाटपणा दर हजारी वृत्तपत्रांच्या खपात या शहराचा पहिला क्रमांक आहे 'असाही शिंबून' आणि 'माईनिची' या येथील दैनिकांचा रोजचा खप अनुक्रमे नव्वद लाख आणि सत्तर लाख आहे. जगातील हे सर्वात महाग शहर नारिता या आंतरराष्ट्रीय विमानतळा-वरून शहरांच्या कोणत्याही नजिकच्या ठिकाणी जाण्यासाठी टॅक्सीने किमान एक हजार रुपये पडतात आणि शहराच्या मध्यवर्ती भागातील दाई इची हॉटेलजवळ जाण्यासाठी किमान सोळाशे रुपये पडतात जिथे टिप् घेण्याची किंवा देण्याची अजिबात पद्धत नाही असा जपान हा एकमेव देश इटली, फ्रान्स इत्यादी देशात भक्कम टिपची जबरी वसुलीच होते माणसांची जास्तीत कामे जिथे यंत्रे करतात ते टोकियो शहर हे जगातील सर्वात प्रगत शहर आहे या शहरात भूकंपांचाही जागतिक विक्रम होतो. टोकियोत वर्षाला सुमारे तीनशे सूक्ष्म भूकंप होतात यंत्रा-शिवाय इतर मार्गांनी लोकाना त्यापैकी बहुतेक जाणवत नाहीत, एवढेच ! एकट्या टोकियो शहरात दररोज सातशे मुलांचा जन्म होतो. भात आणि मासे खाणे यात जपानी लोकाना बहुत दिलचस्पी आहे. या शहरातील लोक दररोज पंचाहत्तर लक्ष पौंड भात, चाळीस लक्ष पौंड मासे आणि साठ लक्ष पौंड इतर अन्न भक्षण

करतात. 'उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' या वचनावर त्यांचा अजिबात विश्वास नाही टोकियो हे उद्योगधंदे आणि व्यापार यांनी अत्यंत गजबजलेले शहर आणि तरीही जगातले सर्वांत कमी संप या शहरात होतात दर माणशी जास्तीत जास्त उत्पन्नाचा विक्रम टोकियोचाच आहे जगात सर्वांत जलद व कार्यक्षमपणे चालणाऱ्या आगगाड्या टोकियोत आहेत या शहरातील लोक दररोज नव्वद लक्ष रेल्वेतिकिटे खरेदी करतात जगातील हा सर्वांत गर्दीगाव असल्याने केवळ गर्दीमुळे कधीकधी घुसमटायला होते, म्हणून काही मोक्याच्या ठिकाणी शुद्ध ऑक्सिजन मिळण्याची सोय आहे.

टोकियो हे जगातले सर्वांत सुरक्षित असे शहर आहे. चोऱ्या, दरोडे, बलात्कार, खून इत्यादी गुन्हे इथे अगदी क्वचित होतात अशा गुन्ह्यांचे टोकियोतील प्रमाण जगातील सर्व शहरांत सर्वांत कमी आहे लोकांची समृद्धी हे त्याचे कारण नाही तसे पाहिले तर न्यूयॉर्क व शिकागो ही शहरेही भरपूर समृद्ध आहेत पण तिथले जीवन टोकियोच्या तुलनेने असुरक्षित आहे जपानी लोकांच्या मनावरचा बौद्ध धर्माचा खोल परिणाम हे टोकियोतील सुरक्षित जीवनाचे महत्त्वाचे कारण असावे टेलिफोन व टपाल यांच्या कार्यक्षमतेत टोकियोचा पहिला क्रमांक आहे जपानइतके सण व उत्सव इतर कोणत्याही देशात साजरे होत नाहीत वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस तर जपानमध्ये वर्षाला तीनशे पंचावन्न सण आहेत! अर्थात त्यातील काही सण प्रादेशिक असतात पण राजधानी टोकियोत निदान दर दिवसाआड कसला ना कसला सण कोणत्या ना कोणत्या भागात साजरा होत असतो

अवाढव्य व्यवहार आणि तरीही कार्यक्षम सुसबद्धता पाहायची तर टोकियोच्या भुयारी आगगाड्यांच्या फलाटावर काही वेळ काढावा गर्दी म्हणजे अगदी झिम्मड असते पण लोक रांगेने उभे असतात. गाडीचे दरवाजे नेमके कुठे येणार ते फलाटावर काढलेल्या पांढऱ्या बाणांनी दाखविलेले असतात त्या रेषावर लोक शांतपणे रांगेत उभे असतात उतरणारे प्रवासी उतरले की मगच ते आत प्रवेश करायला सुरुवात करतात प्रवासी चढल्यावर परवाजे बंद होतात आणि गाडी चालू होते कधीकधी प्रवासी गाडीच्या बाहेर असतात, तेव्हा त्यांना आत ढकलून दरवाजे बंद करण्याचा मार्ग खुला करण्यासाठी सज्ज असलेले, पांढरे हातमोजे घातलेले 'पुशर्स' फलाटावर सकाळी व संध्याकाळी—कचेरीच्या गर्दीच्या वेळी तयार असतात जगात सगळीकडे हे 'रश' अवर्स असतात, टोकियोत ते 'क्रश अवर्स' असतात पण ते क्रशिंगही अत्यंत योजनाबद्ध असते!

पॅरीसमध्ये इफेल टॉवर उभारला गेला त्यापूर्वीच लंडनमध्ये लंडन टॉवर होता मग टोकियो शहरच या बड्या शहरांच्या स्पर्धेत मागे कसे राहील? आशि-

यातील सर्वात उच टॉवर बांधण्याची योजना १९५५ साली टोकियोने आखली जून १९५७ मध्ये त्याच्या उभारणीस सुरुवात झाली

हा टॉवर लांबून पॅरीसच्या इफेल टॉवरसारखाच दिसतो पोलादी खांबांचा प्रचंड सांगाडा पण इफेल टॉवरपेक्षा या टॉवरचा अधिक चातुर्याने उपयोग करून घेण्यात आला आहे २३ डिसेंबर १९५८ रोजी 'टोकियो टॉवर' पूर्ण झाला या टॉवरवर मी गेलो तेव्हा टोकियो शहरावर पावसाची बारीक झिमझिम चालू होती आणि धुकेही पसरले होते त्यामुळे हे शहर मोठे काव्यमय दिसत होते न्यूयॉर्क-प्रमाणे या शहरात गगनचुंबी इमारती नाहीत याचे एक प्रमुख कारण म्हणजे इथे होणारे भूकंप तसेच टोकियोत कधीकधी वाऱ्याचे प्रचंड झोत वाहतात टोकियो टॉवरची उंची तीनशे–तेहतीस मीटर्स आहे वाऱ्याच्या झोतामुळे हा टॉवर झुकतो एका वादळाच्या वेळी हा टॉवर जास्तीत जास्त बत्तीस इंच झुकला होता वाद ळाचा ताशी वेग नव्वद मैल होता मुंबईतील टी व्ही टॉवर हा आशियातील दुसऱ्या क्रमांकाचा असून त्याची उंची तीनशे मीटर्स आहे पॅरीसच्या इफेल टॉवरला सात हजार टन पोलाद वापरले गेले पण टोकियोचा टॉवर त्यापेक्षाही उंच असूनही त्याला फक्त चार हजार टनच पोलाद वापरले गेले कारण जपानी शास्त्रज्ञांनी वजनाला हलके पण टिकायला बळकट असे नवे पोलाद शोधून काढले आहे टॉव-रचा रंग भगवा आणि पांढरा आहे सागरावरून येणाऱ्या खाऱ्या वाऱ्याने पोलाद गंजू नये म्हणून भगवा आणि धुक्याच्या वेळी विमानांना टॉवर स्पष्ट दिसावा म्हणून पांढरा रंग देण्यात आला आहे इफेल टॉवरवर मध्यभागी एक आणि त्यावर एक अशी दोन उपहारगृहेच तेवढी आहेत पण टोकियो टॉवरवर अनेक टेलिव्हिजन केंद्रे, रेडिओ केन्द्र, वेधशाळा, सरकारी माहिती केन्द्र, औद्योगिक कंपन्यांच्या शो-रूम्स, उपहारगृहे, मत्स्यालय अशा कित्येक सोयी आहेत

येथील वेधशाळेतून हवामानाचे अंदाज सतत घेतले जात असतात आणि आवश्यक तर धोक्याच्या सूचना ताबडतोब टी व्ही व रेडिओ केंद्राच्या साहाय्याने सबंध जपानभर आणि सभोवतालच्या सागरातील बोटींना पाठविण्यात येतात सर-कारी माहिती केंद्रात टोकियो व जपानबद्दलची माहिती व पुस्तिका मोफत देण्यात येतात टोकियो टॉवरचे चित्र असलेला कायमचा शिक्का इथे तुम्हाला तुमच्या शर्टावर किंवा रुमालावर मारून घेता येतो फुजी या जगप्रसिद्ध टेलिव्हिजन कंप-नीच्या गाळ्यात स्पेस कॅप्सूल, अवकाशयात्रा, वॅक्स म्युझियम वगैरे पाहण्याची सोय आहे

टोकियोचे सर्वात महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ म्हणजे जपानच्या सम्राटाचा राजवाडा सध्याच्या लोकशाहीच्या काळात जगात फारच थोडे राजे आणि सम्राट उरले आहेत पण त्यापैकी जपानच्या सम्राटांच्या वाट्याला प्रजाजनांची जी निष्ठा

आणि भक्ती आली आहे, ती इतर कोणत्याही राष्ट्रप्रमुखाला आलेली नाही. जपानचे सम्राट जेव्हा पार्लमेंटच्या (डिएट) उद्घाटनाच्या वेळी अगर त्याच्या वाढदिवसाला प्रजेला उद्देशून भाषण करतात, तेव्हा सर्वजण खाली मान घालून, उभे राहून ती भाषणे ऐकतात. कारण सम्राट हे त्यांना सूर्यसमान किंवा देवा-समान आहेत त्यांच्याकडे वर मान करून पाहण्याचे औधत्य प्रजाजनानी करायचे नसते अशी जपानची परपरा आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या राजघराण्यात जपानच्या सम्राटांचे घराणे हे सर्वात जुने आहे सध्याचे सम्राट हिरोहिटो हे या घराण्यातील एकशेचोविसावे सम्राट त्याचे आता ब्याऐंशीवे वर्ष चालू आहे जपानच्या सम्राटाची परपरा अडीच हजार वर्षे अप्रतिहत चालली आहे मात्र जपानच्या सम्राटाचा टोकियोतील वाडा तसा साधा आहे तो जेथे उभा आहे, त्याभोवती सुदर जलाशय, उद्याने वगैरे आहेत या ठिकाणी १४५६ साली सम्राटांनी पहिला किल्ला बांधला होता जपा-नची राजधानी क्योटो इथे होती, ती टोकियोला हलविण्यात आली टोकियोचे पहिले नाव इडो असे होते इडो म्हणजे पूर्वेकडची राजधानी त्या संदर्भात क्योटो ही पश्चिमेकडील राजधानी होती मात्र १८६८ पासून इडो किंवा टोकियो ही जपानची एकमेव राजधानी झाली आहे जपानचा राजवाडा म्हणून जो दाखवितात तो त्याचा अगदी लहानसा भाग हे जरी खरे असले तरी सम्राटाच्या वाढदिव-साला २१ एप्रिल रोजी हजारो जपानी लोक या आवारात मुक्तपणे जाऊ शकतात प्रत्यक्ष राजवाड्यापेक्षा आजूबाजूचा निसर्गसुदर व कलात्मक परिसरच मनावर अधिक मोहिनी टाकतो

टोकियोला जाऊन ज्याने गिंझा हा चैतन्यमय भाग पाहिला नाही त्याने पढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले नाही, असेच म्हटले पाहिजे न्युयॉर्कचे मॅनहटन, लडनचे पिकॅडली सर्कस, मुबईचे फ्लोरा फौंटन तसे टोकियोचे गिंझा हे फॅशन्स, उपहारगृहे, शॉपिंग सेंटर्स, करमणूक या सर्वांचे मध्यवर्ती प्रमुख केन्द्र इथे रात्रीच्या वेळी एवढा झगमगाट असतो की लास व्हेगसप्रमाणे इथेही रात्र आहे की दिवस आहे असा संभ्रम पडतो बहुतेक डिपार्टमेंटल स्टोअर्सना अभेद्य काचेच्या भिंती असतात त्यामुळे मध्यरात्रीही आपल्या दिव्याच्या झगमगाटामुळे ही प्रचड दुकाने उघडी असल्याचा भास होतो या गिंझा भागातलेही पन्हा अतर्भागातले मुख्य केंद्र म्हणजे 'मित्सुबिशी' या जगप्रसिद्ध कार्पोरेशनची 'सॅन ऐ' ही इमारत 'सॅन ऐ' म्हणजे तीन हिरे हे 'मित्सुबिशी' चे बोधचिन्ह आहे ही जगातील सर्वात मोठी कंपनी आहे. या कपनीची गिंझामधील इमारत गोल आहे, पधरा मजली आहे आणि तिच्या सर्व बाजूनी काचा लावल्या आहेत वरचा भाग झगझगीत दिव्यांचा असून तो फिरता आहे

या इमारतीत नव्या यंत्रयुगाचे अनेक चमत्कार पाहायला मिळतात मित्सु-बिशीच्या इलेक्ट्रॉनिक्स शोरूममध्ये खुर्चीवर बसल्याबरोबर पंखा व टी व्ही. ही सुरू होतो टोकियोत कुणालाही फोन केला, तर तिकडून बोलणाऱ्याचे रंगीत छाया-चित्र फोनजवळच्या तबकडीवर दिसते बोलणारा कॉम्प्युटर आहे त्याच्या समोर जाऊन कितीही अवघड गणित उच्चारले तर तो लगेच हिशेब करून उत्तर सांगतो

एक गणकतंत्रात तीनशे वाक्यांचे जपानी भाषांतर करण्याची सोय आहे 'या मालाची किंमत काय ?' – असे त्या यंत्रात आपण बोललो तर त्याचे भाषांतर करून तेच वाक्य गणकयंत्रातून जपानी भाषेत बाहेर पडते अमेरिकेचे प्रतीक म्हणून स्वातंत्र्यदेवीचा पुतळा दाखवला जातो, तसे जपानचे प्रतीक म्हणून अनेक प्रवासी कंपन्या मित्सुबिशीच्या या अमोल इमारतीचे छायाचित्र छापतात

मुंबईची महालक्ष्मी पाहावी तर नवरात्रात आणि त्यातूनही दसऱ्याला, तसेच गिंझाचे खरे चैतन्य दिसते ते रविवारी ! त्या दिवशी हा भाग वाहनांना पूर्णपणे बंद असतो त्यावेळी इथे अगदी चत्राच भरलेली असते. हजारो लोक बायकामुलां-सह अत्यंत निरुद्योगीपणे भटकत असतात त्याची आवडती खाद्य-पेये फूटपाथवर आणि उपहारगृहांत विपुलतेने उपलब्ध असतात मासे आणि तेही कच्चे मासे, भात हे जपानचे लोकप्रिय खाद्य व साके हे लाडके पेय साके हे इतर मद्यासारखे मोठ्या ग्लासातून ढोसायचे नसते. ते बकुळीच्या फुलासारखे नाजुक असते दीड-दोन चमचे भरतील एवढेच ते पेय छोट्या ग्लासात ओतून पुन्हा-पुन्हा भरून घेऊन निवांतपणे गप्पा मारीत सेवन करायचे, चवीने घ्यायचे, रसिकतेने प्यायचे परकी प्रवासी पसंत करतात रविवारी गिंझातल्या पदपथांवर हजारो खुर्च्या टाकलेल्या असतात त्यावर बसून वाहत्या जनप्रवाहाकडे पाहत प्रसन्नपणे बियर किंवा साके घेत तासचे तास काढायचे हा जपान्याचा आणि त्यांच्या सहवासाने परकीय प्रवाशांचाही आवडता छंद. या गजबजलेल्या गिंझा भागात आमचा एक मराठी कल्पक तरुण दोन भार-तीय उपहारगृहे चालवतो आहे त्याचे नाव बाळ देशमुख. उस्मानाबादचा हा उप-क्रमशील तरुण सोळा वर्षांपूर्वी बुद्धमंदिराला भेट देण्यासाठी म्हणून जपानमध्ये गेला तिथे वेटर म्हणून उपहारगृहात काम करू लागला. आता गिंझामध्ये त्याची 'गंगा' व 'यमुना' अशी दोन उपहारगृहे असून जपानमध्ये सपारो आणि ओकिनावा इथे त्याने आणखी दोन उपहारगृहे सुरू केली आहेत 'गिंझा' या जपानी शब्दाचा अर्थ रजत किंवा चांदी असा आहे एके काळी या भागात चांदी गाळण्याचे व चांदीच्या वस्तू तयार करण्याचे कारखाने होते त्यावरून त्याला 'गिंझा' हे नाव पडले आहे. आजही जडजवाहरांचा मोठा व्यापार या भागात होतो. जपानमधील सर्वांत खानदानी दुकाने याच भागात आहेत

पचिंको या खास जपानी खेळाचे प्रचंड हॉल्स गिंझामध्ये आहेत काही संबंध इमारतीच्या इमारतीच पचिन्कोला वाहिलेल्या आहेत हा जपानमधील सर्वात लोकप्रिय खेळ हा एकट्याने खेळायचा असतो. त्यामुळे रमी किंवा पत्त्याच्या इतर खेळासारखं इतराच्या सहकार्याची वाट पाहत बसावी लागत नाही मात्र हा खेळ आहे, जुगार नाही लास व्हेगसच्या जुगारी यंत्रासारखे हे यंत्र वाटते त्याचे तत्त्व व रचना जुगारीसारखी नसून अल्प किंमतीत वेळ घालवायची असते सुमारे शभर येन्सना (चार रुपये) गजग्याएवढे दहा छोटे गोळे मिळतात ते या यंत्रात घालायचे आणि बटण दाबायचे यंत्रातून गोळे खाली पडतात या यंत्रात शून्यापासून पाच, दहा, शभर, हजार असे आकडे असलेल्या खोबणी असतात त्यापैकी ज्या खोबणीत एखादा गोळा अडकेल, त्यातल्या आकड्याइतके गोळे खेळायला मिळतात मग पुन्हा खेळ सुरू काहीच परत आले नाही तर आणखी शभर येन्सचे नाणे टाकून गोळे घ्यायचे दहा–पधरा रुपयात दोन–तीन तास चांगले जातात खेळाच्या शेवटी जितके गोळे जमतील त्याची एखादी छोटी वस्तू मालकाकडून घेता येते रोख पैसे मिळत नाहीत म्हणूनच हा जुगार नव्हे–जरी याचे तत्त्व जुगारीचे असले तरी ! जपानमधील उत्पन्न आपल्या कमाल पधरापट आहे असे मानले तर वास्तविक रुपया दीड रुपयास दोन–तीन तास छान करमणूक पचिन्कोमध्ये निवृत्त लोक आणि घरकाम उरकून रिकामा वेळ घालविणाऱ्या गृहिणी यांची सख्या खूपच मोठी असते

याच गिंझामध्ये जपानमधील पारपारिक नाट्याचे सर्वोत्कृष्ट नमुने सादर करणारे 'कबुकी झा' हे कबुकी नाट्यगृह आहे याचा आकार खास जपानी पॅगोडा पद्धतीचा आहे जपानी नाटके दहा ते अकरा तास सतत चालतात कबुकी हे एकच नाटक नसून त्यात अनेक नाटके सादर केली जातात कबुकीत सर्व भूमिका पुरुषच करतात स्त्रियाना तेथे मज्जाव आहे नाटकातील स्त्री–पात्रांच्या भूमिकाही कोवळे नटच करतात शेकडो वर्षांपूर्वी, कबुकीच्या सुरुवातीला, स्त्रिया त्यात काम करीत पण कपनीचे नट व नटया याच्यात प्रेमप्रकरणे सुरू झाली आणि त्याचा नाट्यकलेवर प्रतिकूल परिणाम झाला, तेव्हापासून स्त्रियावर बदी घालण्यात आली त्याला उत्तर म्हणून अगदी अलीकडे जपानमध्ये 'सर्व स्त्रियाचे जपानी नाटक' हा प्रकार निघाला आहे गिंझामधील कबुकी झा हे नाट्यगृह बाहेरून पारपारिक व जुने वाटत असेल, तरी आतून ते न्यूयॉर्क–लडनच्या कोणत्याही पहिल्या क्रमांकाच्या नाट्यगृहाइतकेच सुसज्ज, वातानुकूलित व बादशाही आहे या पाच मजली भव्य नाट्यगृहात चार हजार प्रेक्षक एकाच वेळी बसू शकतात कबुकी नाटकात तीन–चार मध्यतरे असतात नाटकाचे मुख्य विषय सामुराई योध्यांचे पराक्रम, जपानच्या राजघराण्यांचे गुणसकीर्तन, प्रेमविवाह, खेड्यातून शहरात प्रथमच आलेल्या वावळट

प्रेमवीरांच्या गमतीजमती असे असतात काबुकीचा रंगमंच शंभर फूट लांब, चाळीस फूट उंच आणि साठ फूट खोल (फुटलाईटस्‌पासून शेवटपर्यंतचे अंतर) आहे, त्यावर एका वेळी शंभरपर्यंत कलावंत काम करू शकतात लांब अंतरावरून नाटक चांगले दिसावे म्हणून नाट्यगृहातर्फे दुर्बिणी पुरविण्याची सोय असते काबुकी ह्याचे तिकीट पंच्याऐंशी रुपयांपासून अडीचशे रुपयापर्यंत असते परकीय प्रवाशानी आपला पासपोर्ट दाखवला तर थोडी सवलतही मिळते

गिंझा भागातील धमाल गडबडीच्या अगदी विरुद्ध टोकाचे, शांत–निवांत ठिकाण म्हणजे 'मेईजी पार्क' आणि 'मेईजी मंदिर ' सम्राट मेईजी यांनी जपानचा कायापालट केला १८६८ ते १९१२ हा त्याचा काळ आजचा संपन्न, पराक्रमी आणि कलात्मक जपानचा पाया सम्राट मेईजी यांनीच घातला त्यांच्या थोर कार्याला साजेसे असेच हे मेईजी उद्यान व त्यामधील मेईजी मंदिर आहेत या उद्यानात शिरल्यावर पाच–दहा मिनिटातच आपण इतक्या गर्द झाडीत येतो की, टोकियोसारख्या जगातील सर्वात गजबजलेल्या शहरात आपण आहोत हे खरेच वाटत नाही हे भव्य उद्यान एकशे पंचाहत्तर एकर व्यापणारे आहे यावरून त्याच्या विस्ताराची कल्पना येईल जपानमधील सर्व भागातून मिळतील तितक्या प्रकारची रोपे आणून येथे वृक्षांच्या राई करण्यात आल्या आहेत वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासकाला ही मोठीच पर्वणी आहे पण सर्वसामान्य माणसालाही नेत्रांना व मनाला आनंद देणारी ही वृक्षसंपत्ती अविस्मरणीय वाटेल मंदिर म्हणजे केवळ एखादी इमारत नव्हे, तर त्या मंदिराचा आसमंतही प्रसन्न व सुंदर असला पाहिजे आणि विशेष म्हणजे त्याच्या आसपास भरपूर मोकळी जागा असली पाहिजे हे जपानी लोकांचे वैशिष्ट्य मला मेईजी पार्कप्रमाणेच कानाकुरा व इतर अनेक बुद्धमंदिरात आढळले

जपानमधील मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ 'तोरी' नावाची एक उंच कमान असते दोन चपट्या उंच फळ्यावर एक आडवी फळी मारून ही कमान केलेली असते मंदिरात जाण्यापूर्वी पादत्राणे काढून व हात–पाय धुऊन आत जाण्याची पद्धत आहे मेईजी मंदिर हे पॅगोडा पद्धतीचे भव्य पण साधे, भगव्या रंगाचे आहे आपल्याप्रमाणेच भगवा हा जपानमध्येही विरक्तीचा रंग आहे थायलंडमधील बुद्ध धर्मोपदेशकांच्या वस्त्राचा रंग भगव्यात पिवळा मिसळलेला असतो. लहान मुलाला जपानमध्ये प्रथम घरातून बाहेर नेतात ते बुद्धमंदिरात मेईजी बुद्धमंदिरात ! हा आपल्याकडच्या बारशासारखा किंवा ख्रिस्त धर्मातील ख्रिस्चनिंगसारखा समारंभ होतो. यावेळी मुलाचे आई–वडील, आजी व आजोबा आणि इतर नातेवाईक असतात बौद्ध धर्मोपदेश मुलासाठी देवाची प्रार्थना करतो आणि आशीर्वाद देतो बाहेर विमाने, मोटारी, बंगले, कारखाने यांचा मालक असताना जपानी कोट्या-

धीश जेव्हा मेईजीसारख्या बुद्ध मंदिरात येतो, तेव्हा अत्यंत साधे कपडे घालून येतो, गुडघे टेकून लीन होतो व प्रार्थना–चिंतन करतो. मेईजी मंदिरात आपल्या मुलाला आशीर्वाद मिळावा म्हणून दहा–बारा दिवसांच्या इवल्याशा जिवाला हातात आडवे घेऊन शांतपणे वाट पाहणाऱ्या बाळंतिणींच्या रांगा हे जपानमधील अत्यंत उदात्त आणि वत्सल दृश्य आहे

टोकियोतील दोन खास प्रेक्षणीय स्थळे म्हणजे अलीकडेच सुरू झालेले डिस्ने लँड आहे आणि ओर्लँडो येथे डिस्नेवर्ल्ड आहे. त्यात साहस विभाग, ऐतिहासिक विभाग, विज्ञान विभाग, उद्याचे जग असे एकेक भाग आहेत त्याच धर्तीवर टोकियोतही डिस्नेलँड' सुरू करण्यात आले आहे आबालवृद्धांना हे अत्यंत मनोरंजक व उद्बोधक वाटेल मात्र त्यासाठी सबंध दिवस राखून ठेवावा लागेल दुसरे आकर्षण म्हणजे, यु उनो झू. हे प्राणीसंग्रहालय इतके विशाल आहे की ते सबंध पाहण्यासाठी पायपीट करणे कठीण आहे म्हणून त्यात छोटी आगगाडी (मोनो–रेल) ठेवण्यात आली आहे. पंतप्रधान पं जवाहरलाल नेहरू यांनी या प्राणी संग्रहालयाला हत्तीचे एक पिल्लू भेट म्हणून पाठवले होते ती हत्तीण होती आणि तिचे नाव इंदिरा असे होते या हत्तिणीबरोबर पं नेहरूंनी जपानी मुलांना पाठविलेल्या पत्रात म्हटले होते 'हत्ती हा भारतीय मुलांचा अत्यंत लाडका प्राणी आहे तुम्हालाही तो आवडेल हत्ती हा शांत, शक्तिमान आणि तरीही सौजन्यपूर्ण वागणारा प्राणी आहे टोकियोचे नवे नॅशनल म्युझियम १९३७ साली पूर्ण करण्यात आले. या जागी पूर्वी इंपिरियल हाऊसहोल्ड म्युझियम होते पण एका मोठ्या भूकंपात त्याची खूपच मोडतोड झाली म्हणून ते पाडून पुन्हा उभारण्यात आले त्यात नऊ हजार वर्षांपूर्वीपासून आधुनिक जपानच्या अनेक दुर्मिळ वस्तू ठेवण्यात आल्या आहेत आठव्या शतकातील जपानी कपडे, जुनी शस्त्रे, कापडावरील चित्रे, जिंबुरी (चिलखतावर वापरण्याचा कोट), बुद्धापुढे धूप पेटविण्याच्या मोठ्या नक्षीदार कढया, पुष्परचना इत्यादींचे उत्तम नमुने पाहायला मिळतात या म्युझियमच्या मागे विशाल जपानी उद्यान आणि एक सुंदर तळे आहे एका दालनात लांबलचक कापडी पट्ट्यावर जुन्या सामुराईंच्या साहसकथा व काही विनोदी कथा रंगीत चित्रांतून दाखविल्या आहेत आजच्या 'कॉमिक्स' ची ही जगातील पहिली सुरुवात आहे त्यातील काही चित्र-

जोपासल्या जातात

कालक्षेत्रात टोकियोत केवळ जुन्या परंपराच जोपासल्या जातात
तर आधुनिक कलेचीही उत्तम कदर करण्यात येते, हे 'म्युझियम ऑफ मॉडर्न आर्ट'-
ला भेट दिल्यावर पटते सौंदर्य हे जपानचे एक अविभाज्य अंग आहे याची साक्ष
म्हणजे आधुनिक कलांचे निवडक नमुने असलेले हे वस्तुसंग्रहालय आहे मात्र आधु-

निक जपानी कलेवर पाश्चात्य आधुनिक कलेचा परिणाम झालेला नसून पारंपारिक जपानी कलेतूनच ती फुलली आहे ब्रिडास्टोन टायर कंपनीचे धनाढ्य व कलारसिक मालक श्री इशिबाशी यांचे खाजगी वस्तुसंग्रहालय जनतेसाठी खुले आहे त्यात मॉने, रेन्वा, गेगा, पिकासो, गॉगिन, व्हॅनगॉग या पाश्चात्य चित्रकारांच्या निवडक जगप्रसिद्ध कलाकृती आहेत किटाकू भागातील 'पेपर म्युझियम' हे एक दुर्मिळ असे वस्तुसंग्रहालय आहे गेली चौदाशे वर्षे जपानमध्ये हाताने कागद बनविण्याचा व्यवसाय चालू आहे केवळ लिहिण्यासाठी किंवा चित्रे व कविता काढण्यासाठीच नव्हे तर जपानमध्ये कागदाचे इतर किती उद्योग केले जात होते व आहेत याची कल्पना हे वेगळे प्रदर्शन पाहून येते. बंदुकीची दारू साठविण्यासाठी, हॅट्स तयार करण्यासाठी, अंगरखे व कमिनोसाठी, दिवे तयार करण्यासाठी व भांडी म्हणूनही कागदाचा वापर जपानमध्ये गेली चौदाशे वर्षे चालू आहे.

असाकुसा कॅनन मंदिर हे टोकियोतील एक अत्यंत प्रसिद्ध व रमणीय बुद्ध मंदिर आहे. ते तेराशे वर्षांचे जुने आहे १९४३ साली जुने मंदिर हवाई हल्ल्यात भग्न झाले, तेव्हा १९४५ साली पुनर्रचना करण्यात आली या मंदिराच्या आवारातील वातावरण नेहमी मोठ्या जत्रेसारखे अत्यंत उत्साही आणि प्रसन्न असते. मंदिरापर्यंत जाणाऱ्या लांबलचक रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खेळण्याची, कपड्यांची व इतर वस्तूंची दुकाने आहेत खेळण्यांच्या दुकानांत मी काही कुत्रे पाहिले, ते अविस्मरणीय होते हे यांत्रिक कुत्रे शेपूट हलवतात, चालतात, भुंकतात आणि जीभ बाहेर काढतात. लांबून ते अगदी हुबेहूब खऱ्या कुत्र्यांसारखे वाटतात. मंदिराच्या प्रशांत आवारात एका विहिरीवर थंड पाण्याने हात-पाय धुण्याची व्यवस्था आहे. त्यापुढे एका मोठ्या ब्रांझच्या कुंडात अग्निहोत्र आहे त्यातून निघणारा पवित्र धूर जपानी लोक हातावर व तोंडावर भक्तिभावाने घेतात आपल्याकडे कीर्तनाच्या शेवटी धूर घेतात तसाच हा प्रकार आहे मंदिराच्या विस्तीर्ण आवारात अनेक बुद्ध भिक्षू भविष्याच्या छापील चिठ्ठ्या जपानी भाविकांना देत असतात. जपानी लोक विज्ञानात एवढे पुढारलेले, पण सर्वसामान्य जपानी माणसाचा भविष्यावर जबरदस्त विश्वास. तो भिक्षूंना दक्षिणा देऊन आपल्या भविष्यकाळात काय लिहिले आहे त्याबद्दलची छापील नळकांडीसारखी चिठ्ठी भिक्षूकडून घेतो मंदिराच्या तक्तपोशीवर चिनी ड्रॅगन्स आणि जपानी सुंदरी यांची देखणी चित्रे काढलेली आहेत. या मंदिरातील अग्निहोत्राच्या धुराचे एक वैशिष्ट्य आहे ते असे की एखाद्याच्या शरीराच्या एखाद्या भागाला दुखापत झाली किंवा तो दुखू लागला तर जपानी लोक हा धूर त्या भागावर घेतात. देवाच्या कृपेमुळे या धुरात तो भाग बरा करण्याची शक्ती येते असे जपानी भक्त मानतात

कोराकुवेन उद्यान हे खास जपानी पद्धतीचे उत्कृष्ट उद्यान सम्राटांच्या

राजवाड्याजवळ आहे टोकियोत उद्याने आणि बुद्ध मंदिरे विमुक्त प्रमाणात आहेत. मात्र या सार्वजनिक ठिकाणीच काय पण जपानमध्ये इतरत्र कोठेही भिकारी दिसणार नाही की अस्वच्छता दिसणार नाही भिकारी, अस्वच्छता आणि लोभी पुजारी यांनी आपल्या देशातील मंदिरांचे पावित्र्य आणि सौंदर्य इतके भ्रष्ट करून टाकले आहे की आप या धार्मिक स्थळांना भेट देणे ही अनेकदा मनस्तापाची बाब होऊन बसते जपानमध्ये असा प्रकार कुठेही आढळणार नाही कोराकुवेन उद्यान हे केवळ जपानी उद्यान नाही. त्यात बेसबॉलचे भव्य स्टेडियम आहे त्यात चौतीस हजार लोकांची बसण्याची सोय आहे पोहण्याचा तलाव आहे आणि मुलांचे खेळ असलेला 'अम्युजमेंट पार्क 'ही आहे सतराव्या शतकातील सरदार योरिकुसा टोकुगवा यानी या उद्यानाच्या कामाला सुरुवात केली. सतरा एकर पसरलेले हे कोराकुवेन उद्यान म्हणजे टोकियोचे एक अभिमानास्पद लेणं आहे

या उद्यानाजवळची कोडोकाम ही सिमेंट कॉंक्रीटची इमारत म्हणजे जुडो या जगभर लोकप्रिय झालेल्या संरक्षक युद्धकलेची मुख्य कचेरी आहे. अनेक देशातून इथे जुडोचे शिक्षण घेण्यासाठी तरुण खेळाडू येत असतात. जुडोचे शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचीही येथे सोय आहे या इमारतीत जुडोचे शिक्षण कसे चालते हे प्रेक्षकांना मोफत पाहता यावे म्हणून हॉलच्या वर एक बाल्कनी बांधली आहे १९५८ साली पन्नास लक्ष रुपये खर्च करून जुडोचे हे जागतिक केंद्र उभारण्यात आले आहे हिबिया पार्क हे आणखी एक रमणीय उद्यान. त्यातील एका भागाला 'ड्रीम गार्डन' हे समर्पक नाव देण्यात आले आहे त्या स्वप्न–उद्यानात उडत्या कारंजाजवळ तुम्ही उभे राहिलात, तर तिथे उभे असलेले छायाचित्रकार लगेच तुमचे छायाचित्र घेतील आणि दोन मिनिटांतच ते तुम्हाला अत्यंत अल्प किंमतीत देतील शिजुकु उद्यान हे पूर्वी जपानच्या सम्राटांच्या मालकीचे होते. गेल्या महायुद्धानंतर ते त्यांनी जनतेस बहाल केले महायुद्धापूर्वी या बागेत सम्राटांच्या तर्फे दरसाल नोव्हेंबरमध्ये ख्रिसॅन्थिनम् फुलांना बहर येतो तेव्हा खास पार्टी देण्यात येत असे. आता या बागेत दोन छोटेखानी उपहारगृहे आहेत त्यात उघड्यावर मांडलेल्या खुर्च्या–टेबलावर बसून तळलेले मासे व साके मद्य घेत निसर्गशोभेचे रसग्रहण करण्यात फारच मौज येते.

टेलिफोनच्या बाबतीत टोकियोइतके कार्यक्षम शहर जगात दुसरे नाही टोकियोत चार रंगांचे सार्वजनिक फोन असतात लाल रंगाच्या फोनमध्ये दहा येनचे एक नाणे टाकले तर टोकियोत कोठेही तीन मिनिटांपर्यंत बोलता येते तीन मिनिटे होण्यापूर्वी काही सेकंद इशाऱ्याची घंटा वाजते ती वाजल्याबरोबर आणखी दहा येनचे नाणे टाकायचे म्हणजे पुन्हा तीन मिनिटे बोलता येते. लाल व भगव्या रंगाच्या फोनमध्ये दहा येनची दहापर्यंत नाणी टाकता येतात, म्हणजे अर्धा तासपर्यंत बोलता येते पिवळ्या व निळ्या रंगाच्या फोनमध्ये फक्त शंभर येनची नाणी

चालतात ती टोकियो बाहेर जपानमध्ये कुठेही फोन करण्याकरता चालतात. कोणत्या शहराला किती नाणी लागतात व त्यासाठी कोणता कोड नंबर फिरवायचा ही माहिती फोनजवळच्या डिरेक्टरीत असते किंवा 'एन्क्वायरी'ला विचारता येते कोणत्या क्रमांकावर इंग्रजीभाषिक ऑपरेटर्स आहेत, हेही टेलिफोन डिरेक्टरीत दिलेले असते जपानचे टपाल खाते तर इतके कार्यक्षम आहे, की ज्यांची पत्रे व मनिऑर्डर्स वगैरे अपुऱ्या अगर चुकीच्या पत्त्यामुळे पोचत्या करता येत नाहीत, त्यांची नावे वृत्तपत्रांत प्रसिद्ध करून हे टपाल खाते त्यांना ठराविक पोस्टातून पत्रे वगैरे घेऊन जा अशी विनती करते तुम्हाला आपल्या मित्राचा पत्ता माहीत आहे, पण तिथे कसे जायचे आहे हे माहीत नसेल तर १०४ हा टेलिफोन क्रमांक फिरवून तुम्ही मार्गदर्शन घेऊ शकता. टोकियोत उद्योग–व्यापार किंवा सहल–सफर यासाठी इंग्रजी, फ्रेंच, जर्मन अशा परकीय भाषाचे ज्ञान असणाऱ्या जपानी मुली भाषांतराचे काम करण्यासाठी मिळतात. त्यासाठी फोन क्रमांक ०३–५८२–४२२४ हा फिरवावा ११० क्रमांक फिरविल्यास पोलीस तुमच्या मदतीसाठी येतील.

टोकियोत प्रचंड आणि अवाढव्य अशी अनेक प्रेक्षणीय स्थळे असली, तरी माझे सर्वांत आवडते ठिकाण म्हणजे शिबुया स्टेशनसमोरचा एका कुत्र्याचा पुतळा ! तो पाहून मला शिवाजी महाराजांच्या स्वामिनिष्ठ खंड्या कुत्र्याची आठवण झाली महायुद्धाच्या काळात टोकियोमधील एक कर्मचारी दररोज आपल्या कुत्र्याबरोबर या शिबुया स्टेशनपर्यंत चालत यायचा आपला मालक गर्दीतून दिसेनासा होईपर्यंत कुत्रा त्याच्याकडे पाहत राही आणि मग घरी जाई सध्याकाळी मालक रेल्वेने यायची वेळ झाली, की हा इमानी कुत्रा शिबुया स्टेशनसमोर ठराविक जागी उभा राहायचा एक दिवस मालक आपल्या कचेरीत असतानाच दुर्दैवाने त्याचे हृदय-विकाराच्या झटक्याने निधन झाले. पण हा कुत्रा मात्र रोजच्यासारखा सध्याकाळी ठरलेल्या जागी उभा राहून मालकाची वाट पाहू लागला. मालक आला नाही, तेव्हा त्या कुत्र्याने अन्नपाणी सोडले त्या ठरलेल्या जागेवरून तो शेवटपर्यंत हलला नाही अखेर तेथेच त्याचे निधन झाले मालकाच्या नातेवाईकांनी व मित्रांनी त्याच ठिकाणी या कुत्र्याचा पुतळा उभा केला. त्या इमानी कुत्र्याचे नाव 'हचिन्को' टोकियो महापालिकेने आता या हचिन्को स्मारकाच्या आसपास बाके ठेवली आहेत, बाग केली आहे टोकियोतील प्रेमिकांचे आणि इतर स्नेह्यांचे हे आता अधिकृत सकेतस्थान झाले आहे. आपल्या प्रेयसीची, प्रियकराची किंवा स्नेह्याची वाट पाहत या बाकांवर बसलेले शेकडो लोक या चौकात दिसतात. केवळ एकमेकाची वाट पाहणाऱ्यांची एवढी सोय जगातल्या इतर कोणत्याही महापालिकेने केली नसेल

टोकियोचे रात्रीचे जीवन अत्यंत रंगेल, रंगेल आणि टवटवीत आहे या शहरात अतिश्रीमंत लोक राहतात आणि धनाढ्य परकीय प्रवासी जिवाचे टोकियो करायला येतात हे एक कारण आहे. पण त्यापेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे

जपानच्या उद्योगधंद्याच्या रचनेत सापडते ते कारण असे की, तेथील कारखानदार आणि व्यापारी आपल्या प्रतिनिधींना कंपनीच्या गिऱ्हाईकाशी वाटाघाटी करण्याकरता म्हणून नाईट क्लबचा खर्च कंपनीतर्फे देतात कलात्मक वातावरणात व्यापाराची बोलणी केली तर अधिक फायदेशीर ठरतात हा अनुभव असल्याने आणि प्राप्तीकराच्या रूपाने सरकारला पैसा देण्यापेक्षा आपल्याच अधिकाऱ्यावर व गिऱ्हाईकांवर तोच पैसा खर्च करून कंपनीचा व नोकराचाही फायदा करून घ्यावा असा हा दृष्टिकोन असतो त्यामुळे एका महत्त्वाच्या वाटाघाटीसाठी पन्नास हजार रुपये सहज खर्च करणारे अधिकारीही टोकियोत असतात आणि ही बिले आनंदाने भरणाऱ्या कंपन्याही असतात जपानमधील नव्हे, जगातील सर्व नाईट क्लब्जचा मुकुटमणी शोभेल असा ' मिकाडो ' हा नाईट क्लब टोकियोत आहे. मी न्यूयॉर्क, पॅरीस, लंडन अशा अनेक शहरातील उंची नाईट क्लब्ज पाहिले आहेत, पण मिकाडोची सर एकाही क्लबला नाही. इतका प्रशांत, महाग, वैभवशाली आणि रसिक नाईट क्लब जगाच्या पाठीवर दुसरा नाही या क्लबमध्ये प्रवेश फीच अडीच हजार रुपये आहे शिवाय क्लबमध्ये येणाऱ्या प्रत्येक पुरुषाने ' होस्टेस ' किंवा मैत्रिणीची संगत घेतलीच पाहिजे तिचे अडीच हजार रुपये अर्थात त्या पुरुषानेच द्यायचे. कोणी आपल्या पत्नीबरोबर मैत्रिणीबरोबर या क्लबात आला, तरीही त्याला ' होस्टेस ' घ्यावीच लागते या होस्टेस ऊर्फ कपॅनियनबरोबर मग मद्य, जेवण वगैरेचा खर्च वेगळा कंपनीच्या एखाद्या आर्थिक व्यवहाराच्या चर्चेसाठी दोन मित्र नेले तर त्या प्रत्येकाला एक अशा तीन मैत्रिणी व तीन पुरुष यांचा पहिला खर्चच पंधरा हजार रुपये झाला ! या होस्टेसेस् दिसायला असामान्य लावण्यवती असतात. शिवाय अनेक उद्योगधंदे, व्यापार, जागतिक घडामोडी या विषयांवर नाजुक गप्पा मारण्यापुरते त्यांचे ज्ञान अद्ययावत असते.

मिकाडोच्या एका बाजूला भव्य रंगमंच आहे. त्यावर ' फ्लोअर शो ' म्हणजे अर्धनग्न युवतींचे नृत्यगायन चालू असतेच शिवाय जेथे हे रसिक लोक बसतात, त्यांच्या व वरच्या तक्तपोशीच्या मध्ये अधांतरी एक मोनोरेलसारखी पट्टी असते, तीवरही निवडक अशा जपानी तरुणी जवळजवळ अनावृत्त होऊन नृत्य करीत असतात अशा या मदनोत्सवात लक्षाधीश व कोट्याधीश जपानी आणि परकीय उद्योगपती व व्यापारी अब्जावधी डॉलर्सचे व्यवहार निश्चित करीत असतात जवळ लुसलुशीत तरुणी सहवासासाठी बसली आहे, टेबलावर मद्याचा पूर वाहतो आहे, आसपास मादक सुंदरी नृत्याचा पिंगा घालीत आहेत अशा वेळी कोणी इशिदा टाकोडा अमेरिकन जॉन टिंबर्गला कोट्यावधी डॉलर्सच्या मोटारींची, पोलादाची किंवा गणकयंत्राची विक्री करीत असतो जपानी कंपनी हवे ते भारी बिल देणार असते पण या दोघांचेही लक्ष आजूबाजूच्या मत्त प्रमदांकडे अथवा वारुणीकडे नसते

तर आपल्या कॉर्पोरेशनला या व्यवहारात अधिक फायदा कसा मिळेल या एकाच बाबीकडे असते मिकाडो नाईट क्लबच्या बाल्कनीत बसून अर्ध्या जगावर औद्योगिक राज्य करणाऱ्याच्या या गंमतीजमती पाहण्याची मौज ज्याने एकदा पाहिली, त्याला ती जन्मभर विसरता येणार नाही सबंध नाईट क्लबच नव्हे तर 'प्रसाधनगृहे' ही उंची जपानी मद सुगंधांनी भारलेली असतात

मिकाडोसारखेच रात्रीच्या टोकियोतील आणखी एक अविस्मरणीय स्थळ म्हणजे 'निचिजेकी म्युझिक हॉल !' मात्र नावावरून वाटते तसे हे केवळ संगीताचे सभागृह नाही तर संगीत, नृत्ये, भव्य देखावे आणि उत्तमोत्तम बांध्याच्या जपानी तरुणींच्या कसबी कलेची कमाल दाखविणारा एक बादशाही नाईट क्लबच आहे. पॅरीस येथील 'मर्लाँरूझ' या जगप्रसिद्ध नाईटक्लबसारखाच हाही आहे. त्यात 'रेव्ह्यू'सारखे खेळ सादर केले जातात रेव्ह्यू म्हणजे अनेक दृश्यांची मालिका, पण त्यातील एका दृश्याचा दुसऱ्याशी संबंध नसतो पॅरीस'च्या रेव्ह्यूत विनोदी प्रहसनाला भरपूर स्थान आहे पण निचिजेकीत मादक नृत्ये, संगीत, रंगीबेरंगी प्रकाशाची किमया, भव्य दृश्ये यांची अधिक बरसात आहे 'स्टेज क्रॅफ्ट' किंवा रंगमंचाचे कसब यांचीही इथे खैरात होते. म्हणजे रंगमंच सरकता तर आहेच, पण या रंगमंचाचा मधला दहा-बारा फुटांचा वर्तुळाकार भाग मंचाच्या पातळीखाली जातो आणि नव्या नर्तकींना घेऊन वर येतो उदाहरणार्थ या नाईटक्लबमध्ये मी एक रेनबो नृत्य पाहिले त्यात इंद्रधनुष्याच्या सात रंगांत अनेक मदमस्त तरुणी अंगावरचे कपडे काढून स्नान करतात, नृत्य—गायन करतात असे दाखविले होते. इंद्रधनुष्याची राणी म्हणून जपानमधील जगप्रसिद्ध सौंदर्यसम्राज्ञी सॅगिरी सुजाका जेव्हा रंगमंचावर येते तेव्हा तिच्या शरीराची प्रमाणबद्धता, नितळ कांती नि अलौकिक सौंदर्य पाहून प्रेक्षक थक्क होतात. विविध नृत्ये व संगीत यांचा सुमारे दोन तासांचा एक असे तीन कार्यक्रम निचिजेकी म्युझिक हॉलमध्ये दररोज सादर केले जातात व त्यात सुमारे चाळीस जपानी तरुणी भाग घेतात निचिजेकीचे तिकीट तीन हजार येन्स आहे. कार्यक्रमाच्या वेळा २–३०, ४–४० व ६–५० याशिवाय गिंझा विभागातील 'क्लब मायको' आणि 'कॅबेरे मॉंटेकार्लो' हे कलात्मक नृत्य संगीताच्या कार्यक्रमाबद्दल प्रसिद्ध आहेत. अकासका विभागात क्लब पेन हाऊस, कॉर्डन ब्ल्यू, शिंजीकूमध्ये क्लबली आणि रॉपोंगी विभागात क्लब फॉन्टॅना व क्लब मोरेना हे टोकियोचे खास नाईट क्लब्ज आहेत इंपीरीयलसारख्या फाईव्हस्टार हॉटेल्समध्येही दररोज रात्री कॅबेरेचे खेळ चाललेले असतात

जपान म्हटले की गैशा हा विषय अपरिहार्यपणे येतोच ! मात्र थोडे दिवस मौज करण्यासाठी टोकियोला आलेल्या प्रवाशाला गैशा हा लांबून कुतूहलाने पाहण्या-चाच प्रकार असतो कारण गैशा ही रूढ अर्थाची वेश्या नव्हे. ती 'कपॅनियन' किंवा सहेली असते व तीही दीर्घकाळाची किंवा आयुष्यभर एकाबरोबर नसली तरी एका-

साठी राहणारी. एकाबरोबर म्हणजे एकाच माणसाच्या घरात गैशा ही स्वतंत्र राहते तिची राहणी खानदानी असते तिच्याकडे ' आव जाव तुम्हारा घर ' असा प्रकार नसतो गैशाचे प्रशिक्षण फार कष्टाचे आणि दीर्घ असते तिला नृत्य, संगीत, नाटक, साहित्य, चित्रकला इत्यादींत नैपुण्य संपादून पुरुषाला सतत प्रसन्न राखण्याची कला अवगत करून घ्यावी लागते परदेशातून टोकियोला आलेल्या प्रवाशांना गैशाची झलक दाखविण्याची सोय स्थानिक प्रवासी कंपन्यांनी केलेली आहे 'मारसुक्या' सारख्या गैशागृहात तीन हजार येन्स प्रवेश फी देऊन गैशाच्या बरोबर मद्यपान करता येते त्या थोडा वेळ तुमच्याशी बोलतात, तुमच्यासाठी नृत्य व गायन करतात आणि तासाभराचा सहवास–तोही कलात्मक देऊन ' सायोनारा ' करतात म्हणजे निरोप घेतात. मात्र जपानी लक्षाधीश कारखानदार व व्यापारी बहुधा एखाद्या गैशाशी कायमचा घरोबा करतात. तिचे घर ते चालवतात गैशाचे व त्या कारखानदाराच्या बायकोचे संबंधही स्नेहाचे असतात गैशाची मुले कारखानदारांच्या मुलांच्याबरोबर खेळतात, त्यांच्यात मिसळतात आणि दोन्ही घरे अगदी समान पातळीवर चालतात उद्योगधंद्यात काम करून थकलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गैशाच्या सहवासात आपला थकवा विसरावा व जिवाची करमणूक करून घ्यावी यात जपानी समाजाला आणि त्या उद्योगपतीच्या पत्नीलाही काही गैर वाटत नाही

टोकियो हे शहर आणि जपानी लोक मला अतिशय आवडले एक तर एवढे अवाढव्य महानगर, पण अगदी नीटनेटके, स्वच्छ, टापटिपीचे मुंबई, कलकत्ता यांची अस्वच्छता इथ अजिबात दिसत नाही जगड्व्याळ कारभार असूनही बसेस, आगगाड्या व टेलिफोन, वाहतूक, हॉटेल्स यांची व्यवस्था अगदी आदर्श ! कुठेही, कसलीही फसवणुकीची, खिसेकापूची किंवा चोरांची भीती नाही रस्त्यात कसलेही अमंगल दृश्य दिसणार नाही कुणी पान खाऊन पचापच थुंकतो आहे किंवा लघुशंका करतो आहे असे कधी नजरेला येणार नाही लोक अत्यंत नम्र, सौजन्यशील, मदत करायला नेहमी तयार; माणुसकी जपणारे सर्वत्र असतात. दुकानात छोटी वस्तू, पुस्तक, फार काय पोस्टकार्ड विकायचे तरी ते सुबक पाकिटात घालून मिळेल. जपानी लोकांचा दीर्घोद्योग केवळ अपूर्व आहे जगात इतरत्र कुठेही सतत उद्योग करणारे आणि आपल्या कामात स्वतःला वाहून घेणारे लोक आढळणार नाहीत याचे एक काहीसे अतिरेकी पण गमतीदार उदाहरण मला टोकियोत दिसले माझ्या एका मराठी भाषिक मित्राने मला एक टॉयलेट पेपर दाखविला त्यावर जपानीतून इंग्रजी शब्द शिकण्याची सोय होती ! 'नृत्य' या अर्थाचा जपानी शब्द, इंग्रजी शब्द आणि नर्तिकेचे चित्र असे सुमारे शंभर शब्द त्या टॉयलेट पेपरवर छापले होते. म्हणजे 'प्रसाधनगृहात'ही वेळ वाया जाऊ नये, तेवढ्यात जपानी माणसाला इंग्रजी भाषेचे ज्ञान घेता यावे !

जपानमध्ये दारूबंदी नाही पण अतिमद्यपान करून कोणी धुंद झाला आहे, रस्त्यात पडला आहे असे दृश्य कधीही आढळणार नाही साके हे मद्य लहानपणापासूनच जपानी लोक घेतात माञ त्यात वाहून जाऊन कामाकडे दुर्लक्ष होत नाही पाश्चात्य संस्कृतीतील उपयुक्त ते घेतले म्हणून जपानची परंपरा व धर्म यांचा जपानी लोकाना विसर पडलेला नाही रस्ते, उद्याने, सार्वजनिक दिवे, दुकाने, मंदिरे, मद्यपानगृहे, हॉटेल या सर्वांत खास जपानी कलादृष्टी दिसते अर्थातच टोकियोतून फेरफटका करणाऱ्याला अतिशय प्रसन्न वाटते. चेरी ब्लॉसम (चेरीच्या फुलांचा मोसम) अधिकृतपणे साजरा करण्यात स्वत. सम्राट भाग घेतात बौद्ध धर्माबरोबरच बहुतेक जपानी लोकांनी शिंटो या धर्माचाही स्वीकार केला आहे. निसर्गपूजा हे शिंटो धर्माचे खास वैशिष्टय आहे जपानी लोकांचे निसर्गप्रेम व कलादृष्टी यांचे रहस्य या शिंटो धर्माच्या स्वीकारात आहे मुलींना लहानपणापासून संगीत, चित्रकला नृत्य यांचे शिक्षण देण्यात येते तसेच मुलांना युद्धकलेचे शिक्षणही प्रथमपासून देण्यात येते. विज्ञानात आघाडीवर असणाऱ्या या देशात सम्राटापासून हमालापर्यंत जवळ–जवळ प्रत्येकजण 'हायकू' सारख्या कविता करतो आणि जीवनातली काव्यात्म दृष्टी जागती ठेवतो अशा आल्हाददायक देशाच्या रसिक, जगड्व्याळ व सुसबद्ध राजधानी टोकियोतले दिवस हे कालाच्या लाटानी न पुसणारे ठरावेत यात काय आश्चर्य !

□ □ □

REFBK-0024200

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८७६
प्रा. क्र. २७२००
ग्रंथ शाखा

# रमेश मंत्री यांचे साहित्य

**विनोद**

१. साखरेची चित्रे २. वाटाण्याच्या अक्षता ३. खसखशीचा मळा ४ कोल्हापुरी चिवडा ५ साखरपेरणी ६ एक हाती टाळी ७ बायकांचा राग ८. सह्याद्रीची चोरी ९ दहीहंडी १० जनू बांडे ११ रुखवत १२ कागदी वाघ १३ चोरवाटा १४ विनोबा अमरकोश १५ ताजा कलम १६ कोल्हयाची द्राक्षे १७. हास्यधारा १८ थट्टामस्करी १९ सूर्याची पिले २० पळसाला पाने पाच २१ स्वल्पविराम २२. हलके–फुलके २३ आपलेच दात आणि दुसऱ्याचे ओठ २४ निवडक मंत्री २५. हसवाहसवी २६ विनोदी महाराष्ट्र २७ वाघाचा पुलाव २८. जॅकपॉट २९ हास्यपूर्णा ३० हजार हास्यक्रिया ३१. बायकोवर दात ३२. साप्ताहिकी ३३ हास्यरुचिरा ३४ हेमालिनीचा हंगामा ३५ मावशी हरवली ३६ तिरकस तिरदाजी ३७ एलिझाबेथ टेलर आणि मी ३८ गंमत काय झाली

**नाटक आणि नाटिका**

३९ वरातीमागून घोड ४० करीन ती पश्चिम ४१ नवऱ्याला हवी मैत्रीण ४२. हनिमून झालाच पाहिजे ४३. शहाणीला भेटला दीडशहाणा ४४ चदेरी ४५. शेजाऱ्यावर प्रेम करा. ४६. चटकचांदणी ४७. हासविता धनी ४८ पुरुषांना आवडतात बायका ४९. मृगजळ ५०. लक्षाधीश ५१ ज्ञानाचे इंजेक्शन ५२ विदूषक कॉलेज ५३ लांबनाक्यांचा देश ५४ बोल बोल म्हणता

**कादंबरी**

५५ तुमच्या पायी ठेविले मन ५६. महानगर ५७ अक्षर ५८. उत्तरकाल ५९. बारा लाखात जगाची सफर ६० स्वप्नसुंदरी ६१. मुंबई ते बाडुंग

**प्रवासवर्णन**

६२ थंडीचे दिवस ६३ नवरंग ६४ क्षणाचा प्रवासी ६५ सुखाचे दिवस ६६ ओ कलकत्ता ६७ सुखाच्या रात्री ६८. सागरकन्या ६९ बहरीचे दिवस ७० सूर्यपुत्रांचा देश ७१ तरंगणारे शहर ७२ दिशांतर

**ललित गद्य**

७३ विझणारी आग ७४. हे अद्भुत जग

**कथा** ७५. अखेरची शिकार

**प्रबंध** ७६. वृत्तपत्रव्यवसाय

**बालवाङ्मय** ७७ सजीवचा वाढदिवस ७८. मुलांची जागतिक राजधानी ७९. एक रुपयात हत्ती ८०. वाघाची फजिती. ८१ हत्तीकाका घरी आले.